मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.


स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुररस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत



अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

युगवाणी

संपादक डॉ. सुलभा हेर्लेकर

।। विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र।।

।। भाषा, साहित्य संस्कृती, संवाद व कलाविषयक अभिरुचीचे जोपासन, संवर्धन–संशोधन ।।

कार्यकारी संपादक डॉ. प्रमोद मुनघाटे

संपादक मंडळ प्रा. मदन धनकर । डॉ. ज्योती लांजेवार । प्रा. कृष्ण चौधरी । प्रा. शा. वा. स्दान

अनुक्रम

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अंशतः अनुदान प्राप्त.
या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

मुखपृष्ठ संजय धोतरकर मूल्य ४०.०० रुपये फक्त

संपादकीय व्यवहार : संपादक, युगवाणी, वि.सा.संघ, झाशी राणी चौक, नागपूर १२ / भाष : ५२३९२९

प्रकाशक मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर १२.

अनुक्रमणिका

संपादकीय

विदर्भ साहित्य संघाचे हे अमृत–महोत्सवी वर्ष ! याच वर्षात 'युगवाणी'च्या संपादनाचे काम माझ्याकडे आले हे मी माझे भाग्य समजते. याच वेळेस हे काम किती जबाबदारीचे आहे हेही लक्षात आले. साहित्याचा व्यासंगी वर्ग 'युगवाणी'ला चाहतो याचे कारणच मुळी समाजाचा वाङमयीन दर्जा आणि त्यांची अभिरूची जोपासून दीर्घकालीन साहित्यिक मूल्यांवर त्याचे अधिष्ठान आहे. 'युगवाणी' हे विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र असले तरी तिच्या वाङ्मयीन स्वरूपाला प्रदेशाच्या मर्यादा नाहीत. आज २१ व्या शतकाकडे वाटचाल करताना माणसाच्या जीवनाभोवती जो समस्यांचा, जीवन खचविल्या जाणाऱ्या गोष्टींचा फेर धरल्या गेलाय् त्या अस्वस्थतेच्या काळात एका नियतकालिकाला ठामपणे उभे राहायचेय. पण आर्थिक दृष्टया कोंडी झाल्यामुळे युगवाणीचे मागील २ -३. वर्षांचे अंक निघू शकले नाहीत. तरीही १९९७ चा अंक हा वाङम्यीन संदर्भानी युक्त असा दर्जेदार काढण्याचा प्रयत्न झाला आहे.

मराठीतील ज्येष्ठ कादंबरीकार, समीक्षक, आणि पत्रकार कै. ग. त्र्यं. माडखोलकर यांचे हे जन्मशताब्दी वर्ष. विदर्भ साहित्य संघाची उभारणी आणि एकूणच मराठी साहित्य, संस्कृती आणि सामाजिक चळवळीतील कै. भाऊसाहेब माडखोलकर यांचे योगदान लक्षात घेता 'युगवाणी'चा माडखोलकर विशेषांक निघणे अपरिहार्यच नव्हे तर तो विदर्भ, महाराष्ट्राच्या अभिमानाचा विषय आहे. कारण नुसत्या विदर्भातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात त्यांचे, वाङम्यीन क्षेत्रात व पत्रकारितेत मोठे योगदान आहे. म्हणून १९९८ चा हा पहिलाच अंक कै. माडखोलकर विशेषांक म्हणून प्रसिद्ध करीत आहोत.

सद्यपरिस्थितीत वास्तवाचे स्वरूप तसे निराशाजनकच आहे. आपले व्यक्तिजीवन, कुटुंबाचे व समाजाचे जीवन यांच्यात एक अंतर्बाह्य ताणतणावाचा पडदा आला आहे. असे हे जीवनविश्व अस्वस्थ करणारे आणि जाणत्यांना अंतर्मुख करणारेही आहे. इथे काळोखाचेच जग आहे की काय असे वाटावे इतपत माणसाला परिस्थितीचा अंधार ग्रासून टाकतोय. चित्रात दिसावी तशी नुसती भासमान हिरवळ आहे. असंख्य लोकांच्या गर्दीतही फक्त हरवलेपणाचा अनुभव येतोय आणि माणसांचे दिशाहीन प्रवाह अस्वस्थ करताहेत. परदेशातील वास्तव्यामुळे निर्यात झालेले सांस्कृतिक तुटलेपणाचे प्रश्न, उद्योजकांच्या स्पर्धा, स्वार्थी व भ्रष्टाचारी वृत्ती, स्वतःचे कर्तृत्व घडवू बघणाऱ्या बुद्धिमान स्त्रिया त्यांचे प्रश्न, तुटत चाललेली जिव्हाळयाची, रक्ताची नाती, उमलत्या पिढीचे प्रश्न, संगणकामुळे एकूणच संस्कार होणे कठीण असे प्रश्न, एकाकी होत जाणारी मुलें आणि वृद्धापकाळाच्या अंधारात पिचणारा मध्यमवर्ग या साऱ्याच गोष्टी पराभूत वाटाव्या अशाच आहेत. या पार्श्वभूमीवर साहित्य तेवढेच दिलासा देणारे असते. पण त्यातही अस्तित्ववाद, नवअस्तित्वाद, समाजवाद, कलावाद या वादांनी साहित्यप्रवाहात हलचल माजवली आहे. तरीही 'युगवाणी' सारखे एखादे नियतकालिक साहित्याच्या मूल्यप्रेरणा, मूळ धारणा जपून ठेवण्याचा प्रयत्न करते आहे.

साहित्याची चांगली मूल्ये ही जीवनाच्या चांगल्या आकलनातूनच सिद्ध होत असतात. कै. माडखोलकरांच्या सिद्धहस्त लेखणीतून उमटलेल्या कादंबरी व पत्रकारिता या दोन प्रकारांना आजही वाचक त्याच पूर्वीच्या वेडाने जवळ करतो. मराठीतील कादंबरी, पत्रकारिता, समीक्षा या प्रकारात माडखोलकरांचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. वाचनीयता, वास्तवाचा नेमका अर्थ सांगणारी शैली, सूक्ष्म व सर्वांगीण निरीक्षण, कल्पनांचा व प्रतिमांचा वापर, काटेकोर शब्दकळा या सारख्या गुणविशेषांनी माडखोलकरांचे साहित्य श्रीमंत झालेले आहे.

कै. ना. सी. फडके, कै. वि. स. खांडेकर व कै. भाऊसाहेब माडखोलकर हे तिघेही समकालीन साहित्यिक असले तरी त्या प्रत्येकाची स्वतःची अशी खास वैशिष्टये आहेत. राजकीय कादंबरी लिहून माडखोलकरानी शोकात्म वास्तववादाशी जवळीकच साधली होती. माडखोलकरांना तत्कालीन कुटील राजनीतीवर कोरडे ओढायचे होते. त्यासाठी त्यांनी कादंबरी हे माध्यम वापरले. त्यामुळेच या अंकात या वैशिष्टयांखेरीज काही नवीन प्रकाश टाकता येईल असेही लेख घेण्याचा एक प्रयत्न केला आहे. माडखोलकरांच्या त्रिदल कादंबरीवर एक नवा प्रकाश एका लेखात टाकलेला आहे. तर याच त्रिदल कादंबरीचा आधार घेऊन स्त्रीमुक्ती, स्त्रीवाद या संदर्भात डॉ. अश्विनी धोंगडे यांनी स्त्रियांच्या दृष्टिकोनाचा एक नवीन विचार मांडून प्रश्न निर्माण केले आहेत. या अंकाच्या निमित्ताने डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर यांनीही कादंबरी प्रवाहाचा एक दीर्घ आलेखच आपल्या लेखात चित्रित करून सर्व प्रवाहांची योग्य दखल घेतली आहे.

माडखोलकरांचा सहवास लाभलेले ज्येष्ठ साहित्यिक स. मा. गर्गे यांनी माडखोलकरांच्या पत्रकारितेवर आपले विचार व्यक्त केले आहेत, तर तरुण भारत या वृत्तपत्राचे माजी संपादक श्री. मा. गो. वैद्य व श्री. दि. भा. घुमरे या दोघांनीही त्यांच्या अग्रलेखांच्या व मृत्युलेखांचा महत्त्वपूर्ण आलेख मांडला आहे. माडखोलकरांवरील काही महत्त्वाचे लेख पुनर्मुद्रित केले आहेत. डॉ. अरुणा देशमुख यांनी समीक्षेचे एक वेगळे आकलन आपल्या लेखात मांडलेय तेही महत्त्वपूर्ण आहे. डॉ. उषाताई देशमुखांनी भाऊसाहेबांच्या आठवणींना उजाळ दिला आहे. माडखोलकरकन्या, विजयराव देशमुख कमलाकर धारप इ. न्तीही आठवणीरूप लेख लिहून भाऊसाहेबांच्या व्यक्तिविशेषांवर प्रकाश टाकला आहे. अर्थातच माडखोलकरांवरील सर्वच अंगानी लेख आम्ही देऊ शकलो नाही. महत्त्वाचे वाङ्मयीन प्रवाह व त्यांच्या महत्त्वपूर्ण लेखनाच्या अनुषंगानेच जागेच्या मर्यादेत जेवढे लेख घेता आलेत तेवढे दिले आहे. त्यात काही दोष असतील, अपूर्णताही जाणवेल, त्याची जबाबदारी अर्थातच आमची ! पण थोडीफार, अंकाला सफलता मिळाली असेल तर त्याचे सारे श्रेय लेखक, वाचकांचेच राहील.

अंक तयार करण्याच्या संदर्भात, प्रथमपासूनच कार्यकारिणीने सर्वतोपरी मदतीचा हात दिला. त्यातही साक्षेपी माजी 'युगवाणी'चे संपादक श्री. वामन तेलंग यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. कार्यकारी संपादक डॉ. प्रमोद मुनघाटे यांचेही सहकार्य होतेच. विषय निवडीचे श्रेय त्यांचेच !

सुलभा हेर्लेकर

अनुक्रमणिका

जयघोष

ही वेगाने धावणारी
पांढरी शुभ्र सकाळ
आवेगाने घट्ट मिठी मारीत
मला विचारत आहे;
ही पांढरी बगळयांची रांग
आकाशात
कुठे धाव घेत आहे ?
कुणास ठाऊक, पृथ्वीवरील
सारे ऋतू पुसून टाकून
कुणा जीवनावर
पांढरा शेला तर
पांघरीत नाहीय् ?
कदाचित असेही असेल,
कुणाच्या तरी आत्म्याचा जयघोष
आभाळाकडे झेपावत असेल

सुलभा हेर्लेकर

(कै. भाऊसाहेब माडखोलकरांवरील तरुण भारत माडखोलकर पुरवणी मधील कविता, १९७६, 'पहाटपक्षी' या काव्य संग्रहातून)

अनुक्रमणिका

श्री. ग. त्र्यं. माडखोलकर

कै. नरहर कुरुंदकर

माडखोलकरांचा स्वतःचा असा एक फार मोठा मित्रपरिवार आहे. समाजाच्या विविध थरांतील व्यक्तींचा आणि भिन्न भिन्न तीव्र सामाजिक, राजकीय मते असणाऱ्या मंडळींचा एवढा मोठा परिवार त्यांनी आपल्याभोवती गोळा केलेला आहे की, त्यातील विविधता पाहून मन थक्क होऊन जावे. त्यांच्याजवळ कोणते तरी गुण असल्याशिवाय ही लहान–मोठी माणसे त्यांना अशी चिकटली नसती. एवढा मोठा मित्रांचा परिवार असूनही सर्वसाधारणपणे त्यांच्याविषयी लोकमत प्रतिकूल आहे. कारणे असल्याशिवाय उगीच कुणाच्याविषयी कुणी प्रतिकूल मत बनविणार नाही. मला असे वाटते की, एवढा मोठा मित्रपरिवार असूनही माडखोलकर हे मोठ्या प्रमाणात सर्वत्र परके आहेत. काही अशी ते स्वतः या परकेपणाला कारणीभूत आहेत. हे मलाच जाणवते असे नाही. माडखोलकरांच्या निकट मित्रानाही जाणवते. श्रीमती शांताबाई कशाळकर यांचा आणि माझा काही वर्षे गाढ ऋणानुबंध राहिला. त्या वेळी शांताबाई साठ वर्षांच्या होत्या. मी अजून वीस वर्षांचाही झालो नव्हतो. पण, एखाद्या तरुणाने तरुणीच्या प्रेमात सापडावे आणि तास न् तास तिच्या सहवासात स्वतःला हरवून घ्यावे, तसे आम्हाला शांताबाईंनी जिंकले होते. एखाद्या मातृतुल्य सखीविषयी कशाळकरांचे आकर्षण मला होते. शांताबाई सांगत, त्यांचा आणि माडखोलकरांचा प्रदीर्घ असा बंधुभगिनीसंबंध आहे. शांताबाई माडखोलकरांना 'भाऊराया' म्हणून संबोधूनच पत्र पाठवीत असत. त्या म्हणायच्या, ''माणसे एका विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे एकमेकांच्या जवळ येऊच शकत नाहीत. एक मर्यादा सोडल्यानंतर उरलेला भाग एकमेकांना अज्ञात राहतो.'' तसे अटळ राहणे अपरिहार्य आहे. हा अटळ वेगळेपणा पति–पत्नीतही असतो. खरा प्रश्न या वेगळेपणाचा नाही. खरा प्रश्न व्यक्तींना परस्परांच्याविषयी काय वाटते, या जाणिवेचा असतो. एखाद्याच्या विषयी आपल्याला असे वाटते की, तो अगदी आपला झाला आहे. एखाद्याविषयी आपल्याला असे वाटते की, हा जुना परिचित खरा आणि याचा आपला ऋणानुबंधही खरा, पण तो कुठे तरी परका आहे. माडखोलकरांच्या निकट सहवासातील मंडळींनाही ते काही प्रमाणात परकेच वाटत राहिले. श्री. शांताबाईंनी आपली साक्ष दिलेली नाही. जर दिली असती, तर त्यांनीही अशीच दिली असती.

हे परकेपण माडखोलकरांच्यावर त्यांच्या परिस्थितीमुळे लादलेले आहे. त्यांचे मूळ घराणे गोव्याचे. आयुष्याचा पूर्वार्ध मुंबई, पुण्यात गेला. आणि पुढे ऐन पंचविशीपासून ते जे विदर्भात आले, ते आज पन्नास वर्षे विदर्भातच आहेत. विदर्भाच्या दृष्टीने माडखोलकर विदर्भाचे फार मोठे साहित्यसेवक, पत्रकार आणि विदर्भाच्या हिताच्या प्रत्येक प्रश्नावर विदर्भाची बाजू घेऊन भांडणारे म्हणजे आपले आहेत. पण, या आपलेपणात, हा खरा आपला नव्हे, हा पश्चिम महाराष्ट्राचा आहे, ही परकेपणाची जाणीव शिल्लकच आहे. ही जाणीव, संयुक्त महाराष्ट्राबाबत त्यांनी जी आग्रही भूमिका घेतली, त्यामुळे बळकट झालेली आहे. खरे म्हणजे महाराष्ट्राच्या काँग्रेस पक्षातही माडखोलकर कधी नव्हते. ते मंत्रिमंडळातही नव्हते आणि

नाहीत पण विदर्भात कमी जास्त काही घडले की, दोषारोप महाराष्ट्र राज्याच्या माथ्यावर ठेवला जातो. स्वाभाविकपणे महाराष्ट्र राज्याला दोषी धरीत असताना, लोक माडखोलकरांनाही दोषी धरतातच. पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भ यांना एकत्र सांधणारा बलवान दुवा म्हणून माडखोलकर वागत राहिले. त्यामुळे विदर्भाच्या जनतेला–विदर्भातील संयुक्त महाराष्ट्रवाद्यांनाही, हा आपला नव्हे, हे जाणवतच असते.

हाच प्रकार उलट्या बाजूने पश्चिम महाराष्ट्राचा आहे. पश्चिम महाराष्ट्र त्यांना विदर्भाचा प्रतिनिधी समजतो. माडखोलकर वृत्तपत्रकार असल्यामुळे त्यांना अधून मधून काही लिहावेच लागते. वृत्तपत्रकारांच्या लेखणीत जसा भडकपणा असतो, तसा माडखोलकरांच्या जवळ नाही. त्यांना 'संदेशकार' कोल्हटकर किंवा आचार्य अत्रे या संपादकांच्या रांगेत कुणी बसवणार नाही. नाटकी, भडक, अतिरंजित अशी लेखणी त्यांनी वृत्तपत्राच्या क्षेत्रात सजविली नाही. त्यांचे वृत्तपत्रीय लिखाण पुरेसे थंड असते. पण या थंडपणात खोलवर जिव्हारी घाव घालण्याची शक्ती आहे त्यामुळे माडखोलकर अशी जखम करून जातात, जी जन्मभर कधी बुजत नाही. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या वेळी त्यांनी जाहीर रीतीने असा प्रश्न विचारला की, "हे मराठी राज्य होणार का मराठा राज्य होणार ?" या प्रश्नाने झालेली जखम, आज बारा वर्षे झाली तरी, सतत चिघळती राहिली आहे. अत्र्यांचे शिव्याशाप, त्यांची आक्रस्ताळी भाषा, त्यांनी दिलेली दूषणे काही दिवसांनी लोक विसरून जात. माडखोलकर असे कुणाला विसरता येणारे नाहीत. आपल्या प्रदीर्घ वृत्तपत्रीय जीवनात त्यांनी जखमी केलेली खूप माणसे आहेत. हे त्यांच्या लेखणीचे सामर्थ्य आहे, जे सतत माडखोलकरांच्याविषयी प्रतिकूल बोलण्यास लोकांना उद्युक्त करते. म्हणून माडखोलकर पश्चिम महाराष्ट्र व विदर्भ या दोन्ही ठिकाणी परके आहेत. कोणताच राजकीय पक्ष त्यांच्याविषयी उचंबळून बोलणार नाही.

माडखोलकरांनी आपल्या या कंगोरेदारपणाची मोठी किंमत मोजलेली आहे. गांधीजींच्यावरील त्यांच्या लिखाणाचा परिणाम पुढे कैक वर्षांनी 'तरुण भारत' जाळण्यात झाला. माडखोलकरांच्या या वागणुकीमुळे इतर काही नसले तरी एक गोष्ट निश्चित आहे की, इतर सारी मंडळी राजमान्य झाली. पन्नाशीतील साहित्यिकांप्यापर्यंत पदव्या आल्या त्यांचे समकालीन पद्मभूषण झाले. माडखोलकरांना तो योग येण्याचा संभव नाही, इतके त्यांच्याविषयी वातावरण पक्के प्रतिकूल आहे.

शिवाय माडखोलकर हे सततचे उद्योगी गृहस्थ. दैनिकाचा प्रचंड व्याप सांभाळून त्यांचे वाचन व टीकात्मक लिखाण चालूच असते. त्यातून उरलेल्या वेळात कादंबऱ्या चालू असतात. राजकारणाच्या अंतर्गोटात त्यांचा वावर असतो. तिथे ओठ घट्ट मिटून त्यांनी अनेक गोष्टी टिपलेल्या असतात. माडखोलकरांना घट्ट ओठ मिटून बसण्याची सवय आहे. त्यांच्याजवळ आपले रहस्य मोकळे केले तर फुटणार नाही, अशी अनेकांना खात्री असते. मोठ्या विश्वासाने वाङमयीन, सामाजिक व राजकीय जीवनातील व्यक्तींनी आपले रहस्य त्यांच्याजवळ दिले. या असल्या प्रकारच्या माहितीचा फार मोठा साठा माडखोलकरांच्या जवळ आहे. पण देणाऱ्याने हे रहस्य या विश्वासाने स्वाधीन केलेले असते की, त्याचा गैरवापर केला जाणार नाही माडखोलकरांनी आपल्या स्मृतीच्या कोशात दशकानुदशके ही रहस्ये जतन केली. त्यांचा अनाठायी गैरवापर कधी केला नाही. ज्या व्यक्तींची वर्मे त्यांना माहिती होती, त्यांच्याही विरोधात टीका–प्रतिटीकेला ते मधून मधून उभे राहिले पण ज्ञात रहस्ये उघडी करून कंबरेखाली वार त्यांनी केला नाही.

असा उद्योगी माणूस सर्वांना विपुलपणे गप्पा मारण्यासाठी उपलब्ध नसतो. म्हणून माडखोलकर निष्कारण वेळ खाणाऱ्या माणसाला चटकन झटकून टाकतात. त्यांच्या वाचन, लेखन, विश्रांतीच्या वेळा ठरलेल्या आहेत. भलत्या वेळी आलेला माणूस त्यांना चालत नाही. कानांवर आख्यायिका अशी आहे की, ते घरी असूनही आपल्या ठराविक वेळेपेक्षा इतर वेळी लोकांना भेट देत नाहीत. हा सर्वसामान्यांच्या मते एक तुसडेपणाचा भाग असतो. उद्योगी माणसांना निष्कारण वेळ खाणारी प्रकरणे झटकून टाकावीच लागतात. याहीमुळे खूप मोठे शत्रू होतात. माणसाचा स्वभाव मोठा गमतीचा आहे. जो कान उघडे ठेवतो आणि ओठ बंद ठेवतो, त्याच्याजवळ विश्वासाने माणूस आपले रहस्य मोकळे करतो.

पण, अशा ओठ वद ठेवणाऱ्याच्या विषयी तो सपूर्णपणे आपला आहे, अशी खात्री कुणालाच वाटत नाही. त्याच्याविषयी परकेपणा राहातोच. लोकांना वाटते, आपल्या आवडत्या साहित्यिकाने खूप वाचावे, खूप लिहावे शिवाय त्यांना असेही वाटते की, आपण जाऊ तेव्हा वाटेल तितका वेळ त्याने गप्पा मारीत बसावे. या दोन बाबी विसंवादी आहेत, असे जाणवतच नाही.

लोक माडखोलकरांच्या विषयी सतत प्रतिकूल बोलत असतात, याची माझ्या लक्षात आलेली ही काही परिस्थितिजन्य कारणे आहेत. सगळी कारणे इतकीच असणार नाहीत. कोण्या तरी निकट व्यक्तिगत सबंध असणाऱ्या सुहृदाने त्यांच्या वैयक्तिक गुणदोषांचाही काही खुलासा केला पाहिजे. डॉ. सुनील सुभेदारांसारखे सुहृद या विषयावर लिहिण्याचे अधिकारी आहेत. त्यात मी पडणार नाही

जेव्हापासून मी विचार करू लागलो, त्या मते फुटण्याच्या आरंभकाळी माडखोलकराच्या विषयी सतत प्रतिकूल बोलण्याची इच्छा माझ्याही मनात उसळी मारत असे. ज्यानी मला जीवन समजावून घेण्यास शिकवले, त्या गुरुजनांनी माझ्या या पद्धतीचा वटकन निषेध केला माझ्या आठवणीप्रमाणे, हैद्राबादला 'नागकन्या' या कादंबरीवर, ती अश्लील आहे, असा एक साहित्यिक अभियोग ठरविण्यात आला होता. ही कादंबरी अश्लील आहे या बाजूने अर्थातच आम्ही मंडळी होतो. खरे म्हणजे ती अश्लील आहे, असा गवगवा असल्यामुळेच आम्ही सोळा–सतरा वर्षाच्या मुलांनी ती ताबडतोब वाचून काढलेली होती. ठरल्याप्रमाणे कार्यक्रम झाला. अनुकूल, प्रतिकूल बाजूने साक्षी व वकिलांच्या जबान्या झाल्या. आणि असा हा कार्यक्रम संपल्यानंतर आमचे सारे ज्येष्ठ वाङमयीन नेते, माडखेलकरांच्या विषयी बोलण्याच्या ऐवजी, कार्यक्रम कसा झाला, यावरच बोलू लागले मला राहावले नाही. म्हणून, शेवटी एका जणाजवळ मी माझे मन मोकळे करून विचारले, "ही अशी चर्चा काय करता ? शेवटी माडखोलकराना अश्लीलतेच्या गुन्ह्यातून मुक्त करण्यासाठी म्हणून तुम्ही हा कार्यक्रम ठेवला होता काय ?" मला अनपेक्षितपणे असे विचारण्यात आले की, "अश्लीलतेचा खटला 'नागकन्या' कादंबरीवरच का भरला, हे तुला कळते काय ?" मी म्हटले, "तुम्ही सांगा. ते म्हणाले, "असे कार्यक्रम कादबरीवर चौरस चर्चा व्हावी यासाठी असतात. ते लेखकाला शिक्षा देण्यासाठी नसतात. माडखोलकर आपले आहेत, म्हणूनच त्यांच्यावर हा खटला भरण्यात आला आहे."

मला ही गोष्ट लवकर समजणे कठीण गेले. पण तिथे एक गोष्ट मी शिकलो, ती म्हणजे, माडखोलकर आपले आहेत. आमच्या मराठवाड्याच्या पद्धतीनुसार सांगायचे, तर आम्हाला माहीत असलेले आणि नसलेले त्यांचे सर्व गुणदोष लक्षात घेऊन, आम्ही त्यांना आपले मानतो. हळूहळू या आपुलकीची कारणे मला समजू लागली. आज वयाने खूपच मोठा झाल्यानंतर माझे हे मत आहे की, आमच्या ज्येष्ठांचा हा निर्णय बरोबर होता. आम्ही माडखोलकरांशी भांडू, त्यांच्या कादंबऱ्या एकदम रद्दी आहेत असा निर्णय देऊ, त्यांच्या सर्व विचारांचे खंडन करू, पण ते आमचे आहेत हे विसरू शकणार नाही. उलट, त्यांच्या खंडनाच्या लिखाणाला त्यांनीच आशीर्वाद द्यावा, असा आग्रह धरू, कारण ते आमचे आहेत. या ममत्वसंबंधाला वैचारिक मतभेदांचा अडथळा येण्याचा संभव अजिबात नाही. कारण या ममत्वाचा उगम इतरत्र कुठे तरी आहे. पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भ माडखोलकरांना कसा ओळखतो, ते त्यांनी सांगावे. आम्ही कसे ओळखतो, ते आम्ही सांगू.

एक दिवस असा होता, ज्या दिवशी मराठवाड्यावर निझामाचे राज्य होते. या ठिकाणी चौथीच्यापुढे मराठी माध्यम नव्हते. सगळा राज्यकारभार उर्दूतून चालत होता. सर्व शासन आक्रमक मुस्लिम जातीयवादाने संपूर्णपणे भरलेले होते. अशा त्या अंधाऱ्या वातावरणात जेव्हा मराठवाड्यात अस्मितेची ज्योत जागी झाली, त्या काळी ही सगळी अस्मिता दोन–तीन मार्गांनी प्रकट होत होती. एक तर महाराष्ट्र परिषदांच्या रूपाने राजकीय जागृती चालू होती आणि आमच्याजवळ महत्त्वाचे कोणतेही वर्तमानपत्र नव्हते. इथे काय चालू आहे, हे बाहेर कळतच नव्हते. आम्हाला बाहेर कुणी कौतुक करणारा, धीर देणारा, प्रोत्साहन देणारा नव्हता. आमच्याकडे काही फार महत्त्वाचे घडत होते, अशातला भाग नाही. कुठे चार माणसे जमत, एखादे वाचनालय उघडीत. कुठे एखाद्या शाळेच्या स्नेहसंमेलनासारखा कार्यक्रम होई. एखाद्या नवोदित वक्ता

कुठे निबंध वाची, एखादे व्याख्यान देई. या साऱ्यांच्या प्रसिद्धीची काही सोयच नव्हती. अशा त्या अंधारयुगात जे दोन–तीन तुरळक आधार आम्हाला होते, त्यांत माडखोलकर एक होते. माडखोलकरांच्या नियतकालिकात मराठवाड्यातील वातम्यांना–मग त्या कितीही सामान्य असोत–आवर्जून प्रसिद्धी मिळे. मराठवाड्यातील लेखकांना मधून मधून लेख लिहिण्याची संधी मिळे. मराठवाड्यात फार मोठे, महाराष्ट्र दिपवून टाकणारे लेखक त्याही वेळी फारसे नव्हते. पण, कुठे थोडेही चांगले दिसले, तर त्यावर माडखोलकरांच्या नियतकालिकात निश्चित अभिप्राय येई. मराठवाड्यातील सर्व साहित्यप्रेमीयांना, पोलिस ॲक्शन होईपावेतो, माडखोलकर हा आधार होता.

आणि माडखोलकरांनी कधीही या साऱ्या उपेक्षित भागातील साहित्यिकांना अवहेलनेने वागविले नाही. माडखोलकर आपल्यावर दया करीत आहेत, आपल्याला उत्तेजन आणि प्रोत्साहन देत आहेत, अशी न्यूनगंडाची भावनाही त्यांनी जाणवू दिली नाही. ते मराठवाड्यातील सर्व साहित्यप्रेमीयांचे बरोबरीचे मित्र राहिले. या घटनेचे महत्त्व आमच्या मंडळींनी अचूक ओळखले होते. म्हणून ते माडखोलकरांना आपले मानीत. पुढे मराठवाडा साहित्य परिषदेचे कामकाज सुरू करण्याची धडपड सुरू झाली पहिले आणि दुसरे निजामप्रांतीय मराठी साहित्य संमेलन झाले. पण संमेलने व्हावीत आणि जोम ओसरून जावा, असेच घडू लागले. मराठवाडा साहित्य परिषदेच्या तिसऱ्या अधिवेशनाचे अध्यक्ष माडखोलकर होते. माडखोलकर आले आणि तीन दिवस संमेलन आटोपून परत गेले, असे घडले नाही. संमेलन संपल्यावर ते पुन्हा मराठवाड्यात आले. त्यांनी मराठवाड्यात व्यापक असा दौरा काढला. ठिकठिकाणी व्याख्याने दिली. मराठवाडा साहित्य परिषदेचे एका साहित्य संघटनेत रूपांतर केले. एका प्रतिकूल परिस्थितीत निझामी राजवटीत त्यांनी वाङ्मयाच्या द्वारे एक नवा हुरूप व उत्साह दिला. मराठवाडा साहित्य परिषदेची मांडामांड प्रथमतः त्यांच्या हातची आहे. पोलिस ॲक्शननंतर नव्या वातावरणात या संघटनेची फेरमांडणी प्रो. रा. ब. माढेकर, श्री न. शे. पोहनेकर आणि माझे गुरुवर्य प्रा. कहाळेकर यांनी केली. ज्या दिवशी मी मराठवाडा साहित्य परिषदेचा अध्यक्ष झालो, त्या दिवशी मला ज्यांच्याविषयीची कृतज्ञता व्यक्त करणे कर्तव्य वाटले, त्यांत भाऊसाहेब माडखोलकर याचे नाव अग्रहक्काने होते.

मराठवाडा हा नेहमीच संयुक्त महाराष्ट्राचा पुरस्कर्ता आणि त्या कल्पनेला बिनशर्त पाठिंबा देणारा असा भाग राहिला. संयुक्त महाराष्ट्राची मागणी साहित्य परिषदेच्या व्यासपीठावरून आग्रहाने पुरस्कारिण्यात, या धोरणाचा प्रचार, प्रसार करण्यात आणि पुढे संयुक्त महाराष्ट्र परिषदेची घडण घडविण्यात माडखोलकर अग्रभागी राहिले. विदर्भ हा संयुक्त महाराष्ट्राचा नेहमीच कच्चा दुवा राहिला, याची जबाबदारी फार मोठ्या प्रमाणावर पश्चिम महाराष्ट्राने स्वीकारली पाहिजे. दीर्घ काळपर्यंत पश्चिम महाराष्ट्राचे लोक आपण म्हणजे महाराष्ट्र असे गृहीत धरीत आले. पुण्याला पुण्याच्याबाहेर पाहण्यास वाव नव्हता. मुंबई–पुण्यात सुहृद्भाव असावा याचीही चिंता ज्या मंडळींनी केली नाही, त्यांना विदर्भ आणि मराठवाड्याचे मन जिंकण्याची जबाबदारी समजणे कठीणच होते. पश्चिम महाराष्ट्राविषयी तीव्र अविश्वास हे उरलेल्या महाराष्ट्राचे सामान्य वैशिष्ट्य राहात आले अशा प्रकारच्या भावना सकारण निर्माण होवोत की अकारण निर्माण होवोत, त्या दूर करण्याची, त्याचा निरास करण्याची जबाबदारी जे सर्वात जाणते होते त्यांच्यावर असते शंभर सव्वाशे वर्षे एक घटना चालू राहिली, म्हणजे तिच्यात हितसंबंध निर्माण होतात.

निझामी राजवटीत आम्ही अत्यंत गांजलेले आणि पीडित होतो. तिथे भाषेच्याही विकासाला वाव नव्हता. जीवनाच्या कोणत्याच अंगाच्या विकासाला वाव नव्हता. तिच्या विरुद्ध आम्ही लढलो. एक दिवस मराठवाड्यातील जनतेने निझामाची बलाढ्य राजवट कोसळलेली पाहिली ही निझामी राजवट कोसळताना पाहिल्यानंतर अत्यंत आनंद झाला, हे खरे आहे. पण, पुढे ज्या वेळी संस्थानाचे विभाजन करण्याची वेळ आली, तेव्हा दबत्या आवाजात निरनिराळ्या कुरबुरी सुरू झाल्या. हैद्राबाद संस्थान असेच राहिले, तर काय हरकत आहे, असा एक मुद्दा होता. महाराष्ट्राच्या नादी लागण्यापेक्षा महाविदर्भात जायला काय हरकत आहे, असाही एक मुद्दा होता. हितसंबंधांचा विचार करणाऱ्यांना अपरिचित नवी परिस्थिती नकोच वाटत असते. कारण, नव्या परिस्थितीत

आपले काय होईल, याचे उत्तर अनिश्चित असते.

या काळात मराठवाड्यात पूज्य स्वामी रामानंद तीर्थ हे अढळपणे संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूने उभे राहिले. त्यांनी बिनशर्त महाराष्ट्रात सामील होण्याची भूमिका घेतली. या प्रश्नावर स्वामीजींनी आपली सर्व प्रतिष्ठा पणाला लावलेली होती. त्यांच्या प्रभावाखाली क्रमाने मराठवाडा संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीबद्दल एकमुखी झाला. आमच्यासाठी संयुक्त महाराष्ट्र म्हणजे केवळ मराठी भाषिक एकत्र येण्याचे स्वप्न साकार होणे नव्हते; आमच्यासाठी संयुक्त महाराष्ट्र म्हणजे मराठी भाषिक एकत्र येण्याचा योगही होता. पण, त्याबरोबरच निझामाच्या रूपाने मोगलांचे जे शेवटचे अवशेष शिल्लक होते, त्या मोगलाईच्या अंतिम अवशेषांची समाप्तीही होती. पश्चिम महाराष्ट्रात मराठवाड्याच्या या भूमिकेविषयी पुरेशी कृतज्ञ जाणीव नाही, ही दुःखावी गोष्ट आहे. पण त्याची आम्हाला खत नाही. इतरांनी कृतज्ञ असावे म्हणून आमच्या भूमिका नव्हत्या. आम्ही आमच्या मुक्ततेचे स्वप्न साकार करीत होतो.

चिंतेची बाब असेल, तर ती ही होती की, विदर्भात संयुक्त महाराष्ट्राचा असा बलशाली पुरस्कर्ता नव्हता. श्री. ब्रिजलाल बियाणी, श्री कन्नमवार व लोकनायक अणे ही मंडळी आग्रहाने महाविदर्भवादी होती. अणे तर विदर्भाची संस्कृतीसुद्धा महाराष्ट्राहून भिन्न आहे, असे मानणारे होते. संयुक्त महाराष्ट्रवादी नेते जे विदर्भात होते, ते नेहमीच बोटचेपेपणाने वागत आले. त्यांच्या भूमिका या प्रश्नावर आग्रही नव्हत्या. विदर्भात संयुक्त महाराष्ट्राचे महत्त्वाचे आग्रही पुरस्कर्ते माडखोलकर होते. संयुक्त महाराष्ट परिषदेचे सरचिटणीसपद त्यांना देण्याचे कारणच हे होते. संयुक्त महाराष्ट्राच्या या जिव्हाळ्यामुळे माडखोलकर आम्हाला अधिकच आपले राहिले.

मराठवाड्यातील मराठी साहित्य, मराठवाडा साहित्य परिषद आणि संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न ही ती तीन कारणे आहेत, ज्यामुळे आम्ही माडखोलकरांचे कर्जदार आहोत. ते आम्हाला आपले मानतात, आम्हीही त्यांना आपले मानतो. उरलेले व्यक्तिगत गुणदोष आणि वैचारिक मतभेद इथे अप्रस्तुत आणि गैरलागू आहेत. संयुक्त महाराष्ट्रावर श्रद्धा असणाऱ्या महाराष्ट्र शासनात संयुक्त महाराष्ट्राच्या या खंद्या पुरस्कर्त्याविषयी काहीही ऋणबुद्धी नसावी हे दुःखाचे आहे.

माडखोलकर आणि मी यांच्यात मला एक अनपेक्षित साम्य दिसून येते. त्यांना पाया पडण्याची जोरदार सवय असलेली दिसते. निरनिराळ्या मंडळींच्या पाया पडण्याचे त्यांनी पुनः पुन्हा उल्लेख केलेले आहेत. पाया पडण्याची सवय मलाही आहे. आपणहून ज्यांच्या पायांवर आम्ही डोके ठेवतो आणि माडखोलकर ज्यांच्या पायांवर डोके ठेवतात, ती माणसे निराळी आहेत. चार दोन अपवाद वजा जाता, समकालीनांत, त्यांचे आमचे पूज्य पुरुष निराळे आहेत. या पादवंदनाची एक शिस्त असते. एखाद्या माणसाची मते कोणतीही असोत, त्याने एखाद्या क्षेत्रात आयुष्यभर जे श्रम घेतलेले असतात, त्याविषयीची कृतज्ञता म्हणून हा पदस्पर्श असतो. पण या पाया पडण्याचा विचारांशी संबंध नसतो. माडखोलकर ज्यांच्या नित्य पाया पडतात, त्यांची मते आणि धोरणे त्यांनी कधी स्वीकारली नाहीत. लोकनायक अणे हे भाऊसाहेबांना असे वंदनीय स्थळ होते. पण, अणे यांना वंदन केले, तरी माडखोलकरांनी महाविदर्भाची कल्पना केव्हाही मान्य केलेली नाही. डॉ. मुंजे आणि कै. गोळवलकरगुरुजी हेही त्यांना असे आदरणीय वंदनीय पुरुष होते. पण भाषावार प्रांतरचनेला असणारा त्यांचा विरोध स्पष्टपणे माहीत असूनही, माडखोलकरांनी आपला आग्रह कधी सोडला नाही. आचार्य विनोबा भावे म्हणजे गांधीजींचे संपूर्णपणे वारसदार,–एक ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व,–म्हणून माडखोलकरांना वंदनीय. पण आचार्यांच्या श्रद्धा माडखोलकर मान्य करणार नाहीत. समाजाच्या कल्याणासाठी देह झिजविणाऱ्या विभूती यांच्याविषयीची कृतज्ञता आणि ज्ञान व कलांच्या क्षेत्रांत वैभवशाली भर घालणाऱ्या व्यक्ती यांच्याविषयीची कृतज्ञता ही निराळी असते. वैचारिक मतभेदांमुळे या कृतज्ञतेला पारखे होऊ नये. आदर आणि कृतज्ञतेच्या पोटी आपण स्वतंत्र विचार करण्याचा हक्क गमावू नये. हा तोल मोठ्या संयमाने परिपक्व मनाच्या व्यक्तीच दाखवू शकतात. माडखोलकरांनी या तोलाची कसाशीने जपणूक केलेली आहे.

माडखोलकर कुणाच्या सहवासात राहतात, याचे उत्तर आता स्पष्ट आहे. विशेषतः नव्या स्वरूपात 'तरुण भारत' उ.न.

अनुक्रमणिका

राहत असताना, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ त्या दैनिकाचा आधारस्तंभ राहिला व आजही आहे, ही गोष्ट त्यांनी झाकून ठेवलेली नाही. पण व्यक्तिशः माडखोलकर मात्र रूढ अर्थाने हिंदुत्ववादी कधीच नव्हते आणि आजही नाहीत. जीवनाकडे पाहण्याचा हिंदु धर्माचा काही मंडळींनी वैराग्यप्रधान असा अर्थ लावलेला आहे. ही प्युरिटन भूमिका माडखोलकरांनी कधी घेतली नाही. त्यांना घेताही आली नसती. त्याग, वैराग्य या सर्व गुणांच्या विषयी पुरेसा आदर बाळगून, माडखोलकर संयमाला जास्त महत्त्व देतील. कोणत्याही प्रकारच्या सुखोपभोगाच्या ते आहारी जाणार नाहीत हे जसे खरे, त्याचप्रमाणे हेही खरे आहे की, त्यांनी सुख, भोग आणि विलास वर्ज्य मानलेले नाहीत. जीवनात सहजगत्या येणारा आनंद हा तर ते नाकारणार नाहीतच; पण तोल सांभाळून जर आनंदाचा पाठलाग करता आला, तर तेही ते निंदनीय मानणार नाहीत. यामुळेच, त्यांची जीवनाकडे पाहण्याची भूमिका कठोर शिक्षकाची न राहता, क्षमाशील वत्सल मित्राची राहिली आहे. चाकोरीच्या बाहेर ज्यांची पावले पडतात, त्यांना माडखोलकरांनी सदैव सावरण्याचा आणि प्रमाद उघडा न करता झाकून नेण्याचा दिलासा दिलेला आहे. माणसाने चुकूच नये हा त्यांचा आग्रह नसून, माणसे चुकतच असतात, त्यांना सुधारण्याची दिशा मिळाली पाहिजे, हा त्यांचा आग्रह आहे. जे दृढपणे रेखीव वाटेवरून चालत असतात, त्या कणखर व्यक्तींना इतर कुणी सावरण्याची गरज नसतेच. आसरा आणि दिलासा स्खलनशीलांना लागतो. त्यांनाच फक्त क्षमेची आणि सुधारण्याच्या संधीची गरज लागते. माडखोलकरांनी आपली ही जबावदारी स्वतःच्या बाबतीत आणि इतर सर्व सुहृदांच्या बाबतीत पार पाडली आहे.

परंपरागत हिंदू मनाशी त्यांनी तारुण्यातच फारकत घेतली. वत्सल ईश्वराच्या कल्पनेचा फारसा मोह त्यांना नव्हताच. माणसांचे प्रश्न माणसांनाच सोडवावे लागतात, हीच त्यांची भूमिका राहिली. कोणतीही समाजरचना त्यांनी कधी पूज्य, पवित्र आणि धर्माचा भाग मानली नाही. जगत् सत्य मानणाऱ्या पण या पृथ्वीच्या मागे एखादी शक्ती आहे, असे समजणाऱ्या अज्ञेयवाद्याप्रमाणे त्यांची भूमिका राहिली. हिंदूंचे सर्व धर्मवाङ्मय त्यांना आदरणीय व अभ्यसनीय वाटले, तरी वेदोपनिषदे आणि गीता यांच्याविषयी किंवा स्मृतिग्रथांच्याविषयी त्यांच्या मनात प्रामाण्यबुद्धी कधीच नव्हती. चातुर्वर्ण्य आणि जातिव्यवस्था या दोन्ही कल्पना त्यांनी नेहमीच अमान्य ठरवल्या. जन्मावर आधारलेली जातिव्यवस्था आणि वर्णव्यवस्था तर त्यांनी कधी मान्य केली नाही. त्यांना आदरणीय असणाऱ्या अनेक पुरुषांनी गुणकर्माधिष्ठित वर्णव्यवस्थेचा पुरस्कार केला. माडखोलकरांनी या कल्पनेचा फक्त उल्लेख केला. ती कधीही स्वतः मान्य केली नाही.

हिंदूंच्या प्रचंड धर्मवाङ्मयात वर्णव्यवस्था गुणकर्माधिष्ठित आहे, असा उल्लेख फार तुरळक येतो. प्रसिद्ध उदाहरण तर फक्त एकच,–भगवद्गीतेच्या चौथ्या अध्यायातले आहे. सनातनी मनाचा हा कल असतो की, ते मन निरनिराळे युक्तिवाद लढवून, परंपरामान्य धर्मकल्पना कशी रास्त आहे, हे सांगण्याचा प्रयत्न करते. गुणकर्माधिष्ठित चातुर्वर्ण्याचा पुरस्कार हा असा मूलतः सनातनी असणाऱ्या मनाचा एक खेळ आहे. भगवद्गीतेत ज्या गुणकर्माचा उल्लेख केलेला आहे, ते गुणकर्म म्हणजे व्यक्तीची या जन्मातील प्रवृत्ती आणि तिचे कर्म नसून, गतजन्मातील तिची प्रवृत्ती आणि कर्म आहे. वर्णव्यवस्था नेहमीच जन्मजात अशी राहिली. ती या जन्मीच्या गुणकर्मावर कधीच अवलंबून नव्हती. ती परमेश्वर प्रणीत आणि गतजन्मीच्या गुणकर्मावर आधारलेली आहे, हे भगवद्गीतेचे मत पुन्हा एकदा वर्ण जन्मसिद्ध असतो, हेच सांगत असे. माडखोलकर गीतेच्या या श्लोकाचा अर्थ असाच लावतात, हे मला माहीत आहे. अर्थात ते वर्णव्यवस्थेचा कोणत्याच स्वरूपात कधीही पुरस्कार करीत नव्हते. इ.स. १९२५–२६ पासून ते या मताचे राहिले की, वर्णव्यवस्थेच्या कल्पनेला संपूर्ण तिलांजली दिल्याशिवाय यापुढे हिंदू धर्माला तरणोपाय नाही. नेमके हे ते कारण आहे की, ज्यामुळे अत्यंत आदर असूनसुद्धा, कै. डॉ. हेडगेवार आणि कै. गोळवलकरगुरुजी यांच्या अनुयायांत ते समाविष्ट होऊ शकले नाहीत.

वर्णव्यवस्थेची चर्चा ही तात्त्विक चर्चा असते. व्यवहारात परंपरागत चालीरीती आणि जातिव्यवस्था या संबंधात तुम्ही काय भूमिका घेता, हा प्रश्न महत्त्वाचा असतो. माडखोलकरांनी कधी धर्माचा परंपरागत

आचार निष्ठेने पाळला नाही. त्यांच्याकडून काही धार्मिक कृत्ये घडली असतील, तर तो औपचारिक भाग होता. त्यांच्या घरात विविध जातिधर्मांचे लोक नेहमीच घरच्याप्रमाणे वागत आले. या मंडळीत नुसते अस्पृश्यच नव्हते, तर ख्रिश्चन आणि मुसलमानही होते. माडखोलकरांनी आतरजातीय विवाहाचा तर पुरस्कार केलाच, पण वेळ आली तेव्हा महाराष्ट्रभर गाजलेल्या खान–मालिनी या आंतरधर्मीय विवाहाचाही पुरस्कार केला. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धधर्म स्वीकारला, त्याचे त्यांनी स्वागत केले त्यांच्या प्रत्यक्ष व्यवहारात जात कधीच नव्हती. त्यांनी अस्पृश्य तरुणाचा आपला मुलगा म्हणून उल्लेख केलेला मी पाहिला आहे. सर्व सामाजिक सुधारणा, व्यक्तीच्या समतचे सर्व प्रकार आणि जातिभेद मोडण्याचे सर्व कार्यक्रम यांना माडखोलकरांनी आयुष्यभर उचलून धरले. त्यामुळे दलित वर्गात त्यांना एक मोठे मित्रवर्तुळ मिळाले.

सामाजिक बाबतीत ते समता आणि स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते राहिले. आर्थिक बाबतीत परपरागत अर्थरचना त्यांना कधीही मान्य नव्हती. ते उत्पादनव्यवस्थेत आधुनिकीकरणाचे आणि वितरणव्यवस्थेत समाजवादाचे पुरस्कर्ते राहिले. कोणत्याही ग्रथाच्याविषयी प्रामाण्य नसणारा, हिंदूच्या परंपरागत समाजरचनेचा विरोधक, व्यक्तिगत जीवनात सर्व जातिधर्मात जिव्हाळयाची नातीगोती असणारा, अर्थव्यवस्थेत समाजवादी असा हा माणूस लोकसमजाच्या दृष्टीने मात्र नेहमीच हिंदुत्ववादी मानला गेला. माडखोलकरांच्यामध्ये हिंदुत्व असेल, तर ते इतक्याच अर्थाने आहे की, त्यांना राष्ट्राची एकात्मता हवी आहे. त्यांना आधुनिक भारत हा परंपरेच्या वारशाच्या वर उठून आर्थिक पायावर मजबूत होणारा असा व्हायला हवा आहे. श्रद्धेच्या दृष्टीने ते वारसदार असतीलच, तर न्या. रानड्यांचे आहेत.

यामुळेच माडखोलकर यांचे मित्रवर्तूळ नेहमी संमिश्र राहिले. जीवनाचा व्याप चौरस असावा, मते स्वतंत्र असावीत, मतांची बाधा माणुसकीच्या संबंधाना येऊ नये, विरोध मतांची माणसे मित्र असावीत, हे त्यांच्याबाबत नित्य घडले. एकीकडे डॉ. मुंजे, डॉ. हेडगेवार, गोळवलकरगुरुजी, नवाथे ही मंडळी, तर दुसरीकडे कॉ. डांगे, कॉ. जोगळेकर, कॉ. मिरजकर, श्री. कर्णिक ही मंडळी, त्यांची मित्र राहिली. काका कालेलकर, शंकरराव देव, दादा धर्माधिकारी असे कडवे गांधीवादी त्यांचे मित्र आहेत. त्यांच्या पत्नी शांताबाई या गांधीजींच्यावर श्रद्धा ठेवणाऱ्या, अखिल भारतीय महिला संमेलनात भाग घेणाऱ्या, नागपूरच्या प्रमुख कॉंग्रेस कार्यकर्त्यांच्यापैकी होत्या. या मित्रवर्तुळात रिपब्लिकन पक्षापासून शेतकरी–कामकरी पक्षापर्यंत, रॉयिस्ट व लाल निशाण गटापासून संपूर्ण सनातन्यांच्यापर्यंत अधी विविध थरांतील मंडळी आहेत. इतक्या सर्व जातिधर्मातील, राजकीय पक्षांतील विविध विचारांची माणसे माडखोलकरांची मित्र राहिली, याचा एक अर्थ, त्यांच्यात सहिष्णुता आणि सौजन्य फार मोठे आहे, हा होतो. त्याचा दुसरा अर्थ, लोकशाही विचारस्वातंत्र्य तिथे मुरलेले आहे, हा होतो.

पण, याहीखेरीज माडखोलकरांनी साहित्यिक, कवी, नाटककार, कलावंत, संशोधक, शिक्षणशास्त्रज्ञ असाही एक मोठा परिवार गोळा केला आहे. जीवनाला एकच परिमाण राजकारणाचे नसते. जीवनात ज्ञान, कला, साहित्य यांनाही महत्त्व असते. सत्य, शिव आणि सौंदर्य यांच्या उपासनेचे अनंत प्रकार जीवनात चालू असतात. सहस्त्रधारांनी वाढणाऱ्या या जीवनात आपणही समृद्धपणे वावरले पाहिजे, असे माडखोलकरांनी मानले. पत्रकार व टीकाकार या नात्यांनी त्यांनी केलेले विपुल लिखाण या त्यांच्या चौरसपणाचे द्योतक आहे. या त्यांच्या चौरसपणात सहानुभूती ठिकठिकाणी कमी पडते, अशी माझ्यासारख्याची तक्रार आहे. पण, त्यांच्या मनात एखाद्याचा कायम द्वेष इतका असावा की, गुणग्रहण आणि मूल्यमापन अशक्य व्हावे, अशी वेळ कधी आलेली दिसणार नाही. त्यांच्या समतोल मूल्यमापनाच्या दृष्टीने त्यांचे मृत्युलेख अत्यंत महत्त्वाचे आहेत.

माडखोलकरांचा मूळ पिंड पत्रकाराचा आहे. पत्रकाराच्या नजरेतील सावधपणा आणि चौकसपणा हा त्यांचा स्थायीभाव आहे. तरुण वयात त्यांचा आणि नरसिंह चिंतामण केळकरांचा संबंध आला. एके काळी केळकरांना त्यांनी गुरुस्थानीही मानले होते. केळकरांच्या सहवासात असताना, जीवनाच्या चौरस विकासाची जाण माडखोलकरांना आली असावी, असा माझा

अंदाज आहे. तेव्हापासून राजकारण, समाजकारण, साहित्य, समीक्षा, संशोधन आणि विविध प्रकारची माहिती यांचा ते संग्रह करीत आले. या माहितीचा त्यांनी अन्वय लावला, मीमासाही केली. मराठी वृत्तपत्रसृष्टीत एका नियतकालिकाचे संपादक म्हणून जेव्हा माडखोलकरांच्याकडे आपण पाहू लागतो, तेव्हा इतका दीर्घ काळ या क्षेत्रात वावरलेले अतिशय चौरस व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांच्याकडे केळकरांचे वारसदार म्हणून पाहावे लागेल. तात्यासाहेब केळकरही असेच अफाट परिवार असणारे, दीर्घोद्योगी गृहस्थ होते. आणि, केळकरही असेच सर्वांना हवेसे वाटणारे–पण कुणालाही खात्रीलायकपणे आपले न वाटणारे,–गृहस्थ होते. केळकरांनी केलेले प्रत्यक्ष राजकारण आणि केळकरांचा संस्थात्मक व्याप या बाबी माडखोलकरांच्याजवळ नाहीत. पण, पत्रकार म्हणून केळकरांचा चौरसपणा आणि सर्वसमावेशक सहानुभूती माडखोलकरांच्याजवळ भरपूर आहे. असेच एक चौरस व्यक्तिमत्त्व मराठी नियतकालिकात आचार्य अत्रे यांचे होते. पण, अत्र्यांच्या वृत्तपत्राचा भर नियतकालिकातील बातम्यांच्यापेक्षा, अग्रलेखावर जास्त होता. आणि, अग्रलेखातही, एखाद्या प्रश्नाची माहिती सांगण्यापेक्षा, इतरच बाबींवर त्यांचा भर जास्त होता. विरोधकांशी वागताना आचार्य अत्रे यांना तोल कधी साभाळता आला नाही. त्यांना बातमीची उपयोगिता व महत्त्व यांपेक्षा बातमीतील नाटय महत्त्वाचे होते. विश्लेषणापेक्षा अतिशयोक्तीवर त्यांचा भर जास्त होता. माडखोलकरांचा भर चौफेर आणि चौरस माहितीवर आहे.

एका बाबतीत माडखोलकर सुदैवी राहिले राजकारणाच्या अंतरंगाचे ते नेहमी साक्षीदार राहिले. दर्शनी भागात राजकारणाचे चित्र जे दिसते, त्यापेक्षा किती तरी निराळे असे खेळ पडद्याआड चाललेले असतात. स्वार्थ, क्रौर्य, गटबाज्या, कारस्थाने, मनाचा हीणकसपणा हा तर पडद्यामागे असतोच; पण सत्तेचा उन्माद, मनातील कटुता आणि भोगविलासाचे एक विचित्र भ्रष्ट थैमान हेही पडद्यामागच्या दृश्यात महत्त्वाचे असते. या ठिकाणी त्यांनी अनेकांच्या राजकीय चढउताराचे विविध खेळ पाहिले. डॉ. ई. राघवेंद्र राव व पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांच्यासारख्या मुरलेल्या चाणक्यांच्या निकट वर्तुळात ते दीर्घ काळ राहिले. या अंतरंग परिचयाचा काही भाग त्यांच्या कादंबऱ्यातून आलेला आहे. यातील पुष्कळसा भाग त्यांच्या मृत्युलेखांतूनही आलेला आहे. या मृत्युलेखात माडखोलकरांनी जाणीवपूर्वक काही माहिती विखरून ठेवलेली असते. तिची संगती लावून पाहणे हाही एक उद्याच्या राजकारणाच्या अभ्यासकाना उद्योग होऊन बसणार आहे मात्र या माहितीपैकी आजतागायत स्फोट झाला असेल, तर तो सार्वजनिक दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या बाबींचा. उद्या माडखोलकरांचा पत्रव्यवहार प्रसिद्ध होईल, तेव्हा पुष्कळच विलक्षण माहिती उजेडात येईल, असे मानण्यास जागा आहे. माडखोलकरांनी यातील काही घटनांची कल्पना माझ्याशी खासगी बोलताना दिलेली आहे.

हीच त्यांची पद्धत वाङ्मयात वावरतानाही राहिली. मराठी साहित्यिकांच्या विषयी त्यांच्या वैयक्तिक जीवनाची विपुल माहिती माडखोलकरांनी जतन केली. अधून मधून तिचा उच्चारही केला. असा उच्चार झाला म्हणजे एक वर्ग खवळून जात असतो. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्याविषयी त्यांनी जेव्हा लिहिले, त्या वेळी आचार्य अत्रे असेच उसळले होते. लक्ष्मीबाई टिळकांच्याविषयीसुद्धा माडखोलकरांनी लिहिले, त्या वेळी पेल्यात एखादे वादळ उठावे तसा प्रकार झालाच. याही पुस्तकात तांबे, गडकरी, बालकवी यांच्याविषयी सूचक उल्लेख आहेत त्यामुळे काहीजणांची मने दुखावली जाण्याचा सभव आहे सगळया रागलोभाचे कारण, माडखोलकर सांगतात ती माहिती खोटी असते, हे नव्हे. पुष्कळदा माडखोलकर प्रथम विधान करतात, नंतर खुलासा करतात. पण त्यांचे खुलासेही मूळ विधान मागे घेणारे नसतात, हे बारकाईने पाहणाऱ्याच्या लक्षात येईल. माडखोलकरांच्यावर लोकांचा राग ते खोटे सांगतात यावर नसून, प्रायः वैयक्तिक जीवनाविषयी प्रकाशित व्हावयाला नको असणारे सत्य सांगतात, याविषयी आहे. तुम्ही सांगता ते खरे असले, तरी तुम्ही गप्प का बसला नाहीत, असा हा मुद्दा असतो.

माडखोलकरांच्या या सर्व लिखाणाला एक महत्त्व आहे. मराठीत चरित्रपर टीका फारशी विकसित झालेली नाहीच. कोणत्याही लेखकाच्या चरित्राच्या संदर्भात वाङ्मय समजावून घ्यावे, वाङ्मयातील

गूढाचा चरित्राच्या आधारे अन्वय लावावा, हे अजून मराठीत शक्य होत नाही. कारण, साहित्यकाराच्या खऱ्या चरित्राचे तपशील जाहीर रीतीने मांडण्यापेक्षा, ते झाकून ठेवण्याकडे प्रवृत्ती जास्त असते. कोल्हटकर, माधव जूलियन, गडकरी, बालकवी इत्यादिकांच्या बाबतीत हा चरित्रावर पडलेला पडदा आता कुठे अमळ विरविरीत होऊ लागला आहे. या साऱ्या लिखाणामुळे कलावंतांच्या चरित्रलेखनातील संकोच मावळायला मदत झाली, तर तिचा परिणाम मराठीत चरित्रपर टीका सकस होण्यास होईल. अर्थातच कलावंताच्या चरित्रात एखादे लफडे नसतेच असे नाही आणि अशी एखादी भानगड त्याच्या मानसिक विश्वाचे सारसर्वस्व असते, असेही नाही. हे लक्षात घेऊनच चरित्रांची तपासणी व्हायला पाहिजे.

माडखोलकरांनी वाङ्मयसमीक्षा भरपूर केलेली आहे. या वाङ्मयसमीक्षेत, प्रत्यक्ष कलाकृतीच्या विश्लेषण, मीमांसेपेक्षा, त्या कलाकृतीच्या चौरस आकलनाला उपयोगी पडेल, अशी विविध प्रकारची माहिती पुरविण्यावर त्यांचा भर राहिला आहे. स्वतःच्या वाङ्मयाची कहाणी त्यांच्याइतक्या तपशिलाने इतर लेखकांनी मराठीत क्वचितच सांगितली असेल. आपल्या समकालीनांच्याविषयी इतके कौतुकाने आणि गुणग्रहणपर फारच थोड्यांनी लिहिले आहे. आणि तरीही, माडखोलकरांनी स्वतःला जितके शत्रू करून घेतले आहेत, तितके मराठीत त्यांच्या पिढीतल्या फार थोडया लेखकांनी करून घेतले असतील. सामाजिक दायित्वाविषयी बेफिकीर राहून, आपल्या कोशात विसावलेल्या मंडळींना समाजाने मोठया प्रेमाने वागवावे आणि आपले सामाजिक दायित्व पार पाडताना प्रत्येक प्रश्नावर स्वच्छ आणि स्पष्ट मते देणाऱ्या व्यक्तीचा मात्र राग यावा, ही सार्वजनिक जीवनातील नित्य दिसणारी विसंगती आहे. विचारस्वातंत्र्य हे आपल्या प्रतिष्ठेला आडवे जात नाही, आपल्याला जखमी करीत नाही, तोपर्यंतच माणसाला आवडते. हे समर्थन माडखोलकरांच्या विचारांचे अगर मतांचे नव्हे. कारण विचारांच्या क्षेत्रात त्यांचे माझे अनेक मुद्यांवर मतभेद आहेत. हे फक्त स्पष्टपणे विचार मांडणाऱ्या माणसाचे समर्थन आहे,—मग त्याचे विचार काहीही असोत. दंभापेक्षा फटकळपणा अधिक आदरणीय असतो, असेच निदान मी तरी मानतो.

माडखोलकरांची वाङ्मयीन टीका ही तर त्यांच्या पत्रकारितेने खोल प्रभावित झालेली आहेच; पण त्यांची कादंबरीही या पत्रकारितेचेच एक वेगळे रूप आहे. आणि, कादंबरीच्या क्षेत्रात कोल्हटकर व केळकर या आपल्या दोन्ही गुरूंच्यापेक्षा, माडखोलकरांचे यश किती तरी पटीने उजवे आहे. माडखोलकरांनी राजकारणात, समाजकारणात जे पाहिले, त्याचे या कादंबऱ्यांच्यामध्ये जे वास्तविक जीवनाचे चित्र आलेले आहे, त्यावर कल्पिताचा पडदा फार झिरझिरीत आहे. पण यामुळेच त्यांच्याविषयी दोन प्रकारचे आक्षेप निर्माण झालेले आहेत. एक तर त्यांच्या कादंबऱ्या अवास्तव आहेत, अशी तक्रार आहे. दुसरी तक्रार अगदी विरुद्ध दिशेने, म्हणजे या कादंबऱ्या केवळ वृत्तान्तवजा अशा आहेत, ही आहे. म्हणजे जर माडखोलकर या कादंबऱ्यांतील प्रसंग वास्तविक आहेत म्हणून सांगणार असतील, तर टीकाकार असे म्हणणार की, कल्पिताच्या पातळीवर फारशी नवनिर्मिती इथे नाही, म्हणून ही चांगली कादंबरी नव्हे. कोणताही खुलासा न करता माडखोलकर गप्प बसले असते, तर मग हे सगळेच खोटे आणि काल्पनिक आहे, त्यात वास्तवाचा अंश नाही, असे म्हणण्यास टीकाकार पुन्हा मोकळे होते.

मराठी वाङ्मयसमीक्षा पाहताना मला एक प्रश्न नेहमीच खटकत आलेला आहे. एखादा लेखक समाजात झपाटयाने लोकप्रिय होत असेल, तर तो लोकप्रिय का होतो, हे सांगण्याची जबाबदारी प्रायः समीक्षक टाळताना दिसतात. ही लोकप्रियता क्षणकालिक असेल, तर तिचे कारण वेगळे दिले पाहिजे. पण, ही जर दीर्घजीवी असेल, तर तिचा शोध वेगळा घेतला पाहिजे. खांडेकर, माडखोलकर, गडकरी यांच्यासारख्या लेखकांच्याबाबत हा प्रश्न माझ्या मनात नेहमीच येत राहिला. या मंडळींच्या लिखाणातील दोष मोजून दाखविणे कठीण नाही. कोणत्याच लेखकाच्या लिखाणातील दोष मोजून दाखविणे कठीण नसते. पण एखादी वाङ्मयकृती आणि एखादा लेखक चाळीस चाळीस वर्षे समाजापुढे उभा राहतो, तो या दोषांच्या आधारे उभा नसतो. या दोषांवर मात करणारी काही गुणसंपदा असते. तिची ओझरती ओळखही जर वाङ्मयसमीक्षेला करून देता

आली नाही, तर ती वाङ्मयसमीक्षा आपले श्रेय हुकलेली समीक्षा मानली पाहिजे. जे टिकले आणि तुमच्या चौकटीत बसते, ते या चौकटीमुळे टिकले, हे सांगणे सोपे असते. पण, जे टिकले आणि वाचकप्रिय राहिले–पण समीक्षेच्या चौकटीत त्या वाङ्मयाचे सामर्थ्य सांगता येणे जमले नाही–तिथे आपण उत्तर काय देणार ? अशा वेळी एक मार्ग नवीन उत्तरे शोधण्याचा असतो. तो मराठी समीक्षकाना मानवत नाही. दुसरा मार्ग, आपले समीक्षणाचे निकष अगदीच जुजबी आणि तात्पुरते आहेत, असे सांगण्याचा असतो. तेही टीकाकारांना मानवत नाही. गेली चाळीस वर्षे माडखोलकरांचा वाचकवर्ग का टिकून राहिला, या प्रश्नाचे उत्तर मराठी समीक्षेने दिलेले नाही.

माडखोलकरांच्या कादंबऱ्यांची वाचकप्रियता पाहताना एका मुद्दयाचा फोलपणा नेहमी लक्षात घेतला पाहिजे. त्यांच्या कादंबऱ्यांत शृंगारचित्रण विपुल आहे. 'नागकन्ये' सारख्या कादंबरीत हे शृंगारचित्रण अधिक भडक असे झालेले आहे. कोणे एके काळी, माडखोलकरांच्या कादंबऱ्यांत वासनोत्तेजकता आहे काय ? आणि या कादंबऱ्या अश्लील आहेत काय ? यांची गंभीर चर्चा मराठी कादंबरीत झालेली आहे. माडखोलकरांच्या कादंबऱ्यांतील शृंगार अपरिहार्य आहे काय ? तो कलात्मक आहे काय ? या प्रश्नाची चर्चा करणे निराळे आणि या अतिरेकी शृंगारामुळे त्यांच्या कादंबऱ्या वाचकप्रिय होतात हे म्हणणे निराळे. माडखोलकरांच्या कादंबऱ्यांत वाचकांना अत्यंत आवडत्या ठरलेल्या कादंबऱ्या 'भंगलेले देऊळ', 'कान्ता', 'नवे संसार', 'चंदनवाडी', 'रुक्मिणी', आणि 'सत्यभामा' या आहेत. या कादंबऱ्याच्यापैकी एकही कादंबरी भडक शृंगाराला फारसा वाव देणारी नाही. शृंगाराव्यतिरिक्त माडखोलकरांच्या जवळ अजून काही तरी आहे, असा याचा अर्थ आहे. शृंगारिक वर्णनांचे वैशिष्ट्य असे असते की, त्यांच्या फॅशन्स दर पाच–दहा वर्षाला बदलतात. शृंगार हेच ज्यांचे सामर्थ्य होते, असे अनेक लेखक आले आणि गेले. माडखोलकरांचे वाचकाच्या मनातील स्थान अजून अढळ आहे. समजा, माडखोलकरांची ही वाचकातील स्थिर मान्यता अजून चाळीस वर्षे टिकली, तर उद्या माडखोलकरांचा समावेश मराठीतील अभिजात लेखकांच्यामध्ये करावा लागणार आहे. ह. ना. आपटे, वामन मल्हार आणि केतकर यांची आस्था जशी मराठीत कायम आहे, तशी फडके, खांडेकर, माडखोलकर यांच्या विषयीची आस्थाही कायम राहण्याचा संभव आहे. काळाच्या ओघात टिकून राहिलेल्या कलाकृती निर्दोष असतातच, असे नव्हे. किंबहुना, त्यांना आपण कलाकृतींचा दर्जा देऊ, असेही नव्हे. पण, या सर्व बाबी विवाद्य मानल्या, तरी या साहित्यकृती काळाच्या ओघात टिकलेल्या असतात, हे निर्विवाद सत्य मान्य करून त्यांचा नव्याने विचार करावा लागतो. चाळीस वर्षे संपल्यानंतर, माडखोलकरांच्या वाङ्मयाचा, त्यातील सामर्थ्याचा नव्याने विचार करण्याची वेळ आज आलेली आहे, असे मला वाटते. अर्थातच नव्यानेच विचार करायचा, तर त्यांचे दोष आणि मर्यादा यांचाही नव्याने विचार करावा लागेल.

माडखोलकरांच्या कादंबऱ्यांत सत्य आणि कल्पित यांच्यातील पडदा अगदीच झिरझिरीत आहे ही गोष्ट लक्षात घेतली, तर या कादंबरीवर असणारे प्रभाव लक्षात घेता येतात. त्यांच्या तीव्र आवडीनिवडीही लक्षात घेता येतात माडखोलकरांच्या कायम आवडीचे विषय राजकारण आणि क्रान्ती हे राहिलेले आहेत. एक तर ते पत्रकार होते व आहेत. दुसरे म्हणजे राजकारणाच्या अंतरंगात ते वावरत होते. त्यामुळे या कादंबऱ्यांच्यामधून असा प्रभाव पडणे स्वाभाविकच होते. सर्व सशस्त्र क्रान्तिकारकांच्या विषयी अत्यंत आत्मीयता, हिंदू समाजाच्या भवितव्याविषयी चिंता, समाजवादाविषयीची ओढ आणि म. गांधींच्याविषयी राग हे त्यांच्या कादंबऱ्यांच्यामधील कायम विषय आहेत. विशेषतः काँग्रेसच्या राजकारणाविषयी त्यांच्या मनात फार राग असतो. या काँग्रेसच्या राजकारणाला गांधी जबाबदार आहेत, म्हणूनच त्यांचा गांधींच्यावर राग असतो. या कादंबऱ्यांच्यामधून कम्युनिस्टांचे व अस्पृश्य वर्गाचे पुष्कळच सहानुभूतीने चित्रण केलेले असते. पण, या कादंबऱ्यांत उत्कट राष्ट्रवाद सोडल्यास, हिंदुत्ववादाची फारशी प्रबल ओढ दिसत नाही. पत्रकार माडखोलकरांच्याही लिखाणाचे स्थूलपणे हेच वैशिष्ट्य आहे.

जी माणसे एकेका ध्येयवादाने भारून जातात आणि तो अमलात आणण्यासाठी सर्वस्व पणाला लावतात, त्यांच्याविषयी माडखोलकरांना विशेष

आस्था आहे. विशेषतः त्यांची श्रद्धा असणारी एखादी बाब जर कुणाच्या जीवनात दिसली, तर मग माडखोलकर अशा व्यक्तीचे समर्थन करू लागतात. त्या व्यक्तींनी आपल्याला नावडती असणारी मते जरी मांडलेली असली, तरी माडखोलकर ती क्षम्य मानू लागतात. हा त्यांच्या आवडीनिवडीती फरक विशेषतः न्या. रानडे आणि लोकहितवादी या दोघांच्याविषयी त्यांनी जे लिहिलेले आहे, तिथे ठळकपणे दिसू लागतो. न्या. रानडे हे समाजसुधारक, मवाळ आणि इंग्रजी राज्याचे चाहते. लोकहितवादीसुद्धा समाजसुधारक व इंग्रजी राज्याचे चाहते. दोघेही हिंदूच्या चालीरीतींचे टीकाकार. दोघांचाही नैतिकतेवर अतिशय कटाक्ष. इतके असून माडखोलकर न्या. रानड्यांना एकोणिसाव्या शतकाचे युगप्रवर्तक राष्ट्रपुरूष मानतात. रानड्यांच्याविषयी लिहिताना शक्य तितके झुकते माप देण्याची त्याची पद्धत आहे. न्या. रानडे हे ब्रिटिश राज्यात हिंदुस्थानचे प्रचंड आर्थिक शोषण चालू आहे, ही कल्पना मान्य करणारे नव्हते. यासबंधीची काळातील त्यांची मते पुढे त्यांनी बदलून घेतली. पण, ब्रिटिशांच्या साहचर्यामुळे भारताचे आधुनिकीकरण, औद्योगीकरण घडण्याचा फार मोठा संभव निर्माण झालेला आहे, यावर त्यांची श्रद्धा होती. शोषणावर श्रद्धा नाही, विकासाच्या सभवावर श्रद्धा आहे, याचा समन्वय त्यांच्या राजकारणात दिसून आला, तर ते स्वाभाविक आहे. स्वतः माडखोलकर ब्रिटिश राजवटीचे कडवे विरोधक. पण ते रानड्यांच्याविषयी आदराने बोलणार. हेच माडखोलकर लोकहितवादींचे मात्र कठोर टीकाकार आहेत. ते लोकहितवादींना स्वकीयांचा उत्साहभंग करणारे, पारतंत्र्याचे उद्गाते मानतात.

माडखोलकराच्या या तीव्र रागलोभाचे कारण समजावून घेतले पाहिजे. हिंदू धर्मावरील टीका किंवा इंग्रजी राजवटीचे समर्थन यामुळे माडखोलकर चिडले आहेत, असे प्रथमदर्शनी दिसते. पण हे दिसणे खरे नव्हे. लोकहितवादींच्यावर त्यांचा खरा राग मुख्यत्वे दोन कारणांसाठी आहे. एक तर लोकहितवादी फक्त लिहीतच गेले. या पलीकडे जाऊन आपल्या श्रद्धेनुसार एखादी सामाजिक चळवळ जन्माला घालण्याचा त्यांनी प्रयत्न केला नाही. दुसरे म्हणजे लोकहितवादिंच्या वर्तनात आणि त्यांच्या लिखाणात कमाल विसंगती होती. आपले सर्वच विचार अंमलात आणण्याचे धैर्य नसले, तरी चालेल; पण निदान काही विचार त्यागपूर्वक अमलात आणता आले पाहिजेत. आपले विचार समाजात रुजविण्यासाठी सामाजिक चळवळ निर्माण करण्याचा काही प्रयत्न तर केला पाहिजे. या किमान बाबींही जिथे नाहीत, असा बोलघेवडेपणा पाहिला, म्हणजे माडखोलकर तितकीच तीव्र प्रतिटीका करतात. म. फुले, डॉ. आंबेडकर ही माणसे काही हिंदू धर्माची कमी टीकाकार नव्हती, पण माडखोलकरांनी त्यांच्याविषयी अत्यंत आदराने लिहिलेले दिसून येईल. माडखोलकरांच्या आदराचे, अनादराचे कारण त्या व्यक्तींचे विचार हे अनुषंगाने असते–त्या व्यक्तींच्या कृतिशील सचोटीवरील त्यांचा विश्वास हे प्रामुख्याने असते. माडखोलकरांनी अनेकांच्यावर विरोधी टीका केली आहे. त्यांच्या मतांशी सर्वांना सहमत होणे कठीणच. पण या टीकेचा रोख लक्षात घेतला, तर बहुधा ज्यांच्या सचोटीविषयी त्यांना खात्री आहे, त्यांच्याशी मतभेद त्यांनी गौण मानलेले दिसतात.

माडखोलकरांची ही मनोवृत्ती, त्यांनी 'रामदासानुदास' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रो. परांजपे यांच्याविषयी जे लिहिले आहे, त्यातही दिसून येते. हे श्रीधरबुवा केकावलीचे विद्वान भाष्यकार होते. या केकावली भाष्याचे कौतुक माडखोलकरांनी पुष्कळ केले आहे. खरे म्हणजे केकवली हा काही तत्त्वज्ञानपर प्रबंध नव्हे. एका पंडित कवीची ती पांडित्यपूर्ण भक्तीची रचना आहे. केकावलीत पाहायचे असतील, तर यमकअनुप्रासासारखे शब्दालंकार, अनेकविध प्रकारचे अर्थालंकार आणि पौराणिक दाखले. आध्यात्मिक तत्त्वज्ञान केकावलीच्या आधारे सांगत बसणे किंवा या ग्रंथाच्या आधारे भक्तिमार्गाचे प्रतिपादन करणे यात अर्थ नाही. ज्ञानेश्वरी, दासबोध यांसारखा हा पारंपरिकांचा आधारग्रंथ नव्हे. किंवा एखादे तत्त्वज्ञानपर उपनिषदही नव्हे. श्रीधरबुवांनी या ग्रंथावर जर प्रदीर्घ भाष्य लिहिले असेल, तर तो एक हौसेचा भाग आहे. या रामदासानुदासांना अनेकांनी आपले सद्गुरू मानले. त्यांच्याभोवती अनेक चांगली माणसे गोळा झाली. पण राजकारणाच्या तडाख्यात त्यांची क्रांतिकारक प्रतिमा भंग पावली. पुढे त्यांचे शिष्यही त्यांना सोडून गेले. माडखोलकरांना मात्र त्यांच्याविषयी आदरयुक्त

प्रेम वाटते. त्यांच्या आशीर्वादाने आपल्याला मुलगा झाला, असे माडखोलकरानी नमूद केले आहे. पण हा औपचारिक भाग आहे. साधुसंतांच्याविषयी इतकी भोळी भक्तिभावना मनात बाळगणारे त्याचे त्यांचे मन नाही.

रामदासानुदासांविषयी माडखोलकरांना तीव्र आदर वाटण्याचे कारण निराळे आहे. त्यांच्या डोक्यात अशी कल्पना आहे की, नव्या साधुसंतानी समाजसुधारणेच्या कार्याला एक जन्मभराचे कार्य म्हणून वाहून घेतले पाहिजे. या कार्यातूनच परंपराभिमानी राष्ट्रवादी, पण रूढींचा पसारा गुंडाळून फेकून देणारा एकात्म हिंदू समाज उभा राहील, असे त्यांना वाटते. श्रीधरबुवा हे त्यांच्या या श्रद्धेचे एक प्रतीक आहेत. श्रीधरबुवांनी चालती नोकरी सोडली. एका माणसाला ख्रिस्ती होण्यापासून वाचवण्यासाठी ते ही किंमत द्यायला तयार झाले. त्यांनी रजोदर्शनाबद्दल प्रायश्चित न घेता आपल्या धाकट्या बहिणीचा विवाह केला आणि कर्मठांचा विरोध गुंडाळून बाजूला ठेवला. एका भाविक महाराला त्यांनी आपला शिष्य केले आणि त्याचे नाव रामदास ठेवले. आपल्या वैयक्तिक जीवनातून त्यांनी अस्पृश्यता काढून टाकली. आदिवासी समाजातील अनुयायी जवळ केले; व त्यांना ब्राह्मणांच्या बरोबरीने प्रतिष्ठा दिली. नानाविध जातींच्या विधवा स्त्रिया त्यांनी समाजकार्याला लावल्या. ज्या वेळेला स्वतःला इच्छा निर्माण झाली, तेव्हा हिमतीने जो दुसरा विवाह केला, तो मराठी समाजातील एका विधवेशी केला. स्वतःच्या मुलीचे मौंजीबंधन केले. एक रामदासी पंथाचा सत्पुरुष, आपल्या लोकप्रियतेची पर्वा न करता, झपाट्याने सुधारणा अंमलात आणतो, प्रामाणिकपणे आपल्या गुणदोषांसह समाजासमोर वावरू इच्छितो, आपल्या उपदेशात व स्वतःच्या जीवनात अस्पृश्यता, जातिभेद आणि रूढी गुंडाळून ठेवून मोकळा होतो, याचे माडखोलकरांना मुख्य आकर्षण आहे. म्हणूनच, हिंदुत्ववाद्यांच्या वर्तुळात ते पचण्याजोगे नाहीत, असे त्यांच्याविषयी माझे मत झालेले आहे.

गुणग्राहकता आणि मर्यादांची जाणीव या दोन्ही बाबी माडखोलकरांच्या मृत्युलेखात सातत्याने व्यक्त झालेल्या दिसतात. काही वेळेला एखाद्या कृतिशीलाच्या आदरापोटी ते, काही मुद्द्यांचा उल्लेख न करता, गप्प बसतात, हा प्रश्न निराळा. महर्षी अण्णासाहेब शिंदे याच्यावरील लेख या दृष्टीने पाहण्याजोगा आहे महर्षी शिंदे यांचा जातिभेदावर विश्वास नव्हता दलितांच्या व अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी त्यांनी आयुष्यभर त्यागपूर्वक सेवा केली, ही गोष्ट खरी आहे. पण, महर्षी शिंदे प्रार्थनासमाजाचे अनुयायी होते. याचा अर्थ हा की, ते रूढीचे विरोधक असले, तरी हिंदू धर्मातील उज्ज्वल परंपरा, तत्त्वज्ञान आणि भक्तिमार्ग याचे ते चाहते होते. या विशिष्ट चौकटीत राहून अस्पृश्योद्धार करण्याचा त्यांचा मनोदय होता. कनिष्ठ जमाती आणि शूद्र वर्ग यांना वरिष्ठ जमाती व धर्म यांच्या विरोधी सघर्षात उभे करण्याची त्यांची इच्छा नव्हती. महर्षी शिंद्यांच्या मराठा समाजाने काय किंवा दलित वर्गाने काय त्यांची ही भूमिका नाकारलेली आहे. म. फुले यांना जो आदर आणि आपुलकीचा लाभ झाला, तो योग शिंदे यांना कधी आलाच नाही. महर्षी शिंदे हे एक त्यागी, समर्पित, निष्कलंक जीवन होते. पण, जी जीवनदृष्टी समाजाने नाकारली, तिचे ते प्रतिनिधी होते. त्यांचा ध्येयवाद सार्वजनिक जीवनात पराभूत ठरला आहे. माडखोलकरांना हे माहीत नाही, अशातला भाग नाही. पण, एका ध्येयवादी समर्पित जीवनाला श्रद्धांजली अर्पण करताना, ते असल्या बाबींचा उल्लेख करीत नाहीत.

वाङ्मयाच्या क्षेत्रात आपण उतरलो म्हणजे माडखोलकर हे कोल्हटकरांचे शिष्य आहेत, निदान त्यांचे स्वतःचे असे म्हणणे आहे की, आपण कोल्हटकरांचे शिष्य आहोत. या संदर्भात त्यांनी गिरीश आणि तांबे यांच्याविषयी काय म्हटले आहे हे सोडून देऊन केळकर, कोल्हटकर व खाडिलकर यांचे मूल्यमापन त्यांनी कसे केले आहे, हे पाहिले पाहिजे. एक प्रकारे ही त्रयी म्हणजे त्यांना स्वतःला गुरुस्थानी असणाऱ्या लेखकांतील प्रतिनिधी आहे. तरुण वयात माडखोलकर केव्हा ना केव्हा तरी या तिघांच्या वाङ्मयाने प्रभावित झालेले होते. आज इतक्या वर्षांच्यानंतर या मंडळींच्याविषयी माडखोलकरांना काय वाटते ? नाट्याचार्य खाडिलकरांच्याविषयी त्यांचा आदर जवळजवळ शिल्लक आहे. खाडिलकरांच्या व्यक्तिगत सचोटीविषयी, धीरोदात्त व त्यागमय जीवनाविषयी ते कृतज्ञ आहेत. लो. टिळकांचे शिष्य व अनुयायी या नात्याने खाडिलकरांच्याकडे पाहण्याच्याऐवजी

ते त्यांच्याकडे त्याग, पराक्रम, पौरुष यांची पूजा करणारे लेखक म्हणून पाहणे जास्त पसंत करतात. या सर्वाच्यापेक्षा वाङमयीन दृष्टीने माडखोलकरांचा एक मुद्दा जास्त महत्त्वाचा आहे. वाङमयविवेचकांच्या नजरेतून निसटलेला पण अतिशय मार्मिक असा हा मुद्दा आहे. तो मुद्दा असा की, खाडिलकर ज्या क्षणी संगीत रगभूमीकडे वळले, त्या क्षणी त्यांनी शेक्सपिअरचा हात सोडून दिला आणि किर्लोस्करांच्या नाट्यपरंपरेला ते अधिक निकटवर्ती झाले. या मुद्द्याचा मार्मिकपणा अगदी उघड आहे. खाडिलकर हे जेव्हा 'भाऊबंदकी' 'कीचकवध' सोडून 'मानापमाना' कडे वळतात, त्या वेळेला नुसता गद्य नाटके व सगीत इतकाच बदल घडत नाही त्यांच्या नाटकाच्या एकूण प्रकृतीवरच त्याचा परिणाम होतो 'मानापमाना' मध्ये नुसती सगीताची लयलूट आहे इतकेच नाही, तर गंभीर नाट्य आणि संघर्ष यालाही पारखे असणारे ते नाटक आहे. या नंतरच्या खाडिलकरांच्या नाटकात तुल्यबळ प्रतिस्पर्धी क्वचितच एकमेकांच्या विरोधात उभे राहतात. 'विद्याहरणा'तील शुक्राचार्यांच्या समोर किंवा 'स्वयंवरा'तील श्रीकृष्णासमोर संघर्ष करण्यासाठी या नाटकांच्यामधून तेवढी बलशाली व्यक्तित्त्वेच नाहीत क्रमाने खाडिलकरांच्या नाटकांत मोहक आणि स्वप्नाळू प्रणय महत्त्वाचे स्थान मिळवू लागतो. या नाटकांचे सामर्थ्य सगीतातील स्वप्नविलास, प्रणयातील स्वप्नरंजन या दिशेने जाऊ लागते. जाणीवपूर्वक खाडिलकरांनी हे केले नसेल, पण हा बदल त्याच्या नाटकात दिसू लागतो, हे खरे आहे. फक्त हळूच माडखोलकरांनी, भारतीय परपरा व 'सौभद्र' यांचा खाडिलकरानी आपल्या नाटकांशी सांधा जुळवला हे सांगताना, 'मूकनायका'चे पिल्लू सोडून दिलेले आहे. पण खाडिलकरांच्या नाट्यातील परिवर्तने लक्षात घेताना 'मूकनायक' विचारात घेण्याची गरज नसावी.

खाडिलकर वगळता केळकर आणि कोल्हटकर हे तर माडखोलकरांचे प्रत्यक्ष गुरू. पुष्कळदा केळकर त्यांना कोल्हटकरांचे शिष्य म्हणत आणि कोल्हटकर त्यांना केळकरांचे शिष्य म्हणत. उतारवयात माडखोलकरांच्या जवळ जी आदरबुद्धी कोल्हटकरांच्याविषयी उरलेली आहे, ती केळकरांच्याविषयी उरली नाही. दोघांच्याहीविषयी त्यांनी अतिशय मनमोकळेपणाने आणि निर्भयपणे पुष्कळ बाबी सांगितल्या आहेत, पण कोल्हटकरांच्याविषयी लिहिताना ते कोल्हटकरांचे समर्थन करीत असताना दिसतात. केळकरांच्याविषयी अशा समर्थनाची त्यांना गरज भासत नाही केळकर हे साहित्यसम्राट म्हणून अनेकांनी गौरविलेले. अनेक संस्थांचे चालक म्हणून सतत प्रकाशझोतात मिरवणारे. ते राजकारणात पराभूत झाले, तरी त्यांच्याभोवती प्रतिष्ठेचे एक मोठे वलय शेवटपर्यंत शिल्लक होते. महाराष्ट्राच्या संस्थात्मक जीवनात साहित्यसम्राट यांचा वाटा सिंहाचा होता. त्यांच्या भोवताली नेहमीच माणसांची गर्दी होती. कोल्हटकरांच्याप्रमाणे केळकर कधी विजनवासात गेले नाहीत. यामुळे केळकराच्याविषयी कोणतीही दयामाया दाखविण्याची गरज नाही, अधिक निर्भयपणे व निर्भीडपणे बोलले तरी चालेल, असे माडखोलकरांना वाटते. केळकरांचे गांधींच्या राजकारणाविषयीचे विचार बरोबर होते, असे आजही त्यांचे मत आहे. पण त्यांना साहित्यसम्राट समजावे काय, याविषयी त्यांना शंका वाटते.

केळकर हे मराठीतील फार मोठे शैलीकार होते, ही गोष्ट खरीच आहे. ती माडखोलकरांनाही मान्य आहे. ते फार मोठे पत्रकार आणि संपादक होते, समकालीन पत्रकारांत ते सर्वांत चौरस आणि सौजन्यशील पत्रकार होते, असेही त्यांना वाटते. पण ते फार मोठे इतिकासकार नव्हते, तत्त्वचिंतनाचा त्यांच्याजवळ अभाव होता, त्यांच्या लिखाणात शैलींचे सौष्ठव, विविधता, बहुश्रुतपणा, कोटिक्रम भरपूर होता, पण खोली नव्हती. नाटककार या नात्याने खाडिलकरांशी व समीक्षक या नात्याने कोल्हटकरांशी त्यांची तुलना होऊ शकत नाही. माडखोलकरांनी स्पष्टपणे म्हटले नाही, पण त्यांना ते श्रेष्ठ शैलीकार व दुय्यम दर्जाचे लेखक वाटतात, हे स्पष्ट आहे.

पैकी केळकरांना साहित्यसम्राट म्हणावे काय, हा अगदी गौण मुद्दा आहे. अशा पदव्या लोक प्रेमगौरवाच्या पोटी देतात. त्या काटेकोरपणे पाहायच्या नसतात. केळकरांना साहित्यसम्राट म्हणणे आणि कोल्हटकरांना साहित्यसिंह म्हणणे या गोष्टी टिळकांना लोकमान्य म्हणण्यासारख्या नाहीत. टिळक हे सर्वार्थाने लोकमान्य होते. पण अणे यांना ज्या वेळी आपण लोकनायक म्हणतो, त्या वेळी तो गौरवबुद्धीचा भाग आहे. या गौरवाच्या

बाबी सोडून दिल्या, तर काही मुद्दे शिल्लक राहतात. केळकर हे खाडिलकर–गडकऱ्याच्या बरोबरीचे नाटककार आहेत, असे कुणीच म्हणणार नाही. पण वाङमयेतिहासाचे प्रश्न बाजूला ठेवून, केवळ नाट्यगुण आपण तपासू लागलो, तर केळकरांचे 'तोतयाचे बंड' आणि 'कृष्णार्जुनयुद्ध' यांच्या तुलनेत कोल्हटकराचे एकही नाटक बसणार नाही. कोल्हटकर युगप्रवर्तक नाटककार असतील, पण त्यांच्यातील नाट्यगुण केळकरांच्यापेक्षाही कमी होते.

साहित्यसम्राट केळकर यांच्या वाङ्मयसमीक्षेला खोली आहे की नाही, हा विवाद्य मुद्दा आहे. पण केळकरांच्या नावाशी वाङ्मयसमीक्षेतील दोन कल्पना कायमच्या जोडलेल्या आहेत. एक म्हणजे केळकरांचा सविकल्प समाधीचा सिद्धांत जो त्यांनी बडोदे संमेलनात मांडला आणि त्यावर पुढे पंचवीस वर्षे मराठी समीक्षा चर्चा करीत राहिली. आजही केळकरांचा सविकल्प समाधीचा सिद्धांत चर्चा करण्याजोगा आहे. तो पुनःपुन्हा खोडून काढण्याचा उत्साह टीकाकारांना वाटतो. कुठे तरी मनात ही जाणीव शिल्लक राहते की, या सिद्धांताचे आपण संपूर्ण खंडन करू शकत नाही. त्या सिद्धांतातील दोष आणि उणिवा दाखवून आपल्याला थांबावे लागते. वाङ्मयात व्यक्ती असतात आणि आपण त्यांच्याशी तादात्म्य पावतो, या केळकरांच्या म्हणण्यात फार मोठे सत्य आहे. ते सत्य नाकारता येत नाही. लोल्लटाचा सिद्धांत ज्याप्रमाणे पुनःपुन्हा भुतासारखा उभा राहतो, तसे केळकरांच्या या सिद्धांताचे आहे. मी स्वतः हा सिद्धांत नाकारणारा आहे. पण त्यामुळे या सिद्धांताचे महत्त्व कमी होत नाही.

केळकरांशी चिकटलेला दुसरा सिद्धांत विनोदाविषयीचा, म्हणजे औचित्यविसंगती हा विनोदाचा गाभा आहे, हा होय. हा सिद्धांत तर मराठीत आजही प्रमाण झाल्यासारखा झाला आहे. मला स्वतःला हाही सिद्धांत पटत नाही, पण या सिद्धांताने तीस–चाळीस वर्षे मराठी वाङ्मयसमीक्षेला विनोदचर्चेसाठी आधार दिला आहे, हे नाकारता येत नाही. बीजग्रंथकारांचे वैशिष्ट्यच हे असते. त्यांचे सिद्धांत निर्विवादपणे पुढे मान्य होतील असे नाही, पण त्या सिद्धांतांच्या खंडन–मंडनात समीक्षकांच्या पिढ्या उत्साहाने गुंतून पडतात आणि त्या क्षेत्रातील गुंतागुंतीच्या समस्यांच्यावर नवा प्रकाश पडून त्यात ज्ञानक्षेत्राचा विकास होतो. मराठी वाङ्मयसमीक्षेत दीर्घ काळपर्यंत केळकराचे विचार हा समीक्षेसाठी एक महत्त्वाचा आधार राहिला. कोल्हटकरांना हा भाग्ययोग कधी आला नाही. कोल्हटकरांचा कोणताही सिद्धांत पुढच्या वाङ्मयसमीक्षकांना आपल्या विवेचनाचा केंद्रबिंदू करावासा वाटला नाही. माडखोलकरांनाही केळकरांचे हे मोठेपण नाकारण्याची इच्छा नाही. स्वतः माडखोलकरच, त्यांच्या प्रकृतिधर्माप्रमाणे पाहिले, तर केळकरांचे अधिक वारसदार आहेत. त्या प्रमाणात त्यांच्या वाङ्मयात कोल्हाटकरांचा वारसा सांगता येणे कठीण आहे.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचा काही मोठेपणा कुणीच नाकारीत नाही. ज्या तीन लेखकांनी प्रौढ मराठी समीक्षेचा पाया घातला, त्यांत केळकर, वामन मल्हार आणि कोल्हटकर ही त्रयी आहे. प्रत्यक्ष मराठी वाङ्मयविवेचन पाहिले, तर वाङ्मयाच्या आकलन, आस्वाद व मूल्यमापनात कोल्हटकरांनी निर्माण केलेली चौकट ही एका युगाची चौकट होती, हेही सर्वजण मान्य करतात. कोल्हटकरांनी आखून दिलेल्या चौकटीतच थोडा फार फरक करून मराठी समीक्षा मर्ढेकरांच्या उदयापर्यंत वावरत राहिली. या क्षेत्रातील सिद्धान्तचर्चा सोडल्यास उरलेल्या विवेचनावर सर्वात मोठा प्रभाव कोल्हटकरांचाच होता. ते युगप्रवर्तक नाटककार होते. विनोदपीठाचे आचार्य होते. गडकरी, वरेरकर, अत्रे, खांडेकर, माडखोलकर, गुर्जर, खानोलकर अशा एका फार मोठ्या अनुयायी वर्गाने, आपण त्यांचे शिष्य आहोत, असे सांगण्यात जन्मभर अभिमान बाळगला. हे भाग्य इतर कुणाच्याही वाट्यला आले नाहीं. कोल्हटकरांचा हा मोठेपणा कधीच कुणी नाकारीत नाही. पण हा मोठेपणा मान्य केला, तरी त्यामुळे त्यांच्यातील उणिवा झाकल्या जाऊ शकत नाहीत. या उणिवांना समर्थने देण्यात अर्थ नसतो

पहिली गोष्ट अशी की, क्रमाने कोल्हटकर मागे पडले. इ. स. १८७१ ला त्यांचा जन्म झाला. १८९३ पासून ते लेखक म्हणून उदयाला येऊ लागले इ. स. १८९६ ला त्यांचा वैभवकाळ सुरू होतो. १९११ पासून ते मागे पडू लागतात. म्हणजे कोल्हटकर वयाच्या बेचाळीसाव्या वर्षापासून मागे पडू लागले. आयुष्याची शेवटची वीस वर्षे क्रमाने ते अधिकाधिक मागेच पडत गेले. हे



अनुक्रमणिका

कोल्हटकराचे मागे पडणे माडखोलकरांना मान्य आहे. फक्त या मागे पडण्याला ते अधिक चांगली कारणे शोधू इच्छितात. माडखोलकराची कारणे खरीही जरी मानली, तरी हा लेखक उदयाला आल्यापासून वीस वर्षांत मावळू लागला, त्याचा वैभवकाळ तर फक्त अठरा वर्षांचा आहे, हे माडखोलकर गुरुभक्तीच्या भरात विसरतात. इतर लेखक सोडा, स्वतः माडखोलकर यापेक्षा दीर्घ काळ सर्व विरोधकांना पुरून उरलेले आहेत आणि वाचकाच्या मनात ठाण मांडून बसलेले आहेत. इतकेही यश आपला वाचक टिकवण्यात त्यांच्या गुरुजींना आलेले दिसत नाही.

एखाद्या लेखकाने आपला वाचकवर्ग टिकवणे म्हणजे सर्वस्व नव्हे. ते वाङ्मयाच्या क्षेत्रातील त्या लेखकाच्या मोठेपणाचे गमक नव्हे, तसे कलात्मकतेचेही गमक नव्हे. या सर्व गोष्टी मान्य केल्या, तरी इतक्या वेगाने एखादा लेखक मागे का पडतो हे विचारात घेतलेच पाहिजे. कवी, कादंबरीकार, कथाकार या नात्याने कोल्हटकरांना किमान यशही आले नव्हते त्यांचे मोठेपण वाङ्मयसमीक्षा, विनोद आणि नाटक या क्षेत्रांत आहे. विशेषतः नाटकाच्या क्षेत्रात त्यांच्या मोठेपणाचे स्वरूप नवीन कल्पकतापूर्ण कथानक, कल्पनाप्रचुर कोटिनिष्ठ संवाद, विनोदाला स्वतंत्र जागा, नवे संगीत अशा प्रकारचे आहे. कोल्हटकर जिवंत नाट्यगुणांसाठी कधी प्रसिद्ध नव्हते. त्यांच्या प्रभावामुळे मराठी नाट्यसृष्टी बदलली. पण त्यांचे स्वतःचे नाटक मात्र कधीही टिकाव धरू शकले नाही याचे कारण असे की, एखादा नाटककार कल्पनाविलासाच्या जोरावर वाङ्मयाचा भावनात्मक परिणाम वाढवतो. एकाद्याच्या जवळ अशी कोणती उत्कटता नसतेच, जिवंतपणाही नसतो. फक्त कल्पना व कोट्या असतात. ज्या दिवशी कल्पनाप्रचुर संवाद लिहिणारा नवा नाटककार उदयाला येतो आणि त्याच्याजवळ उत्कटतेचा अंशही असतो, त्या दिवशी नुसते कोट्या करणारे मागे पडतात. हे कोल्हटकरांचे झाले. कोल्हटकरांना बाधक ठरले असतील तर गडकरी आणि खाडिलकर हे दोन नाटककार बाधक ठरले. माडखोलकर सांगतात त्याप्रमाणे वाचक–प्रेक्षकांचा दर्जा खालावला, हे बाधक ठरले नाही. इ. स. १९२० नंतर खाडिलकर, गडकरी, खांडेकर, माडखोलकर, अत्रे, वरेरकर हे क्रमाने लोकप्रिय होत गेले आणि त्या शेजारी मागची देवल, किर्लोस्करांची नाटकेही लोकप्रिय राहिलीच. फक्त मधले कोल्हटकर मात्र अस्त पावले. याची जबाबदारी वाचक–प्रेक्षकांच्यावर टाकणे अन्यायाचे आहे.

कोल्हटकरांच्या संगीताविषयी सुद्धा एकदा स्पष्ट भूमिका घेतली पाहिजे. किर्लोस्करांच्या नाटकांतून जे संगीत क्रमाने मराठी रंगभूमीवर प्रतिष्ठित झाले, त्यात एक स्थित्यंतर होते. भजन, लावण्यांने संगीत या रंगभूमीवरील प्रयोगांतून ते मोठ्या वेगाने बदलत गेले आणि त्या ठिकाणी ग्वाल्हेर गायकीचे संगीत क्रमाने लोकप्रिय झाले. किर्लोकर–देवलांच्या नाटकात ग्वाल्हेर घराण्याच्या गायकीला शक्य तितके सुगम आणि आकर्षक स्वरूप देण्यात येत होते. यानंतर खाडिलकर पुढे आले. खाडिलकरांच्या नाटकांच्या मधून कधी जयपूर घराणे, कधी जयपूर ग्वाल्हेर यांची मिश्रणे लोकप्रिय झाली. गोविंदराव टेंबे, भास्करबुवा बखले, रामकृष्णबुवा वझे यांनी दिलेले संगीतच क्रमाने खाडिलकर–गडकऱ्यांच्या नाटकांत होते. या दोहोंच्या मध्ये तप, दीड तप कोल्हटकर उभे होते, कोल्हटकरांचे तानप्रधान संगीत उभे होते. कोल्हटकरांनी उर्दू आणि पारशी रंगभूमीवरील ज्या चाली मराठी रंगभूमीवर आणल्या, त्यात तानांची कसरत होती, गतिमानता होती, राग–रागिण्यांची मिश्रणे होती. पण या सर्व संगीताचा संगीत म्हणून दर्जा फार सामान्य होता. संगीतक्षेत्रातल्या मंडळींनी या संगीताची आकर्षकता मान्य केल्यानंतर त्याचा दर्जा सामान्य ठरविला आहे. गोविंदराव टेंबे त्याला रंगीबेरंगी तुकड्यांचा मजेदार ताबूत म्हणतात. त्यांनीही या संगीताला दर्जा नव्हता, असेच मत दिलेले आहे. बाबूराव जोशींनी या संगीताविषयी दर्जा म्हणून नापसंतीच दाखविली आहे. संगीताच्या क्षेत्रातही कोल्हटकरांना चमत्कृती आणि नावीन्य याचा मोह पडला. त्या संगीतातील स्थायी माधुर्याचे गुण त्यांनी दुर्लक्षित केले.

किर्लोस्करांचे संगीत जसेच्या तसे शिल्लक राहणारच नव्हते. सगळ्या महाराष्ट्रातच संगीताचे पुनरुज्जीवन चालू होते. अभिजात संगीताच्या आकर्षणाची एक नवीन लाट आलेली होती. तिचे पडसाद मराठी रंगभूमीवर उमटतच होते. किर्लोस्करांची नाटके तीच होती, गीते तीच होती, परंतु त्यांतील

अनुक्रमणिका

गायनाचे प्रकार मात्र क्रमानं बदलत होते. देवलांच्या नाटकांमधून किर्लोस्करी संगीतच होते. पण त्या संगीतातील काही घटक सदैव बदलत होते. विशेषतः देवलांच्या 'मृच्छकटिक' आणि 'शारदा' या नाटकांतील संगीताचे स्वरूप निराळे होते. ते अगदीच 'सौभद्रचे' चे संगीत नव्हते. कोल्हटकरांच्या वैभवाचा काळ जरी घेतला म्हणजे १८९६ ते १९१० हा काळ जरी विचारात घेतला, तरी 'सौभद्र' चालू होते, 'मृच्छकटिक' आणि 'शारदे' ला अपार लोकप्रियता होती. आपल्या वैभवाच्या काळातही कोल्हटकर मराठी रंगभूमी आच्छादून टाकू शकत नव्हते.

तरीही मराठी वाङ्मयात कोल्हटकरांचे एक महत्त्व आहे. हरी नारायण आपटे यांच्यामुळे कादंबरीत आणि किर्लोस्कर–देवलांच्यामुळे नाटकात वास्तववादी शैली ही रूढ झालेली होती. या जिवंत, प्रसन्न वास्तववादी शैलीला जसे सामर्थ्य होते, तशा तिच्या मर्यादाही होत्या. कोल्हटकरांनी कोट्या व कल्पनाविलासाने नटलेल्या नव्या आलंकारिक शैलीचा पुरस्कार केला. पाहता पाहता या नव्या आलंकारिक शैलीने वास्तववादी शैलीचा पाडाव केला. खांडेकर आणि माडखोलकर हे तर कोल्हटकरांचे शिष्यच आहेत. पण प्रत्यक्ष फडकेसुद्धा आलंकारिकाच्या शैलीत लिहीत असतात. फडक्यांची शैली वास्तवाचा भास निर्माण करणारी पण आलंकारिकांची शैली आहे. हा प्रश्न फक्त शैलीचा नसून मनोवृत्तीचाही आहे. नवनवे स्वप्नरंजन निर्माण करून त्या काल्पनिकाच्या पसाऱ्यात रमण्याची एक सवय कोल्हटकरांनी मराठी साहित्याला लावली. या स्वप्नरंजनाच्या वातावरणाचे मराठी वाङ्मयावर परिणाम झाले. हे कोल्हटकरांचे मराठी साहित्यातील युगप्रवर्तक स्थान नाकारताही येणार नाही, पण त्याबरोबरच कोल्हटकरांच्या वाङ्मयसृष्टीतील मूलभूत दुवळी जागाही विसरता येणार नाही.

कोल्हटकरांना कथानकाचे स्वतंत्र महत्त्व वाटे. भाषाशैलीचेही स्वतंत्र महत्त्व वाटत होते. कथानकातील गुंतागुंत, या गुंतागुंतीची अनपेक्षित उकल ही त्यांच्यासाठी एक महत्त्वाची गोष्ट होती. आलंकारिक भाषाशैली ही दुसरी महत्त्वाची गोष्ट होती. रसोत्कटता, व्यक्तिदर्शन, जीवनदर्शन, वास्तवता या बाबींच्याकडे त्यांचा फारसा कल नव्हता. त्यांनी खलपात्रांनाच विनोदही करायला लावलेले आहे. हे करीत असताना जीवनातील खलत्व ही गंभीर बाब आहे, विनोदाचा खेळकरपणाशी संबंध आहे, खलपात्रच विनोदी बुद्धिवैभवाने आणि उपरोधाने दाहक करावा लागतो, असे कोल्हटकरांना वाटले नाही

कोल्हटकराच्या विनोदाचेही हेच वैशिष्ट्य आहे. केवळ कोट्या इतकेच त्या विनोदाचे स्वरूप नाही. तो विनोद निबंधवजा लेखातील विनोद आहे. त्या विनोदातील मर्म समजण्यासाठी हिंदू धर्मातील बारीकसारीक ज्ञान आणि शब्दातील अर्थच्छटांची तीव्र जाणीव वाचकांच्या जवळ असणे आवश्यक आहे. म्हणजे तो विनोद पंडितांचा विनोद आहे कोल्हटकरांच्या नाटकातील शृंगार पंडितांचा शृंगार आहे. त्याची समीक्षासुद्धा रसग्रहणावर आधारलेली नाही. चागल्या कालाकृतीचे समरसून सौंदर्यग्रहण करणे त्यांना कधी जमलेच नाही. माहिती आणि वर्गीकरणाचा तपशील, विश्लेषण आणि पद्धतिविषयक चर्चा हीच त्यांच्या समीक्षेचीही वैशिष्ट्ये राहिली. या वैशिष्ट्यांच्या जोरावर समीक्षाक्षेत्रातील एखाद्या व्यापक सिद्धान्तनापर्यंत पोचणे त्याना शक्य झाले नाही.

व्यक्ती म्हणून कोल्हटकर अतिशय रसिक होते, संभाषणचतुर होते. नवोदित साहित्यिकांना मित्राप्रमाणे वागविण्याची, त्यांचे कौतुक करण्याची, त्यांना पुढे आणण्याची त्यांची प्रवृत्ती होती. त्यांच्या जीवनात थोडा लंपटपणा होता, तशी व्यापक रसिकता होती. ते रसिकतेने सौंदर्याचे ग्रहण करीत, गंभीरपणे शास्त्रचर्चाही करीत. त्यांची शारीरिक वैगुण्ये त्यांना जन्मभर सोबत करीत राहिली. पण त्याचे व्यक्तित्व स्त्रियांच्यासाठी रुबाबदार आणि आकर्षक राहिले. या साऱ्याचा मोठ्या जिव्हाळ्याने माडखोलकरांनी विचार केला आहे. त्या वेळचे वाङ्मयविश्व समजावून घेताना, जीवन व वाङ्मयाचे सांधे जोडताना, चरित्रात्मक टीका समृद्ध करताना, माडखोलकरांनी दिलेली ही सर्वच माहिती अतिशय महत्त्वाची ठरेल. वाङ्मयातील त्या काळची पिढी अनेक विसंवादी थरांनी भरलेली होती. त्या विसंवादी पातळ्या, त्यांचे परस्परांच्यावरील परिणाम, त्यांचे वाङ्मयावरील परिणाम तपासून पाहण्यासाठी भाऊसाहेबांचे हे लिखाण अतिशय उपयोगी ठरेल.

या पिढीत, एक तर,

अनुक्रमणिका

समाजसुधारणाच्या निमित्ताने समाजाच्याविषयीची प्रतिबद्धता आणि समाजाला मार्गदर्शन करण्याची जिद्द व हौस, हा थर आहे. या पातळीचा मोह हे लेखक टाळू शकत नाहीत. दुसरे म्हणजे वाङ्मय आनंदासाठी आहे, आनंद चमत्कृतीतून येतो, ही चमत्कृती घटनाची, यासाठी कथानकातील गुंतागुंत व अनपेक्षितता ही चमत्कृती कल्पनांची, यासाठी कोट्या व अलंकार असा हा चमत्कृतिजन्य आनंदाचा व स्वप्नरंजनाचा भाग या मंडळीच्या मनाचा एक थर आहे. त्याचेही आकर्षण त्यांना टाळता येत नाही भारताच्या परंपरेविषयीचा अभिमान हाही तिथे आहे. पाश्चिमात्य संस्कृतीचे महत्त्व कळल्यामुळे त्याचेही आकर्षण आहे. दोन्ही परंपरांचा सोयिस्कर समन्वय लावण्याच्या धडपडीतून निर्माण होणारे विसंवादही आहेत. समकालीन जीवनात विद्वान, चारित्र्यवान, समाजसुधारक म्हणून प्रतिष्ठा मिळवणे व वेगवेगळ्या थरांत रसिक म्हणून लोकप्रियता मिळवणे, असेही थर तिथे आहेत. अशा सर्व चमत्कारिक विसंवादांनी ही मने भारली गेलेली आहेत. त्याचे दर्शन केळकर, कोल्हटकर आणि खाडिलकर या त्रयीत, मागे हरिभाऊ, केशवसुतात आणि पुढे वामन मल्हार–केतकरात दिसून येते. कोल्हटकरांना मध्यवर्ती गृहीत धरून, या वाङ्मयविश्वाचा चरित्रात्मक टीकापद्धतीने नव्याने अभ्यास करता येईल, असे वाटते. अशा अभ्यासाची जिज्ञासा माडखोलकरांनी निर्माण केली. तो अभ्यास शक्य व्हावा यासाठी विपुल चरित्रात्मक तपशील दिला. आणि या अभ्यासामुळे त्या वाङ्मयाचे स्वरूप नव्याने लक्षात येण्याची सोय उपलब्ध झाली. हे मराठी वाङ्मयमीक्षेवर माडखोलकरांचे फार मोठे ऋण राहणार आहे.

माडखोलकरांनी जर आपल्या टीकेचा विशिष्ट प्रकारचा प्रपंच मांडला नसता, तर देवलांच्या 'संशयकल्लोळा' चे पुष्कळसे अंतरंगदर्शन घडलेच नसते. बालकवी, गडकरी यांच्या वाङ्मयातील अनेक चमत्कारिक रहस्यांचा उलगडा करण्याची इच्छाच निर्माण झाली नसती. कोल्हटकर, केळकर यांच्या वाङ्मयातील अनेक स्थळे अज्ञात राहिली असती. या साऱ्या प्रयत्नात थोर वाङ्मयीन नायकांचे मूर्तिभंजन होत आहे का ? मला तसे वाटत नाही. माडखोलकरांच्या या लिखाणमागे प्रेरणेची अशी दूषित दृष्टी नाही. त्यांना कोणाची विटंबना अगर मूर्तिभंजन करायचे नाही. या वाङ्मयाने असा आकार का धारण केला, या आकाराच्या मागे सामाजिक आणि चरित्रात्मक कारणं कोणती आहे, इकडे लक्ष वेधण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे. वाङ्मयाचे अलौकिक विश्व लौकिक विश्वाशीं कसे जोडलेले आहे, यावर प्रकाश टाकण्याची ही धडपड आहे.

मराठीतील वाङ्मयसमीक्षा अजून सर्वच मार्गांनी विकसित व्हायला हवी आहे. एखाद्या वाङ्मयकृतीचे त्या वाङ्मय प्रकारातील परस्परांशी संबध, भोवतालच्या समाजाशी संबंध, कलावंतांच्या व्यक्तित्वाशी संबंध, कलावंतांच्या वाङ्मयीन व वैचारिक भूमिकांशी कलाकृतीचे संबंध अशा सर्वच बाजूंनी वाङ्मयसमीक्षा समृद्ध व्हायला पाहिजे. माडखोलकरांनी या विविधमार्गी अभ्यासाच्या दृष्टीने विपुल सामग्री उपलब्ध करून दिलेली आहे आणि इतरांना आपल्या जवळची माहिती उजेडात आणण्याचे धैर्य दिले आहे. हे कार्य काही कमी महत्त्वाचे नाही. मराठी वाङ्मयसमीक्षेला त्यांचा हा सारा उद्योग अनेक मार्गांनी समृद्ध करणारा ठरेल, यात मला शंका नाही.

कै. नरहर कुरुंदकर
('अभिवादन'
या ग्रंथातून पुनर्मुद्रित)

प्रज्ञावंत पत्रकार

स. मा. गर्गे

श्री. भाऊसाहेब माडखोलकर प्रथितयश साहित्यिक हाते. कादबरी लेखक म्हणून ते विशेष गाजले. साहित्य समीक्षक म्हणूनही ते नामवंत होते. लघुकथा आणि कविता या साहित्य प्रकारातही आरंभीच्या काळात त्यांनी नांव सपादन केले. साहित्य क्षेत्रातील अशा यशाची वाटचाल त्यांची चालू होती. त्याकाळातच ते वृत्तपत्रक्षेत्रातही यश मिळवित होते. आरभी वीस वर्षे नागपूरच्या 'महाराष्ट्र' साप्ताहिकात त्यांनी आपल्या लेखणीने त्या साप्ताहिकाला वृत्तपत्रीय क्षेत्रात स्थान मिळवून दिले आणि त्यानंतर सुमारे पंचवीस वर्षे त्यांनी नागपूरच्या दैनिक 'तरुण भारत'चे सस्थापक–संपादक म्हणून महत्त्वाची भूमिका पार पाडली. विदर्भातील मराठी दैनिकांच्या संपादकीय क्षेत्रात ते अग्रगण्य होते.

साहित्य आणि पत्रकारिता ही दोन क्षेत्रे भिन्न प्रकृतीची मानली जातात. पण त्या काळात तरी मराठीत या दोन्हीतील श्री. न. चिं. उर्फ तात्यासाहेब केळकर, शिवराम महादेव परांजपे, श्री. काकासाहेब खाडिलकर यांच्याच परंपरेत श्री. माडखोलकर यांनी उच्चस्थान मिळविले होते. साहित्याला राजकीय कथांची डूब देऊन कादंबऱ्यांचे क्षेत्र श्री. भाऊसाहेब माडखोलकरांचे वैशिष्ट्यपूर्ण कार्य समजले जाते. राजकारणातील विपरीत प्रवृत्तींच्या मागे दडलेले डावपेच त्यांच्या वेधक कांदबऱ्यात वाचकांसमोर स्पष्ट होतात. अर्थात हे करीत असताना भाऊसाहेबांनी ललित साहित्याचा बाज मात्र सोडला नाही. तत्कालीन मध्यप्रदेशातील राजकारणाचे अनेक धागेदोरे मांडत असताना राज्यकर्त्यांच्या मनातील भावही यशस्वीपणे ते रेखाटत असत. अेका अर्थाने वृत्तपत्र हेही राजकारणाची आणि समाजकारणाची समीक्षाच करीत असते सार्वजनिक जीवनाची प्रकृती आणि विकृतीही शोधण्याचे, त्यावर आपले मत व्यक्त करण्याचे, त्याची प्रतिक्रिया ओळखून आपले मार्ग दाखवावयाचे, अशी अनेक मार्गी समीक्षाच वृत्तपत्रात चालू असते श्री. भाऊसाहेबांच्या शोधक मनोवृत्तीला हे कार्य अधिक यशस्वीपणे करता आले ते त्यांच्या चिकित्सक बुध्दीमुळे, प्रखर टीकेमुळे आणि धारदार लेखणीमुळे. ही सर्व आयुधे ते आपल्या दैनिकात सहजगत्या चालवीत असत. त्यामुळे तथाकथित पुढारी घायाळ होत असत तर कार्यकर्त्यांना आधार मिळत असे

काहीशा योगायोगाने वृत्तपत्र संपादनाच्या क्षेत्रात काम करण्याची मला संधी मिळाली आणि तीही श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांच्या सारख्या प्रतिथयश संपादकाच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची. मराठवाडा साहित्य संमेलनाचे भाऊसाहेब अध्यक्ष होते आणि त्याच संमेलनाच्या स्वागत मंडळाचा मी चिटणीस होतो. निजामाच्या नादीरशाही कारभाराचे अनेक अडथळे ओलांडून आम्ही ते संमेलन १९४५ साली औरंगाबाद येथे भरविले होते. हैद्राबाद संस्थानच्या सीमेबाहेरील कितीही मोठा साहित्यिक असो, त्याला संस्थानात संमेलनाच्या अध्यक्षपदी निवडण्याची आम्हाला परवानगी नव्हती. या संदर्भात सुमारे सहा महिने पत्रव्यवहार झाल्यानंतर ती मिळाली. त्यामागचे राजकारण विस्ताराने

अनुक्रमणिका

सांगण्याची येथे गरज नाही. सारांशाने एवढेच सांगता येईल की शेवटच्या क्षणी आम्ही असा युक्तिवाद लढवला की विदर्भ हा तत्त्वत: निजामाचाच प्रांत आहे, म्हणून श्री. माडखोलकर यांच्या अध्यक्षपदाच्या नावाला संमती मिळावी आणि आमची ही खेळी यशस्वी ठरली.

संमेलनाच्या निमित्ताने श्री भाऊसाहेबांशी चिटणीस या नात्याने पत्रव्यवहार करणे मला आवश्यक होते. त्यातूनच मी कळत नकळत माझ्या मनातील वृत्तपत्रीय क्षेत्राची ओढ त्यांच्या निदर्शनास आणून दिली. प्रत्यक्ष भेटीत पत्रव्यवसाया–संबंधी आमची चर्चाही झाली. मला आणि माझ्या बरोबरच्या अनेक तरुणांना निजामाच्या राज्यातून, कोणत्याही का मार्गाने होईना, बाहेर पडण्याची उत्सुकता होती. मला वृत्तपत्र लेखनाचे आकर्षण वाटत असे. माझ्या भावनांना माडखोलकर यांनी योग्य तो प्रतिसाद दिला आणि अनेक सावधगिरीच्या सूचना देऊन अखेर 'तरुण भारत' मध्ये काम करण्याची संधीही दिली. चालू असलेली नौकरी सोडून मी १९४६ च्या आरंभी तरुण भारतच्या संपादकीय विभागात रुजू झालो. चार वर्षे भाऊसाहेबांच्या अनुभवी मार्गदर्शनामुळे माझ्या जीवनाला अगदी वेगळे पण उपकारक वळण मिळाले. हे सर्व तपशीलाने सांगण्याचे कारण असे की, माझ्यासारख्या अगदी अपरिचित पण उत्सुक तरुणाच्या मनातील भाव अचूक ओळखून श्री. माडखोलकर यांनी माणसाची पारख, दूरदर्शीपणा आणि लेखक व पत्रकार या दोन्ही क्षेत्रातील आपली अनेक वैशिष्टये व्यक्त केली.

वर्तमानपत्राच्या कार्याविषयी आणि कार्यालयाविषयी त्यांची अनेक वैशिष्टये मला पुढच्या चार वर्षांच्या कालावधीत अनकेदा दिसली. समाजाकडे ते किती व्यापक दृष्टीने पहावे लागते याची ते आपल्या सहकाऱ्यांना आणि जिव्हाळयाच्या हितचिंतकाना जणू जाणीव करून देत असत. वर्तमानपत्र चालवावयाला आवश्यक असलेले सारे गुण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अेकवटलेले होते. वर्तमानपत्रासंबंधी ते अनेकदा म्हणत असत की, "वर्तमानपत्राची कचेरी म्हणजे बहुजन समाजाची चावडी आहे. या चावडीत साऱ्या सामाजिक आणि सार्वजनिक चळवळींचा फड पडलेला असतो. अनेक सहकार्याची आणि संघर्षाची चर्चा तेथे चालते. समाजावरील कोणतीही आपत्ती असो, ती आपत्ती निवारण करण्याचे सामर्थ्य फक्त वर्तमानपत्रातच असते." अर्थात अशा चावडीवर जो पाटील बसलेला असतो, त्याची दृष्टी, वृत्ती समाजाशी समरस होण्याची आणि बुध्दी तीव्र असावी लागते. अर्थात त्याचे सर्वात प्रभावी साधन म्हणजे त्याची शैलीदार आणि परिणामकारक भाषाशैली.श्री. माडखोलकर यांच्या लेखणीत सामर्थ्य होते आणि वृत्तीत समाजकारण होते, म्हणूनच ते दैनिकाच्या संपादकपदाची धुरा यशस्वीपणे चालवू शकले. विदर्भात तर त्यांचे दैनिक संपूर्ण यशस्वी झाले. त्यांच्या संपादकीय दृष्टीसमोर लो. टिळकांची राष्ट्रीय दृष्टी होती आणि कार्यपद्धतीत तात्यासाहेब केळकरांचा शिस्तशीर आदर्श होता.

'तरुण भारत' हे माडखोलकरांचे अेका अर्थाने व्यक्तिपत्र आणि मतपत्रही होते. त्यांची मते अनेकदा विसंगत वाटली तरी ती मांडण्याची आणि वाचकांना पटवून देण्याची शैली वैशिष्टयपूर्ण असे. त्यांच्या अग्रलेखात व्यक्त होणाऱ्या विचारात कोणी ढवळाढवळ करीत नसे आणि ते करूही देत नसत. बातम्यांच्या बाबतीतही ते अतिशय चोखंदळपणे निवड करीत असत. 'तरुण भारत'ने जिल्हा बातमीदार नेमलेले होते. जागतिक महायुद्धाचे शेवटचे पर्व, देशातील जातीय राजकारण, स्वातंत्र्याच्या आणि फाळणीच्या दिशेने होत असलेली देशाची वाटचाल अशा सर्वप्रकारच्या प्रक्षोभक कालखंडात बातम्यांची निवड करणे, अग्रलेखातून त्यांची चिकित्सक छाननी करणे, लोकांच्या मनावर उत्कटतेने परिणाम करतील अशी शब्द–रचना करणे, हे सर्वच संपादकीय धोरण त्याकाळी अतिशय अवघड बनलेले असे. पण माडखोलकर यांचे भाषाप्रभुत्व, संपादनकौशल्य आणि समाजाची नाडी ओळखण्याचे चातुर्य हे सर्व तत्कालीन लोकमताला योग्य ते वळण देण्यास उपयोगी पडले. ब्रिटीश सत्तेविरुध्द भावना प्रक्षुब्ध तर व्हाव्यात पण लोकमानसातील असंतोष विशिष्ट मर्यादेबाहेर तर जाऊ नये, अशी त्यावेळी तारेवरची कसरत करण्याचे कौशल्य त्यांच्या दैनिकांत दिसून येत असे. आझाद हिंद सेनेची बातमी असो, की नौखालीत जातीय आगीने होरपळ होत असो त्यांचे यथोचित दर्शन

अनुक्रमणिका

'तरुण भारतच्या' वाचकांना झाले पाहिजे. ही त्यांची वृत्तपत्रीय व्यापक नीती बातमीतून व्यक्त होत असे. पण केवळ राजकारणावरच 'तरुण भारतचा' सर्व भर नव्हता. देशातील आणि जगातील अस्वस्थ करणाऱ्या बातम्या तर वाचकांना प्राधान्याने मिळाल्याच पाहिजेत पण त्याबरोबरच साहित्य, चित्रपट, क्रीडा, व्यापार–व्यवसाय ही क्षेत्रेही वाचकांना चांगली परिचित झाली पाहिजेत, यासाठी त्यांनी नवी सदरे सुरू केली आणि त्यावेळच्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करून दैनिकाचा प्रचार आणि प्रसार वाढविला. इ.स. १९४४ साली 'तरुण भारत' दैनिक सुरू झाले तेव्हा नागपुरात टेलिप्रिंटरने बातम्या मिळण्याची सोय नव्हती. वृत्तसंस्थेचा प्रतिनिधी दर दोन तीन तासानतर बातम्या पाठवीत असे त्यामुळे बातम्या मिळण्यास, त्या अनुवादित व संपादित करून छापण्यास कितीतरी विलंब होत असे. त्यातच त्यावेळी विदर्भात वाहतुकीची आणि दळवळणाची साधनेही पुरेशी आणि जलदगतीची नव्हती. यंत्रसामुग्रीही मुंबई–पुण्याच्या तुलनेने बव्हंशी जुनीच होती. विकत घेऊन वृत्तपत्र वाचण्याची प्रवृत्तीही यथातथाच असे. त्यातच हिंदी आणि इंग्रजी दैनिकांची तीव्र स्पर्धा, हिंदी दैनिकाला शासकीय उत्तेजनाची भरपूर खिरापत मिळण्याची सोय अशा सर्व अडचणींमुळे मराठी दैनिकाचा प्रसार विशिष्ट जिल्हयाच्या पलीकडे होणे अवघड होते. अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून श्री. माडखोलकर यांनी आपले दैनिक फार थोडया अवधीत यशस्वी केले. अडथळयांची स्पर्धा जिंकली.

वृत्तपत्रव्यवसाय हा धंदा नसून धर्म आहे असे भाऊसाहेब मानीत असत. राष्ट्रीय परंपरा आणि इतिहासातील गौरवस्थाने यांच्या संबंधीचा अभिमान त्यांच्या अग्रलेखातून व्यक्त होत असे. त्यांचे अग्रलेख प्रदीर्घ असत. सामान्यतः चार स्तंभापासून सात आठ स्तंभापर्यंत अग्रलेखांची लांबी हे त्यांच्या अग्रलेखाचे अेक वैशिष्टय. त्यात समकालीन राजकीय आणि भाषिक परिस्थितीचे विश्लेषण तर असेच, पण त्यासाठी ऐतिहासिक व्यक्तींचा आणि पौराणिक कथांचा चपखल उपयोग करून ते वाचकांपुढे चित्र उभे करीत. त्यातील उपमा अलंकारांनी वाचकाला त्यामागील घटना सहजपणे लक्षात येत असत. डौलदार वाक्यरचना आणि समकालीन प्रसंगाचा योग्य परामर्श घेण्याची क्षमता व कला, यामुळे माडखोलकरांचे अग्रलेख अत्यंत लोकप्रिय होत असत समाजातील कर्तृत्ववान व्यक्तीचे गुणदोष, राजकीय पुढाऱ्यांच्या धोरणातील संगती आणि विसगती, डावपेच करून आपले महत्त्व वाढवू पहाणाऱ्या मंडळीचा उपहास या सर्वांची पल्लेदार वर्णने ही तर त्यांच्या अग्रलेखाची बलस्थाने होती. सर्वात महत्त्वाचे वैशिष्टय असे की कोणत्याही अेका विशिष्ट राजकीय विचाराचा पुरस्कार 'तरुण भारतने' केला नाही. सर्व समावेशक राष्ट्रवादी चळवळीला अग्रस्थान देऊन लोकमानसात अशा चळवळीविषयी ते आत्मीयता उत्पन्न करत असत त्यांच्या अनेक अग्रलेखात मराठी भाषिक जीवनाचा आणि परंपरेचा अभिमान तर असेच, पण त्याबरोबरच मराठीवर हिंदी भाषेच्या राजकीय आक्रमणाचा ते खरमरीतपणे परामर्शही घेत असत. दांभिकपणे गांधीवादाची जपमाळ ओढणाऱ्या आणि समाजात आपले महात्म्य वाढवू पहाणाऱ्या तथाकथित गांधीवादी मंडळीवर त्यांनी अनेकदा प्रखर टीका केली. त्यात तत्कालीन मंत्रीमडळातील हिंदी भाषिक मंत्र्यांचा प्रामुख्याने समावेश असे त्यावेळच्या मंत्रीमंडळाची सूत्रे पं. रविशंकर शुक्ल व पं. द्वारकाप्रसाद मिश्र या जोडगोळीच्या हाती होती. त्यांच्या नांवावर कोटी करून मिश्र–संस्कृतीचे शुक्ल–काष्ट मराठी समाजाच्या मागे लागले आहे असा वाक्प्रचारही त्यावेळी कोणीतरी रूढ केलेला होता. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती आणि मराठी भाषेला सामाजिक व्यवहारात अग्रस्थान, हे माडखोलकरांच्या वृत्तपत्रीय धोरणाचे मुख्य सूत्रे होते.

श्री. भाऊसाहेब माडखोलकर सर्व सहकाऱ्यांशी अतिशय खेळीमेळीने वागत असत. पुढच्या काळात मी काही संपादक असे पाहिले आहेत की जे आपल्या केबिनमधून बाहेर येऊन सहकाऱ्यांशी बोलणे किंवा चर्चा करणे कमीपणाचे मानीत असत. सहकाऱ्यांना काही सूचना द्यावयाच्या तर त्याही त्याला केबिनमधे बोलावून, तथाकथित आपल्या वरिष्ठपणाच्या पातळीवरूनच देत असत. पण भाऊसाहेबांचा खाक्या निराळाच असे. ते स्वतःला अेखाद्या स्वतंत्र केबिनमध्ये कोंडून घेत नसत. किंबहुना 'तरुण भारत'

मध्ये त्यानी स्वतःसाठी अशी वेगळी केबिनच ठेवली नव्हती. त्यांच्या धोरणाप्रमाणेच ते 'तरुण भारत' च्या मध्यवर्ती 'चावडी' वर टेबलाशेजारी बसून अग्रलेखाचे लेखन, सहकाऱ्यांशी चर्चा, आणि बाहेरून येणाऱ्या मंडळीशी विचारविनिमय करीत असत. अनेकदा ही सर्व कामे अेकाच वेळी चालत असत. अेकीकडे संपादकीय लेखन आणि त्याचवेळी बाहेरगांवाहून आलेल्या वातमीदारांकडून त्याच्या गावातील वर्तमानसार समजून घेत असत दररोज दुपारी तीन–चारच्या दरम्यान सर्व संपादक–सहाय्यकांशी, चहा घेत असताना भाऊसाहेबांच्या गावगप्पा, विनोदी कोटया मुक्तपणे चालत असत आणि मग हास्यकल्लोळात चहाची बैठक अर्धा–पाऊण तास रंगत असे. अशा मोकळया वातावरणात सर्वांनाच काम करण्याचे नवे चेतन्य मिळत असे. खरे तर भाऊसाहेबांसकट आम्ही सर्वच संपादक होतो.

दैनिकाच्या संपादकीय कामात तरबेज असणाऱ्या व्यक्तीकडूनही घाई–गर्दीत कळत नकळत चूक राहून जाणे नित्याचेच असते पक्ष, गाव, व्यक्ती, प्रसंग, यांच्या नावात अदलाबदल होणे, हाही प्रकार दैनिकाच्या संपादकाला नवा नसतो. पण अशी अेखादी मोठी चूक राहून गेली तर, भाऊसाहेब ती संपादकाच्या नजरेस आणून देऊन तशी चूक पुन्हा होऊ नये म्हणून काही सूचना देत असत. पण हे सर्व न रागावता काहीशा विनोदी पद्धतीने चालत असे. माझ्याच बाबतीत अेकदा अेक फार मोठा गंभीर प्रसंग घडला होता. मी त्यादिवशी रात्रपाळीचे काम करीत होतो. रात्री अेक वाजता काम संपलेच पाहिजे अशी आम्हाला सक्त ताकीद होती. त्यानंतर छपाईचे संपूर्ण काम होऊन अंकाचे वितरण वेळेवर होण्याच्या दृष्टीने आणि दैनिक 'महाराष्ट्राच्या' अगोदर हे सर्व उरकणे आवश्यक असल्यामुळे रात्री अेक वाजण्याची मर्यादा आखून दिलेली होती दि. ११ सप्टेंबर १९४८ रोजी महंमदअली जीना निधन पावले. वस्तुतः ही एवढी मोठी बातमी होती की सहसा अगदी नवख्या संपादकाकडूनही ती चुकण्याची अेखादा टक्का देखील शक्यता गृहीत धरता येत नाही. पण 'तरुण भारत' मध्ये ती बातमी त्या रात्री प्रसिध्द झाली नाही आणि दै. महाराष्ट्रात प्रसिध्द होऊ शकली. संपादकाच्या दृष्टीने हा अेवढा मोठा प्रमाद होता की त्याला नोकरीवरून काढून टाकण्याखेरीज दुसरा पर्यायही असू शकत नाही. सकाळी शेजाऱ्याने झोपेतून उठवून मला ही माझी घोडचूक दाखविली तेव्हा मी अक्षरशः हादरून गेलो. मी तसाच कार्यालयात चालत गेलो आणि रात्रींच्या बातम्यांचे सर्व कागद तपासले. पी. टी. आयच्या प्रतिनिधीला फोन करून विचारले तेव्हा त्याने सांगितले, 'रात्री दोन वाजता ही बातमी आमच्याकडे आली. लगेच दोन्ही दैनिकाकडे फोन करून कळविली. तुमच्या कचेरीत कोणीही नव्हते'' महाराष्ट्राच्या छपाईयंत्रात बिघाड झाल्यामुळे संपादकासकट सगळेच तेथे हजर होते. त्यामुळे त्यांनाच बातमीचा लाभ झाला. मी सुटकेचा निश्वास टाकला. रात्री अेक नंतर अेक अक्षरही छपाईला द्यायचे नाही. 'संपादकाने घरी निघून जावे,' अशा सूचना असल्यामुळे, जिनांच्या मृत्यूची बातमी तरुण भातरच्या अंकात प्रसिद्ध न होण्याच्या बाबतीत माझा काहीच दोष नाही हे लक्षात आले. तेवढयात भाऊसाहेब कचेरीत आले. त्यांनी हा सर्व प्रकार घरी असतानाच समजून घेतला होता. त्यांच्याकडे डॉ. खरे–तरुण भारतच्या विश्वस्त मंडळाचे सभासद आणि इतरांचे अनेक फोन आले होते. डॉ. खरे यांनी तर संतापून 'रात्रीच्या संपादकाला काढून टाका' असेही भाऊसाहेबांना सांगितले. पण खरा प्रकार भाऊसाहेबाना अेकटयांनाच माहित असल्यामुळे त्यांनी सर्वांना वस्तुस्थिती सांगितली. परीस्थितीच अशी होती की त्यात कोणाचाही दोष नव्हता माझ्यावरील अेक मोठे संकट टळले. त्याच्यात भाऊसाहेबांचा समजूतदारपणा, वास्तव परिस्थितीची योग्य जाणीव आणि कोणाच्याही दडपणाला बळी न पडण्याचे धैर्य हेच कारणीभूत होते. इतरत्र असा प्रकार घडला असता आणि संपादक बोटचेप्या वृत्तीचा असता तर, निराळा प्रकार घडला असता.

'तरुण भारत'च्या परिवारात भाऊसाहेबांचे स्थान अेखाद्या कुटुंबप्रमुखासारखे होते. संपादकवर्ग असो की कंपोझिंग खात्यातील लोक असोत, सर्वांनाच भाऊसाहेबांचा आधार वाटत असे. त्यांच्याविषयी सर्वांनाच आदर वाटत होता. ते पत्रकार

म्हणून श्रेष्ठ होते, तसेच व्यक्ती म्हणूनही ते थोर होते. त्यांच्या आणि 'तरुण भारता'च्याही लोकप्रियतेचे ते महत्त्वाचे गमक होते. कोणत्याही संकटप्रसंगी ते किती ठामपणे आपल्या भूमिकेवर उभे रहात असत याचा प्रत्ययही लवकरच आला. ते संकट अत्यंत भयानक होते. अेवढे सांगितल्याने त्याचे संपूर्ण वर्णन होऊ शकणार नाही.

असा अद्वितीय प्रसंग गांधीजींच्या दुर्दैवी हत्त्येनंतर 'तरुण भारत' दैनिकावर आणि भाऊसाहेबांच्या साहित्यजीवनावर गुदरला. तो अेवढा प्रचंडच आघात होता की मराठी वृत्तपत्रसृष्टीत त्याचे अन्य उदाहरण क्वचितच सापडेल. दि. ३० जानेवारी १९४८ रोंजी सायंकाळी प्रार्थनेच्या वेळी महात्माजींची दुर्दैवी हत्या झाली. लगेच दुसरे दिवशी दक्षिण महाराष्ट्रात सर्वत्र जाळपोळीचे सत्र सुरू झाले नागपुरात त्या भीषण प्रकारचे पडसाद दोन दिवसानंतर उठले त्या अग्निकांडात 'तरुण भारत'च्या छापखान्याची आहुति पडलीच पण भाऊसाहेबांचे संपूर्ण घर उद्‌ध्वस्त झाले. त्यांनी आयुष्यभर जीवापाड जपलेला बहुमोल ग्रंथसंग्रह नष्ट झाला आणि त्याबरोबरच महाराष्ट्रातील थोर साहित्यिकांच्या पत्रव्यवहाराच्या चिंध्या झाल्या.

गांधीहत्येची वार्तमी शहरभर पसरताच आम्ही सारे संपादक 'तरुण भारत'मध्ये धावत गेलो. भाऊसाहेब अगोदरच येऊन बसले होते. त्यांनी बातमी अनुवादित करून जुळाऱ्याकडे दिली आणि उद्विग्न मनःस्थितीत चिंताग्रस्त अवस्थेत ते पुढच्या संभाव्य घटनांची सहकाऱ्यांशी चर्चा करू लागले. गांधीजींच्या क्रूर हत्येची प्रतिक्रिया काय होईल याची कल्पनाही करवत नाही, असे भाऊसाहेब काहीसे स्वतःशी आणि काहीसे इतरांना उद्देशून म्हणाले. त्याच चिंताग्रस्त मनःस्थितीत सर्वजण काम संपवून घरी निघाले. त्यांना घरापर्यंत सोबत म्हणून आम्ही त्यांच्या बरोबर गेलो, तेव्हा ते अत्यंत निराशेने म्हणाले, "द्रोणाचार्यांच्या वधानंतर चिडलेल्या अश्वत्थाम्याने मध्यरात्री पांडवांच्या शिबिरावर हल्ला करून त्यांची झोपेत असलेली पोरे–बाळे देखील कापून काढली. तसेसुध्दा घडेल अेखादे वेळी."

दुसरे दिवशी दक्षिण महाराष्ट्रात सर्वत्र दंगली, जाळपोळ, आणि विध्वंस यांचे अनेक प्रकार घडले. त्याचेच पडसाद तीव्रतेने अेक दिवसानंतर नागपुरातही उमटले. त्यासंबंधी भाऊसाहेबांनी 'अेका निर्वासीताची कहाणी' या पुस्तकात विस्ताराने वर्णन केले आहे. त्यातील अनेक प्रसंगांना मी साक्षी होतो. पण त्या वर्णनाची पुनरावृत्ती करण्याचे येथे कारण नाही. भाऊसाहेबांच्या घरावर आणि तरुण भारतावर हल्ला करण्यात, ब्राह्मण–ब्राह्मणेतर, मराठी, हिंदी, कॉंग्रेस–बिगर कॉंग्रेस अशा विविध प्रवृत्तीची माणसे होती. भाऊसाहेबांचे सर्वस्व गेले. माडखोलकर कुटुंबियाचीही त्या अग्नीत आहुति पडायची, पण ते घडले नाही, अेवढेच समाधान. त्याप्रसंगी पत्रकार म्हणून भाऊसाहेबांचे जे धीरोदात्त वर्तन घडले त्याला तोड नाही त्यांच्या सारख्या थोर पत्रकाराची ग्रंथसंपत्ती नष्ट झाली, कायमचे जीवनधन गेले.

पण अशाही प्राणघातक संकटातून तरुण भारताला नवे जीवन आणि नवे रूप दिले ते भाऊसाहेबानीच. त्या विध्वंसक राखेतून फिनिक्स पक्ष्याप्रमाणे 'तरुण भारत' पुन्हा नव्या तेजाने प्रकट झाला, तो फक्त सतरा दिवसाच्या अल्पावधीत १९ फेब्रुवारी १९४८ ला प्रथम छोटा अंक काढावा लागला. त्या अंकात 'खडीसाखरेचे खडे' या मथळयाखाली महात्माजींच्या जीवनातील काही चटका लावणाऱ्या प्रसंगांच्या आठवणी भाऊसाहेबांनी लिहिल्या. त्या इतक्या लोकप्रिय झाल्या की 'तरुण भारत' चे अंक हातोहात खपू लागले. पण भाऊसाहेबाचे समाधान तेवढयानेच होण्यासारखे नव्हते. आपल्या वृत्तपत्राचा नेहमीच्या आकाराचा मोठा अंक लवकरात लवकर निघाला पाहिजे असे भाऊसाहेबांचे जिद्दी मन खटपट करीत होते. त्यांनी त्यासाठी अहोरात्र परिश्रम केले. आणि २६ फेब्रुवारी १९४८ रोजी पूर्ववत मोठा अंक प्रसिद्ध केला, तेव्हाच त्या थोर पत्रकाराच्या मनाला समाधान वाटले असावे.

पण हे फळ पदरात पडेपर्यंत किती प्रतिकूल परीस्थितीची अडथळयाची शर्यत श्री. माडखोलकर यांना जिंकावी लागली ? आर्थिक अडचणी तर होत्याच

अनुक्रमणिका

पण तरुण भारतचा छापखाना अक्षरशः मोडून पडलेला होता. टाईप वितळून गेला होता. छोटी–मोठी साधने शुक्रवार तलावाच्या तळाशी जाऊन बसली. शहरातील मोठया छापखान्यांनी आश्वासने देऊनही ऐनवेळी, राजकीय धमक्यांना घाबरून, अंक छापून देण्याचे नाकारले. स्वतःला गांधीवाद्यांचे ठेकेदार आपणच आहोत, असे म्हणविणाऱ्या अेका वजनदार पुढाऱ्याने ''तरुण भारत' छापू नका, आणि विकू नका; हे पत्र गाडण्याची हीच वेळ आहे'' अशी विक्रेत्यांना चिथावणीही दिली. पण भाऊसाहेबाची धारदार प्रसन्न लेखणी, संपादकीय कौशल्य, आत्मविश्वास आणि दृढनिश्चय, अशा सर्व आयुधांनी घोर संकटावर मात केली. विरोधकांचे आडाखे व खटपटी निष्फळ ठरविल्या. भाऊसाहेबांनीच नंतर म्हटल्याप्रमाणे, ''मला 'तरुण भारत' हवा तो माझ्या विशिष्ट कल्पनांच्या प्रसारासाठी, संयुक्त महाराष्ट्रासाठी हवा'' मराठी दैनिक काढून ते यशस्वी करण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. नागुपरात हिंदी, इंग्रजी दैनिके निघतात पण अेकही मराठी दैनिक निघू नये आणि निघाले तर ते चालू नये, याची खंत त्यांना वाटत होती.

कोणत्याही पक्षीय राजकारणाशी वा धोरणाशी, माडखोलकरांनी स्वतःला आणि आपल्या वृत्तपत्राला कधीच बांधून घेतले नव्हते. आपल्या पत्राचे धोरण स्वतंत्र आणि राष्ट्रीय आहे, असे ते म्हणत असत. प्रत्येक पक्षाच्या धोरणातील आणि कार्यक्रमातील जो भाग आपल्या बुद्धीला पटेल, तो स्वीकारायचा राष्ट्रहिताच्या दृष्टीने त्याचा उपयोग करायचा, निरनिराळया पक्षांच्या बातम्या द्यायच्या, पण संपादकीय लेख स्वतंत्रबुद्धीने लिहावयाचा आपला विचार त्या पक्षाला अनुकूल असेलच असे नाही. म्हणूनच काँग्रेस पासून कम्युनिस्ट पक्षापर्यंत, समाजवादी पक्षापासून हिंदू महासभेपर्यंत आणि जनसंघापासून शे. का. फेडरेशन पर्यंत सर्व पक्षांच्या बातम्यांना 'तरुण भारत' मध्ये, तारतम्य राखून, प्रसिध्दी देण्यात येत असे. कोणत्याही विशिष्ट राजकीय पक्षाच्या धुरेला वृत्तपत्रांनी जखडून न घेता आपले धोरण स्वतंत्र ठेवले पाहिजे, सत्ताधारी पक्षाच्या बाबतीत तर अधिकच जागरूक असावे, असे ते म्हणत असत.

अशा निपक्ष आणि निर्भय धोरणामुळेच काही पक्ष वा गट दुखावले जात असत. अशा असंतुष्टांच्या मनात साचत गेलेल्या सामुदायिक रोषामुळे 'तरुण भारत' व श्री. माडखोलकर यांच्यावर लोकक्षोभ कोसळला हे स्पष्टच झाले. पण त्या आपत्तीतून डोके वर निघायलाही असंख्य वाचकांचा लोकलोभ उपयोगी पडला हे त्यापेक्षाही अधिक खरे. कोणाही निष्ठावंत पत्रकाराला अभिमान वाटावा अेवढे वाचकांचे प्रेम तरुण भारतने फक्त चार वर्षांच्या अल्पावधित संपादन केले होते. याचा आणखी अेक अर्थ असा की माडखोलकर केवळ आलेल्या बातम्या गोळा करून आणि त्या ठिकठाक करून छापणारे संपादक नव्हते. ते जसे ललित साहित्याची निर्मिती करणारे प्रतिभावंत लेखक होते तसेच स्वतंत्र धोरणाने आपले वृत्तपत्र यशस्वी करणारे प्रज्ञावंत पत्रकारही होते.

स. मा. गर्गे
१२०५/४ शिवाजीनगर,
पुणे – ४.

मी आणि माझे कादंबरीलेखन

ग. त्र्यं. माडखोलकर

१९३० ते १९७० या कालावधीतील माझ्या साहित्यक्षेत्रातल्या वाटचालीचे निरीक्षण करण्यापूर्वी, त्या वाटचालीची पार्श्वभूमी थोडी तरी विशद करणे अवश्य वाटते. त्याशिवाय माझ्या साहित्याची भाषा, शैली, प्रवृत्ती, विचारसरणी इत्यादी विशेषांचा उलगडा होणार नाही. १९४६ साली प्रसिद्ध झालेल्या 'दोन तपे' या माझ्या पुस्तकात माझी सुरुवातीची चोवीस वर्षे कोणत्या परिस्थितीत गेली, याचे वर्णन आलेले आहे, ही गोष्ट खरी पण त्यात सगळा भर कथनावर आहे. विश्लेषण अजिबात नाही. म्हणून ते थोडे प्रथम करणे इष्ट होईल.

मी शंभर टक्के मुंबईकर आहे. माडखोलकर घराणे हे मूळचे गोव्यातले असले, तरी त्या घराण्याच्या माझ्या पूर्वीच्या पाच पिढ्या तरी निदान मुंबई शहरात गेलेल्या होत्या. आज ज्या भागाला प्रिन्सेस् स्ट्रीट असे भपकेबाज नाव आहे, त्या भागातील लोहार चाळीत असलेल्या अंतोबा गोसाव्याच्या वाडीत आमचे स्वतःच्या मालकीचे घर होते. मुंबई बेटातील ज्या मूळच्या जातिजमातींनी ते बेट आपल्या कर्तबगारीने वसाहतीला आणि वैभवाला आणले, त्यांच्यापैकी पाठारे प्रभु समाजातील संपन्न प्रतिष्ठित घराण्यांची वृत्ती आमच्याकडे होती. आत्मारामबुवांच्या ठाकुरद्वारापासून तो नवी वाडीपर्यंतचा आजच्या नानाशंकर शेठ रस्त्याचा सगळा टापू त्या समाजातील लहान–मोठ्या नागरिकांच्या टुमदार शोभिवंत घरांनी गजबजलेला होता. आमच्या यजमानांकडे होणाऱ्या लग्नमुंजीसारख्या समारंभांना, वयाच्या सहाव्या वर्षापासून, मी वडिलांबरोबर जात असे. माझे प्राथमिक शिक्षणही नवी वाडीतील शाळेतच झाले.

त्यामुळे, पाठारे प्रभु समाजाचा सुसंस्कृतपणा, सौंदर्यासक्ती, दिलदारपणा, डामडौल, छानछोकी, शौक वगैरे सर्व जीवनविशेष मला पाहावयाला मिळाले. माझे शाळेतील सोबतीही बहुतेक त्या समाजातलेच होते. अर्थात त्यांच्या घरगुती जीवनाशीही माझा निकट संबंध आला. त्या समाजातील कोणताही समारंभ त्या काळात नायकिणींच्या नाचगाण्याशिवाय सहसा होत नसे. त्यामुळे या दोन्ही कलांचे तत्कालीन मुंबईतील खानदानी वैभव मी मनसोक्त पाहिले. वयाच्या सहाव्या वर्षापर्यंत माझ्या मनावर झालेल्या या सगळ्या संस्कारांचा संकलित परिणाम असा झाला की, मुंबईत स्थायिक झालेल्या कोकणातील कारकुनी पेशाच्या दक्षिणी ब्राह्मण कुटुंबातल्या मुलांपेक्षा माझी दृष्टी, अभिरुची, चालरीत आणि राहणी निराळ्या प्रकारची होऊन गेली. म्हणूनच बहुधा, मी जातीने ब्राह्मण नाही, असा ग्रह श्री. तात्यासाहेब केळकर, श्री. दादासाहेब ओगले प्रभृती मंडळींचा प्रथमदर्शनी माझ्याविषयी झाला असावा. शिवाय त्या काळातल्या कोणत्याही दक्षिणी ब्राह्मण जातीच्या गोत्रावळीत माडखोलकर हे आमचे आडनावही नव्हते. त्यामुळे तो ग्रह साहजिकच बळकट होऊन गेला.

माझ्या बाळपणाची ही जशी सुखी

अनुक्रमणिका

म्हणता येईल, अशी बाजू मी सांगितली, तशीच त्यापेक्षा किती तरी दु:खपूर्ण म्हणता येईल, अशीही बाजू त्याला आहे. पाठारे प्रभु समाजाच्या आश्रयामुळे ब्राह्मण मंडळीत आम्ही तसे घरंदाज आणि गर्मश्रीमंत समजले जात असू, व तळकोकणातून नशीब काढण्यासाठी मुंबईला येणारे लोक त्यामुळे आमच्या घरी महिनोगणती मुक्कामाला राहत असत, असे उद्गार श्री. भालचंद्रशास्त्री देवस्थळी, प्रो. त्र्यं. शं. शेजवलकर, श्री. वि. वा. पणशीकर प्रभृती आमच्या आप्तेष्टांनी मजजवळ काढलेले आहेत. तरीसुद्धा आमच्या घरात मी आनंद कधी पाहिला नाही. माझ्या वडिलांचा संसार चालवणारी त्यांची कर्तबगार मावशी, मी जन्मल्याच्या आठव्या दिवशीच, प्लेगने गेली. त्या दिवसापासून मृत्यूने जी माझी पाठशिवण सुरू केली, ती १९२३ जूनमधे माझ्या वडिलांचे पुण्यास देहावसान होईपर्यंत! घरात बार महिने कुणाचे तरी अथरूण पडलेले असावयाचे. डॉ. नायक प्रभृती आमचे जे यजमान आमच्या घरातल्या प्रत्येक आजारी माणसाला मोठ्या कळकळीने औषधोपचार करीत असत, ते केव्हा केव्हा माझ्या वडिलांना म्हणावयाचे, "त्रिंबकजी, तुमचा हा एकुलता एक मुलगा काही तुम्हाला लाभाचा झालेला दिसत नाही." माझ्या आईची आई तर सारखी म्हणावयाची, "कसा रे बाबा, तू दळभद्र्या जन्माला आलास!" १९१० च्या मार्चमध्ये माझी आई ऐन तारुण्यात लोणावळा येथे क्षयाने मरण पावली. तेव्हापासून, १९२५ च्या मेमध्ये नागपूर येथे सौ. शांताबाईशी माझे लग्न होईपर्यंत, मी आमच्या घरात सौभाग्य कधी पाहिलेच नाही. आणि, ज्या घरात सौभाग्य नाही, त्या घरात सणावारांचा आणि मगल कार्याचा उत्सव आणि आनंद कुठून असणार? आजी विधवा, बहीण विधवा, मावशी विधवा, मधून मधून घरी राहावयाला येणाऱ्या आप्त आणि आश्रित यांच्या बायकाही बहुतेक विधवा,–असे भयानक वैधव्य, दुखणी आणि मृत्यू यांच्या जोडीला, आमच्या घरात ठाण मांडून बसलेले होते. मलाही स्वतःला वयाच्या चौदाव्या आणि चोविसाव्या वर्षी क्षयाची भावना होऊन गेलेली होती. १९२४ च्या सप्टेंबरमध्ये गणेशोत्सवात व्याख्याने देण्यासाठी नागपूरला आलेले श्री. दादासाहेब ओगले यांचे परम स्नेही पंडित दिनकरशास्त्री कानडे हे मला बघितल्याबरोबर उद्गारले, "कशाला आणलात दादा, तुम्ही मुंबईहून हा अशक्त रोड नाजूक मुलगा? अहो, हा तरतरीत आणि देखणा असला, तरी तुमच्या वर्तमानापत्राच्या धबडग्याला थोडाच टिकणार आहे?" पुढे १९२५ च्या मेमध्ये सौ. शांताबाईशी माझा विवाह झाला आणि, त्या कल्याणीने, माझ्या उदास एकाकी जीवनात स्वास्थ्य, सौभाग्य आणि साफल्य आणले. त्यामुळे, माझा इतका काही कायापालट होऊन गेला की, १९३० च्या मेमध्य त्या वेळी मुंबई येथील 'प्रगति' साप्ताहिकाचे संपादक असलेले माझ्या मामांचे वर्गबंधू प्रो. शेजवलकर यांना भेटावयाला, प्रो. वि. ह. कुलकर्णी यांच्यासह, मी नौरोजी स्ट्रीटमध्ये गेलो असता, त्यांना नमस्कार केल्याबरोबर, माझ्याकडे पाहत ते आश्चर्याने उद्गारले, "काय रे, तूंच का तो गजानन? आम्हाला त्या वेळी वाटत असे, तुझे मामा आणि आई यांच्याप्रमाणे तूही अल्पायुषी होशील. पण किती चांगला दिसतोस रे तू आता. नागपूर तुला मानवले म्हणायचे!"

माझ्या विद्यार्थीदशेत मृत्यूशिवाय मजवर झालेला सर्वात प्रभावी संस्कार म्हणजे मनःपूत स्वच्छंदी वाचनाचा आणि वर्तनाचा! माझे आई आणि वडील हे दोघेही संस्कृत विद्येचा वारसा घेऊन जन्माला आलेले होते. शिवाय, दोघांनाही वाचन आणि सार्वजनिक जीवन यांची आवड असल्यामुळे, घरातले वातावरण बुद्धिविसाकाला पोषक होते. पोथ्यापुस्तकांचा दोन तीन पिढ्यांनी केलेला उत्तम संग्रहही घरात होता. वडील आतिथ्यशील, परोपकारी आणि टिळकभक्त होते. त्यामुळे सार्वजनिक कामे करणारे नाना प्रकारचे लोक नेहमी आमच्याकडे यावयाचे. १९०७ ते १९१२ च्या दडपशाहीच्या काळात अडचणीत आलेली अनेक माणसे, नुसती मदतीसाठीच नव्हत, तर केव्हा केव्हा आश्रयासाठीही आमच्याकडे येत असत. लोहार चाळीतील आमचे वडिलार्जित घर इम्प्रूव्हमेंट ट्रस्टने घेतल्यावर, आम्ही जरी झावबाच्या वाडीतील अडतीस नंबरच्या चाळीत राहावयास आलेलो होतो, तरी आमच्याकडे बरीच वर्षे दोन बिऱ्हाडांची जागा होती. शिवाय, फणसवाडीच्या रस्त्यावरील कोळ्याच्या वाडीत जे आमचे आश्रित असलेले तेलंगे ब्राह्मण राहत असत, त्यांच्याकडेही आम्हाला अशा प्रकारच्या आपद्ग्रस्तांची सोय

करता येत असे. जॅक्सनच्या खुनानंतर महाराष्ट्रात जी सार्वत्रिक धरपकड सुरू झाली, तिचे सुदर्शन आपल्यामागे लागू नये, म्हणून अनेक तरुण मुंबईतील गरीब वस्तीतल्या अंधेऱ्या चाळीतून दडी देऊन, दिवस काढीत होते. अशा काही फरारी तरुणांना माझ्या वडिलांचा आधार होता. १९०९–१९१० साली, माझ्या आईच्या प्रकृतीसाठी, आम्ही लोणावळ्याला राहत असता, तिथेही अशी माणसे आमच्याकडे एखादे वेळी धावत्या मुक्कामाला असत. त्यांच्या धाडसाच्या सुरस गोष्टी ऐकत, त्यांच्या बरोबर वेळी अवेळी भटकणे, ही माझी सर्वांत मोठी करमणूक असे त्यामुळे, माझे मन शाळेतल्या अभ्यासावरून जे एकदा उडाले, ते कायमचेच. आई वारल्यावर १९१० च्या एप्रिलमध्ये लोणावळ्याचे बिऱ्हाड मोडून आम्ही ज्या वेळी मुंबईला परत आलो, त्या वेळी माझ्या मनाला आणि वर्तनाला धरबंध उरलेला नव्हता. एकुलता एक मुलगा म्हणून वडिलांच्या नजरेच्या पहाऱ्यात आणि हाकेच्या धाकात मला जे रांहावे लागे, तेवढेच काय ते बंधन! अशा रीतीने दहाव्या वर्षापासून तो सत्राव्या वर्षापर्यंत माझा जीवनक्रम उदास, एकलकोंडा पण एका परीने अनिर्बंध होता. सकाळ संध्याकाळ आणि केव्हा केव्हा रात्री देखील रा. ल. पराडकर, द. प. नवरे, वि. ह. कुलकर्णी, शं. गं. वैद्य, त्र्यं. वि. पर्वते प्रभृती मित्रांबरोबर चौपाटीवर, मलबार हिलवर किंवा महालक्ष्मीवर भटकणे आणि सभा–समारंभांना हजर राहणे, एवढाच काय तो त्या बैठ्या बंदिस्त जीवनाचा बाहेरच्या जगाशी संबंध! या सात वर्षांत वाचणे, गप्पा मारणे आणि शाळा बुडवून भटकणे, याशिवाय दुसरे काहीही मी केले नाही. ही माझ्या पूर्वायुष्याची परवड ध्यानात घेऊनच माझ्या साहित्याचा विचार करावयाला हवा.

प्रकाशनाच्या दृष्टीने माझ्या लेखनायुष्याला १९१९ साली प्रारंभ झाला. १९१९ पासून १९३० पर्यंत मी मुख्यतः टीकाकार म्हणून वाचकांपुढे उभा होतो. या बारा वर्षांच्या कालावधीत, १९१९ पासून १९२३ पर्यंत, कवी म्हणूनही माझे नाव गाजले. इतके की, कवी माधव आणि प्रो. ना. के. बेहेरे यांच्यासारख्या तत्कालीन प्रमुख कवींनी, माझ्यावर कविता लिहून, माझ्या कवित्वशक्तीचा गौरव केला. त्या कालाखंडात प्रसिद्ध झालेल्या अनेक कवितासंग्रहातही माझ्या कवितांना अगत्याने स्थान देण्यात आले. विशेतः, माझे 'शुक्रतारा' हे सुनीत, त्या सुमारास निघालेल्या सुनीतासंबंधीच्या सगळ्या पुस्तकांत, उत्कृष्ट म्हणून उल्लेखिलेले आणि उद्धृत केलेले आढळेल त्याचप्रमाणे १९२४ पासून १९३६ पर्यंत कथालेखनही मी मधून केले. १९३६ साली मुंबईच्या 'ज्योत्स्ना' मासिकात वर्ष सव्वा वर्ष ज्या माझ्या कथा ओळीने आल्या, त्याच्या लेखनाचे श्रेय बव्हंशी श्री. वामनराव ढवळे यांना द्यावे लागेल. या कथाही लोकप्रिय झाल्या; व तत्कालीन कथासंग्रहांत आणि क्रमिक पुस्तकातही त्यांचा अंतर्भाव करण्यात आला. प्रो. रा. कृ. लागू यांच्यासारख्या इंग्रजी साहित्याच्या चिकित्सक पंडितानेही माझ्या 'दिलरुबा' या कथेचा गौरवाने निर्देश केल्याचे दिसून येईल. याच कालावधीत, १९२३ च्या जानेवारीपासून, माझ्या वृत्तपत्रव्यवसायालाही सुरुवात झाली. पुणे येथील 'ज्ञानप्रकाश' दैनिकाच्या 'काव्यशास्त्रविनोद' आणि 'परराष्ट्रीय राजकारण' अशा दोन्ही साप्ताहिक पुरवण्या माझ्या संपादकत्वाखाली निघू लागल्या. १९२४ च्या ऑगष्टमध्ये मी नागपुरास येऊन 'महाराष्ट्र' साप्ताहिकाच्या संपादकमंडळावर रुजू झालो. तेव्हापासून आतापर्यंत माझे हे व्यावसायिक जीवन अखंड चालू आहे. त्याबरोबरच अवांतर लेखनही! माझ्या लेखनायुष्याच्या या पहिल्या तपातच 'आधुनिक कविपंचक' 'विष्णु कृष्ण चिपळूणकर' आणि 'विलापिका' हे तीन टीकात्मक प्रबंध प्रसिद्ध झाले.

१९३० साली माझ्या लेखनायुष्यातील सर्वात महत्त्वाचे परिवर्तन घडून आले. त्या वर्षाच्या डिसेंबरमध्ये, जंगल सत्याग्रहात भाग घेतल्याबद्दल झालेली चार महिन्यांची शिक्षा भोगून, मी नागपूरच्या तुरुंगातून बाहेर आलो. माझे गुरुबंधू आणि कौटुंबिक मित्र श्री. वि. स. खांडेकर यांची 'हृदयाची हाक' ही नुकतीच बाहेर पडलेली कादंबरी त्या वेळी लोकप्रिय झालेली होती. टीकाकार म्हणून १९१९ पासून खांडेकर आणि मी लोकापुढे प्रामुख्याने उभे होतो. त्यांची ही कादंबरी वाचून सौ. शांताबाईला साहजिकच असे वाटले की, आपल्या पतीनेही, गुरुबंधूप्रमाणे, कादंबरी लिहून लोकप्रियता संपादन करावी. तिच्या आग्रहामुळे मी जी 'मुक्तात्मा' ही

कादंबरी लिहावयाला घेतली. ती १९३३ च्या मार्च मध्ये प्रसिद्ध झाली. या कादंबरीचे यश आणि तिच्यावर झालेला टीकेचा भडिमार या दोहोंमुळे साहित्याच्या या नव्या शाखेतील माझे स्थान पक्के होऊन गेले. वस्तुत: श्री खांडेकर आणि आचार्य अत्रे या दोघांनीही मी या शाखेत यश मिळवू शकणार नाही, असे भाकित त्या वेळी वर्तविलेले होते. त्याचप्रमाणे, महाराष्ट्रातील श्री वा. ना. देशपांडे यांच्यापासून तो श्री. श्री. के. क्षीरसागर यांच्यापर्यंत, बहुतेक प्रमुख टीकाकारांचा अभिप्रायही तसाच पडलेला होता. फक्त प्रो. फडके यांनी मात्र, माझ्या कादंबरीच्या उत्तरार्धात, कथानकाला मिळालेली आकर्षक कलाटणी आणि गती यांची प्रशंसा केलेली होती. प्रो. डॉ. शं. दा. पेंडसे यानी जरी, 'केसरी'त लिहिलेल्या तिच्या विस्तृत परीक्षणात, भाषा मोरोपंती थाटाची असल्याबद्दल दोष दिलेला होता, तरी राजकीय कादंबरी म्हणून मात्र मुक्त कंठाने तिचे स्वागत केलेले होते. श्री श्री. अ. डांगे यानीही याच दृष्टीने तिच्याविषयी अनुकूलता व्यक्त केलेली होती. त्यामुळे, 'विविधवृत्ता'दी नियतकालिकांतून जरी मजविरुद्ध निरर्गल नालस्तीची मोहीम उघडण्यात आलेली होती, तरी देखील अशा प्रकारच्या कादंबऱ्या यापुढे आपण लिहावयाच्या, असे मी मनाशी ठरवून टाकले. नागपूर कटाच्या खटल्याने या वेळी नागपुरात खळबळ उडवून दिलेली होती. नागपूरचे नामांकित कायदेपंडित, माझे स्नेही रावसाहेब फुले यांच्या तोंडून मी या कटाचे रहस्यमय कथानकं ऐकलेले होते; त्यानी दिलेल्या आरोपींच्या जबान्याही वाचलेल्या होत्या; व त्या कटातील एक प्रमुख व्यक्ती, सुप्रसिद्ध हिंदी कवयित्री सौ. विद्यावती देवडिया यांच्याशीही त्यांनी माझी ओळख करून दिलेली होती. म्हणून त्या कथानकाच्या अनुषंगाने कादंबरी लिहिण्याच्या विचारात मी होतो.

तथापि, सौ. शांताबाईने, हा विषय बाजूला ठेवून, मला 'भंगलेले देऊळ' ही कादंबरी लिहावयाला भाग पाडले. माझ्या टीकाकारांप्रमाणे तिलाही 'मुक्तात्मा' ही कादंबरी म्हणून काही विशेष आवडलेली नव्हती; व तीत जर मी राजकारण घुसडले नसते, तर ती अत्यंत आकर्षक होऊन फडके आणि खांडेकर यांच्यासारखी लोकप्रियता मला लाभली असती, असा तिचा ग्रह झालेला होता. श्री. खांडेकर यांची 'उल्का' ही याच सुमारास प्रसिद्ध झालेली दुसरी कादंबरी तर तिला फार आवडलेली होती. म्हणून, मी स्त्रीजीवनावरच शुद्ध सामाजिक कादंबरी लिहावी, असा हट्ट तिने धरला. तदनुसार मी 'भंगलेले देऊळ' ही कादंबरी लिहिली. आणि काय सांगावे ? सौ. शांताबाईच्या अपेक्षेप्रमाणे या कादंबरीवर प्रो. वा. म. जोशी यांच्यासारख्या स्वत: श्रेष्ठ कादंबरीकार म्हणून गौरविल्या गेलेल्या ज्येष्ठ टीकाकाराने स्तुतिसुमने उधळली ! ती अतिशय लोकप्रिय झाली; विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात तिला स्थान मिळाले; व फडके आणि खांडेकर यांच्या बरोबरीने माझा कादंबरीकार म्हणून निर्देश होऊ लागला. अर्थात, तेव्हापासून साहजिकच शांताबाईचा माझ्या पाठीमागे असा सारखा लकडा लागला की, मी शुद्ध सामाजिक कादंबऱ्याच लिहाव्यात आणि त्याही 'भंगलेले देऊळ' या कादंबरीप्रमाणे भावरम्य भाषाशैलीत। तितक्यात खांडेकरांचे एक उदयोन्मुख तरुण शिष्य श्री. ब्रह्मानंद मुकुंद नाडकर्णी यांनी मजजवळ छोट्या कादंबरीची मागणी केली. नागपूर कटाच्या कथानकातले काही प्रसंग माझ्या मनात घोळत होते. माझे त्या वेळचे लेखनव्यवसायातील अंतेवासी सहकारी, बंगाली आणि हिंदी साहित्याचे अभिज्ञ श्री. विनायक अंबादास गिजरे हे मला श्री. बुद्धदेव बसू प्रभृती नवीन पिढीतील बंगाली ललित लेखकांच्या कथा–कादंबऱ्यांची जी कथानके सांगत असत, ती ऐकूनही माझ्या मनात कांही कल्पना आलेल्या होत्या. माझे या काळातील दुसरे विद्यार्थी सहकारी, सौ. शांताबाईचे आतेभाऊ श्री. द्वारकानाथ वासुदेव घाटे हे, श्री. गिजरे यांच्याप्रमाणेच, हिंदी, बंगाली आणि भरीला फ्रेंच या तिन्ही भाषांतील ललित साहित्याचे शौकीन होते. त्या शौकाचा त्यांच्या उमलत्या विकारसुलभ यौवनावर झालेला भलताच परिणाम पाहून माझे मन विलक्षण व्यथित होऊन गेलेले होते. या मनोमंथनातून 'शाप' ही कादंबरी निर्माण झाली. तिच्यातील बहुतेक करुण प्रसंग वास्तविक होते; व टीकाकारांनी तिचा विचार जरा थोडा सहृदयतेने केला असता, तर तिला अश्लील आणि विकृत ठरविण्याची बुद्धी त्यांना खचितच होती ना ! पण, 'भंगलेले देऊळ' या कादंबरीच्या अनपेक्षित यशाने दबून गेलेल्या माझ्या वाङ्मयवैऱ्यांना ही छोटी कादंबरी बाहेर पडताच, एक नवे

कोलित अचानक हाती सापडल्यासारखे होऊन माझ्या विरुद्ध त्यांनी अर्वाच्च टीकेचा अगदी आगजाळ भडकवून दिला. इतका की, श्री. व. भ. कर्णिक, श्री. खंडेराव सुळे, प्रो. वि. ह. कुळकर्णी यांच्यासारख्या समतोल विचारी विमर्शकांनी त्या कादंबरीची चांगली बाजू दाखविण्याचा जो प्रयत्न केला, तोही सफल झाला नाही. या कादंबरीपासून जो अश्लील आणि विकृत असा छाप माझ्या कादंबरीलेखनावर बसला, त्याचा कोळसा, पुढे 'नवे संसार', 'चंदनवाडी', प्रमद्वरा', 'स्वप्नांतरिता' यांयारख्या कादंबऱ्या बाहेर पडल्यावरही, प्रो. सौ. कुसुमावती देखपांडे, प्रो. डॉ. अ. ना देशपांडे यांच्यासारख्या विदर्भातील सोज्वळ टीकाकारांनी वर्षानुवर्ष चढाओढीने उगाळला.

'शाप' नंतर नागपूर कटातील घटनांच्या अनुषंगाने लिहिलेली जी 'कांता' ही कादंबरी बाहेर आली, तिने सर्वथैव प्रतिकूलतेकडे झुकलेला माझ्यावरील टीकेचा हा काटा थोडा बहुत समेवर आणला. या कटाचा वृत्तांत मोठा रोमांचकारी आहे. बंगालमधील 'अनुशीलन समिती' या विख्यात क्रांतिवादी गुप्त संघटनेचे एक सदस्य श्री. शैलेंद्र घोष हे तेथून हद्दपार झाल्यामुळे, जबलपूरच्या तुरुंगातून सुटल्यावर, नागपुरास येऊन स्थायिक झाले. सेंट जॉन हायस्कूलमधे ते शिक्षक होते, व सीताबर्डीवर टेकडी लाइन्समध्ये राहत असत. श्यामनारायण काश्मिरी, रघुवीरदयाळ पांडे, ललिताशंकर अग्निहोत्री आणि नरेंद्र चतर्जी हे त्या शाळेतले, भूपेंद्रनाथ मुखर्जी आणि शिवनंदन तिवारी हे सायन्स कॉलेजातले, हनुमंतराव मेमणे हे मेडिकल कॉलेजातले व मगनलाल बागडी हे इतवारीतले विद्यार्थी त्यांच्या भजनी लागले. शैलेंद्रबाबूंनी त्यांना स्टार्की पॉइंटवर नेऊन बॉम्ब तयार करण्याची आणि हत्यारे वापरण्याची विद्या शिकवली. या सर्व युवकांत श्री. बागडी हे स्वतंत्र बुद्धीचे आणि कल्पक असून, दिलेरी आणि इष्क हे पौरुषाचे दोन्ही धर्म त्यांच्या थोराड दणकट आणि करारी व्यक्तित्वात एकवटलेले होते. त्यांचे धारिष्टय अचाट असून, बाळपणापासूनच क्रांतिवादाकडे त्यांचा ओढा होता. श्री. तेजराम गहलोत, महादेवराव गवळी, शेरखान, मथुराप्रसाद पांडे प्रभृती वर्धा जिल्हातील समवयस्क साथीदारांच्या साहाय्याने हिंगणघाट स्टेशनवर त्यांनी दरोडा घातला. त्यांच्या या कटात सामील असलेली शूर हरिजन तरुणी तानीबाई हिने, स्टेशन मास्तरकडून मोठ्या शिताफीने तिजोरीच्या किल्ल्या मिळवून, त्यांचे काम सोपे केले. या डाक्यात हाती लागलेल्या १४४० रुपयांच्या नोटांच्या बंडलाचा उपयोग करून, त्यांनी शस्त्रसामग्री गोळा केली. शिवनदन तिवारी यांचे पोलिस खात्यातून निवृत्त झालेले वडील नर्मदाप्रसादजी हे बैतूल येथे राहत असत. पण, ते स्वतः मात्र या वेळी, आपले चुलते, नागपूरचे सिटी सुपरिटेंडंट ऑफ पोलिस परमेश्वरदयालजी यांच्याकडे राहून, कॉलेजमध्ये शिकत होते. त्यांनी आपल्या वडिलांचे पिस्तूल आणि चुलत्यांचे रिव्हॉल्वर हस्तगत करून या सामग्रीत भर घातली. दैवयोग असा की, या वेपत्ता झालेल्या शस्त्रांच्या तपासात असतानाच, पोलिसांना या कटाचा सुगावा लागून, ता. ३ जुलै १९३२ रोजी, हे सर्व तरुण पकडले गेले; व गव्हर्नरच्या कोठीवर छापा घालून, त्याचा खून करण्याचा या साहसिकांचा मनसुबा फसला. त्यानतर ज्या अनेक झडत्या नागपूर, वर्धा, हिंगणघाट वगैरे ठिकाणी झाल्या, त्यांत श्री. मगनलाल बागडी यांच्या विश्वस्त मित्र इतवारीतील तरुण कार्यकर्त्या सौ. विद्यावती देवडिया यांच्याही घराची आणि उपाहारगृहाची झडती घेण्यात आली. त्यांचे हॉटेल हे या क्रातिकारक तरुणांच्या शहरविभागातील गुप्त मसलतीचे केंद्र होते. त्यामुळे कांही शस्त्रेही तेथे ठेवण्यात आलेली होती. सौ. विद्यावतीबाईंचे मोहक व्यक्तित्व, चतुर संभाषण आणि ओजस्वी कवित्व हे या वीर युवकांच्या उमलत्या जीवनातले एक मोठेच आकर्षण होऊन बसलेले होते. आपले पती श्री. पन्नालालजी देवडिया यांच्या बरोबरीने त्या काँग्रेसच्या राजकारणात आणि नागपूर नगरपालिकेच्या कारभारात चमकल्या. नागपुरातील ब्राह्मणेतर चळवळीचे एक प्रवर्तक, नामांकित कायदेपंडित श्री. गोविंदराव प्रधान हे नगराध्यक्ष असताना, विद्यावतीबाईच्या घनिष्ठ स्नेहसंबंधाचा त्यांना असलेला पाठिंबा ध्यानात घेऊन, मौलाना नातिक यांनी एकदा नगरपालिकेच्या सभेला असा झकास शेर सुनावला होता की,–

लग गये मत्थेपे पत्री, क्या बात है शान की।
झूठी है सबकी विद्या, सच्ची एक प्रधान की।

अशा या रूपगुणसंपन्न हिंदी कवयित्रीचे घर

आणि हॉटेल ही दोन्ही या कटाची संकेतस्थाने असल्याच्या संशयाने जरी त्यांच्या झडत्या पोलिसांनी घेतल्या, तरी तेथे काहीही न सापडल्यामुळे, सौ. विद्यावतीबाईंना कटाच्या खटल्यात गोवण्याचा त्यांचा डाव काही साधला नाही. हा खटला ता. ३१ जुलै १९३२ पासून ता. ३१ ऑक्टोबर १९३३ पर्यंत चालला; व त्यात मुखर्जी, बागडी, काश्मिरी, तिवारी, मेमणे प्रभृती आरोपींना पाच वर्षांपासून तीन वर्षांपर्यंत सक्त मजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली.

नागपूर कटाच्या या त्रोटक वृत्तांतावरून 'कांता' कादंबरीत त्याचे कुठे कसे प्रतिबिंब पडलेले आहे, हे कळून येईल. पंडितजी आणि स्वामीजी ही तिच्यातील दोन पात्रे पंडित दिनकरशास्त्री कानडे आणि श्री. अप्रबुद्ध यांच्या क्रांतिकार्यात गेलेल्या पूर्वायुष्यावरून मला सुचली, व–

द्वावाचार्यौ जटिलकुटिलावप्रबुद्धातिबुद्धौ
कृष्णाकृष्णौ तनुपृथुतनू गूढवादप्रसक्तौ
तत्र ज्येष्ठो भवति कुटिलः शाट्यतंत्रप्रवीणः
पाश्चात्यानामगदथ यः शिष्यतां तत्र वासात्

हा श्लोक तर खुद्द श्री. अप्रबुद्ध यांनीच मला दिलेला होता. तिच्यातील सर महादेव ठाकूर यांचे पात्र मध्यप्रांतव-हाडचे माजी गृहमंत्री सर मोरोपंत जोशी, सागरच्या इतिहासप्रसिद्ध सुभेदार घराण्यातील नागपूरचे माजी हायकोर्ट जज बॅ. अण्णासाहेब सुभेदार आणि मुंबई सरकारचे माजी एक्झिक्युटिव्ह कौन्सिलर सर महादेव चौबळ या तिघांच्या करारी, कणखर, उमद्या व्यक्तित्त्वावरून सुचले. सर मोरोपंत हे गृहमंत्री असताना त्यांच्या सलगीतल्या नागपुरच्या जुन्या ऐतिहासिक घराण्यातील एक लोकविख्यात तरुण गतधवा समाजनारी, विधानसभागृहातील त्यांच्या चेंबरमध्ये, ग्रंथालयात किंवा सज्जात नेहमी दृष्टीस पडत असत. गव्हर्नरसाहेबांपासून तो विरोधी पक्षाच्या नेत्यांपर्यंत सर्वांशी त्यांचे खेळीमेळीचे संबंध होते; व सर अण्णासाहेबांना आपल्या अनेक नाजूक मसलतीत या संपर्कचतुर बाईची मदत होते; अशी त्या वेळी बोलवा होती. त्यांच्यावरून



मला 'प्रियंवदा' या पात्राची कल्पना सुचली. अशा विविध पात्रांनी विनटलेल्या नागपूर कटाच्या रम्योज्ज्वल कथानकावरील या कादंबरीने वाचकांच्या मनाची पकड घेतली यात नवल नाही. महाराष्ट्रातील नामांकित गांधीवादी ग्रंथकार श्री. दा. न. शिखरे यांनी 'केसरी'तून तिचे हार्दिक स्वागत केले; व तिच्यातील एका करुण प्रसंगाचा विपर्यास करून जरी काही दुर्विदग्धांनी ती अश्लील ठरविण्याचा खटाटोप केला, तरी तिची लोकप्रियता आणि यश ही दोन्ही यत्किंचितही कमी झाली नाहीत.

यानंतर बाहेर पडलेल्या खरे प्रकरणावरील 'मुखवटे' या कादंबरीमुळे पुन्हा पारडे फिरले. आतापर्यंत माझ्या कादंबऱ्यांवर फक्त अश्लीलतेचाच छाप मारण्यात आलेला होता. पण, त्याच्या भरीला आता, या कादंबरीचे निमित्त करून, गांधीद्वेषाचाही छाप मारण्यात आला; व महाराष्ट्रातील स्वतःला गांधीवादी म्हणवणारे काही कॉंग्रेसनिष्ठ टीकाकार आणि साहित्यिक हे माझ्यावर तुटून पडले. वस्तुतः, म. गांधी यांच्याविषयी तीत कोणतेही अप्रस्तुत किंवा अनृत विधान आणि वर्णन केलेले नव्हते. तसेच निरनिराळे प्रसंग आणि घटना रेखाटताना, वास्तवाला कुठेही धका लागणार नाही, अशी दक्षताही घेतलेली होती. म्हणूनच, आचार्य दादा धर्माधिकारी, श्री. ह. कृ. मोहनी यांच्यासारख्या महात्माजींच्या अंतेवासी कार्यकर्त्यांनी देखील, मला पत्रे लिहून, तिच्यातील पात्रे आणि प्रसंग हे, वास्तवाचा विपर्यास होऊ न देता, संयमाने आणि सहृदयतेने चित्रित केल्याबद्दल धन्यवाद दिलेले होते. उलट, गांधीवादाचे ज्यांना कोणत्याही प्रकारचे सोयर सुतक नव्हते आणि गांधीजींच्या सान्निध्यात आपल्या आयुष्याचा एक क्षणही ज्यांनी कधी घालवलेला नव्हता, अशा या अभिनिविष्ट टीकाकारांनी मात्र ही कादंबरी गांधीविरोधी आणि विकृत असल्याबद्दल गवगवा केला. त्यांनी अत्यंत आक्षेपार्ह ठरवलेले जे तिच्यातील मुरलिमोहन हे पात्र, त्याच्याविषयी आता जरूर तेवढा खुलासा करावयाला अडचण उरलेली नाही. कायदेभंगाच्या चळवळीतील अपेशामुळे नाउमेद झालेल्या गांधीवादी कार्यकर्त्यांनी, १९३४ च्या आरंभी, वस्त्रस्वावलंबनाची म्हणजे बहिष्काराची चळवळ श्री. जमनालाल बजाज यांच्या नेतृत्वाखाली

सुरू केली होती. तिची माहिती मला देण्यासाठी श्री. ह. कृ. मोहनी हे, श्री. मदनमोहन चतुर्वेदी आणि श्री. गोपाळ लपालीकर या आपल्या दोन नवीन तरुण सहकाऱ्यांसह, एक दिवस सकाळी 'महाराष्ट्र' कचेरीत आले. ते दोघेही उमदे, लाघवी आणि चतरे होते. श्री. चतुर्वेदी यांची जिवणी, बहुधा तोंडाला झालेल्या लकव्याच्या विकारामुळे, एका बाजूला सरकलेली होती. म्हणून, चद्रपूरचे प्रमुख काँग्रेस कार्यकर्ते शेठ खुशालचंद खजानची, श्री. माधवराव दातार याच्यासारखे आमचे काही स्नेही त्याना गमतीने 'वक्रतुंड' म्हणून संबोधीत असत. श्री. चतुर्वेदी हे कल्पक, हरहुन्नरी, कर्तबगार आणि धाडसी होते. त्यामुळे, श्री. जमनालाल बजाज यांनी त्यांना हाताशी धरले, व टॉम्कोमध्ये वरच्या दर्जाची नोकरी लावून दिली. त्यांनीही, शेठजींची राजकीय, आर्थिक वगैरे नाना प्रकारची नाजूक, बिकट कामे शिताफीने आणि धडाडीने पार पाडून, त्यांच्यापासून तो सरदार पटेल यांच्यापर्यंत, सगळ्या काँग्रेसश्रेष्ठींचा लोभ आणि विश्वास संपादन केला. इतका की, श्री. चतुर्वेदी यांचे शुभमंगल पुढे सेवाग्राम येथे, म. गांधी यांच्या कृपाछत्राखाली, जेव्हा साजरे झाले, तेव्हा बहुतेक काग्रेसश्रेष्ठी, सुताचे हार घातलेल्या या खादीधारी दंपत्याला आशीर्वाद देण्यासाठी, अगत्याने उपस्थित होते. नागपुरात काटोल रोडवर अगदी एका बाजूला असलेला त्यांचा बंगला हा अनेक प्रकारच्या साहसांचे आणि सुखविलासांचे संकेतस्थान होऊन बसला होता. ते नखशिखान्त गांधीवादी असले, तरी त्यांना काहीही वर्ज्य किंवा त्याज्य नव्हते, असेव्य किंवा अनभिगम्य नव्हते. त्या बंगल्यात एका फ्रेंच युवतीने पोकरच्या खेळाचा अड्डा चालवल्याच्या संशयाने पोलिसांनी त्याच्यावर छापा घातलेला होता, एवढे सांगितल्याने श्री.चतुर्वेदी यांच्या अफाट आयुष्यक्रमाची कल्पना येईल. त्याबरोबरच, सरहद्द गांधीचे बंधू डॉ. खानसाहेब यांच्या फरार चिरंजीवांना त्यांनी त्यां बंगल्यात आश्रय दिलेला होता, ही गोष्टही त्यांच्या धाडसाची द्योतक म्हणून सांगावयाला हवी. पोलिसांचा ससेमिरा मागे लागलेल्या अशा अनेक साहसिकांना आश्रय देताना किंवा सुरक्षित ठिकाणी पोचवताना त्यांचे चातुर्य आणि धारिष्टय सार्थकी लागलेले आम्ही पाहिले होते. मुरलिमोहनचे पात्र रेखाटताना श्री. चतुर्वेदी यांचे हे वैचित्र्यपूर्ण व्यक्तित्त्व, खरे प्रकरणातील त्यांच्या चमत्कारिक हालचाली आणि त्यांच्या कलंदरीचे वेछूट रंगढग डोळयापुढे होते 'मुखवटे' 'नवे संसार' 'नागकन्या' आणि 'डाक बंगला' या कादंबऱ्यांत त्यांच्या गहिऱ्या बहुढंगी व्यत्तित्वाच्या छटा उमटलेल्या आहेत. मोहनी, धर्माधिकारी, खुशालचद, दातार, रुईकर, पटवर्धन प्रभृती आमच्या मित्रांना या छटा अतिरंजित किंवा विकृत आहेत असे काही कधी वाटले नाही. उलट, श्री. हरिभाऊ मोहनी यांनी तर, 'मुखवटे' कादंबरीत मी, वास्तवाचे अवधान आणि औचित्याच्या मर्यादा सांगाळून, वर्णने केलेली आहेत, असा अभिप्राय आपल्या पत्रांत प्राजंळपणाने दिलेला आढळेल.

'मुखवटे'च्या मागोमाग प्रसिध्द झालेल्या 'नवे संसार' या कादंबरीने पुन्हा माझी बाजू सावरली. विशेषत:, १९४२ च्या चळवळीत, ती जप्त झाल्यामुळे जास्तच ! 'काता' मध्ये ज्याप्रमाणे नागपूर कटातील काही घटनांचा मी उपयोग केलेला होता, त्याचप्रमाणे या कादंबरीत, बुलढाणा जिल्हयातल्या चिखली तालुक्यात वद्रळी या गावी, १९४० मध्ये पडलेल्या दरोडयातल्या काही प्रसंगांचे अगदी ओझरते प्रतिबिंब पडलेले होते. प्रथम वऱ्हाडातील ब्राह्मणेतर चळवळीत गाजलेले आणि क्रांतिकारकांच्या उठावात सामील झालेले कार्यकर्ते श्री. आनंदस्वामी हे या दरोडयाचे सूत्रधार होते. इतकेच नव्हे तर त्या सुमारास अकोला, यवतमाळ, पुणे इत्यादी जिल्हयांत नांदखेडपासून सासवडपर्यंत जे दरोडे चौदा पंधरा ठिकाणी पडले, त्यांत स्वामीजी आणि त्यांचे साथीदार यांचा हात होता, असें पुढे वद्रळी येथील दरोडयाच्या खटल्यात उघडकीला आले. तितकेच त्यांच्या हिकमतीचे आणि हिंमतीचे एक उदाहरण म्हणून असे सांगता येईल की, वद्रळीच्या खटल्याचा निकाल लागल्यावर दोन तीन वर्षांनी, ओंकारमांधाता येथे ते अखेर मोठ्या मुष्किलीने पोलिसांच्या हाती लागले. या दरोडयाचा माग काढण्यासाठी, ता. ९ ऑगस्ट १९४० रोजी, ज्या झडत्या आणि जी धरपकड अकोला, बुलढाणा आणि मुंबई येथे झाली, त्यांत अच्युतराव देशमुख, देवमन पाटील, शांताराम जैन, नरहर पाटील, राजाभाऊ देशपांडे, राम कुळकर्णी, बंडुनाना पांडे, डी. आर. जोशी,

राजाराम व्यास, व्ही. व्ही. फाटक, रघुवीर गोवेकर, बिसन खडसे, पांडुरंग जोशी प्रभृती काँग्रेस, रॉयिस्ट, कम्युनिस्ट इत्यादी पक्षातील चाळीस कार्यकर्त्यांना पकडण्यात आले होते. या सत्रात जगद्विख्यात भारतीय क्रांतिकारक श्री. मानवेंद्रनाथ रॉय यांचे मुबईतील मुख्य सहकारी श्री. व. भ. कर्णिक यांच्या घराची आणि कार्यालयाची जी झडती घेण्यात आली, त्यामुळे या दरोडयाकडे माझे लक्ष गेले, व त्यातील काही प्रसंगांचा उपयोग मी 'नवे संसार' या कादंबरीच्या कथानकाला कलाटणी देण्यासाठी केला दरोडयाबद्दल पकडण्यात आलेल्या कार्यकर्त्यांपैकी एकतीस आरोपींवर शेवटी जो खटला भरण्यात आला, त्याचा निकाल ता ९ ऑगस्ट १९४१ रोजी लागून, दहा आरोपींना प्रत्येकी सात वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा देण्यात आली १९४४ च्या जानेवारीत 'तरुण भारत' सुरू झाल्यावर, आनदस्वामी प्रभृती या खटल्यांतील कार्यकर्त्यांच्या मुक्ततेसाठी, मी जोराचा प्रचार केला त्यामुळे १९४६ साली बधमुक्त झाल्यानंतर स्वामीजी, नागपूरचे प्रसिध्द काँग्रेस कार्यकर्ते डॉ. र स आकरे आणि श्री. बाबुराव भोसले यांच्याबरोबर, मला भेटावयाला आले त्या वेळी त्यांनी या दरोडयाची हकिगत मला स्वतःच सागितली. त्याबरोबर, पुण्यापासून अमरावतीपर्यंत किती ठिकाणी असे राजकीय स्वरूपाचे दरोडे घालण्यात आले, याचाही निर्देश त्यांनी केला.

'नवे संसार' या कादंबरीबरोबरच १९४३ च्या सप्टेंबरमध्ये बाहेर पडलेल्या 'प्रमद्वरा' या छोटया कादबरीचाही उल्लेख करावयाला हवा. किंबहुना, त्या कादंबरीची ही एका परीने धाकटी बहीणच म्हणावी लागेल. कारण, तीत 'छोडो भारत' या स्वातत्र्याच्या लढयातील अंतिम पर्वात, ता. १० ऑगस्टपासून ता. १५ नोव्हेंबर पर्यंत, ज्या घटना नागपूर शहरात घडून आल्या, त्याचे धावते प्रतिबिंब पडलेले आहे. ता. १० ऑगस्ट रोजी सायंकाळी इतवारीतील पोस्ट ऑफीस जाळण्याचा जो प्रकार घडला, त्यात, श्री. मगनलाल बागडी यांनी स्थापन केलेल्या हिंदुस्थान रेड आर्मीच्या कार्यकर्त्यांबरोबर, सौ. शांताबाई माडखोलकर, कु. अनसूया जोशी आणि श्री. नीलाबेन या तिघी प्रमुख होत्या; व पुढे तेलंखेडी बॉम्ब कटापर्यंत हिंदुस्थान रेड आर्मी, राष्ट्रीय युवक संघ आणि स्टूडंट्स फेडरेशन यांच्या तरुण कार्यकर्त्यांनी जे उत्पाती आंदोलन केले, त्याच्याशीही या तिघींचा निकट संबंध होता. श्री. आनंदराव कळमकर, श्री. एन. एल. राव प्रभृती राष्ट्रीय युवक संघाचे आणि आता चंद्रपूर येथे डेप्युटी कलेक्टर असलेले सौ. शांताबाईचे बंधू श्री. वि. ल. बडकस, श्री. प्रभाकर रोहणकर प्रभृती स्टूडंट्स फेडरेशन कार्यकर्ते तेलंखेडी बॉम्ब कटात प्रमुख होते. त्याच्या या साहसात पांडुरंग म्हस्के, रामराव वाळबुधे, मणिराम मेश्राम प्रभृती तरुणांची त्यांना साथ होती. यापैकी काही युवकांना नऊ वर्षांपासून तीन वर्षांपर्यंत सक्त मजुरीच्या जबर शिक्षा झाल्या. 'प्रमद्वरे'त इतवारीतील पोस्ट ऑफिसाच्या जाळपोळीपासून तो तेलंखेडीच्या राखीव जंगलातील पाठलागापर्यंत ज्या अनेक प्रसंगांचे आणि त्यात भाग घेण्याऱ्या व्यक्तींचे ओझरते रेखाटन आलेले आहे, त्यामुळे 'नवे संसार' प्रमाणेच ही कादंबरीही ताबडतोब जप्त करण्यात आली. अर्थात, टीकाकारांना, ती काळजीपूर्वक वाचून, तीत वर्णन केलेल्या घटना अतिशयोक्त आणि असंभाव्य आहेत, अशी ओरड करण्याची संधी काही मिळाली नाही, व तिच्या जरी आतापर्यंत तीन आवृत्या निघालेल्या असल्या, तरी 'डाकबंगला' आणि 'नागकन्या' यांच्याप्रमाणे ती गाजलीही नाही. वस्तुतः 'मुक्तात्मा' 'कांता' 'नवे संसार' आणि 'प्रमद्वरा' या चार कादंबऱ्यांत १९१९ पासून १९४४ पर्यंत झालेले कानपूर कट, नागपूर कट, तेलंखेडी कट इत्यादी कट आणि त्या कटांत प्रकट झालेले अनेक तरुण कार्यकर्त्यांचे धारिष्ट यांचे जे, अंशमात्र का होईना, वास्तव रेखाटन केलेले आहे, त्यावरून हे स्पष्ट प्रत्ययाला येते की, १९२० साली म. गांधी यांनी भारतीय राजकारणात जे अहिंसायुग प्रवर्तित केले, त्या युगात दरोड्यांपासून तो बॉब स्फोटांपर्यंत सर्व प्रकारच्या अत्याचारी चळवळी अखंड चालू होत्या; व त्यांत काँग्रेससकट सर्व पक्ष आपआपल्या परीने भाग घेत होते. 'छोडो भारत'चा अंतिम सामना आणि आझाद हिंद सरकारची स्थापना म्हणजे तर देशव्यापी सामुदायिक सशस्त्र अत्याचारी उठावाचा प्रयोग यशस्वी होऊन, त्याच्या जोरावरच हा देश अखेर दास्यमुक्त झाला, असे जे विधान वारंवार आग्रहाने करण्यात येते, ते सर्वथैव अवास्तव आहे, असा निष्कर्ष ओघानेच निघतो. पण, गेली तीस वर्षे या कादंबऱ्यांवर सतत ताशेरे

झाडीत असलेल्यांना राजकारणाची चर्चा करण्याची बुध्दी झाली नाही याचे नवल वाटते. मग 'मुक्तात्मा' आणि 'कांता' किंवा 'नवे संसार' आणि 'प्रमद्वरा' या कादंबऱ्यांत जी कथानकांची आणि विचारांची सगती आणि प्रगती आहे, तिच्याकडे जर त्यांचे दुर्लक्ष झाले असले, तर त्यांत आश्चर्य मानण्यासारखे काहीच नाही.

'नवे संसार' आणि 'प्रमद्वरा' यांच्या दरम्यान 'डाक बंगला' आणि 'नागकन्या' या ज्या दोन छोटया कादंबऱ्या प्रसिध्द झाल्या, त्यांपैकी 'नागकन्ये'ने तर माझ्या विरुध्द टीकेचे मोठेच वादळ उठवले. १९४१ च्या दिवाळीत, देशमुख आणि मंडळीचे तत्कालीन मालक आणि माझे प्रकाशक श्री. भ. व्यं. देशमुख आणि श्री. रा. ज. देशमुख यांच्याबरोबर, श्री. वि. ल. बडकस आणि मी असे दोघे, बैतूलपासून चौदा मैलावर असलेल्या, तापी तीरावरील बारालिंग या एकांत निसर्गरम्य तीर्थस्थानी गेलो होतो. श्री. भगवानराव देशमुख यांच्या पत्नीचे मातामह श्री. रंगराव गोविंदराव ऊर्फ बाबासाहेब बोकील हे निजाम–हैद्राबाद संस्थानातील पोलिस खात्यातून सेवानिवृत्त झाल्यावर, तेथे नदीकाठी असलेल्या टेकडीच्या उतारावर टुमदार बंगलीवजा मठी बांधून आपले उत्तरायुष्य अध्यात्मचिंतनात घालवीत होते. त्या मठीसमोर तापीच्या पात्रातच त्यांच्या श्वशुरांची समाधी होती. मोंगलाईतील पोलिस खात्यात त्या काळी हिंदूंना दुष्प्राप्य असलेल्या सुपरिंटेंडंच्या हुद्दयापर्यंत ते चढलेले होते. पूर्वायुष्य अशा रीतीने अधिकारपदावर राहून, नाना प्रकारचे ऐषआराम भोगण्यात घालवल्यावर–

नाही मी भक्त ना साधक।
नाही मज परमार्थविवेक।
प्रपंच झाला नीट सकळ।
सुखे कंठावयाचा काळ।
हाती घेतलीसे माळ।
व्हावया निज मनरंजन।
कधी करितो हरिभजन।
हे नोहे संतपण।
स्पष्ट सांगतो घेउन आण।
गोविंदात्मज सांगे लोका।
कोणा होऊ नये धोका।

अशा विनीत भावनेने, त्यांनी आता वार्धक्यात हा वानप्रस्थाश्रम थाटलेला होता. त्यांच्या सहवासात आम्ही जे चार दिवस मनसोक्त स्वैरालाप करण्यात घालविले, त्यांतून 'नागकन्ये'चा जन्म झाला. बैतूलहून बारालिंग येथे येताना, वाटेत खेडी येथे म. गाधी यांच्या ब्रिटिश शिष्या मिस मेरी बार या प्रौढ बाईनी चालवलेला आश्रम आम्ही पाहिला. त्यांच्या हाताखाली मिस बार्बरा व हार्टलैंड या दोन पाश्चात्य तरुणी रचनात्मक कार्य करीत असत. त्यांपैकी एका तरुणीने तर आपली सर्व मालमत्ता या आश्रमाला म्हणजेच महात्माजींना अर्पण केलेली होती. आश्रमात त्यापूर्वी नुकत्याच होऊन गेलेल्या काही अनैतिक दुर्घटनांचा परिस्फोट खुद्द महात्माजींनीच मुळी जाहीर रीतीने खेदपूर्वक केला होता; व त्या घटनांबद्दल या मंडळीबरोबर आश्रमात राहत असलेले श्री. गोपाळ लपालीकर हे अंशतः जबाबदार असल्याचे चौकशीअंती दिसून आल्यामुळे, गांधीजींच्या आदेशानुसार, त्यांना सेवाग्रामला येऊन प्रायश्चित्तही घ्यावे लागले होते. या लाजिरवाण्या प्रकरणासंबंधी महात्माजींशी झालेला आपला पत्रव्यवहार त्यांनी स्वतःच मला दाखवला होता. खेडीहून रात्री बारालिंग येथे आल्यावर श्री. बाबासाहेब बोकील यांनी माझ्या या माहितीत थोडी भर घातली. असे हे त्या वेळी सर्वत्र गवगवा झालेले प्रकरण माझ्या मनात घोळत असतानाच, दुसऱ्या दिवशी सकाळी, आम्ही तापीच्या डोहावर स्नानाला गेलो. तेथून परत आल्याबरोबर मी कादंबरीची जी सुरुवातीची पंचवीस तीस पाने झपाटयाने लिहून काढली, ती श्री. देशमुखप्रभृती मंडळींनी वाचून पाहिली, व श्री. देशमुख यांनी कादंबरी त्वरित हातावेगळी करून देण्याचा आग्रह मला केला. अशा रीतीने आश्रमातील घटनांचा किंचिन्मात्र आधार जरी मी कथानकाला घेतलेला होता, तरी वर्णनात मात्र, कोणत्याही प्रकारचा विपर्यासच काय, पण अतिशयोक्ती देखील केली नव्हती. उलट, त्या घटनांच्या अत्यंत दुःखद अशा घृणास्पद पर्यवसनाला प्रणयातुर

अनुक्रमणिका

मिथुनाच्या ताटातुटीची करुणपूर्ण कलाटणी देऊन यौवनासंबधीच्या नायकाच्या लंपट कल्पनांचा धिक्कार मी नायिकेकडून करवला होता. आपल्या एरवी सुखसंपन्न असलेल्या जीवनात केवळ प्रणयभंगामुळे उत्पन्न झालेल्या दु:खाची रडकथा जेव्हा तो तिला सागतो, तेव्हा ती 'नागकन्या' त्या कामुकाला अशा रीतीने फटकाराते की, ''प्रीती हा यौवनाचा धर्म आहे असं तू म्हणतोस, ते अर्धसत्य आहे, पूर्ण सत्य नव्हे. यौवनाचा धर्म एवढा एकच नाही. इतका संकुचित नाही. प्रीती हा यौवनाच्या धर्माचा एक आविष्कार आहे. ते यौवनाचं सर्वस्व नव्हे, साफल्य नव्हे आणि सामर्थ्य तर नव्हेच नव्हे. म्हणून, तुझ्यासारख्या तरुणानं हृदय इतक्या साध्या घटनेनं खचू शकतं, हे पाहून तुझी कीव आली मला !'' अर्थात, या कादंबरीत जो शृंगार होता, तो संभोगशृंगार नव्हे, तर विप्रलंभशृगार होता. तितकीच महत्त्वाची दुसरी गोष्ट ही की, नायक आणि नायिका यांच्या रात्रभर झालेल्या संवादात स्पेन आणि चीन या देशातील लोकयुध्दातल्या भीषण प्रसंगांपासून तो हैद्राबाद संस्थानातील हिंदु प्रजेचा छळ आणि पाश्चात्य मिशनरींच्या कारवाया यांच्यापर्यंत नाना प्रकारचे राजकीय विषयच मुख्यतः येऊन गेलेले होते.

तरीसुध्दा, 'नागकन्ये'च्या वेष्टनावर घालण्यात आलेले भडक शृंगारिक चित्र पाहूनच बहुधा, टीकाकारांची माथी भणाणली, व ती अश्लील असल्याचा ढोल जोरजोराने पिटावयाला त्यांनी प्रारंभ केला. या ढोलपिटाईतील सगळयांत विनोदी प्रकार जर कोणता असेल, तर तो हा होता की, प्रो. ना. सी. फडके याच्यासारख्या ज्या ज्येष्ठ कादंबरीकारावर उत्तान शृंगारिक वर्णने केल्याबद्दल वर्षानुवर्ष टीकेचा सारखा भडिमार चाललेला होता, त्यानी आपल्या 'झंकार' या साप्ताहिकात, ''माडखोलकराची नाग (वी)–कन्या'' असा भरमसाट सणसणाटी मथळा देऊन, त्या कादंबरीची, माझी आणि बिचाऱ्या माझ्या पत्नीचीही यथेच्छ नालस्ती केली. मग काय विचारावे ? इतर टीकाकार त्यांनी सुरू केलेल्या या फाल्गुनोत्सवात चढाओढीने सामील झाले. माझ्या लेखनायुष्याच्या सुरवातीला मी, कै. रा. ग. गडकरी यांच्या भाषेचे अनुकरण करून, 'आधुनिक कविपंचक' हे टीकालेखांचे पुस्तक लिहिलेले होते. त्या वेळी त्या अनुकरणाचे सर्वत्र कौतुक झाले. मी अगदी नवीन पोरसवदा लेखक असून देखील कोणीही मजवर कै गडकरी यांची भ्रष्ट नक्कल केल्याचा किंवा वाङ्मयचौर्याचा आरोप केला नाही. पण, 'नागकन्या' ही 'रणांगण' या कादंबरीची भ्रष्ट नक्कल असल्याचा आणि अशा रीतीने मी वाङ्मयचौर्यही केल्याचा शोध पुण्याच्या 'ध्रुव' मासिकाचे विद्वान संपादक श्री. रा. प्र. कानिटकर यांनी लावला. या शोधाकडे कोणीही अजिबात लक्ष दिले नाही आणि अशा रीतीने तो उपजल्याबरोबरच मरून गेला, हा भाग निराळा. पण, 'झंकार' चे सात आठ रकाने भरभरून मजवर टीकेचा मारा करताना प्रो. फडके यांना सुध्दा जो आरोप करण्याचे धाडस झाले नाही, तो करण्याचे धारिष्ट कानिटकर यांनी दाखवावे, ही त्यांची केवढी बहादुरी! 'नागकन्ये' वर टीकेचा असा चौफेर हल्ला चालू असता, मी मुंबईस गेलो होतो. त्या वेळी झालेल्या भेटीत श्री. मामासाहेब वरेरकर मला म्हणाले, ''गजाननराव, ही कादंबरी तुम्ही मराठीत लिहिलीत इथेच तुमचे सगळे चुकले. अहो, ती जर तुम्ही संस्कृतात लिहिली असतीत तर त्याच लोकानी तुमची उलट वाहवा केली असती! संस्कृतात ही श्लीलअश्लीलाची भानगड नाही.'' त्यानंतर 'चंदनवाडी'पासून 'सत्यभामे'पर्यंत माझ्या ज्या आठ कादंबऱ्या गेल्या सत्तावीस वर्षात प्रसिध्द झाल्या, त्यांच्यावर मात्र असे कोणत्याच प्रकारचे आक्षेप किंवा आरोप माझ्या या धंदेवाईक टीकाकारांना सुध्दा करण्याचे धैर्य झाले नाही.

तथापि, एक अगदी निराळाच आक्षेप खुद्द माझे प्रकाशक श्री. रा. ज. देशमुख यांनी घेतला. 'चंदनवाडी' या कादंबरीची मुद्रणप्रत ज्या वेळी मी त्यांच्याकडे पाठवली, त्या वेळी त्यांनी तिच्यासंबंधी अशी तक्रार केली की, ''पूर्वीच्या तुमच्या कादंबऱ्यांच्या मानाने या कादंबरीत भाषेचे सौष्ठव अगदी कमी असल्याचे नजरेस आले. त्यामुळे, वाचकांना ती कितपत आवडेल, याबद्दल शंका वाटते.'' पण ही त्यांची भीती निराधार ठरली. 'भंगलेले देऊळ' नंतर जर माझी कोणती एक कादंबरी अत्यत लोकप्रिय ठरली असेल, तर ती 'चंदनवाडी' होय. अर्थात, गेल्या दहा वर्षातल्या 'रुक्मिणी' आणि 'सत्यभामा' या दोन कादंबऱ्याही तितक्याच लोकप्रिय ठरल्या, हा भाग वेगळा.

वस्तुतः 'मुक्तात्मा'पासून तो 'सत्यभामे' पर्यंत गेल्या चाळीस वर्षातल्या माझ्या एकाही कादंबरीची भाषा दुसऱ्या कादंबरीसारखी नाही. कारण, भाषेच्या बाबतीत निरनिराळे प्रयोग करण्याचा मला मुळी प्रथमपासूनच छंद आहे. विशेषतः, लेखनायुष्याच्या सुरुवातीपासून टीकालेखन आणि वृत्तपत्रलेखन ही दोन्ही करावी लागल्यामुळे, एकाच वेळी दोन प्रकारची भाषा लिहिण्याची सवय मला लागून गेलेली होती. १९२४ च्या ऑगस्टमध्ये मी जेव्हा 'महाराष्ट्र' साप्ताहिकाच्या संपादकमंडळावर आलो, तेव्हा त्याचे मुख्य संपादक श्री. दादासाहेब ओगले यानी मला असा इशारा हसत हसत दिला की, "हे पाहा माडखोलकर, तुम्ही ज्या भाषेत 'आधुनिक कविपंचक', 'चिपळूणकर' वगैरे पुस्तके लिहिलीत, ती भाषा काही आमच्या 'महाराष्ट्र'ला पेलणार आणि परवडणार नाही. साहित्य समालोचनाच्या सदरात तुम्हाला वाटल्यास तशी भाषा लिहा. पण, साप्ताहिकाच्या इतर कामात आणि संपादकीयात मात्र तुम्ही भाषा अगदी सोपी आणि वाक्ये सुटसुटीत लिहिण्याची काळजी घ्या. माझी लिहिण्याची पध्दत तुम्ही पाहाताच आहात. तितके सोपे, साधे, सरळ तुम्ही लिहावे, असे काही मी म्हणत नाही. पण, विदर्भाच्या अगदी खेडयापाडयात देखील आपला 'महाराष्ट्र' जातो, हे ध्यानात घेऊन, तुम्ही सोपे लिहिण्याचा प्रयत्न करा. खरे म्हणजे तुम्हाला मी हे सांगण्याची गरज नाही कारण, विष्णुशास्त्र्यांची 'निबंधभाषे'तली संस्कृतप्रचुर डौलदार भाषाशैली आणि 'केसरी'तील त्यांच्या लेखांची अगदी साधी सुबोध भाषा यांच्यातला फरक तुम्ही पाहयलाच आहे. तेच धोरण 'महाराष्ट्रा'च्या बाबतीत तुम्ही अमलात आणा." श्री. ओगले यांच्या या सूचनेचे मर्म मी लक्षात घेतले होते. पण, टीका आणि वृत्तपत्र यांच्यापेक्षा कादंबरीची भाषा अगदी निराळी असली पाहिजे व विषय, प्रसंग आणि रस यांच्या अनुरोधाने ती बदलत गेली पाहिजे, अशी माझी भावना. जॉर्ज इलियट, हयूगो, झोला, लिटन, मेरेडिथ, टॉलस्टॉय, गॅलस्वर्दी, हॉल केन, हार्डी, रोमा रोला, थॉमस मॅन, शोलोकोव्ह, स्टीफन झ्वाइग इत्यादी पाश्चात्य लेखकांच्या कादंबऱ्या वाचून झालेली होती. त्यामुळे प्रथमपासूनच मुळी माझ्या कादंबऱ्यांच्या भाषेला अगदी निराळे वळण लागले; व विषय, प्रसंग आणि रस यांच्या अनुषंगाने गेल्या छत्तीस वर्षोत तीत सतत बदल होत गेला.

१९३० ते १९७० पर्यंतच्या या कालावधीत माझे आयुष्य जसजसे बदलत आणि विस्तारत गेले, तसतसा माझ्या दृष्टिकोणातही बदल होत गेला. १९३६ पर्यंत माझा जीवनक्रम बैठा होता. म्हणजे असे की, घर आणि 'महाराष्ट्र' कचेरी यांच्यापलीकडे माझी दुनिया नव्हती. १९३७ च्या एप्रिलमध्ये मी प्रथम पंचमढी, जगन्नाथपुरी आणि कलकत्ता अशी तीन शहरे पाहिली. नंतर मेमध्ये मध्यभारत मराठी साहित्य संमेलनाचा अध्यक्ष म्हणून सौ. शांताबाईसह मी महेश्वरला गेलो तेव्हापासून माझा जो प्रवास सुरू झाला, तो या घटकेपर्यंत अखंड चालू आहे. १९४६ च्या जुलैत, संयुक्त महाराष्ट्र परिषदेचा सरचिटणीस झाल्यावर तर, माझ्या पायावरती मुळी नक्षत्र पडल्यासारखेच होऊन गेले ! अशा रीतीने गेल्या चौतीस वर्षात हरिद्वारपासून हैद्राबादर्यंत आणि भुवनेश्वरपासून खंबायतपर्यंत मला, निरनिराळया निमित्तांनी, प्रवास करण्याची बरीच संधी मिळाली त्याचप्रमाणे अमेरिका, इंग्लंड आणि पश्चिम जर्मनी या राष्ट्रांचा सरकारी पाहुणा या नात्याने या तीन देशांबरोबर मी फ्रान्स, स्वित्झर्लंड आणि इटली या देशांतीलही काही महत्त्वाची शहरे पाहिली. या प्रवासाइतकेच वृत्तपत्रव्यवसायातील अनुभवही माझी दृष्टी व्यापक व्हावयाला कारण झाले १९३० च्या ऑगस्टमध्ये, जंगल सत्याग्रहात भाग घेतल्यामुळे, नागपूरच्या तुरुंगात असताना डॉ. खरे, रावसाहेब साळवे, डॉ शिवाजीराव पटवर्धन, श्री. वासुदेवराव सुभेदार, ठाकूर प्यारेलालसिंग, ठाकूर लक्ष्मणसिह चौहान, मौलाना चिरागुद्दिन प्रभृती मध्यप्रांत वऱ्हाडातील काही प्रमुख कॉंग्रेस कार्यकर्त्यांशी माझा संबंध आला. बंदिवासातून सुटल्यावर 'महाराष्ट्रा'चे कार्यकारी संपादकत्व लवकरच माझ्याकडे आले. त्यामुळेच कदाचित असेल, मध्यप्रांत–वऱ्हाडच्या तत्कालीन राजकारणातले केवळ प्रतिचाणक्यच असे नुकतेच गृहमंत्रिपदावर आरूढ झालेले धुरंधर मुत्सदी डॉ. ई. राघवेंद्र राव यांनी, शेठ खुशालचंद आणि रावसाहेब फुले यांच्यामार्फत माझा परिचय करून घेतला. याची परिणती विश्रब्ध स्नेहात झाली. डॉ. खरे आणि डॉ. राव यांच्या

साहचर्यामुळे मध्यप्रा.. व-हाडचे राजकारण आणि राज्यकारभार यातील खरे प्रकरणासारख्या अनेक महत्त्वाच्या घटना मला अतरंगातून पाहण्याचा योग आला. १९४४ च्या जानेवारीत मी 'तरुण भारत' दैनिकाचा मुख्य संपादक आणि १९४६ च्या जुलैत त्या वेळी कॉंग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य असलेले सयुक्त महाराष्ट्र परिषदेचे अध्यक्ष श्री. शकरराव देव यांचा मुख्य सहकारी झालो त्यामुळे मध्यप्रदेशातील, मुंबई राज्यातील आणि भारतातीलही अनेक नेते आणि मंत्री यांच्याबरोबर काम करण्याची सधी मला मिळाली. या सगळया विविध अनुभवांमुळे माझे जीवन साहजिकच व्यापक होऊन गेले.

चाळीस वर्षाच्या या कालखंडात माझ्या विचारांत जे परिवर्तन होत गले तेही लक्षात घ्यावयाला हवे. १९१९ साली जेव्हा मी लेखक म्हणून पुढे आलो, तेव्हा लक्षात घ्यावयाला हवे. की माझ्या मनावर क्रातिकारकांच्या चळवळीचा प्रभाव होता. १९२० साली एकीकडे आधुनिक कवींवरील टीकालेख लिहीत असतानाच, दुसरीकडे आयर्लंडातील सिनफेन पक्षाच्या क्रातिकारी उठावावर 'केसरी'तून जी लेखमाला मी लिहिली, ती याच कारणामुळे श्री. श्री. अ. डांगे यांच्याशी ओळख झाल्यावर कम्युनिस्ट तत्त्वप्रणालीविषयी मला जे आकर्षण वाटले, त्याला बहुधा माझी ही प्रवृत्ती कारण झाली असावी. त्यांनी वेळोवेळी दिलेल्या पुस्तकाच्या वाचनामुळे आणि त्यांच्याशी केलेल्या चर्चेमुळे माझ्या मनात असा विश्वास उत्पन्न झाली की, आपल्या देशाचे केवळ पारतंत्र्यच नव्हे, तर सामाजिक आणि आर्थिक विषमता नष्ट व्हावयालाही साम्यवादाचे तत्त्वज्ञान उपयोगी पडेल. 'मुक्तात्मा' पासून 'नवे संसार' पर्यत माझ्या सर्व कादंबऱ्यावर या विश्वासाची छाप पडलेली आहे. पुढे स्टालिनच्या कारकीर्दीत रशियन कम्युनिस्ट पक्षातल्या स्वतंत्र वुध्दीच्या कार्यकर्त्यांची प्रथम जी मुस्कुटदाबी आणि नंतर अमानुष कत्तल करण्यात आली, ते अत्याचार पाहून, त्या विश्वासाला धक्का बसला; व दुसऱ्या महायुध्दातील त्याच्या विसंगत, अनाकलनीय धोरणामुळे आणि त्या धोरणाची री ओढणाऱ्या भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या अराष्ट्रीय वृत्तीमुळे रशियन राजनीतीविषयी मला आदर उरला नाही तथापि, समाजवादाविषयीची अनुकूलता मात्र कायम राहिली. १९२२ पासून वृत्तपत्रव्यवसायात आणि सार्वजनिक जीवनातही मला जे अनुभव येत गेलेले होते, त्यामुळे, सोशॅलिझमच्या पायावर आपल्या समाजाची पुनर्घटना झाल्याशिवाय, सर्वसामान्य माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठेने जगता येणार नाही, अशी माझी भावना होऊन गेलेली होती. १९२२ साली 'ज्ञानप्रकाशा'त दरमहा चाळीस रुपयांवर, १९२४ साली 'महाराष्ट्रा'त अडुसष्ट रुपयांवर आणि १९४४ साली 'तरुण भारता'त शंभर रुपयांवर मी वृत्तपत्रीय कामाला सुरुवात केली. हे माझे वेतन, १९६७ च्या मे मध्ये मी मुख्य संपादकपदावरून निवृत्त झालो त्या वेळी, सातशे रुपयांपर्यंत वाढलेले होते. १९४६ च्या जूनमध्ये, 'तरुण भारता'तील माझ्या पगारावरून बोलताना, श्री. तात्यासाहेब केळकर म्हणाले, होते, "मला काय किंवा खाडिलकराना काय संसार जो थोडाबहुत प्रतिष्ठेने करता आला, तो केवळ आमच्या अवांतर लेखनाच्या प्राप्तीच्या जोरावर! आम्हाला देशाभिमानाची ईर्ष्या आणि लेखनाची हौस होती, म्हणूनच खरोखरी आम्ही वर्तमानपत्रात काम करू शकलो. एरवी पैशाच्या दृष्टीने या धंद्यात कोणी पडावे, असे मी तरी म्हणणार नाही." हा केळकरांचा अभिप्राय अगदी वास्तविक आहे. मी स्वतः जन्मभर जे इतक्या कमी पगारावर इतक्या जिद्दीने काम केले, ते केवळ स्वतःच्या कल्पनांनुसार मला काम करण्याची संधी मिळाल्यामुळे म्हणून. वृत्तपत्रव्यवसायात पडल्याबद्दल मला कधीही असमाधान वाटले नाही, व उच्च दर्जाच्या आणि चांगल्या पगाराच्या ज्या सरकारी आणि निमसरकारी नोकऱ्या पुढे मला देऊ करण्यात आलेल्या होत्या, त्या मी आभारपर्वूक नाकारल्या. शिवाय, माझी लेखणी कामधेनूप्रमाणे इच्छादानी असल्याकारणाने, अवांतर लेखनाच्या जोरावर मला संसार सुखाने करता आला. तथापि, केवळ या वैयक्तिक अनुभवामुळेच समाजवाद मला ग्राहय वाटला, असे मात्र नाही. इतिहासात प्रतिबिंबित झालेला एकंदर मानवी जीवनाचा ओघ पाहून, माझी अशी धारणा झाली की, कर्मगतीमुळे म्हणा किंवा दैवगतीमुळे म्हणा, वैषम्य आणि नैर्घृण्य यांनी ग्रासलेल्या मानवी संसारात व्यक्तिमात्राला स्वतःच्या प्रवृत्तीनुसार विकास करून घेण्याची समान संधी जर मिळावयाला हवी असेल, तर ती आत्मस्वातंत्र्य आणि समाजवाद यांच्या

अवलंबनानेच मिळू शकेल. विषमता आणि परस्परांचे शोषण हा मुळी द्वंद्वमय स्पृष्टीचा कायदाच आहे. त्याचा जबरदस्त काच थोडा तरी जर आपल्याला सैल करणे शक्य असेल आणि करण्याची आकांक्षाही असेल, तर या दोन प्रमेयांच्या पायावरच मानवी संसार आणि शासन यांची पुर्नघटना करण्यात आली पाहिजे.

गेल्या पन्नास वर्षांतील या सगळया अवलोकनातून, अनुभवातून आणि मननातून माझे साहित्य निर्माण झालेले आहे. मी तत्त्वचिंतक नाही. फक्त समाजजीवनाचा एक निरीक्षक आणि विश्लेषक आहे. माझ्या जीवनाला जर तात्त्विक बैठक असलीच, तर ती वयाच्या नवव्या वर्षापासून आजपर्यंत केलेल्या महाभारताच्या पारायणाची आणि चिंतनाची आहे, असे म्हणता येईल. माझ्या संस्कृत भाषेच्या तुटपुंज्या ज्ञानामुळे हा ग्रंथ मी मुळातून वाचू शकलो नाही. पण, त्याचे निरनिराळे मराठी अनुवाद मुळाशी ताडून पाहून, मी तो समजावून घेण्याचा प्रयत्न मात्र चिकाटीने केलेला आहे. इलियट, ओडिसी, बायबल, डिव्हाइन कॉमेडी, पॅराडाइज लॉस्ट इत्यादी पौराणिक स्वरूपाचे बहुतेक पाश्चात्य ग्रंथ मी वाचलेले आहेत. पण, मानवी स्वभाव, जीवन आणि समस्या यांचे वैचित्र्यपूर्ण विराट दर्शन महाभारतात जसे घडते, तसे ते दुसऱ्या कोणत्याही पौराणिक ग्रंथात घडत नसावे, असा माझा समज आहे. म्हणूनच, मी म्हणतो की, माझ्या जीवनाला जर कोणता आध्यात्मिक आधार असेल, तर तो महाभारतातल्या या दर्शनाचा. त्याने जशी मला समाजसेवेची स्फूर्ती दिली, तसाच सर्व बिकट प्रसंगात धीरही दिला. हा जो परिणाम माझ्या मनोजीवनावर त्या ग्रंथाने केला, त्याचा परिपाक 'रुक्मिणी' 'ऊर्मिला' आणि 'सत्यभामा' या गेल्या दहा वर्षात प्रसिध्द झालेल्या माझ्या कादंबरी–त्रयात (Trilogy) उतरलेला आहे. त्या वाचून मुंबईच्या एका विदुषी भगिनीने मला लिहिलेल्या पत्रात असे उद्‌गार काढले होते की, "आपल्या या कादंबऱ्यांनी महाभारतात एकंदर मानवी संसाराचा आणि विशेषतः स्त्रीजीवनाचा किती सखोल आणि सर्वांगीण विचार केलेला आहे, हे माझ्या निदर्शनास आणून दिले. स्त्री ही मानवी समाजाची जननी आणि धारिणी आहे, हे जे तत्त्व या कादंबऱ्यात, महाभारतातल्या निरनिराळया प्रसंगांचे दाखले देऊन, विशद केलेले आहे, ते आजच्या सगळया सामाजिक समस्यांच्या मुळाला हात घालणारे आहे, असे मला वाटते. स्त्रीजीवनातल्या नाना प्रकारच्या गुंतागुंतीचा इतका बारीक विचार महाभारतात केलेला असेल, तसे मला वाटले नव्हते. त्यामुळे या कादंबऱ्या वाचून मला अगदी निराळया प्रकारचा आनंद झाला." त्या भगिनीचे हे पत्र वाचून, आपल्या कादंबरी–लेखनाचे सार्थक झाले, असा विचार माझ्या मनात आला.

'एका पिढीचे आत्मकथन' या ग्रंथातून पुनर्मुद्रित
(संपादक– पु. शि. रेगे, वा. ल. कुलकर्णी,
रा. भि. जोशी, गं. ब. ग्रामोपाध्ये)

अनुक्रमणिका

माडखोलकरांचे मृत्युलेख

दि. भा. घुमरे

स्व. श्री ग. त्र्यं. उपाख्य भाऊसाहेब माडखोलकर यांच्या सव्यसाची, चतुरस्त्र, बहुआयामी, विदग्ध, तार्किक आणि परखड लेखनात त्यानी लिहिलेल्या मृत्युलेखांना अनन्य आणि वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. मृत्यूलेखांप्रमाणेच त्यांनी लिहिलेले अभीष्टचिंतनपर गौरवलेखही तशाच तोलामोलाचे आहेत. परंतु या गौरवलेखांपेक्षा त्यानी लिहिलेले मृत्यूलेख अधिक गाजले. आजही साहित्याच्या, पत्रकारितेच्या आणि सार्वजनिक जीवनाच्या क्षेत्रात श्री भाऊसाहेबांच्या लेखनकर्तृत्त्वाच्या संदर्भात बोलता–लिहिताना या मृत्यूलेखांचा उल्लेख ठळकपणे केला जातो

साहित्यवैभव आणि अनन्यता

थोरामोठयाच्या निधनावर दुखवटा व्यक्त करण्यासाठीच केवळ नव्हे तर त्यांचे जीवन आणि त्याचे कार्य यातून बोध घडविण्यासाठी, वृत्तपत्रे आणि नियतकालिके यांच्या संपादकीयात मृत्यूलेख लिहिण्याची परंपरा पूर्वीपासून सुरू होती. इंग्रजी वृत्तपत्रे आणि नियतकालिके यांत 'ओबिच्युअरी' पुरेशी ठरे पण भाषिक वृत्तपत्रात आणि नियतकालिकात थोरामोठयांचे मृत्यू हा 'महत्त्वाचा विषय' असे आणि हा विषय मग त्या व्यक्तीचे चरित्र आणि तिचे कार्य या क्रमाने वर्णन करून ती व्यक्ती गेल्याचे दुःख, तिच्या मृत्यूमुळे झालेली हानी आणि त्या व्यक्तीच्या जीवन व कार्यापासून घ्यावयाचा बोध या स्वरूपात हाताळला जाई. एखाद दुसरा अपवाद वगळल्यास अशा या मृत्यूलेखांना ठराविक साचापलीकडे वेगळे असे वैभव नसावयाचे भाऊसाहेबांनी ते दिले; केवळ साहित्यालंकार चढवून नव्हे की केवळ दुःखशोकातून करुण रसाचा परिपोष करूनही नव्हे; तर त्याहून सर्वस्वी वेगळे, अंतरंगाचा ठाव घेऊन, त्या व्यक्तित्त्वाची चिरस्थायी प्रतिमा सिद्ध करणारे आयाम आणि वैभव दिले. इथे त्यांच्या प्रज्ञेची स्वतंत्रता आणि त्यांच्या प्रतिभेचा विलास यांचा जो मनोज्ञ संगम झाला आहे, त्या संगमाच्या क्षेत्रात मराठी पत्रकारितेनेच नव्हे तर मराठी साहित्यानेही सदैव अभिमान वागवावा, असे एक साहित्यशिल्प उभे झाले, जे अजूनही त्याच्या नामकरणाची वाट बघत आहे. भाऊसाहेबांनी जे अनेक मृत्यूलेख लिहिले त्यातील काही निवडक मृत्यूलेख आणि गौरवलेखही, दोन वेगवेगळया पुस्तकात ग्रथित केले आहेत. 'व्यक्तिरेखा' आणि 'व्यक्ति तितक्या प्रकृति' ही ती दोन पुस्तके आहेत. म्हणजे नामकरण स्वतः भाऊसाहेबांनीच केलेले आहे. मग आता वेगळया नामकरणाची गरज ती कुठे उरते ? गरज आहे ती या आंगळयावेगळया साहित्यकृतीच्या नामकरणाची. त्यांचे मृत्यूलेख या जशा 'व्यक्तिरेखा' आहेत तसेच त्या मृत्यूलेखातून 'व्यक्ति तितक्या प्रकृति' हेही दृग्गोचर झाले आहे. पण तेवढयाने या मृत्यूलेखांचे वेगळेपण स्पष्ट होत नाही.

भाऊसाहेबांच्या या मृत्यूलेखात व्यक्तिरेखा आहेत त्याचप्रमाणे व्यक्ती तितक्या प्रकृतीही आहेत. परंतु या व्यक्तींच्या मृत्यूने, त्यांच्या प्रत्येकाच्या जीवन आणि कार्याच्या संदर्भात जे

अनुक्रमणिका

तत्त्वचिंतन प्रकट झाले आहे आणि त्याला प्राचीन पौराण ग्रंथातून, मध्ययुगीन नाटयवाङ्मयातून, आख्यानकथातून समर्पक आणि चपखल अशा दृष्टांतांची आणि कथांची जी डूब देण्यात आली आहे, ते सारे वागविभव वाचकाला दिवंगताचे जीवन, कार्य आणि त्याची शिकवण एवढाच सीमित 'बोध' घडवीत नाही, तर त्यापेक्षा कितीतरी अधिक संस्कार, प्रबोध आणि उत्कट असा रसानंद यातून मिळतो. भाऊसाहेबांचे हे अनन्यत्त्व, हा त्यांच्या प्रतिभेचा केवळ क्षणिक उल्लास आणि विलास नाही, तर मानवी जीवन आणि मृत्यू, त्या मृत्यूनंतरचा दुःखशोक आणि सांत्वना, त्या सांत्वनापूर्वीचे कारुण्य आणि तत्त्वचिंतनात त्याचे होणारे पर्यवसान—या सर्व अवस्थांचा त्यांनी केलेला दीर्घ अभ्यास आणि सखोल चिंतन यात ते अनन्यत्व दडलेले आहे.

समर्पक दृष्टान्त आणि आठवणी

नागपूरचे दानशूर रसिकाग्रणी स्व. श्रीमंत बाबुरावजी देशमुख यांच्या १० जुलै १९७० रोजी झालेल्या मृत्यूवर श्री भाऊसाहेबांनी 'तरुण भारत'च्या १२ जुलैच्या अंकात जो मृत्यूलेख लिहिला तो या अनेक दृष्टींनी अभ्यसनीय आहे. त्यात चरित्र आहे, भाऊसाहेबांशी त्यांचा केव्हा व कसा संबंध आला, ते सांगितले आहे, आणि हे सागत असताना बाबुरावांच्या दातृत्वाचा विषय कसा या लिखाणाचा मर्मबंध ठरतो, ते कळूही नये इतकी त्या विषयाची या चरित्रात वेमालूम गुंफण झाली आहे. येथून पुढे बाबुरावांचे दातृत्व आणि त्यांचे रसिकत्व, हे 'मृच्छकटिकां'तील रसिकराज चारुदत, हरिश्चंद्र, शिबी, रघु, कर्ण आणि धर्मराज युधिष्ठिर यांच्या जीवनातील दातृत्वाच्या कथा, त्या प्रत्येकीतील वेगळेपणासह विविध दाखले, उध्दरणे आणि बोध असा संमिश्र साज घेऊन, बाबुरावांच्या दातृत्वाचा पोत उलगडून सांगण्यासाठी जेव्हा वर्णनात उपस्थित होतात, तेव्हा बाबुरावांच्या निधनाचा दुःखशोक करुण रसाची एक आगळीच आस्वाद्यता प्रकट करतो.

भाऊसाहेब लिहितात, ''मृच्छकटिक' नाटकात दानशौर्यामुळे अखेर दारिद्र्यावस्थेस येऊन पोहोचलेला उज्जयिनी नगरीचा केवळ अलंकारच असा रसिकराज जो चारुदत्त, त्याच्या गुणाचे वर्णन 'आदर्श शिशितानां सुचरितनिकष शीलवेलासमुद्रः' अशा एकापेक्षा एक मार्मिक विशेषणानी, केलेले आहे. ही सर्व विशेषणे खुलून दिसावीत, असे जे श्रीमंत बाबुरावाचे मर्यादशील, विनीत आणि सयम व्यक्तित्व होते, हे व्यासपीठावर कधीकधी लोकांच्या काय दृष्टीस पडले असेल, तेवढेच। त्या गुणसंपन्न व्यक्तित्वाला पडलेल्या या मर्यादांमुळे वक्तृत्वाचा फुलोरा फुटलेला लोकांनी कधी पाहिलाच नाही. त्यामुळे त्यांची गुणज्ञता, रसिकता आणि दानशीलता ही, मृगाच्या नाभीतील कस्तुरीप्रमाणे, जरी सर्वसामान्य लोकांना शेवटपर्यंत अदृश्य राहिली, तरी तिचा परिमल मात्र नागपूरपासून कोल्हापूरपर्यंत महाराष्ट्राच्या सर्व परिसरात सतत दरवळत राहिला''

बाबुरावांचे दान हे गुप्त दान असे कुणाला काय दिले, किती दिले हे ते सांगत नसत. असे दान हेच श्रेष्ठ दान असते हे, महाभारतातील एका दृष्टान्तातून भाऊसाहेब सांगतात...

''धर्मराजाने अश्वमेध केल्यानंतर आपल्या दातृत्वाविषयी जो गर्व त्याला झाला तो त्याचा गर्वज्वर उतरविण्यासाठी मूर्तिमंत धर्मच मुळी स्वतः मुंगसाचे रूप घेऊन यज्ञमडपात आला, व आपले अर्धेमुर्धे सोन्याचे अग त्या यज्ञातील दानोदकात त्याने बुचकळून पाहिले पण त्याचे सगळे अग काही सोन्याचे झाले नाही धर्मराजाने जेव्हा त्या मुंगसाला त्याच्या त्या विचित्र वर्तनाबद्दल खुलासा विचारला, तेव्हा धर्म त्याला म्हणाला, 'राजन, तू काही खरा दाता नाहीस. दान हे गुप्त आणि निरपेक्षच असले पाहिजे. ज्याला आपल्या दातृत्वाचा अभिमान वाटतो आणि जो त्याबद्दल बढाया मारतो तो मुळी दाताच नव्हे! माझे हे सोन्यासारखे दिसणारे अर्धे अंग, एका गरीब माणसाने जेवणाच्या वेळी दारात आलेल्या भुकेल्या याचकाला स्वतःच्या पुढचे वाढलेले ताट देताना जे दानोदक सोडले त्यात लोळल्यामुळे सुवर्णमय होऊन गेले. ती पुण्याई काही तुझ्या या दानोदकात नाही' श्रीमंत बाबुरावजींची दातृत्वाविषयी भावना अशाच प्रकारची होती. बिदागी, मदत किंवा देणगी म्हणून कोणालाही जी रकम ते देत ती बंद

पाकिटातून देण्यात येत असे व त्यावेळी किती रक्कम त्या पाकिटात आहे हे चकार शब्दानेही ते बोलत नसत. त्याची पावती द्यायची नाही व ते पाकीट त्यांच्यासमोर फोडायचे नाही. अशीही त्यांची शिस्त असे...

अशा एकेक सरस दृष्टान्तांनी आणि आठवणींनी फुलवत नेलेल्या या लेखाच्या समारोपातील त्यांचे एकच वाक्य मग वाचकांच्याही डोळ्याना पाणी आणते.. "असा हा ललित कलांच्या आस्वादात जीवनाचे साफल्य मानणारा रसिकराज, महाराष्ट्रातील कलाकार, साहित्यिक आणि पत्रकार यांच्या गुणांचे चीज करणारा दाता आणि भोक्ता आता पुन्हा आपल्या दृष्टीस पडणार नाही, या जाणिवेने डोळे आज पुन:पुन्हा भरून येत आहेत"

"त्याच्या या जीवनातून प्रेरणा घेऊन आपणही आपल्या ठिकाणी रसिकत्व आणि दातृत्व या गुणांचा विकास करण्याचा प्रयत्न करणे, हीच त्यांना खरी श्रध्दांजली ठरेल" अशासारखे चेल्लर आणि निरर्थक वाक्य त्यांच्या एकाही मृत्युलेखात आढळावयाचे नाही, कारण त्याना जो बोध घडवावयाचा असे तो अगदी वेगळा असे. चरित्रलेखक हा जसा चरित्रनायकाच्या जीवनातील प्रत्येक प्रसंगाचा, त्या प्रसंगातील त्याच्या वर्तनाचा आणि त्या वर्तनातून प्रकटलेल्या चरित्रनायकाच्या मन–बुध्दीच्या, प्रज्ञा–प्रतिमेच्या आणि त्याच्या शील–ब्रीद–धारणेच्या आविष्काराचा वेध घेऊन चरित्रनायकाचे व्यक्तिमत्त्व साकार करतो, तसे ते भाऊसाहेब करीतच, पण त्या चरित्रनायकाच्या मृत्यूतून प्रकट झालेल्या त्याच्या अमृतत्त्वाच्या मागे असलेल्या त्याचा स्वधर्म आणि त्या स्वधर्मानुसार त्याने केलेले कर्म याचा असा काही वेध घेत की त्यातून त्या दिवंगताच्या जिवंतपणी अंतेवासी जनांनाही न आकळलेले त्याचे जीवनरहस्य कारुण्याच्या स्पर्शाने अधिक गाढ होऊन वाचकाला अंतर्मुख करी; आणि प्रसंगी त्या दिवंगताविषयी कुठे काही शिल्लक असलेली तेढ आणि ग्रह हे त्या विदग्ध वर्णनाने शुचिसंपन्न होऊन जात.

पिंडागणिक बदलती शैली व भाषा

याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे लोकनायक डॉ. बापूजी अणे यांच्या निधनावर लिहिलेला सर्वांगसुंदर मृत्युलेख !

'लोकनायकांचे देहावसान' या दि. २८ जानेवारी १९६८ च्या 'तरुण भारता'त प्रसिध्द झालेल्या मृत्युलेखात, बापूजींचा मृत्यु हा त्यांनी वांछिलेल्या स्थितीतच कसा आला, याचे अतिशय करुणरम्य वर्णन भाऊसाहेब करतात. "गळावयाची वाट पाहता आम्ही पिकली पाने' या चरणार्धाने प्रारंभ केलेल्या या लेखात, ते एक आठवण नमूद करतात: "बापूजी एकदा प्रस्तुत लेखकाला म्हणाले होते की, 'हृदयक्रिया बंद पडून अचानक मरण येणे, हे अनेकांना मोठे सुखाचे आणि सुदैवाचे वाटते, पण मला मात्र मूढावस्थेत होणारा अशा प्रकारचा अंत अभिलषणीय वाटत नाही; तर 'अंतकाले च मायेन स्मरन्मुक्त्वा कलेवरम्' या भगवदुक्तीनुसार, अखेरच्या क्षणापर्यंत परमेश्वराचे स्मरण करीत, देह ठेवण्यातच साफल्य आहे असे मी समजतो. 'अन्ते मतिः सा गतिः' अशी माझी भावना आहे" ही आठवण नमूद करून भाऊसाहेब पुढे लिहितात, "या आपल्या श्रद्धेनुसार, आपल्यावर यमपाश पडत असल्याची पुरेपूर जाणीव असताना, भगवच्चिंतन करीत त्यांनी शरतल्यावर पडलेल्या पितामह भीष्मांचार्याप्रमाणे, भागवत एकादशीच्या पवित्र दिवशी, आपल्या जीर्ण कलेवराचा त्याग केला, हा तरी त्यांच्या आत्मबलाचाच प्रभाव होय." आणि मग थोडेसे तत्त्वचिंतन, बापूजींची व्युत्पन्नता, त्यांची आध्यात्मिकता, त्यांची देशभक्ती, त्यांची राजनीतिज्ञता हे सारे चढत्यावाढत्या क्रमाने, प्रमाणे आणि आठवणींसह दिवंगताच्या जीवन आणि कार्याची गाथा उलगडत जातात. इथे दिवंगताच्या मृत्यूच्या शोकाचे विरेचन त्याच्या विभूतिमत्त्वाच्या गौरवास्वादात होते.

जसा ज्याचा पिंड तशी भाषा आणि तशी शैली इतकेच नव्हे तर त्या त्या दिवंगताच्या चाहात्यांचा पिंड आणि त्यांची आवडी याचेही भान ! रसिकराज, दानशूर बाबुरावजी देशमुख यांच्या मृत्युलेखाचा बाज निराळा, भाषा निराळी आणि शैलीही त्यांच्या पिंडाला संवादी ! बापूजी अणे व्युत्पन्न पंडित, राजनीतिज्ञ तेव्हा भाषा, शैली आणि आठवणीही तशाच–भारदस्त वजनांच्या !

याचबरोबर देशाच्या राजकारणातून वेळोवेळी उत्पन्न झालेल्या प्रश्नांची चर्चा निराकरणात दिवंगत नेत्याची,

जनमानसात रुजलेल्या सर्वज्ञात भूमिकेच्या मागे असलेली प्रेरणा आणि निकड, जी लोकांना ज्ञात नसते पण भाऊसाहेबांनी खाजगी चर्चेत हिकमतीने काढून घेऊन जतन करून ठेवलेली असते, ती त्या चर्चेच्या वेळी त्यांच्यासोबत असलेल्या अन्य व्यक्तींच्या नामोल्लेख साक्षीने ते अशा खुबीने सांगतात की, त्यामुळे त्या दिवगताचा एक वेगळाच आणि प्रभावोत्पादक परिचय घडतो. काँग्रेसने पं. मोतीलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने तयार केलेल्या राज्यघटनेच्या मसुद्यावरून बापूजींचे म. गांधी व पं. नेहरू यांच्याबरोबर झालेले मतभेद व त्यानंतर अन्य बाबतीत झालेले मतभेद या संदर्भातली त्यांची खास माहिती तसेच विदर्भ आणि संयुक्त महाराष्ट्र या वादातील, देशाच्या ऐक्य आणि एकात्मतेसाठी भाषावार प्रांतरचना मुळातच मान्य नसल्याचे बापुजींचे खाजगी मुलाखतीमधील विधान, बापुजींविषयीचे अनेक गैरसमज दूर करून त्यांची महात्मता वाढविण्यास साहयभूत होतात.

आणि अशी ही किमया !

'राष्ट्रसंतांचे देहावसान' हा मृत्युलेख त्यातील सहजता, सोपी सुटसुटीत भाषा आणि संतत्वाची पायरी गाठेपर्यंत महाराजांची वाटचाल, इतक्या 'मितले आणि मवाळ' शब्दांच्या साहयाने ते सांगतात आणि ते सांगताना आठवणींच्या अशा बागा फुलवितात की, साक्षात महाराज डोळयांपुढे उभे राहावेत. या मृत्युलेखातील एक आठवण अतिशय हृद्य आणि अश्रुतपूर्व ठरली... भाऊसाहेब लिहितात, ''प्रस्तुत लेखकाने जेव्हा महाराजांना त्यांच्या आध्यात्मिक आणि बौध्दिक प्रगतीबद्दल छेडले, तेव्हा ते मोठयाने हसून उद्‌गारले, 'ही सद्‌गुरूची कृपा आहे, भाऊसाहेब ! ती कशी कोणाला समजावून सांगणार ? मी खेडुला माणूस–माझी आई पहाटे जात्यावर दळताना ओव्या म्हणायची. तिच्या हातातल्या जात्याची घरघर, गळयातला गोडवा आणि ओव्यातील भक्तिभाव माझ्यात उतरला आहे. मी बोलून चालून भाटाचा पोर. आम्ही भाट पुराणावर आणि इतिहासावर कवनं रचून, आपल्या धर्माचे, देशाचे आणि देवाचे प्रेम लेकांच्या मनात चेतवीत हिंडणारे भटके लोक. माझी खंजिरी आणि माझी वाणी, माझे कवित्व आणि माझे भजन, माझे देशप्रेम आणि माझी देवभक्ती ही भाटाव्या परंपरेतील आहे. सामान्य माणसाच्या काळजाला भिडेल असे मी लिहितो, बोलतो आणि गातो. हीच माझी शक्ती, मग तुम्ही याला गुरूची कृपा म्हणा किंवा प्रतिभेची किमया म्हणा !.

महाराजांचे सारे जीवन आणि कार्य, त्यांची परपरा आणि जडणघडण यांच्या या सारगर्भ स्वधर्मात साठविलेले आहे. हे सारे निवेदन करणारी भाषा अत्यंत सुलभ, निवेदन, कथाकथन शैलीचे अशी योजना । ग्रामीण भागातील महाराजांच्या हजारो भक्त–चाहात्यांना सहज भावेल, आकळेल असा हा मृत्युलेख महाराजांच्या मृत्यूवियोगाने अंतःकरणात दाटलेल्या शोकावर भक्तिसुखाची पुटावर पुटे चढवीत अशी झळाळी आणतो, जिच्या प्रकाशात महाराजांचा सहवास आणि दर्शन लाभलेल्या असंख्यांना या मृत्युलेखाचे वाचन महाराजांचे स्मरणसुख देते।

१३ ऑक्टोबर १९६८ च्या अंकातील या पहिल्या लेखानंतर त्यांच्या प्रथम पुण्यतिथीला दि. २६ ऑक्टोबर ६२ रोजी 'हा देह मानवतेसाठी राबवला' हा दुसरा लेख त्यांनी लिहिला. निमित्त होते विख्यात कवी आणि कादंबरीकार श्री. बाबा मोहोड यांच्या 'राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज' या पुस्तकाच्या प्रकाशनाचे.

या लेखातही महाराजांनी खाजगी चर्चेत सांगितलेल्या अनेक गोष्टी नमूद करून महाराजांच्या आचरणात सर्वधर्म–समभाव उतरलेला असला तरी हिंदुत्व आणि राष्ट्रीयत्व यांची जाणीवही त्यांच्या ठिकाणी तितकीच उत्कट व प्रखर होती, हे प्रकट करणारी एक आठवण भाऊसाहेब सांगतात. ''भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरच्या, हिंदू लोकांना जबरदस्तीने बाटविणाऱ्या सोळाव्या शतकातील स्पॅनिश मिशनरी सेंट फ्रान्सिस झेवियर याचे थडगे गोव्यात असून, पोर्तुगीजांनी त्याच्यावर भले थोरले चर्च बांधलेले आहे. या जुन्यापुराण्या चर्चच्या जीर्णोद्धारासाठी भारत सरकारने सात लाख रुपयांचे अनुदान दिले असल्याची माहिती गोव्याच्या प्रवासात महाराजांना सांगण्यास आली. त्याबरोबर ते चटकन उद्‌गारले, धर्मातीत राज्यात असा पक्षपात

का चालावा हे कळत नाही. हिंदू देवालयांसाठी सरकार कवडीही खर्च करीत नाही, पण मशिदी आणि चर्च याच्यासाठी मात्र पैशाचा पाऊस पाडतो' हे महाराजांचे उद्‌गार त्यांच्या स्वधर्माभिमानाचे द्योतक आहेत''

ही आणि अन्य एक आठवण या लेखात वर्णन करून, महाराजांच्या या 'दर्शनावर, धर्मनिरपेक्षतावाद्यांकडून बुध्दयाच जो पडदा टाकण्याचा प्रयत्न त्या काळात होत असे, ती प्रवृत्ती पत्रकाराच्या सत्यनिष्ठेला जागून ते अशा प्रसंगी मोडून काढीत संमिश्रसंस्कृती आणि सर्वधर्मसमभाव या मूल्यनिष्ठेच्या काळात श्री तुकडोजी महाराजांच्या 'राष्ट्रसंत' या छवीचे तुष्टीकरणवाद्यांनी जे भ्रमपूर्ण राजकीयीकरण चालविले होते, त्यातील अनृत नजरेला आणून देण्यासाठी भाऊसाहेबांनी महाराजांच्या या स्वधर्माभिमानाचे पोत म. गांधी यांच्या स्वधर्माभिमानाशी जोडून आपले हे 'चातुर्य' शहाणे केले.

भाऊसाहेबांनी अनेक मृत्युलेख लिहिले. त्यातील निवडक असे प्रत्येकी १३ मृत्युलेख मिळून एकूण २६ मृत्युलेख वर उल्लेखित त्यांच्या दोन पुस्तकात आहेत. त्यातील फक्त पाचच लेख येथे चर्चेसाठी घेतले आहेत. त्यात बाबुराव देशमुख हे एक दानशूर, रसिक व लोकप्रिय नागरिक आहेत, बापूजी अणे लो. टिळकांच्या काळापासूनचे व्युत्पन्न पंडित व राजनीतिज्ञ आहेत तर श्री तुकडोजी महाराज हे राष्ट्रसंत आहेत. यानंतर डॉ. लोहिया आणि नाटककार नानासाहेब जोग यांच्यावरील मृत्युलेखावर दृष्टिक्षेप टाकावयाचा आहे. डॉ. लोहिया स्वातंत्र्य आंदोलनातील आणि संसदेतील ज्येष्ठ पुरुष होते तर नानासाहेब जोग हे कवी, कलावंत, वादक, नाटककार आणि वि.सा. संघ भवनाच्या बांधकामावर देखरेख करणारे निर्माणपुरुष होते.

डॉ. लोहियांची झुंजार प्रतिमा

'तरुण भारता'च्या १६ ऑक्टोबर १९६७ च्या अंकात डॉ. लोहिया यांचा मृत्यु' या मथळ्याखालील भाऊसाहेबांचा मृत्युलेख हा स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर अशा अर्धशतकाच्या काळातील तत्त्वभ्रष्ट राजकारणाचा आणि मूल्यऱ्हासाचा, डॉ. लोहियांच्या जीवन व कार्याच्या परिप्रेक्ष्यात सखोल वेध घेणारा एक अजोड लेख आहे. गैरकाँग्रेसवादाचा नारा बुलंद करून लोहियांनी परिवर्तनाची जी द्वाही घुमविली होती, तिचे परिणाम दृष्टिपक्षात येत असतानाच लोहियांचे अकाली निधन व्हावे, हे नियतीचे निष्ठुर असे चेष्टित कसे आहे ते भाऊसाहेबांनी वेचक शब्दात माडले आहे. "लोहिया गेल्याचे दुःख आणि शोक 'नियतीचे निष्ठुर चेष्टित' या एवढया एकाच उद्‌गारात संपवून, आयुष्यभर झुंजलेल्या या श्रेष्ठ नेत्याचे जीवन, या थोर विचारवंताचे विचार आणि या पुरुषोत्तमाचे चारित्र्य त्याच्या कार्याच्या विशाल अशा कॅनव्हासवर भाऊसाहेब जबरदस्त फटकाऱ्यांसह चित्रित करीत जातात तेव्हा अलंकरण शैलीचा प्राधान्याने वापर करणारे भाऊसाहेब शक्तिसौष्ठव शैलीचा एक दमंग असा प्रत्यय त्यांच्या नकळत घडवून जातात. वीराच्या मरणाचा शोक हा विरोचित असायला हवा. येथे करुणरस वीर आणि रौद्र रसावर आरूढ होऊन मृत्युंजयाचे स्तोत्र गात निघाला आहे. मार्गात त्या झुंजार पुरुषोत्तमाच्या जीवनातील आदर्शवादाच्या, चारित्र्याच्या, मार्दवाच्या, आणि हार्दाच्या जागा मग त्या पुरुषोत्तमाच्या जीवनशिल्पातील रत्नजडित ठरतात.

भाऊसाहेब लिहितात, ''डॉ. लोहिया यांचे अलौकिक वैशिष्टय जर कोणते असेल तर ते या गोष्टीत आहे की, स्त्री, संपत्ती आणि सत्ता हे जे मानवी जीवनातील एकापेक्षा एक तीन दुस्तर मोह आपल्या धर्मशास्त्रात मानलेले आहेत, त्यापैकी कोणत्याही मोहाला बळी न पडता, त्यांनी केवळ तत्त्वनिष्ठेसाठी आपले शक्तिसर्वस्व पणाला लावून सगळे आयुष्य शेवटच्या क्षणापर्यंत झुंजत घालविले. १९४७ पर्यंत स्वातंत्र्याच्या झुंजीत आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९६७ पर्यंत त्या स्वातंत्र्याचे पद्धतशीर मातेरे करणाऱ्या काँग्रेस पक्षाविरुध्द आरंभिलेल्या झुंजीत ! 'देवाच्या सख्यत्वासाठी। पडाव्या जिवलगांच्या तुटी।–' असे जे उद्‌गार श्रीसमर्थांनी काढलेले आहेत, त्याची सत्यता जर आधुनिक काळातील राजकारणात कुठे प्रत्ययाला आली असेल तर ती डॉ. लोहिया यांच्या जीवनात !

''काँग्रेस पक्षाप्रमाणेच माझ्याही समाजवादी पक्षाचे हात जर जनतेच्या दबावाने भरणार असतील तर आम्ही सत्ता हाती न घेतलेली पुरविली'' असे केरळातील पट्टम थाणु पिल्ले

यांच्या पहिल्या समाजवादी सरकारच्या हातून घडलेल्या प्रमादाच्या वेळी लोहियांनी काढलेल्या उद्गाराची भाऊसाहेब 'स्नेहं दयाच सौख्यंच आराधनाय लोकानां मुंचतो नास्ति मे व्यथा' या प्रभू रामचंद्रांच्या वचनाशी तुलना करून, लोहियांनी घेतलेल्या जनसेवाव्रताचे सुंदर उदात्तीकरण करतात.

ही केवळ वानगी आहे. त्याच्याच शब्दात सागावयाचे झाल्यास लोहियांच्या साऱ्या संतापाचे आणि देहपातापर्यंतच्या झुंजीचे मूळ भारताच्या फाळणीत होते. भाऊसाहेब लिहितात, "१९४७ साली बंदिवासातून बाहेर आल्यानंतर भरतखंडाच्या फाळणीसह स्वातंत्र्याचे जे छद्मी शापित वरदान काँग्रेसश्रेष्ठींनी घाईघाईने पदरात पाडून घेऊन सत्तेचे सिंहासन कसेबसे अखेर एकदाचे गाठले, ते राष्ट्रीय प्रतारणेचे भयानक रूप पाहून चिडलेल्या डॉक्टरसाहेबांनी अधिकाररूढ काँग्रेसश्रेष्ठी आणि काँग्रेस पक्ष यांच्यावर तेव्हापासून जे शस्त्र धरले ते नंतर आपला देहपात होईपर्यंत काही खाली ठेवले नाही...

रोचक जीवन कहाणी

श्री. नानासाहेब जोग यांच्यावरील मृत्युलेख ही एक सुंदर आणि समृद्ध अशी व्यक्तिरेखा आहे. 'चित्रशाळा' आणि 'सोन्याचे देव' यामुळे प्रसिध्दीस आलेल्या नाना जोगांचे चरित्र, कार्य, त्यांचा स्वभाव, त्यांच्या आवडीनिवडी, त्यांची तत्त्वनिष्ठा, त्यांचे कलावंत मन, काम करण्याची जिद्द, त्यांची बहुश्रुतता, त्यांचा संपर्क हे सारे अनेक आठवणींच्या गुंफणीतून भाऊसाहेब सांगतात तेव्हा ती एक रोचक आणि उद्‌बोधक कहाणी ठरते. या मृत्युलेखात शोकाच्या कपाळी न्युनोल्लेख तर चरित्रवर्णनाच्या पदरी भरपूर माप पडलेले आहे. ४ मे १९५८ च्या 'तरुण भारता'त प्रसिध्द झालेला हा मृत्युलेख, जागांविषयी किती सांगू आणि किती नाही, या ऊर्मीतून उतरलेला असावा. माणूस जवळचा, नित्य सहवासातला, त्याचे आणि लेखकाचे मित्रही समान, सारे एकाच कार्याला वाहून घेतलेले त्यामुळे अनेक समान मित्रांचे उल्लेख, त्यांचे अभिप्राय, इषारे, सल्ले अशा व्यामिश्र कथनांसह नानांची व्यक्तिरेखा, अलंकरण आणि तत्त्वचिंतन यांना डावी घालून, प्रवाहीपणे साकारत जाते. ही सुध्दा एक वेगळी शैलीच नव्हे का!

असे हे श्री भाऊसाहेब माडखोलकरांनी लिहिलेल्या अनेकानेक मृत्युलेखांचे किंचितदर्शन! अग्रलेखाच्या स्तंभातून मृत्युलेख आणि अभीष्टचिंतनपर लेख लिहिण्यातील भाऊसाहेबांची सढळता आणि उदारता हेही त्याचे एक वैशिष्टयच होते. पण हेच त्यांचे वैशिष्टय अनेक समव्यावसायिकांच्या कधी कधी वेष्टेचाही विषय ठरे। तेही साहजिकच होते. फारच मोठी व्यक्ती आहे आणि टाळता येत नाही असे आपले म्हणजे धावपळ करावयाची किंवा मग एखाद्या जाणकाराकडून 'गेस्ट आर्टिकल'–पाहुणालेख मागवून भागवावयाचे आणि नंतर साप्ताहिक आवृत्तीत अशाच एखाद्या जाणकाराकडून मागविलेला लेख आकर्षकपणे प्रसिद्ध करावयाचा, ही सर्व साधारण परिपाठी असताना भाऊसाहेब मात्र अग्रलेखातून विस्तृत, समृद्ध आणि काळजाला भिडणारा मृत्युलेख सर्वाआधी लिहित. त्याची बहुश्रुतता, त्यांचा अभ्यास, त्याचा लोकसंपर्क आणि मुख्य म्हणजे प्रत्येक क्षेत्रातील थोरामोठयांशी वारंवार होणाऱ्या त्यांच्या भेटी, त्या भेटीतून त्याच्या चौकसवृत्तीने त्यांना प्राप्त होणारी मौलिक सामुग्री अशा नित्यासिध्दतेमुळे त्यांची लेखणी सदैव तयार असे आणि दिवंगताला अग्रलेखाचा सन्मान देण्याची त्याची बुद्धीही असे. आणि याचमुळे 'तरुण भारता'तील मृत्यूलेख हे 'प्रतिष्ठित लेखन' म्हणून पत्रकार क्षेत्रात तसेच साहित्य क्षेत्रातही मान्यता पावले होते.

प्रयोजन आणि प्रेरणा

याचबरोबर आणखी एक प्रयोजन होते आणि तेच माझ्या अल्पबुद्धीला अधिक रुजी घालते भाऊसाहेबांनी एलेजी–विलापिका–या काव्यप्रकारावर १९२७ साली ९५ पृष्ठाचा एक प्रबंध प्रसिध्द केला. तत्पूर्वी हा प्रबंध पुण्याच्या 'रत्नाकर' मासिकातून लेखमालेच्या स्वरूपात प्रसिध्द होत असे पुढे अधिक अभ्यास करून २४८ पानांची द्वितीयावृत्ती आणि नतर ३२३ पानांची तिसरी आवृत्ती प्रसिद्ध झाली. या त्यांच्या प्रबंधाच्या तपशिलात येथे जावयाचे नाही. फक्त एवढेच नमूद करावयाचे आहे की, या काव्य प्रकाराच्या अभ्यासात त्यांनी आंग्ल साहित्यातील विलापिकांबरोबरच संस्कृत आणि मराठी साहित्यातील त्या मानाने

अगदीच वेतास वेत अशा वैलापिक काव्याचा आणि 'मृत्यु' सबधातील दु:खशोकादि भावनांचा तसेच तत्त्वचिंतनपर विचाराचाही परामर्ष घेतला हा सर्व अभ्यास करताना भारतीय संदर्भात त्याच्या लक्षात दोन तीन गोष्टी आल्या ते म्हणतात, "भावगीत, सुनीत आणि दिलापिका हे तीन पाश्चात्य काव्यप्रकार इंग्रजी वाङ्मयाच्या प्रभावाने १० व्या शतकाच्या उत्तरार्धात मराठीत आले... परंतु भावगीत आणि सुनीत हे काव्यप्रकार मराठीत जितके झपाटयाने लोकप्रिय आणि रूढ झाले त्या मानाने विलापिकेला काहीच स्थान किंवा महत्त्व मिळाले नाही.

तमाम जनतेने धाय मोकलून रडावे किंवा कविमंडळीने स्फुदून स्फुंदू अश्रू गाळावेत, असे प्रसंग गेल्या शंभर वर्षात काही कमी येऊन गेलेले नाहीत रानडे, टिळक, गांधी, नेहरू याच्यासारख्या राष्ट्रनेत्याच्या म्हणा किंवा केशवसुत, टिळक, गोविंदाग्रज, बालकवि यांच्यासारख्या थोर कवींचे म्हणा, मृत्यु हे राष्ट्राच्या किंवा साहित्याचा दृष्टीने विलापाचे केवढे मोठे विषय। तथापि या सगळया व्यक्तींवर जरी शेकडयांनी शोकपर कविता लिहिल्या गेल्या असल्या तरी पाश्चात्य वैलापिक कवितांची सर त्यापैकी एकाही कवितेला येणार नाही"

शोकातून उदित होणारी सुषमा

'विलापिका' या काव्यप्रकाराने भाऊसाहेबांना जे इतके झपाटून टाकले होते ते मृत्यूमुळे उद्भवलेल्या शोकाचे ज्या क्रमाने विरेचन होत जाते आणि अती दु:खशोकाचे करुणाच्या खोल गव्हरात, तत्त्वचिंतनात आणि त्यातून पुढे शांतात जे पर्यवसान होते, त्याच्या अपरूपतेमुळेच होय. मिल्टन, ग्रे, शेले, टेनिसन, व्हिटमन, अर्नोल्ड, स्विनवर्न यांच्यापासून तो संयुक्त राष्ट्र सघाचे सरचिटणीस हॅमरशील्ड या पाश्चात्यांच्या आणि अजविलापापासून तो मराठी शाहीर आणि अर्वाचीन मोगरे, लेंभे., टिळक, आगाशे या मराठीयांच्या वैलापिक काव्याच्या अभ्यास–रसग्रहणानंतर, विलापिकेच्या सौंदर्यातील मर्म आणि तिच्या अभिव्यक्तीतील शाश्वत यांचे जे जीवनपाथेय त्यांच्या हाती आले त्यामुळे मृत्यूनंतरच्या शोकाचे, प्रज्ञा–प्रतिभेच्या स्पर्शाने कसे आणि किती प्रकाराने विरेचन–उदात्तीकरण होते, हा जो आकलन होता, तीच त्याच्या मृत्यूलेख लेखनाची मूळ प्रेरणा ठरली असावी. त्यांच्या प्रबंधाच्या समारोपात ते म्हणतात: "दु:खाच्या उद्रेकाने मनातल्या सगळया वासना, कामना निचरून गेल्यावर ते श्रांत, शुद्ध आणि शांत झालेले मन दिवगत प्रियजनाविषयीच्या स्मृती आणि त्याच्या निधनामुळे उद्भवलेले तत्त्वविचार यांनी व्यापून जाते. शोकांतिकेमुळे माणसाचे मनोरंजन होते, असे जे 'कॅथार्सिस'चे प्रमेय ॲरिस्टॉटलने प्रतिपादन केलेले आहे, ते प्रमेय शोकातिरेकाच्याही परिणामाला लागू पडते. अश्रूंच्या महाभिषेकाने चित्त जणू स्वच्छ आणि शुद्ध होऊन गेल्यावरच वैराग्याचा प्रादुर्भाव त्यात होतो. 'सॅम्सन ॲगोनिस्टस' या आपल्या शोकांतिकेच्या शेवटी मिल्टनने म्हटलेच आहे की, "विकार सगळे निचरून गेले आणि मन शांत झाले" ही जी शोक–संतप्त मनाची शांतावस्था, तीच विलापिकेतील तत्त्वविचारांची जन्मभूमी। हे निर्वेदजन्य तत्त्वविचार केव्हा श्रद्धामय असतील, केव्हा संशयात्मक असतील तर केव्हा वैराग्यपूर्ण असतील. पण शांत रसाची सर्व सुषमा त्यात साठविलेली असल्यामुळेच. टेनिसनने 'इन मेमोरियम'च्या समारोपात केलेली खिस्ताची प्रार्थना किंवा व्हिटमनने, 'अनु रिरॅक्स लास्ट'च्या शेवटी गाइलेले मृत्यूचे स्तोत्र आपल्याला इतके उदात्त वाटते. विलापिकेचे सगळे सौंदर्य शोक रसातून उदित होणाऱ्या या शांत रसाच्या सुषमेत आहे."

ही 'सुषमा' हेच माडखोलकरांचे मृत्युलेख–लेखनातील ईप्सित होते आणि तेच त्यांचे लेखनादिव्यही आहे.

लौकिक आणि सांसारिक कारणांमुळे निर्माण होणाऱ्या निर्वेदाला कोणत्याही प्रकारची आध्यात्मिक प्रतिष्ठा उरत नाही, त्यामुळे तो शांत रसाचा स्थायी भाव मानता येत नाही; तर तत्त्वज्ञानजन्य निर्वेद हाव शांत रसाचा स्थायी भाव होय. ही भरतापासून तो अभिनव गुप्त आणि जगन्नाथ पंडित यांचा मागोवा घेऊन भाऊसाहेबांनी केलेली रसचर्चा आणि तिच्या निष्पत्तीत त्यांना आकळलेला तत्त्वज्ञानजन्य निर्वेद हा त्यांनी लिहिलेल्या मृत्युलेखांचा 'प्राण' असावयाचा. चार लोक रडताहेत त्यांच्याबरोबर आपणही गळा काढावयाचा, असे काही ते चिल्लर 'आन्हिक' नव्हते.

मृत्यू, अमृतत्त्व, आत्म्याचे अमरत्व यावर वैदिक वाङ्मयापासून तो मराठी वाङ्मयापर्यंत खूप काथ्याकूट झाला असला, 'मरणं प्रकृतिः शरीरिणाम्' हे तत्त्वसार जरी अगवळणी पडलेले असले आणि आत्म्याचे अमरत्व हे सत्य जरी गळी उत्तरविण्याची परंपरा अक्षय असली तरीही आत्मा देही झाल्यामुळेच त्याचे अस्तित्व, मातब्बरी, उपयुक्तता आणि प्रतिष्ठा असते. आणि त्यामुळेच भीष्माचार्य ब्रम्हीभूत झाल्यावर धर्मराज शोकाने वेडापिसा होतो आणि महाज्ञानी, महायोगी निवृत्तीनाथ ज्ञानदेवांच्या समाधीने शोकविव्हल होतात. असे हे 'वास्तव' विस्तृत चर्चा करून लक्षात आणून दिल्यावर भाऊसाहेब सांगतः ''आत्म्याला अस्तित्व, व्यक्तित्व, भोक्तृत्व आणि कर्तृत्व जे काय प्राप्त होते, ते केवळ देहाच्या आश्रयाने. तो देही झाल्यावरच त्याची अस्मिता देहातून प्रकट होते आणि त्याचे व्यक्तित्व देहामुळे प्रतीत होते. ती अस्मिता आणि ते व्यक्तित्व म्हणजेच माणसाची 'पर्सनॅलिटी'! देह नष्ट झाल्याबरोबर ती पर्सनॅलिटीही नष्ट होऊन जाते. नुसता आत्मा म्हणजे माणूस नाही, म्हणजे व्यक्ती नाही. देह आणि आत्मा मिळून माणूस निर्माण होतो, त्याचे व्यक्तित्व सिध्द होते. म्हणूनच मरण हे इतके दुःखदायक होऊन बसलेले आहे. ज्ञानेश्वरांनी काय किंवा तुकारामांनी काय समाधी घेतल्यावर नामदेवांपासून कान्होबापर्यंत सगळया संतकवींनी जो इतका आकांत केला, तो याच कारणामुळे; व 'ज्ञानदेव पहावा डोळां' असा जो ध्यास नामदेवरायांना लागला, 'भेटीसुध्दा' साठी त्यांचा जीव जो कासावीस होऊन गेला, ''देव म्हणे नाम्या पाहे। ज्ञानदेव मीच आहे' ही खुद्द देवाची अद्वैताची भाषा देखली जी त्यांना रुचली नाही, तीही याच कारणामुळे''

शोकाकडून शांताकडे

हीच 'पर्सनॅलिटी' हे मृत्यूलेख लिहितांना भाऊसाहेबांचे 'प्रेय' असावयाचे. त्यातून उद्‌भूत व्हावयाचा' प्रेमान् दक्ष' तो त्यांना गलबलवून, दडवून तत्त्वज्ञानजन्य निर्वेदाकडून शांताकडे घेऊन जायचा. अनेक मृत्यूलेखांचे 'डिक्टेशन' त्यांनी आनद गिळीत, हुदके देत, अश्रू पुसत दिले आहे. कार्यालयात आल्यावर लेखनिक सागायचा, 'आज भाऊसाहेब मधून मधून सारखे रडायचे!' मृत्युलेखांच्या प्रुफागणिक हा निर्वेद 'शांताची कोटी, अधिकाधिक संपन्न करीत जावयाचा।

ती मग शुष्क, ओबिच्युअरी तर नसायचीच; तसेच ते लिखाण 'पर्सनॅलिटी फीचर' ही नसायचे। तर ती असायची तत्त्वज्ञानजन्य, साहित्यालंकारमंडित, चटका लावणारी आणि चिरस्थायी अशी गद्यविलापिका, जिने त्यांना त्यांच्या तरुणपणी जीवन आणि मृत्यू यांच्या अभ्यासास प्रवृत्त करून एका अक्षय आणि मौलिक प्रबंधाचे धनी केले होते. म. गांधींच्या हत्येनंतरचा लेख, वामन मल्हार जोशी यांच्यावरील 'मृत्यु ? नव्हे, पूर्णाहूति' हा मृत्युलेख असे अनेक मृत्युलेख याची साक्ष देतात. हे सारे मृत्युलेख 'विलापिके'च्या परिप्रेक्ष्यात एका स्वतंत्र प्रबंधाचा विषय आहेत. म्हणूनच माझ्या अल्पबुध्दीचे हे धाष्टर्यचेष्टित इथे पुरे करतो.

दि. भा. घुमरे
मेडिकल टी.बी. वॉर्ड समोर
नागपूर ४४०००३ पो. अजनी
दूरभाष क्र. ७४८७२५

मी आणि माझे लेखन

कै. ग. त्र्यं. माडखोलकर

आपण विचारलेल्या प्रश्नांपैकी बहुतेक प्रश्न मला लागू पडण्यासारखे नाहीत कारण, कवि, कथालेखक किंवा नाटककार यांच्यापैकी कांहीच मी नाहीं. मी फक्त टीका करणारा म्हणजे वाङ्मय आणि वाचकवर्ग यांची गांठ घालून देणारा मधलोवा आहें। त्यामुळे स्फूर्ति, प्रतिभा, सौदर्याकुलता, एकांतांत होणारे दिव्याचे साक्षात्कार इत्यादि अननुभूत आणि,—— माझ्यासारख्या धीटपाठ लेखकाच्या दृष्टीनें,——अतींद्रिय गडीविषयीं मी काय लिहू शकणार ? असल्या गोष्टी म्हणजे गावें त्याच्या वंशा तेव्हां कळे ! आपल्या प्रश्नापत्रिकेत उल्लेखिलेल्या बहुतेक उपाधि अशा आहेत कीं, त्यांची बहुधा जगातील बडे लेखक तेवढे भूषित झालेले आढळतात. आणि, मी तर केवळ एक वर्तमानपत्री लेखक आहे, अभिजात वाङ्मयनिर्माता नव्हे रोजंदारीनें लेखणी झिजवणाऱ्या माझ्यासारख्या शारदेच्या साम्राज्यांतील मजुराला असली मिजासखोरी कशी शोभेल ? तथापि, आपण विचारलेच आहे, म्हणून आपल्या प्रश्नांपैकीं माझ्या दृष्टीनें सोईच्या अशा कांहीं प्रश्नांना मी उत्तरें देत आहें.

माझी कोणतीच वाङ्मय कृति मला आवडत नाहीं. कारण मला स्वतःला आवडण्यासारखी वाङ्मय कृति माझ्या हातून अद्याप निर्माण व्हावयाची आहे. शिवाय, आपला प्रत्येक लेख छापला जात असतां, प्रुफें तपासण्याच्या निमित्तानें तो इतक्या वेळां वाचावा लागतो कीं, त्यानंतर त्याच्याविषयीं कोणत्याहि प्रकारची आवड शिल्लक रहात असेल, असें मला वाटत नाहीं. माझा कोणताहि



लेख छापला गेल्यानंतर, तो पुन्हा वाचण्याची इच्छा किंवा धैर्य मला झालेले नाहीं एका अर्थानें मी हे भाग्यच समजतों. कारण, इतरांच्या लेखनाविषयी जी प्रखर टीकादृष्टी आपण नेहमीं चालवितों, ती जर स्वतःच्याहि लेखनाविषयीं चालविण्याइतका समंजसपणा सुदैवानें आपल्या ठिकाणी असेल, तर मेकॉलेप्रमाणें हातचा बाण सुटून गेल्याबद्दल आपल्याला कायमची हळहळ लागून राहील. शिवाय आपली कोणती वाङ्मय कृति आपल्याला आवडते ? तर जिच्यांत आपलें प्रतिभासर्वस्व पूर्णतेनें प्रकट झालेलें आहे, असें आपल्याला वाटत असेल ती. पण, असें वाटणें, म्हणजे खरोखरी आपल्या बुद्धीची प्रगती कुंठित होणेंच नव्हे काय ? ज्याच्या ठिकाणीं हा अहंकार उत्पन्न झाला, त्याच्या बुद्धीची वाढ खुंटली, असें बेलाशक समजावें. स्वतःच्या कोणत्यच कृमीविषयी स्वतःला समाधान न वाटणें, हें निदान मी तरी बुद्धीच्या प्रगमनशीलतेचेंच लक्षण समजतों. 'असंतोषः श्रियो मूलम' हें तत्त्व जितकें व्यवहाराला, तितकेंच वाङ्मयालाहि लागू आहे.

मी केव्हाहि आणि कुठेंहि लिहू शकतों. कारण, माझ्यासारख्या लेखकाला स्फूर्तीची वाट पहात तिष्ठत बसणें मुळींच परवडणारें नाहीं. मोर्लेसाहेबांनी वर्तमानपत्राचें वर्णन 'धांदलें वाङ्मय' (Literature in hurry) असें केलेलें आहे तेव्हां, असल्या या धांदलीच्या मामल्यांत, स्फूर्तीची वाट पहात ताटकळण्याइतका वेळ आहे कुणाला ? शिवाय, प्रतिभेला कळे लावून, एकांतांत तिच्या प्रसादाची वाट पहात, प्रहर न प्रहर तिष्ठत कोण बसेल ? —— जो प्रतिभाशाली असेल तो. माझ्या

अनुक्रमणिका

ठिकाणीं तर तसलें कांहींच नाहीं तादात्म्य, एकांताची आवश्यकता, स्फूर्तीचे दिव्य क्षण, पौर्णिमेची प्रशांत रजनी, पंच पंच उषःकालाचा प्रसन्न समय इत्यादि अनेक गोष्टी मी प्रतिभाशाली लेखकांविषयी वाचलेल्या आणि ऐकलेल्या आहेत. पण, मी त्यांच्या वंशांतला नसल्यामुळेंच बहुधा, त्यांपैकीं कशाचाच मला अनुभव आलेला नाहीं. भगवभ्दक्ताच्या भजनाला जसा काळ वेळ नसतो, तसाच माझ्यासारख्या धंदेवाईक लेखकाच्या लेखनालाहि काळ वेळ नसतो. ज्या क्षणीं हातांत लेखणी ध्यावी, तोच स्फूर्तीचा दिव्य क्षण. एकांताचीहि आवश्यकता मला कधीं भासलेली नाहीं. मला वाटतें, मी तर चक्रव्यूहांत बसून सुद्धा लिहू शकेन.

तद्रूप होण्यासाठीं मला कोणत्याच साधनाचा अवलंब करावा लागत नाहीं. वाङ्मयाची समाधि लावण्याकरिता, सुपारीच्या खांडापासून तों दारूच्या पेल्यापर्यंत, निरनिराळ्या साधनांचा अवलंब प्रतिभाशाली लेखकांनीं केला असल्याचे मला माहित आहे दुदैवानें, असल्या कोणत्याहि साधनाची मदत न घेतल्यामुळेंच बहुधा, मी प्रतिभाशली लेखक होऊ शकलों नाहीं, असे मला वाटतें. हातांत लेखणी घेतल्याबरोबर, सभोवतालच्या परिस्थितीचा पूर्ण विसर पडून, माझें मन क्षणार्धात एकाग्र होतें.

मी स्वतःच लिहितों. दुसऱ्याकडून लिहवून घेण्यासाठी लेखक ठेवण्याइतका मोठेपणा मला अद्याप आलेला नसल्याकारणानें, तो प्रयोग करून पहाण्याची संधि मला दुदैवाने अजून मिहालेली नाहीं.

कॉमेडी किंवा ट्रॅजेडी यांपैकीं काय लिहिण्याकडे माझे विशेष कल आहे, हें मला स्वतःलाच अद्याप कळलेलें नाहीं. ज्यांच्या स्वतःच्या आयुष्याची ट्रॅजेडी झालेली असते, त्यांचा विशेष कल कॉमेडी लिहिण्याकडे असतो, अशी माझी कल्पना आहे. स्विफ्टचें सर्व आयुष्य दुर्धर मनस्ताप भोगण्यांत गेलें. पण त्याचें वाङ्मय वाचून मात्र सर्व जग आज पोट धरधरून हंसतें. उलट, ज्या लेखकांना उभ्या जन्मांत कधीं दुःखाची झळ लागलेली नसते, असे हार्डीसारखे लेखक दुःखपूर्ण कथा लिहिण्यांत आनंद मानतात. सुप्रसिद्ध अमेरिकन नट चार्ली चाप्लिन हा प्रेमभंगानें पोळलेला मनुष्य आहे, असें म्हणतात. पण, त्याच्याइतका लोकाच्या हसून मुरकुंड्या उडवणारा नट आज जगांत दुसरा क्वचितच सापडेल. तथापि या विषयावर मत देण्याचें मी तूर्त तहकूब करितों कारण, ट्रॅजेडी अगर कॉमेडी यापैकी कांहींच मी अजून निदान प्रसिद्ध तरी केलेलं नाहीं.

माझी 'वाग्देवतेस' ही कविता 'विविधज्ञानविस्तार' मासिकाच्या जानेवारी १९१९ च्या अकात प्रसिद्ध झाली. पण पाठविल्यानंतर चार महिन्यांनीं. तथापि, माझीं कविता प्रथम 'विस्तारा'त प्रसिद्ध झाली, याबद्दल मला केव्हांहि अभिमानच वाटेल. त्या मासिकाचे संपादक रावसाहेब मोरमकर याचे त्या वेळीं जरी मजकडे लक्ष गेलें नाहीं, तरी पुढें एक वर्षानें माझ्या गुरूंच्या कृपेनें त्यांच्याशीं माझा निकट संबंध आला, व त्यानंतर त्यांनीं आमरण मजवर अकृत्रिम लोभ ठेवून मला परोपरीनें मदत केली. माझी ही प्रथमच प्रकाशनार्थ पाठविलेली कृति प्रसिद्ध व्हावयाला विलंब लागला खरा. पण याशिवाय दुसरी कोणतीहि अडचण आली नाही. परंतु मी हा माझा मोठासा गुण मात्र समजत नाहीं. ही कविता शार्दूलविक्रीडित वृत्तांत आणि सांप्रदायिक विषयावर होती. मग, जुन्या वळणाच्या कवितेला उचलून धरणारें 'विस्तारा' सारखें मासिक ती कां म्हणून नाकारील ? माझ्या लिहिण्यांत जर कांहीं नावीन्य असतें, तर कोणत्याहि संपादकानें त्याला वेलाशक केराची टोपली दाखविली असती, याबद्दल मला मुळींच शंका वाटत नाहीं. शिवाय, त्या वेळीं नियतकालिकांच्या दाराशीं आजच्या इतकी प्रकाशनेच्छूंची गर्दी नसे, हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे. 'विस्तारा'त कविता आल्यानतर फेब्रुवारी महिन्यांत 'नवयुग' मासिकाकडे मी 'शिवप्रभूस'ही कविता पाठविली; व ती त्या मासिकाच्या मार्च–एप्रिल १९१९ च्या अंकात ताबडतोब प्रसिद्धहि झाली. इतकेंच नव्हे, तर 'नवयुगा' चे त्या वेळचे संपादक श्री. गणपतराव कुळकर्णी आणि काव्यपरीक्षक कवि माधवराव काटदरे यांना माझी ती कविता आवडून, त्या दोघांनीं आणि विशेषतः माधवरावांनीं, माझ्या या लेखनव्यवसायाच्या आरंभींच्या दिवसांत, मला अतिशय उत्तेजन दिलें.

माझा स्वतःचा वाङ्मयेतिहास, निव्वळ माझ्या पुरताच विचार केला, तर खचित

गर्वानें फुगून जाण्यासारखा आहे; व केव्हां केव्हा मला तसा गर्व होतोहि श्री मा. के काटदरे, रो. श्री. कृ कोल्हटकर, रा. सा मोरमकर आणि श्री. न चिं. केळकर यांनीं मला, उन्नतीची बिकट चढण चढत असता, आपलेपणानें हात देऊन माझा माग सुकर केला. यापेक्षा अधिक अभिमानास्पद गोष्ट दुसरी कोणती असू शकेल ? खरांखरी, मी भाग्यशाली, म्हणूनच या थोर व्यक्तींची सहानुभूति, सहवास आणि सहाय्य मला लाभलें. १०२३ सालीं मी पुण्यास गेल्यावर श्री. गिरीश, प्रो. श्री. बा. रानडे, प्रो. मा. त्रिं. पटवर्धन, श्री. यशवंत प्रभृति त्या वेळच्या नवीन पण नामांकित कवींशीं माझी निकट संबंध आला, व पुढें त्यांनीं 'रविकिरणमंडळ' स्थापन केलें. मी लेखक बेताचाच आहे आणि कवि तर मुळींच नाहीं. तरीसुद्धां, माझ्या या कवीमित्रानी मला आपलया मंडळांत घेतले, व मंडळाच्या पुस्तकावर चुरचुरीत टीका खरडण्यापलिकडे जरी माझा अन्य काहींच उपयोग त्यांना होत नाहीं, तरीहि त्यानीं आपल्या मंडळाच्या पटावर माझे नांव कायम ठेवलेलें आहे. त्यामुळें, त्यांचा जरी काहीं नसला, तरी माझा मात्र मोठाच फायदा झाला आहे त्यांच्या प्रभावळींत राहिल्या कारणानें या कविहीरकाच्या तेजोरश्मींनी माझीहि गरिबाची लेखनकामाठी उजळून दिसते, व स्वतः मी जातीचा अभिजात नसतांहि, 'पुष्पसंगे मातीस वास लागे' या न्यायानें, माझ्या वर्तमानपत्री लिखाणावर अभिजातपणाची कळा आलेली आहे.

माझें 'आधुनिक कविपचक' हे पहिलें पुस्तक श्री. अ. चि. भट यांनी प्रकाशित केलें. या पुस्तकाच्या किती प्रती त्यांनी काढल्या, याचा विचार करणें जरी इथें अवश्य नसलें, तरी त्यानी मला मोबदल्यादाखल बरे पैसे आणि तेहि मागितल्या वेळीं दिले, ही गोष्ट मी आभारपूर्वक नमूद करतों. बायरननें आपला प्रकाशक मरे याला बायबलाची एक प्रत नजर केली होती. मात्र, त्यांतील, 'बॅराबस हा दरोडेखोर होता,' (Now Barabbas was a robber) या वाक्यांतील 'दरोडेखोर' (robber) हा शब्द खोडून, त्याच्याऐवजी 'प्रकाशक' (Publisher) हा शब्द त्यानें घातला होता ! तसें काही करण्याचा प्रसंग अद्याप कोणत्याच प्रकाशकाने मजवर आणला नाहीं. याबद्दल मी दैवाला नेहमी दुवा देत असतों.

तथापि, मासिकाकडून लेखांसाठीं वारंवार येणाऱ्या निकडीच्या मागण्या, लेख वाचण्याची तसदी न घेतां फक्त नांव वाचूनच दिले जाणारे वर्तमानपत्रांतील स्तुतिपर अभिप्राय, साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षांच्या भाषणांतून इतर अनेक लेखकांबरोबर होणारा औपचारिक नामानिर्देश, युनिव्हर्सिट्यांनीं पुस्तक मंजूर केल्यामुळें मिळणारा पोकळ बहुमान, नवीन होतकरू गरजू लेखकांकडून होणारी तोंडदेखली स्तुति इत्यादि कोरड्या प्रतिष्ठेचे कमी अधिक भडक आणि आपल्या महत्त्वाविषयी घमेंड उत्पन्न करणारे मादक प्रकार सोडले, तर पैशाच्या दृष्टीनें वाङ्मयव्यवसायाचा गेल्या आठ वर्षांचा माझा अनुभव अत्यंत निराशाजनक आहे. मला कोणत्याहि लेखाबद्दल आजपर्यंत एक कपर्दिकहि मिळालेली नाहीं. मग माझ्या इतर व्यवसायबंधूचें काय असेल तें असो. अर्थात याबद्दल मी प्रकाशकांना दोष देऊं इच्छित नाहीं. ते तरी काय करतील बिचारे ? त्यांचीं नियतकालिकें सदाच बुडित चाललेली. लेखकाच्या धंद्याइतका नादान धंदा दुसरा कोणताच नसेल, अशी माझी आतां खात्री होऊन चुकलेली आहे. इतर धंद्यांत पैसा न मिळाला, तरी मनुष्याचें डोकें तरी निदान ताळ्यावर रहातें किंवा, यदा कदाचित डोके फिरलेंच, तर तें पैसा मुळींच न मिळालयामुळें फिरतें. परंतु, लेखकाच्या धंद्यांत पडलेलया माणसाचें डोकें फिरतें, तें पैसा न मिळालयामुळें नव्हे; तर फुकट्या प्रतिष्ठेच्या लाभामुळें. उलट, पैसा न मिळणें,—किंबहुना मिळाला तरी तो न घेणें,–ही या धंद्यांत एक बहुमानाची बाब समजली जाते. शोपेनहौरनें असें म्हटलेलें आहे कीं, स्त्रीला रूपाचा आणि पुरुषाला बुद्धीचा अहंकार असतो. या त्याच्या सिद्धांताच्या सत्यतेचें मूर्तिमंत इरसाल उदाहरण म्हणजे लेखक. 'आतां उरलों उपकारापुरता' या अहंकारानें तो इतका बहकून गेलेला असतो कीं, जगाकडून होणाऱ्या उपेक्षेची किंवा अवज्ञेची यत्किंचितहि दरकार न करतां, नियतकालिकांच्या निरर्थक मागण्या पुरविण्यासाठीं, तो रिमेंच्या रिमें उठवीत असतो. शिवाय, या त्याच्या जन्मजात अहंकाराला जोड म्हणूनच कीं काय, "कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी" हा आशीर्वाद घमेंडखोर भवभूतीने देऊन ठेवलेलाच आहे. इतर धंद्यांत पैसे न मिहाल्यामुळें लोकांनी आत्महत्या केल्याच्या

बातम्या आपण नेहमीं वाचतों. पण पैसे न मिळाल्यामुळें कोणत्याहि लेखकानें आत्महत्या केल्याचें निदान मला तरी अद्याप माहीत नाहीं. लेखक होण्यापेक्षां न्हाव्याचा, धोब्याचा, खाणावळवाल्याचा किंवा इतर कोणताहि धंदा मनुष्यानें करावा. पण, स्वतःच्या महत्त्वाविषयीं भलत्याच कल्पना डोक्यांत उत्पन्न करणारा हा प्रतिष्ठित पण वांझोटा धंदा मात्र मुळींच करूं नये. मला स्वतःला लिहिण्याची हौस नाहीं अगर लौकिकाचीहि हांव नाहीं निव्वळ हौसेखातर असें मी कवितांशिवाय कांहीं लिहिले असेन, असे मला वाटत नाहीं. आणि, त्या माझ्या कविता जर मला स्वतःलाच कधीं वाचाव्याशा वाटल्या नाहींत, तर लोकांनीं तरी त्या कां म्हणून वाचाव्यात ? उदरनिर्वाहाचें दुसरें कोणतेंहि साधन उपलब्ध नसल्यामुळें मी या धंद्यांत पडलों.

टीकाकारांविषयीं मला अतिशय आदर आहे. एक तर, मी स्वतःत्यांच्या वर्गांतला आहे; व दुसरें असें कीं, लेखकाच्या धंद्यांत मी शिरल्या क्षणापासून माझें डोकें ताळ्ययावर ठेवण्याची काळजी या माझ्या व्यवसायबंधूंनी मोठ्या दक्षतेनें घेतलेली आहे. तो रोमहर्षक प्रसंग मला अद्यापहि आठवतो. माझें 'आधुनिक कविपंचक' हें पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर मला काहीं दिवस अस्मान अगदीं ठेंगणें होऊन गेलेले होतें. पण, माझे हितैषी रावसाहेब मोरमकर यांनीं श्री. बाळकृष्ण अनंत भिडे यांच्या करवीं माझ्या डोळ्यांत टीकेचें इतकें झणझणीत अंजन घातलें कीं, त्यामुळें क्षणार्धात त्यांच्यावर चढलेली धुंदी उतरली. समर्थांनीं कवींना जगदुद्धर्ते म्हणून गौरविलेलें आहे. पण टीकाकार हे तर जगदुद्धर्त्या कवींचेहि उद्धर्ते आहेत. "नसता टीकाकारांचा व्यापार। तरी कैंचा असता कवींचा उद्धार ?" खरोखरी, हे वाङ्मयवैद्य जगांत आहेत, म्हणूनच प्रतिष्ठेच्या खोट्या कल्पनांनीं वारंवार बहकणारीं लेखकांची डोकीं थोडीं तरी ठिकाणावर राहिलेलीं आहेत. लेखकाचें डोकें ताळ्यावर ठेवण्याचा उद्योग हा वाङ्मयवैद्य निरंतर आणि मोठ्या निरपेक्षपणानें करीत असतो. प्रथम प्रथम प्रतिकूल टीका वाचून माझ्या हृदयाला अगदी घरे पडत. परंतु, कुत्सित टीकाच्या सदैव होणाऱ्या आधातांनीं माझें मन आतां इतकें घट्ट झालेलें आहे कीं, मजवर होणारी टीका मी स्वतःतर मोठ्या गोडीनें वाचतोंच, पण तिच्यातील विशेष खोंचदार भाग मित्रमंडळीलाहि वाचून दाखवितों लेखकाच्या धंद्यांत जर माझी काहीं प्रगति झालेली असेल, तर तिचें सर्व श्रेय या माझ्या व्यवसायबंधूंना आहे. प्रतिकूल टीकेमुळें वैमनस्य उत्पन्न होतेंच, असें नाहीं. प्रो. बेहरे यांचा आणि माझा परिचय मी त्यांच्यावर केलेल्या प्रतिकूल टीकेमुळें झाला, तर श्री. खांडेकर यांचा आणि माझा परिचय त्यांनीं माझ्यावर केलेल्या प्रतिकूल टीकेमुळें झाला. पण या दोघांहि लेखकांशीं गेलीं आठ वर्षे माझा जिव्हाळ्याचा स्नेह आहे

आपल्या प्रश्नाना इतकी दिलखुलास आणि तपशीलवार उत्तरें मीं दिलेली आहेत की, हा लेख छापला जाण्याची मला आतां फारशी आशा उरलेली नाहीं "भाषेचा उपयोग आपले विचार लपवण्यासाठी करावयाचा असतो," हें एका जगद्विख्यात मुत्सद्याच्या तोंडचें मुक्ताफळ प्रसिद्धच आहे. आणि बहुतेक सारे लेखकहि नेहमीं स्वतःशिवाय दुसऱ्या कोणाचे तरी विचार आणि अनुभव आपल्या लेखांतून व्यक्त करीत असतात. पण, मी मात्र आपलें पत्र आल्यावर, लेखनव्यवसायाविषयींचे स्वतःचे विचार एकदां स्पष्टपणानें सांगून टाकण्याचें ठरविलें आणि त्याप्रमाणें अखेर केलेंहि.

शेवटी आणखी एक गोष्ट सांगितली पाहिजे. लेखकाचा धंदा सोडण्याचा मात्र माझा मुळींच विचार नाहीं.

('मी आणि माझे लेखन' या ग्रंथातून पुनर्मुद्रित)

पत्रकार माडखोलकर

मा. गो. वैद्य

ग. त्र्यं. उपाख्य भाऊसाहेब माडखोलकर हे जातिवंत पत्रकार होते. आमच्या सारखे अपघाताने उपटलेले पत्रकार नव्हते. पत्रकरिता ही त्यांची आवड होती, निवड होती; आणि ध्येयही होते.

निवड

प्रा. भास्कर नंदनवार यांच्याशी बातचीत करताना भाऊसाहेबांनी मनमोकळेपणाने सांगितले की, ''गणित हा विषय नावडता असल्यामुळे मॅट्रिक परीक्षेत उत्तीर्ण होण्याची मला मुळीच आशा नव्हती. मग आपल्या मनाप्रमाणे आयुष्य घालविण्यासाठी कोणता हुकमी व्यवसाय निवडावयाचा हा प्रश्न माझ्यासमोर उभा ठाकला, म्हणून केळकरांनी वृत्तपत्र व्यवसायात पडण्याचा सल्ला मला आग्रहाने दिला, तेव्हा मी तो अक्षरशः वेदवाक्य मानून त्यांच्या शिकवणीनुसार त्या व्यवसायास प्रारंभ केला'' (''बातचीत भाऊसाहेब माडखोलकरांशी''–पृष्ठ ५४)

कोणत्या कारणामुळे साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांना भाऊसाहेब माडखोलकरांचे आकर्षण वाटले ? –तर ते भाऊसाहेबांच्याच एका लेखामुळे. आयर्लंडच्या स्वातंत्र्यासाठी उग्र चळवळ करणाऱ्या 'सितफीन' या संघटनेच्या कार्याविषयी त्यांनी एक लेख लिहिला होता; आणि तो प्रकाशनासाठी 'केसरी'कडे पाठविला. तो लेख 'केसरी'च्या अग्रलेखा शेजारील प्रतिष्ठित जागेवर प्रकाशित झाला. केसरीचे संपादक श्री. न. चिं. केळकर यांचा स्वतःचा आयर्लंडच्या इतिहासाविषयी प्रगाढ अभ्यास होता. त्यांचा 'आयर्लंडचा इतिहास' हा ग्रंथही प्रकाशित झाला होता. अशा अधिकारी व्यक्तीने भाऊसाहेबांचा लेख पसंत केला, याचे भाऊसाहेबांसहित सर्वांनाच आश्चर्य वाटले. त्यावेळी भाऊसाहेबांचे वय अवघे बावीस वर्षांचे होते. हा लेख प्रकाशित झाल्यावर, मुंबईच्या सरदार गृहात भेटीला येण्यासंबंधी त्यांना श्री. केळकर यांचे पत्र आले, आणि दि. १२ फेब्रुवारी १९२१ रोजी माडखोलकरांची केळकरांशी भेट झाली. त्या भेटीचा परिणाम म्हणून भाऊंनी पत्रकार बनण्याचा निश्चय केला.

आवड

परंतु असा निश्चय प्रत्यक्षात उतरविण्यासाठी त्या व्यवसायाच्या मर्मबंधाची खूण जी गंभीर आणि विचारपूर्वक लेखन करण्याची आवड, ती माडखोलकरांच्या ठिकाणी जन्मजातच होती, असे वाटते. २०–२२ वर्षांच्या वयात प्रेमकविता आणि प्रेमकथा लिहिण्याकडे कुणाचाही स्वाभाविकच कल राहील. भाऊसाहेब त्याला अपवाद होते असे नाही. परंतु या वयात वृत्तपत्राला आवश्यक असणाऱ्या विषयांचीही त्यांना आवड होती. त्यांच्या संस्कारक्षम वयाच्या वेळी, लोकमान्य टिळकांची लोकप्रियता शिगेला पोचली होती. तरुण मने त्यावेळी देशभक्तीच्या भावनेने भारलेली होती. भाऊसाहेब प्रा. नंदनवारांना सांगतात की, ''ज्ञानात भर घालणारी, विचाराला चालना देणारी

किंवा देशाभिमान उद्दीपित करणारी अशी मुंबईतील एकही सभा किंवा चळवळ नसेल की, जिच्यात त्यांनी (माडखोलकरांनी) आपले मित्र श्री. रा. ग. वैद्य आणि श्री. त्र्यं. वि. पर्वते यांच्यासह १९१३ ते १९२० पर्यंतच्या त्या प्रक्षोभक काळात श्रोते किंवा स्वयंसेवक म्हणून भाग घेतला नसेल'' ("बातचीत'' पृष्ठ ५०) यातील "ज्ञानात भर घालणारी, विचारांना चालना देणारी आणि देशाभिमान उद्दीपित करणारी'' ही जी विशेषणे आहेत, ती अत्यंत महत्त्वाची आहेत. ती भाऊसाहेबांची स्वाभाविक आवड प्रगट करतात. या आवडीला आविष्कृत करणारे माध्यम पत्रकारिता हे आहे. त्यावेळेला तरी तेच एकमात्र माध्यम होते. श्री. त्र्यं. वि. पर्वते हेही पत्रकारितेच्या क्षेत्रात उतरले आणि एक नामवंत पत्रकार म्हणून लौकिक प्राप्त करते झाले.

ध्येय

पत्रकरिता हे भाऊसाहेबांचे जीवनध्येयही होते. ते नुसतेच पत्रकार नव्हते, ग्रंथकारही होते. कादंबरी आणि वाङ्मयीन समीक्षा ही दोन्ही क्षेत्रे त्यांनी पूर्वीपासून गाजविली होती. 'आधुनिक कविपंचक' या लेखमालेतील पहिला लेख त्यांनी १९२० साली लिहिला होता. त्या लेखाची जशी प्रशंसा झाली, तशीच त्याची खूप निंदाही झाली. गडकऱ्यांच्या (गोविंदाग्रजांच्या) 'दसरा' या कवितेवर टीका करताना गोविंदाग्रजांची ही कविता केशवसुतांच्या 'तुतारी' या कवितेचे भ्रष्ट अनुकरण आहे. असे भाऊसाहेबांनी लिहिले होते. त्यावर श्री वि. स. खांडेकर आणि कवि यशवंत यांनी खवळून जाऊन, अत्यंत कठोर टीका केली होती. यावेळी भाऊसाहेबांचे वय फक्त एकवीस वर्षे होते.

कादंबरी–लेखनाचे सर्व गुण त्यांच्या ठिकाणी होते. फडके आणि खांडेकर यांच्यानंतर त्या काळात तरी माडखोलकरांचेच नाव घेतले जात असे. फडके महाविद्यालयात तत्त्वज्ञान विषयाचे प्राध्यापक होते. खांडेकर शिक्षक होते. भाऊसाहेबांच्या जवळ औपचारिक शिक्षणातील यश नसले तरी ते शिक्षक सहज होऊ शकले असते. स्वतः भाऊसाहेबांनीच लिहिले आहे की "नागपुरातील वुइमेन्स कॉलेजच्या चालकांनी मराठीच्या अध्यापकाची जागा मला देऊ केली असतानाही ती मी नाकारली (माझी वृत्रपत्रीय नीतीः 'सोबत' दिवाळी अंक १९६९) अधिक पैसा आणि प्रतिष्ठा मिळवून देऊ शकणारे अनेक पर्याय वेळोवेळी त्यांच्या समोर आले; पण त्यांनी अत्यंत निर्धारपूर्वक त्यांच्याकडे पाठ फिरविली आणि वृत्तपत्रीय लेखन हेच आपले ध्येय निश्चित केले. 'सोबत'च्या दिवाळी अंकातील वर उल्लेखिलेल्या आपल्या निवेदनात, भाऊसाहेब लिहितात, '१९२४ च्या ऑगष्टमध्ये मी 'महाराष्ट्र'त काम करण्यासाठी नागपूरला आलो. त्यावेळी आणि त्यानंतर मध्यप्रांत–वऱ्हाडच्या शिक्षण खात्यातील आणि नागपूर विद्यापीठातील मराठीचा अभ्यासक्रम तयार करण्याच्या समित्यांवर श्री. श्री. कृ. कोल्हटकर, रा. ब. अ. सी. साठे, श्री. नी. ब. भवाळकर, प्रा. ना. के. बेहरे यांच्या सारखे माझ्या विषयी जिव्हाळा आणि अगत्य असलेले अनेक वजनदार सुहृद होते व त्यांनी पाठयपुस्तकांच्या संपादनाचे काम हाती घेण्याबद्दल मला अनेकदा आग्रह करून पाहिला. त्याचप्रमाणे कर्नाटक प्रेसचे श्री. मं. ना. कुळकर्णी यांच्या पासून तो ठाकूर आणि कंपनीचे श्री. ना. म. ठाकूर यांच्या पर्यंत महाराष्ट्रातील आणि विदर्भातील अनेक मातबर प्रकाशकांनीही पाठयपुस्तके, वाचनमाला वेच्यांची पुस्तके वगैरे संपादन करण्याचे काम घेण्याबद्दल मला वारंवार गळ घातली. पण अशा प्रकारचे कोणतेही हुकमी द्रव्यदायक काम करण्याचा विचार सुध्दा माझ्या मनाला कधी शिवला नाही. तसेच मध्यप्रांत–वऱ्हाडचे माजी गृहमंत्री डॉ. ई. राघवेन्द्र राव आणि पंडित द्वारकाप्रसाद मिश्र या दोघांनीही उच्चदर्जाच्या सरकारी आणि निमसरकारी जागा मला देऊ केल्या असतानाही, त्याही मी स्वीकारल्या नाहीत, किंबहुना १९३३ पासून कादंबरी लेखन हे माझे द्रव्यार्जनाचे पूरक प्रधान साधन होऊन बसलेले असतानाही, मी संपादकीय कामालाच सदैव पहिले स्थान दिले'' (सोबत दिवाळी अंक १९६९)

पत्रकारिता ही भाऊसाहेबांची आवड, निवड आणि ध्येय होते, हे जे मी या लेखाच्या आरंभी म्हटले, त्याची यथार्थता या–वरून स्पष्ट व्हावी.

सुळावरची पोळी

पत्रकार बनण्याचे एकदा पत्करल्यानंतर, त्यातील कष्टांची आणि धोक्यांची त्यांना लवकरच कल्पना आली. परंतु, त्यामुळे, त्यांच्या या व्यवसायाविषयीचा निश्चय तसूभरही ढळला नाही. १९२४ सालच्या ऑगस्ट महिन्यात नागपूर वरून प्रसिध्द होणाऱ्या व टिळक पंथाचा पुरस्कार करणाऱ्या 'महाराष्ट्र' या साप्ताहिकात ते पत्रकार म्हणून रुजू झाले. त्यावेळी श्री. गोपाळराव ओगले हे 'महाराष्ट्रा'चे संपादक होते. त्यांच्या निमंत्रणावरूनच भाऊसाहेब नागपूरला आले. तथापि, पत्रकार म्हणून त्यांच्या, जीवनाचा प्रारंभ यापूर्वीच झालेला होता. 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया' या संस्थेचे मुखपत्र असलेल्या 'ज्ञानप्रकाश' या वृत्तपत्रात ते १९२३ पासून कार्यरत होते. 'ज्ञानप्रकाश'ची प्रकृती मवाळ, तर 'महाराष्ट्र'ची त्या काळातील कल्पनेनुसार जहाल. भाऊसाहेबांना 'ज्ञानप्रकाश' ऐवजी 'महाराष्ट्र'च अधिक मानवला व भावलाही असणार. कारण असे की, 'ज्ञानप्रकाशात' असतांना "परराष्ट्रीय राजकारण" आणि "काव्यशास्त्र विनोद" या दोन साप्ताहिक पुरवण्यांचेच काम त्यांच्याकडे होते. परराष्ट्रीय राजकारणावर लिहिण्यात फारसा धोका नसतो. कितीही कडवट टीका केली, तरी ज्याच्यावर टीका केली त्याला आपली भाषा समजण्याची शक्यता नसल्यामुळे बिनधास्तपणे लेखणी चालविता येते. स्वदेशात मात्र प्रतिशोधाचा धोका असतो, तो भाऊसाहेबांनी एकाहून अधिक वेळा अनुभवला आहे. 'महाराष्ट्रात' असताना १५ जानेवारी १९३१ च्या 'महाराष्ट्रा'च्या अंकात 'नोकरशाहीच्या आसुरी हट्टाचे बळी' हा उपाग्रलेख भाऊसाहेबांनी लिहिला. त्या लेखाने तत्कालीन मध्यप्रांत–वऱ्हाडचे सरकार खवळले आणि या लेखाबद्दल संपादक श्री. गोपाळराव ओगले यांना अटक करून त्यांच्यावर खटला भरला. या खटल्यात श्री. गोपाळराव ओगले यांना एक वर्ष सक्त मजुरीची शिक्षा झाली. आपल्या लेखामुळे आपल्या संपादकाला शिक्षा व्हावी याचे स्वाभाविकच भाऊसाहेबांना फार वाईट वाटले. श्री. गोपाळराव ओगले, अटकेनंतर जामिनावर सुटून आले असतांना, भाऊसाहेबांच्या डोळयात आलेले पाणी पाहून ते भाऊसाहेबांना म्हणाले, "तुम्ही काय एवढे मनाला लावून घेता ? १९०८ साली लोकमान्यांवर जो राजद्रोहाचा खटला झाला, त्याला असेच खाडिलकरांचे लेख कारण झाले होते. म्हणून काय त्यांनी खाडिलकरांना कधी दोष दिला काय? टिळक मुळी म्हणतच असत की, वर्तमानपत्र चालविणे ही बोलून चालून सुळावरची पोळी आहे. लोकांची बाजू मांडण्यासाठी ज्याने ही जबाबदारी एकदा पत्करली, त्याने कोणत्याही प्रसंगाला तयार असले पाहिजे. नाही तर असल्या कामात त्याने मुळीच पडू नये. तेव्हा 'महाराष्ट्र'वर हा प्रसंग इतक्या उशीरा आला, हेच खरोखरी आश्चर्य।" ('सोबत' दिवाळी अंक १९६९).

या उद्‌गारातील "लोकांची बाजू मांडण्यासाठी" हे शब्द अत्यंत मोलाचे आहेत. वृत्तपत्राला बाजू सरकारची घ्यायची नसते, लोकांची मांडायची असते; आणि बहुधा कोणत्याच सरकारला हा लोकपक्ष सहन होत नाही. त्याकाळी, तर सरकार परकीयच होते. त्यामुळे लोकानुवर्ती लेखनावर त्याची वक्रदृष्टी पडणे स्वाभाविकच होते. भाऊसाहेबानी "दैनिक तरुण भारता"ची संपादकीय धुरा स्वीकारल्या नंतरही अशा प्रसंगांना त्यांना अनेकदा तोंड द्यावे लागले. १९४४ च्या जानेवारीत दैनिक 'तरुण भारता'चा आरंभ झाला. १९४४च्या ऑगस्ट महिन्यात १९४२च्या लढयाच्या अनुषंगाने भाऊसाहेबांनी नऊ लेख लिहिले, त्या लेखांनी सरकार खवळले. 'तरुण भारत' चालविणाऱ्या 'नरकेसरी स्मारक ट्रस्ट'चे तेव्हाचे अध्यक्ष डॉ. ना. भा. खरे हे त्यावेळी व्हाईसरॉयच्या एक्झिक्युटिव कौन्सिलचे सदस्य होते. त्यांच्याकडे प्रांताच्या चीफ सेक्रेटरीने 'तरुण भारता'संबंधी तक्रार केली होती. त्यावेळी तरी सरकारने 'तरुण भारता'च्या विरुध्द कोणतीही कारवाई केली नाही. परंतु १९४५ च्या जुलै महिन्यात, 'तरुण भारता'चा चिमूर–आष्टी विशेषांक काढण्याची योजना जेव्हा जाहीर करण्यात आली, तेव्हा सरकारचे पित्त पुनः खवळले. चीफ सेक्रेटरी श्री. जयरत्नम् यांनी भाऊसाहेबांना आपल्या कचेरीत बोलावून, ताकीद दिली की, "हा अंक जर तुम्ही प्रसिध्द केला, तर सरकार 'तरुण भारता'ला टाळे लावील"

परंतु, अशा धमकीचा परिणाम होऊन दबणारे भाऊसाहेब नव्हते. धमकीचे प्रसंग पारतंत्र्यातच येत होते असे नाही.

लोकशाही व्यवस्थेतही ते येत असत. लोकशाहीत लोकांनी ज्यांना बहुसंख्येने निवडून दिले, त्यांना राज्य करण्याचा जनादेश मिळाला आहे, हे वृत्तपत्रांनी मान्य केले पाहिजे. परंतु ज्यांना राज्य करण्याचा जनादेश मिळाला आहे, ते राज्य कसे चालवित आहेत, हे सांगण्याचा वृत्तपत्रांचा अधिकार राज्यकर्त्यांनीही मान्य केला पाहिजे. हा जो निरपवाद आदर्श आहे, त्याचा विसर दोन्ही बाजूंना पडतो, असे दिसून येते. काही वृत्तपत्रे असे समजतात की, विधान मंडळातील विरोधी पक्षांची भूमिका आपल्याला बजावयाची आहे, आणि या गैरसमजुतीतून, त्यांना राज्यकर्त्या पक्षाचे काहीच चांगले दिसत नाही; तर सरकारला असे वाटते की, वृत्तपत्रांनी आपली भाटगिरी करावी. त्यासाठी प्रलोभनेही दिली जातात आणि ती स्वीकारून लांगूलचालन करणारे पत्रकारही असतात. अशा सर्वांसाठी भाऊसाहेबांची धीरोदात्तता अनुकरणीय आहे. पत्रकार भाऊसाहेब याच धीरोदात्ततेने आयुष्यभर जगले.

१९७५ बाणेदारपणा सालच्या आणिबाणीच्या काळात मी 'तरुण भारत'चा मुख्य संपादक होतो. त्यावेळी ज्येष्ठ संपादक असलेले भाऊसाहेब आठवडयातून एक अग्रलेख लिहीत असत. सेन्सॉरशिप लागली होती. भाऊसाहेबांनी मला आणि माझे ज्येष्ठ सहकारी दिगंबरराव घुमरे यांना भेटीसाठी बोलावून सेन्सॉरशिप लागली असताना, कसे लिहावयाचे या बद्दल काही उपयुक्त सूचना केल्या. त्यावेळी मी त्यांना म्हणालो, "ही जरा वेगळीच सेन्सॉरशिप दिसते. "आजचे कार्यक्रम" देखील सेन्सॉरला दाखवावे लागतात. ज्यांना भाषा आणि तिचा आशय समजण्याची पात्रता नाही, असे पोलीस इन्स्पेक्टर अग्रलेख वाचून बिनडोकपणे कात्री लावीत असतात" भाऊसाहेबांना हे ऐकून आश्चर्य वाटले. एकदा तर त्यांच्याही अग्रलेखाला पोलिसी कात्री लागली, तेव्हा, त्यांनी त्यांच्या परिचयाचे असलेले केन्द्र सरकारातील कायदे मंत्री श्री. हरिभाऊ गोखले यांना एक पत्र लिहिले. परंतु, गोखलेही काही करू शकले नाहीत. भाऊसाहेबांनी, सरकारच्या या दडपशाहीला शरण जाण्याचे नाकारले आणि लिखाणच बंद केले. त्यांची प्रकृतीही त्यावेळी चांगली नव्हती. आणि सुमारे वर्षभराने त्यांना मृत्यूने गाठले देखील.

व्यवसायगुरू

केसरीचे संपादक श्री. न. चिं. केळकर हे आपले वृत्तपत्र व्यवसायातील गुरू आहेत, हे भाऊसाहेबांनी प्रांजळपणे मान्य केले आहे. अगदी तरुण वयात ते केळकरांचे लेखनिक म्हणून त्यांच्या संपर्कात आले. सरदारगृहात, केळकरांशी जी त्यांची पहिली भेट झाली, त्या तासभराच्या भेटीत "वृत्तपत्रीय लिखाणाची शैली आणि सजावट या दोहोंविषयी इतके मार्मिक विवेचन त्यांनी (केळकरांनी) ओघाओघाने केले आणि त्या लिखाणाच्या विविधतेची माहिती होण्यासाठी इतकी पुस्तके वाचण्याची शिफारस केली की, वृत्तपत्र व्यवसायाचा पहिला घसघशीत धडा मला त्यादिवशी मिळाला असे मी आजही कृतज्ञतेने म्हणू शकतो" ("बातचीत" पृ. ५४) याच 'बातचीत' मध्ये ते पुढे सांगतात की, "वाचकांच्या मनाला हलवील, गुदगुल्या करील, जागृत करील असे सुबोध, सुश्लिष्ट गद्य लिहिण्याची कला मला केळकरांनीच शिकविली" (बातचीत पृ. ५४)

केवळ शैलीच्या बाबतीतच नव्हे, तर संपादकीय व्यवहाराच्या बाबतीतही भाऊसाहेबांच्या पुढे केळकरांचाच आदर्श होता. भाऊसाहेब सांगतात, "केळकर नेहमी असे म्हणायचे की, वर्तमानपत्राच्या संपादकाचे घर आणि त्याची कचेरी ही दोन्ही मुक्तद्वार असली पाहिजे. कोणाला केव्हाही भेटण्याची त्याची तयारी असली पाहिजे. त्याने कोणत्याही बाबतीत नकार देता कामा नये. आणि 'काम करतो' असे सांगून मागाहून फसवताही कामा नये. प्रत्येक माणसाला आपल्याविषयी विश्वास वाटेल असे त्याचे वर्तन असले पाहिजे. आपण स्वतः आणि आपले वर्तमानपत्र यांच्या विरूध्द लोक जे बोलतील, ते ऐकण्याची त्याची तयारी असली पाहिजे; तरच त्याचा तोल राहतो. आणि त्याच्या लिहिण्यातही ताजेपणा येतो. तिसरी गोष्ट ही की, जो प्रत्येक नवा विचार किंवा नवी कल्पना आपल्यापुढे येईल, ती समजून घेतली पाहिजे, तिच्या विषयीचे वाङ्मय निदान चाळले पाहिजे आणि त्यातले जे काय ग्राहय वाटेल ते, आत्मसातही करून टाकले पाहिजे. चौथी आणि शेवटची गोष्ट ही की, आपल्याला

येणाऱ्या प्रत्येक पत्राचे उत्तर उलट टपाली गेले पाहिजे'' (''वातचीत'' पृष्ठ ६०)

केळकराच्या मार्गदर्शनाचा संदर्भ देऊन, भाऊसाहेब स्वतःचीच वृत्तपत्रनीती सांगत आहेत, असे म्हटले पाहिजे. कारण स्वतः भाऊसाहेबही याच प्रमाणे वागले. मी 'तरुण भारता'त दाखल होण्यापूर्वी, भाऊसाहेबांच्या घरी सुमारे एक तास माझी त्यांनी जी मुलाखत घेतली, आणि नंतर एकेका पुस्तकाचे नाव घेऊन हे मी वाचले काय म्हणून त्यांनी मला विचारले, तेव्हा तर माझी छातीच दडपून गेली होती. कारण, भाऊसाहेबांना अभिप्रेत असलेले फारच थोडे मी वाचले होते. भाऊसाहेबांच्या धंतोली वरील बंगल्यातून निघून घरी परतताना माझ्या मनात सारखा एकच विचार येत होता की, ''ही जबाबदारी आपल्याला पेलेल ?''

लेखनगुरू

आपल्यावर झालेल्या टीकेच्या संदर्भात भाऊसाहेब कमालीचे सहिष्णू होते. मला याचे मोठे आश्चर्य वाटे. एकदा आचार्य अत्रे यांनी 'कोल्हटकरांचा हरामखोर शिष्यः माडखोलकर' असे जळजळीत शीर्षक देऊन एक लेख लिहिला होता. मी भाऊसाहेबांना विचारले ''आपण तो लेख वाचला काय ?'' तेव्हा ते उत्तरले, ''मी वाचला आहे. मला त्याचे काही वाटत नाही. अत्रे यांची अशीच लिहिण्याची शैली आहे.'' ही सहिष्णुता जन्मजात होती की अभ्यासाने बाणविली होती असा मला नेहमी प्रश्न पडे. त्याचे उत्तर 'सोबतच्या १९६० च्या दिवाळी अकातील ''माझी वृत्तपत्र नीती'' या त्यांच्या लेखातून मला मिळाले. १९२१ च्या नोव्हेंबर महिन्यात बडोदे येथे महाराष्ट्र साहित्य संमेलन भरले होते. त्याचे अध्यक्ष होते श्री. न. चिं. केळकर. त्यांचे भाषण भाऊसाहेबांनी लिहिले होते. या भाषणात आधुनिक कवी आणि कविता यांचा परामर्श घेतांना, पुण्यातील तत्कालीन कवी प्रा. लक्ष्मण गणेशशास्त्री लेले आणि त्यांचे वडील या पितापुत्रांचा निर्देश नव्हता. त्यामुळे चिडून शास्त्रीबुवांनी 'ज्ञानप्रकाशात' त्यावर अत्यंत खुनशी टीका केली होती. त्या लेखात 'एक पोरसवदा' लेखक अशी माडखोलकरांची संभावना करून, अध्यक्षीय भाषण तयार करण्याच्या अतिशय जबाबदारीच्या कामी, त्याची मदत घेतल्याबद्दल केळकरांवर ताशेरे झाडलेले होते. जशास तसे या न्यायाने भाऊसाहेब माडखोलकरांनीही 'नवयुग' च्या १९२१ च्या डिसेंबरच्या अंकात लेलेशास्त्र्यांवर अत्यंत कडक टीका केली. ती टीका वाचल्यानंतर, भाऊसाहेबांचे लेखनगुरू श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी त्यांना पत्र पाठवून आपली नापसंती प्रकट केली होती. त्यानंतर १९२२ च्या मे महिन्यात भाऊसाहेबांची भेट झाल्यावर, कोल्हटकरांनी रागानेच विचारले, ''गजाननराव आपण आपली लेखणी वस्तऱ्यासारखी वापरणार, शस्त्रवैद्याच्या सुरीसारखी वापरणार की पराक्रमी पुरुषाच्या तरवारी सारखी वापरणार ? हा प्रश्न आपल्या सर्व आयुष्याचा आहे. आपली मनोवृत्ती दुष्ट व्हावी की उदार व्हावी याचा आहे. आपण लेले शास्त्र्यांच्यावर ज्या पध्दतीने टीका केलीत, त्या पध्दतीने लिहिण्याची सवय का जर एकदा आपल्याला लागली, तर आपले मन दुष्ट होऊन जाईल, आणि वाङ्मयाच्या क्षेत्रात न्हाव्याचे आणि मारेकऱ्याचेच कष्ट जन्मभर करीत रहाल'' भाऊसाहेब पुढे लिहितात ''माझ्या गुरूंच्या या उपदेशाचा असा काही परिणाम मजवर झाला की, त्यामुळे माझ्या केवळ वाङ्मयीन टीकेलाच नव्हे, तर राजकीय टीकेलाही, सद्‌भिरुचीचे वलय लागले'' ('सोबत', दिवाळी अंक १९६०)

अनिंदक टीका

मी 'तरुण भारता'त येण्यापूर्वी त्यांनी माझी जी तासभर मुलाखत घेतली, तीतही हा दंडक त्यांनी आवर्जून मला सांगितला. ते म्हणाले, ''गांधीजी, विनोबा भावे, गुरुजी गोळवलकर प्रभृती थोर लोकांच्या निंदानालस्तीचा एक शब्दही 'तरुण भारता'त येता कामा नये; मग तुमची त्यांच्या विषयीची मते कोणतीही असोत'' भाऊसाहेबांना आचार्य विनोबा भावे यांच्या संबंधी अजीबात आदर नव्हता असे मला जाणवले. पण असे असतानाही 'भौमर्षी' म्हणून विनोबांचा गौरव करणारा प्रदीर्घ लेख त्यांनी लिहिला. भाऊसाहेबांचे हे कौशल्य खरोखरी अतुलनीय होते. केवळ जगन्मान्य थोर लोकांविषयीच नव्हे, तर बरोबरीच्या लोकांविषयीही भाऊसाहेब फार संयमाने लिहीत



याचे कारण 'उध्दटाशी असावे उध्दट' असे लेखन करण्याची कला त्यांना अवगत नव्हती असे नाही, तर असे स्वतः लिहावयाचे नाही व आपल्या सहकाऱ्यांनाही तसे लिहू द्यावयाचे नाही, हे त्यांचे जाणीवपूर्वक स्वीकारलेले धोरण होते हे आहे. दैनिक 'महाराष्ट्राचे' संपादक कै. दि. ब. पंडित यांच्या जळजळीत आणि सहेतुक अशा निम्न दर्जाच्या टीकेचीही ते याच नीतीतून उपेक्षा करीत असत. परंतु काही कार्ये अशी असतात की, त्या कार्यावर टीका करायची म्हणजे ते कार्य ज्या व्यक्तिमत्त्वाशी एकरूप झालेले असते, त्या व्यक्तिमत्त्वावरही टीका करणे अपरिहार्य असते. अशा प्रसंगी भाऊसाहेब त्या व्यक्तिमत्त्वाची गय करीत नसत. १९३८–३९ साली, उद्‌भवलेल्या खरे प्रकरणात, महात्मा गांधीवर टीका करणे कसे टाळता आले असते ? परंतु, एवढयावरून किंवा त्यांच्या राजकीय कादंबऱ्यातील खलनायकांच्या तोंडी घातलेल्या उद्‌गारांवरून, भाऊसाहेबांची स्वतःची मते, तशी होती असा निष्कर्ष काढणे अन्यायकारक आहे. स्वतः भाऊसाहेब लिहितात की, "महाराष्ट्र' आणि 'तरुण भारत' या वृत्तपत्रातील माझ्या संपादकीयात काय, किंवा 'मुक्तात्मा' पासून 'सत्यभामा' पर्यंत मी लिहिलेल्या कादंबऱ्यात काय, महात्माजींच्या राजकारणावर मी टीका केलेली असली, तरी ती वैयक्तिक किंवा अर्वाच्य नाही. उलट, माझ्या कादंबऱ्यांतील सगळया नायक–नायिकांनी आणि सुष्टु पात्रांनीही गांधीजीचा गौरव मुक्तकंठाने केलेली आढळेल" ('सोबत' दिवाळी अंक १९६९.)

प्रा. भास्कर नंदनवार यांनी प्रा. नरहर कुरूंदकरांचे तौलनिक मूल्यांकन आपल्या पुस्तकात दिलेले आहे, ते मोठे मार्मिक आहे. श्री कुरूंदकर आचार्य अत्र्यांच्या बाबतीत लिहितात, "अत्र्यांच्या पत्रकारितेचा भर बातमीपेक्षा अग्रलेखावर जास्त होता व अग्रलेखातही एखाद्या प्रश्नाची माहिती देण्यापेक्षा इतर बाबींवर त्यांचा भर जास्त होता. विरोधकांशी वागतांना आचार्य अत्रे यांना तोल सांभाळता आला नाही." तेच कुरूंदकर माडखोलकरांविषयी लिहिताना म्हणतात, "(पत्रकार) माडखोलकरांमध्ये सहिष्णुता आणि सौजन्य फार मोठे होते."

अशा या निर्भीड, चतुरस्र, ध्येयनिष्ठ आणि शैलीदार पत्रकाराच्या हाताखाली अकल्पितपणे कां होईना काम करण्याची संधी मला मिळाली, हे मी माझे भाग्य समजतो. त्यांच्या सारखे ललित, मनोहारी गद्य लिहायला, तर मला पुनर्जन्मच घ्यावा लागेल. परंतु संपादकीय कर्तव्य आणि जबाबदारी याचे यथासांग प्रशिक्षण घेण्याच्या दृष्टीनेही मी थोडा दुर्दैवीच राहिलो. ११ जुलै १९६६ ला 'तरुण भारता'च्या संपादकीय विभागात मी रुजू झालो आणि एक वर्ष पूर्ण होण्याच्या आतच भाऊसाहेब मुख्य संपादक म्हणून निवृत्त झाले. शिवाय, त्यावेळी माझे वयही त्रेचाळीस वर्षांचे म्हणजे नवीन काही शिकण्याच्या दृष्टीने बरेचसे जरठ झालेले होते. तथापि, नवनवीन लेखकांना संधी देणे, प्रसिध्दीविन्मुख विद्वान पंडितांच्या लेखनाला 'तरुण भारता'च्या रविवार आवृत्तीत जागा देणे, दैनिक वृत्तपत्र असले तरी वैचारिक अंगाची उपेक्षा न करणे, कनिष्ठ सहकाऱ्यांशी मित्रत्वाच्या नात्याने वागणे अशा अनेक सामूहिक क्रियाकलापांसाठी आवश्यक असलेले गुण मला त्यांच्या ठिकाणी आढळले व ते यथाशक्ति आपल्या अंगी बाणविण्याचा मी प्रयत्न केला. त्यांच्या जन्मशताब्दीच्या या पर्वानिमित्त स्वर्गीय भाऊसाहेबांच्या स्मृतीला मी अभिवादन करून हा लेखनप्रपंच थांबवतो.

मा. गो. वैद्य
ईशावास्यम्,
कॉंग्रेसनगर, नागपूर

स्त्री - जन्माची शोकात्मिका

अश्विनी धोंगडे

गेल्या पिढीतील थोर कादंबरीकार ग. त्र्यं. उर्फ भाऊसाहेब माडखोलकर यांच्या बहुसंख्य कादंबऱ्यांची नावे त्यातील स्त्री व्यक्तिरेखांची आहेत, आणि जवळजवळ सर्व कादंबऱ्यातून स्त्रियांची चित्रणे मध्यवर्ती म्हणून आलेली आहेत. त्याचप्रमाणे त्यांच्या कादंबऱ्याची गुंफण बहुपेडी असल्यामुळे एखाद्या घटना प्रसंगातील स्त्रीचा दृष्टीकोन कसा आहे, तिच्याकडे इतर व्यक्ती कशा नजरेने पाहतात, स्त्रियांच्या बाबतीत समाजाच्या प्रतिक्रिया कशा असतात, त्याचप्रमाणे ती स्त्री एखादी घटना कशी हाताळते याबाबत साहित्यिक म्हणून ते खूपच जागरूक असलेले दिसतात. 'भंगलेले देऊळ' सारख्या कादंबरीची नायिका हीच कादंबरीची निवेदिका असल्यामुळे स्त्रीच्या आयुष्याची कथा स्त्रीच्या मुखातून स्त्रीच्या भाषेत लिहण्याचा प्रयत्न त्यांनी पुरुष असूनही केला आहे, त्यामागे तृतीय पुरुषी निवेदनात येणारा तटस्थपणा टाळून एका बुध्दीमान आधुनिक स्त्रीला जास्तीत जास्त समजून घेऊन तिच्या वर्तनाचे समर्थन करण्याचाच हेतू आहे. स्त्री पुरुष संबंधाचे स्वरुप आणि स्त्री पुरूषांच्या समाजात दिसणाऱ्या पारंपारिक प्रतिमा यावर त्यांच्या सर्वच कादंबऱ्यातून अधून मधून लेखकाचीच निरीक्षणे व मतेही आवर्जून नोंदवली जातात. एकूणच 'स्त्री' हा माडखोलकरांच्या लेखनातला एक अधोरेखित घटक आहे असे म्हणावे लागते.

आजच्या काळातही जे वातावरण, ज्या व्यक्तिरेखा आणि जी कथा कालबाहय झाली आहे असे वाटत नाही, अशी माडखोलकरांची एक सदासतेज कादंबरी म्हणजे 'रुक्मिणी' वास्तविक पाहता या कादंबरीतला काळ स्वातंत्र्यापूर्वी काही वर्षाचा, म्हणजे किमान पन्नास पंचावन्न वर्षापूर्वीचा ! त्या काळातले राजकीय प्रश्न आता अस्तित्वातही नाहीत. त्यातील व्यक्तिरेखा प्रामुख्याने सरदार, संस्थानिक शोभाव्यात अशा ! ज्यांच्या आलिशान जीवनाची नामोनिशाणी सुध्दा आज उरलेली नाही. त्याच विलासी, ऐषारामी खासगी जीवन, विवाहबाहय संबंध, प्रेमकरणे, व्यसने, चैनी या गोष्टी तर सध्याच्या प्रबोधन युगात सरजामशाही बद्दल राग निर्माण करणाऱ्या ! असं असून सुध्दा ही कादंबरी आजही मोह घालते. (महाविद्यालयाच्या ग्रंथालयातून हे पुस्तक मी आणून वाचले. त्यावर विद्यार्थ्यांचे सडतोड अभिप्राय असतात. याही पुस्तकावर पहिल्याच पानावर हे पुस्तक अतिशय चांगले आहे' असा स्पष्ट निर्वाळा कोणी अनामिक तरुण वाचकाने लिहला आहे, तो नक्कीच दुर्लक्ष करण्याजोगा नाही) याचं नेमकं कारण काय असावं ?

या कादंबरीची एक गंमत आहे. तिचा पहिला एक तृतीयांश भाग उर्मिलेनं व्यापला आहे. मधला एक तृतीयांश भाग पचमढीतील पार्ट्यांनी व्यापला आहे आणि तिसरा भाग निवडणुकीतील राजकारणाने व्यापला आहे. या सर्व घटनांवर

घट्ट पकड आहे ती महाराजाच्या व्यक्तिरेखेची, आणि तरीसुध्दा महाराजांचे नाव या कादंबरीला नाही. कादंबरी सुरू होते उर्मिलेच्या विवाहापासून. ती सोळा वर्षाची एक सुंदर पण पुरोहिताच्या गरीब घरात जन्माला आलेली. तरूण मुलगी आहे तिचा विवाह चाळीशीला आलेल्या महाराजांशी ठरवला गेला आहे. त्यांचा हा तिसरा विवाह आहे. पहिल्या बायकोला मूल नाही. दुसरीला वेड लागले आहे. तेव्हा हे तिसरे लग्न मुख्यत्वे करून वंशाच्या वाढीसाठी होत आहे. उर्मिलेच्या गरीब बापाला या लग्नापासून जन्माची ददात मिटेल एवढा धनलाभ होणार आहे. म्हणजे या लग्नामागे एकूण जे राजकारण आहे. त्यात उर्मिलेसारख्या सुशिक्षित तरुण मुलीचा बळी जात आहे. तिच्यावर प्रेम करणाऱ्या तिच्या शाळेतील गायन मास्तरांनी, "लग्नानंतर पहिल्यारात्री जेंव्हा तुझी आणि त्या तिजवराची भेट होईल, तुझ्या वडिलांच्या वयाच्या–छे–त्यांच्यापेक्षाही मोठा असलेला तो जरठ पुरूष जेंव्हा तुझ्यापुढे उभा राहील तेंव्हा तुझं सगळं उत्फुल्ल, अनाघ्रात तारुण्य तुझ्या रोमरोमातून उफाळून उठेल आणि तुला आक्रदून म्हणेल की या स्वैराचारी, लंपट तिजवराला हात लावून देवू नकोस तू आपल्या कोमल निरागस शरीराला ! त्याचा स्पर्श म्हणजे शाप आहे तुझ्या सौंदर्याला आणि यौवनाला ! उर्मिले ती पहिली रात्र म्हणजे शेवटलीच रात्र ठरेल तुझ्या तारुण्याची! आणि मग तू जन्मभर पस्तावा करत बसशील या लग्नाला संमत्ती दिल्याबद्दल. छे, छे, हे लग्न होता कामा नये !" असा स्पष्ट इशारा तिला दिला आहे. खरंम्हणजे कोणत्याही लेखकाला भुरळ पडेल अशी क्षमता या बोलण्यात आहे. तरुण नायिका, तिचां तरुण प्रियकर आणि खलनायकाच्या भूमिकेत तिचा तिजवर नवरा–बळजबरीने झालेले लग्न–त्यानंतर लग्नाच्या रात्रीच झालेला भ्रमनिरास–मग तिचे पुन्हा प्रियकराकडे पळून जाणे त्याने तिचा स्वीकार करायला दिलेला नकार–कल्पनाशक्ती जेवढी अधिक ताणता येईल तितक्या अधिकाधिक कथा या घटनेतून मिळू शकतील. पण अशी सामान्य वकुवाच्या कथेची भुरळ माडखोलकरांना पडताना दिसत नाही. यातले गायन मास्तर म्हणतात तसे काहीही होत नाही. ती त्यांना आपल्या मनातील कोणत्याही भावना उघड न करता निग्रहाने बाजूला सारते. ठरलेले तिजवराचे स्थळ मनाने स्वीकारते, मात्र आपला सौदा करणाऱ्या आपल्या माहेरच्या माणसांशी पुढील आयुष्यात कोणताही संबंध ठेवत नाही. महाराजांशी सुध्दा ती विनम्रपणे पण आपला आब राखून एकरूप झाली आहे. ती महाराजांची आवडती पत्नी झाली आहे, कारण त्यांना तिने चिरवांछित असे पुत्ररत्न दिले आहे. वेड लागलेल्या सत्यभामेला परत माणसात आणण्याचा अपशस्वी प्रयत्न तिने करून पाहिला आहे. रूक्मिणीला आईचे स्थान देऊन तिच्याशी अत्यंत जिव्हाळयाचे संबंध प्रस्थापित केले आहेत. गरीबा घरची असूनही श्रीमंतांचे योग्य ते रीतीरिवाज आत्मसात केले आहेत. पार्ट्यांमध्ये स्वतःचे ब्रीद न सोडता महाराजांना साथ दिली आहे. प्रसंगी वाईट गोष्टींपासून दूर ठेवले आहे. रुक्मिणीच्या गैरहजेरीत वाडयाचा कारभार अगदी महाराजांइतकाच चोख ठेवला आहे, अशी ही उर्मिला सालस, कर्तव्यदक्ष, सुंदर, तरुण, विनयवती, पुरुषांचं मन मोहवणारी, जिंकणारी, वंशाला दिवा देणारी कांता ! कोणत्याही कादंबरीची नायिका शोभावी अशा गुणांनी विभूषित स्त्री. या कादंबरीतल्या जास्तीत जास्त घटना तिच्या भोवती घडल्या आहेत. किंवा तिच्या उपस्थितीत घडल्या आहेत तरीही माडखोलकरांनी तिला या कादंबरीची नायिका बनवलेली नाही.

महाराज हे तर सर्व घटनांचे कर्ते करविते. मालगुजारीतून आलेल्या पिढीजात श्रीमंतीने त्यांना संस्थानिकांसारखेच ऐश्वर्यसंपन्न आयुष्य लाभले आहे. अशा लोकांच्या अंगी असणारे सर्व गुण व दुर्गुण महाराजांच्यामध्ये आहेत. देशात आणि परदेशात त्यांनी श्रीमंतांना साजेसे असे सर्व विलास उपभोग केले आहेत. व्यसने केली आहेत आणि त्याची खंत न बाळगता जाहीरपणे उर्मिलेकडे त्याची कबुली दिलेली आहे. दानशूरपणा हा त्यांच्या अभिजातपणाचा आणखी एक पैलू प्रसंगी न पेलवणारी मोठी रक्कमही त्यांनी दानधर्मासाठी खर्च

केली आहे. वयाच्या चाळीशीत असताना एका सोळा वर्षाच्या गरीब तरुण मुलीशी लग्न करूनही ते कुठेही वाचकांच्या हेटाळणीचा विषय झालेले नाहीत हे विशेष. आपण स्वार्थापोटी या मुलीवर अन्याय करतो आहोत याची जाणीव त्यांनाही आहे, म्हणूनच उर्मिलेबाबतचे त्यांचे सर्व वर्तन अतिशय सभ्य, उदार आणि आदराचे राहिले आहे. मनाने ते ईश्वरभक्ती आणि धर्मकार्य यात रमणारे नाहीत, पण रुक्मिणीवरच्या प्रेमापोटी त्यांनी ते सगळे स्वीकारले आहे शिवाय गुरूंकडून अनुग्रह घेतल्यावर आपल्या आयुष्यातल्या काळया वर्तनावर त्यांनी लगाम घातला आहे. राजकारण्यांशी त्यांचा जवळचा संबध आहे. कॉंग्रेसपक्षाला निवडणुकीसाठी त्यांनी पैशाची भरघोस मदत वेळोवळी केलेली आहे. पण राजकारणातल्या छककया पंज्यात ते मुरलेले नाहीत. आपल्यावर केलेल्या डावाला प्रतीडावाने शह कसा द्यायचा याचा निर्णय ते स्वतः घेऊ शकत नाहीत. पण एकंदरीने महाराजांचे सर्व वागणे, बोलणे आदब ही महाराजांच्या स्थानाला शोभेल अशीच आहे. कधी काळी ते चैनी, व्यसनी असले तरी त्यांच्या स्वभावाचा एकूण कल सत्प्रवृत्तीकडेच आहे. तीन स्त्रियांचा पती असलेला, अफाट श्रीमंतीचा मालक असलेला, दानशूर असा हा राजा लौकिकार्थाने कोणत्याही कादंबरीचा नायक बनू शकतो. सर्व कादंबरीभर महाराजांची व्यक्तिरेखा विखुरलेली आहे. एवढे सगळे असूनही ही कादंबरी महाराजांची नाही. महाराज ही मध्यवर्ती व्यक्तिरेखा असूनही ही कादंबरी महाराजांना हुलकावणी देत पुढे जाते. कादबरीतील प्रत्येक घटनेवर महाराजांची हुकमत आहे, तरीही ही कादंबरी नायकप्रधान रहात नाही. असं का व्हावं ?

माडखोलकरांनी या कादंबरीचं नाव रुक्मिणी का ठेवलं ? सहज की सहेतुक ? सत्यभामा आणि उर्मिला हया पुढच्या दोन कादंबऱ्या लिहून ही त्रिधारा पूर्ण करण्याचा त्यांचा प्रथमपासून योजनाबध्द प्लॅन होता का ? नसावा, कारण तशी योजना असती तर विचारपूर्वक त्यांनी रूक्मिणीला मध्यवर्ती स्थानावर आणून ठेवले असते. तसे ते बुध्दया करत नाहीत, आणि तरीही कादंबरीला रूक्मिणीचे नाव देतात. तसे पाहता महाराज, उर्मिला आणि रूक्मिणी हा त्रिकोण मानला तरी पहिल्या दोन व्यक्तीच अधिक ठसठशीत आहेत. महाराजांचे आयुष्य हा कादंबरीचा मुख्य प्रवाह मानला तर उर्मिला काठावर आहे. तसे पाहिलं तर ती पराभूत नायिका आहे. तिच्या दृष्टीने पाहिले तर ती राजाला मूल देऊ शकलेली नाही तेंव्हा स्त्री म्हणून ती स्वतःला दोष देते. सौभाग्यवती असून संन्यासिनी सारखे–किंबहूना एखाद्या विधवेसारखे आयुष्य ती जगते आहे. पूजाअर्चा, सण समारंभ यांच्या कर्मकांडात तिने स्वतःला गाडून घेतले आहे. पानांच्या दृष्टीने पाहिले तर कादंबरीची फार थोडी पाने तिच्या वाटयाला येतात. कादंबरीतले फार थोडे प्रसंग तिच्या उपस्थितीत अथवा तिच्याबद्दल घडतात, तरीसुध्दा ती या कादंबरीचे नाव धारण करते.

ही कादंबरी वाचून संपवली की या कोडयाचे उत्तर मिळू शकते, कारण शेवटी उर्मिला आणि महाराज या दोन्ही व्यक्तिरेखा त्यांच्या त्यांच्या परिस्थितीतील व्यक्ती जशा वागतील तशा वागणाऱ्या सर्व साधारण व्यक्ती आहेत. कोणत्याही प्रसंगाला त्यांनी दिलेले प्रतिसाद हे सामान्य माणसाच्या प्रतिसादाप्रमाणेच आहेत. पण कादंबरीकार म्हणून माडखोलकरांना अधिक रस आहे तो रूक्मिणीत, कारण कोणत्याही संवेदनाशील लेखकाला भुरळ घालेल असं काहीतरी वेगळेपण तिच्या व्यक्तित्वातच आहे. त्यामुळे कादंबरी वाचून संपली तरी मनात उरते ती रूक्मिणी जिचे व्यक्तित्व पुरसे कळले नाही अशी हुरहूर लागून रहावी अशी व्यक्तिरेखा म्हणजे रूक्मिणी तसं पाहिलं तर कादंबरीतील बहुसंख्य प्रसंगात ती नाही, पण तिची दाट सावली आहे. तिच्या आठवणी आहेत. तिचा प्रेमपूर्वक दरारा आहे, म्हणून सर्व कादंबरीभर ती छुपेपणाने व्यापून राहिली आहे. वरवर पाहता मघाशी म्हटल्याप्रमाणे ती काठावर आहे असे वाटले तरी खरे तर ती महाराजांबरोबर मुख्य प्रवाहाला व्यापूनच उरली आहे. आणि हे तिचे उरलेपण तिला अधिक जिवंतपणा बहाल करते, मानवी स्वभाव हा इतका गुंतागुंतीचा

आणि अतर्क्य आहे, की त्याच्या वागणुकीला तर्काचे काटे लावून तो गुंता सोडवता येणार नाही. साहित्यातही काही व्यक्तिरेखा अशा असतात की लेखकाने निर्माण केलेल्या चौकटीत त्या मावत नाहीत. त्यांच्या वागणुकीचे पदर दिसतात, पण त्या मागची कारणमीमांसा शोधता येत नाही. लेखकाला त्या खुणावतात, भुलवतात, आपल्या मोहात पाडतात, पण आपल्या मनाचा थांग लागू देत नाहीत. त्यांच्या तशा धूसर असण्यातच त्याचं वास्तवपण दडलेलं असतं, कारण त्यामुळे त्यांच्या व्यक्तित्वाला खोली प्राप्त होते, त्या हाडामासाच्या व्यक्ती होतात रूक्मिणी ही साहित्यातल्या अशा काही थोडया सशक्त व्यक्तिरेखेतील एक व्यक्ती आहे. एखाद्या वस्तूवर पडदा टाकलेला असेल तर त्याचे अवगुंठीत सौंदर्य अधिक आकर्षक होते. रूक्मिणीच्या स्वभावाचे अनेक पैलू हे असे झाकलेलेच राहिल्याने रूक्मिणी ही इतर व्यक्तींपेक्षा अधिक आकर्षक व रसरशीत झाली आहे. एक अधिक एक बरोबर दोन अशी समीकरणे तिच्या वर्तनाला लागू शकत नाहीत म्हणून इतर सामान्य माणसापेक्षा ती अधिक गूढ वाटते, कारण त्यामुळे तिच्या मनातील घटनांचा आपल्याला थांगच लागत नाही, आणि जे बाहयात्कारी वर्तन दिसते ते अचंबित करणारे असते.

तिचे पहिले दर्शन घडते ते सवत भेटायला येते तेंव्हा, पहिल्याच भेटीत ती उर्मिलेला आपलीशी करते ती तिच्या पोक्त, समजस, परिपक्व वागण्याच्या जाणीवेतून. सवतीमत्सराचा लवलेशही तिच्या वागण्या बोलण्यात दिसत नाही. आपले वांझपणही तिने वास्तव म्हणून स्वीकारले आहे, त्यात कडवटपणा आणू दिलेला नाही. मोठे थोरले शांत कनवाळू डोळे, वात्सल्ययुक्त विश्रब्ध दृष्टी हे तिचे वर्णनच तिचा मोठेपणा दाखवणारे आहे. उर्मिलेला तरी मूल व्हावे, आणि ते होईल याबद्दल तिला पूर्ण खात्री आहे. पहिल्याच भेटीत उर्मिलेशी तिनं आई लेकीचं जवळचं जिव्हाळयाचं नातं जोडलं आहे. सामान्य माणसाच्या मुठीत न मावण्यासारखं हे रूक्मिणीचं असामान्यपण आहे.

कोडं पडावं असं रूक्मिणीचं दुसरं रूप म्हणजे स्वतःच्या लग्नानंतर मूल होत नाही म्हणून स्वतःच्याच नात्यातल्या मुलीशी तिनं स्वतःहून लावून दिलेला महाराजांचा दुसरा विवाह ! आणि बंगल्यावर थाटून दिलेला महाराजांचा दुसरा संसार ! या लग्नानंतर तिनं स्वतःला जुन्या वाडयात कोंडून घेतलं आहे. सकाळ देवघरात, दुपारी पुराण, सायंकाळी कीर्तन, रात्री भजन या पलिकडे तिला दुसरं आयुष्य उरलेलं नाही महाराजांच्या घराण्याच्या प्रतिष्ठेची जी परंपरागत धार्मिक बाजू आहे, ती भक्कमपणे सांभाळणारी तिच्याशिवाय दुसरी कोणी असू शकत नाही अशी महाराजांनाही मनोमन खात्री आहे. श्री ब्रह्मानंद सरस्वतींवर त्यांची विलक्षण श्रध्दा आहे. उर्मिला विषबाधेमधून सुखरूप बाहेर पडल्याच्या प्रसंगात स्वामींच्या पादुका मस्तकी घेऊन नर्मदेची प्रदक्षिणा करण्याचं वचन त्यांनी स्वामींना दिलं आहे. हा वशांकुर वाचण्यासाठी आपल्या समाधीपाशी मी देह वाहीन असा कौल त्यांनी मनोमन लावला आहे. नर्मदेची प्रदक्षिणा हा किती खडतर प्रवास आहे. याची जाणीव असूनही रूक्मिणीसारखी जन्मल्यापासून राजभोगात राहणारी स्त्री आपल्या सवतीच्या मुलासाठी–त्याहीपेक्षा आपल्या घराण्याच्या कुलदीपकासाठी–जेंव्हा हा निर्णय घेते तेंव्हा ही पुन्हा एकवार अतीव आदर वाटावी अशी ही कृती असूनही एक गुढरम्यतेचे वलय नकळतपणे रूक्मिणीभोवती निर्माण होताना दिसते.

रूक्मिणी आणि महाराजांचे नाते नेमके कसे आहे ? शयनेषू रम्भा ही स्त्रीची भूमिका तिने आपखुषीने त्यागिली असली तरी गृहिणी, सखी, सचिव म्हणून ती उर्मिलेपेक्षाही महाराजांच्या अधिक जवळची आहे, याची जाणीव कदाचित उर्मिलेलाही झालेली नाही. सत्यभामेच्या वडिलांनी देवाच्या साक्षीने रूक्मिणीला महाराजांपासून कायमचे दूर राहण्याचे वचन सत्यभामेच्या लग्नापूर्वी घेतले व ती शारिरिक दृष्ट्या महाराजांपासून विलग झाली, पण महाराजांच्या मनातलं

अनुक्रमणिका

तिच्याबद्दलचं अढळ स्थान पुढच्या दोघी सवतींना एवढसही विचालित करता आलेलं नाही. महाराजांनी तिसऱ्या लग्नाची खबर तिला दिली नाही, तरी ती नव्या नवरीला आपल्यात सामावून घेईल याची त्यांना खात्री आहे. राजकारण असो वा अर्थकारण महाराजांना पदोपदी सल्ला मसलत कराविशी वाटते आणि योग्य तो चतुर सल्ला मिळेल याची खात्री वाटते ती केवळ रूक्मिणीच्याच बाबतीत ! महाराजांच्या दृष्टीने ती घराण्याची प्रतिष्ठा आहे, कारण महाराजांच्या बिघडलेल्या वर्तनाचा बभ्रा तिने कुठेही केलेला नाही, तिचा खडतर नवस हा तिच्या वागणुकीच्या मुळाशी जी खोल, उदात्त भावना आहे. त्याचाच आविष्कार आहे, आणि हाच मानवी संसाराचा आणि सातत्याचा आधार आहे अशी महाराजांची भावना आहे. प्रवासातिने लिहलेली पत्रं ही तिच्या धर्मग्रंथांच्या पारायणांमुळे प्रासादिक आहेत, पण ज्या अधिकार वाणीनं तिनं ती महाराजांना लिहलेली आहेत, त्यावरून महाराजांवर तिचा किती प्रभाव आहे याची साक्ष पटते. बर्डीवरचा वाडा हा तिचं संस्थान आहे तिथं तिचं राज्य चालतं. गोपाळकृष्ण हा मंडलिक आहे तिचा आणि दुसरा मंडालिक मी आहे' अशी स्पष्ट कबुली खुद्द महाराजांनी दिली आहे, यापेक्षा रूक्मिणीला अधिक प्रशंसनीय काय असू शकेल ?

रूक्मिणीची सामान्य माणसांपेक्षा वेगळी असण्यातली आणखी एक परमोच्यबिंदूची कृती म्हणजे तिची आत्महत्या. ती नदीत वाहून गेली हा अपघात नाही, ही आत्महत्या आहे. उर्मिलेच्या दृष्टीने बाळासाठी समाधीवर केलेले आत्मसमर्पण आहे. रूक्मिणीचा असा शेवट हा तिच्या आयुष्याचा एक अटळ, अपरिहार्य अंतच आहे. 'रूक्मिणी माझं सर्वस्व होती. आई, बहिण, बायको मित्र, सगळं काही होती ती मला' ही महाराजांनी तिला वाहिलेली श्रध्दांजली ! इथे कादंबरी संपते पण रूक्मिणीबद्दल अनेक प्रश्न निर्माण करून.

कादंबरीमधील व्यक्तिरेखेचे परीक्षण तीन प्रकारे करता येते. ती व्यक्ती स्वतःबद्दल काय बोलते, एखाद्या प्रसंगात कशी वागते हे एक, दुसऱ्या व्यक्तींची मते त्या व्यक्तीबाबत काय आहेत हे दुसरे आणि स्वतः मधे येऊन लेखक एखाद्या व्यक्तीबद्दल काय बोलतो हे तिसरे कादंबरीच्या घट्ट विणीतून हे धागे सोडवून घेत एखाद्या व्यक्तिरेखेचे परीक्षण करता काही धागे जाणून बुजून लेखकाने अर्धवट सोडले आहेत, काही ठिकाणी मौन बाळगले आहे, काही ठिकाणी त्या व्यक्तिरेखेचे पदर त्याच्या हातातून निसटले आहेत असे वाटत राहते. रूक्मिणीच्या मृत्यूनंतर संपलेली कादंबरी पुन्हा वाचली तर काही थोडे धागेदोरे हाती लागतात, ज्यामुळे रूक्मिणीच्या स्वभावातील काही अंधाऱ्या बाजूंवर प्रकाश पडू शकतो. हे दुवे फार कच्चे आहेत, म्हणून त्यावरून अनुमान काढून काही ठोक विधाने करता येणार नाहीत, पण रूक्मिणीच्या स्त्री म्हणून असलेल्या, आणि स्त्री म्हणून पुरेशा प्रगट न झालेल्या स्वरूपाकडे थोडे बोट दाखवता येईल.

रूक्मिणीची आत्महत्या हे नुसते समर्पण आहे का ? नाही, समर्पण असते तर खडतर प्रवासांचे कष्ट भोगण्यापूर्वीही ते शक्य होते. तिची श्रध्दाळू, धार्मिक दृष्टी पाहता गुरूंच्या समाधीपाशी तिने प्राण अर्पण करणे हे योग्य वाटतेही, पण प्राण सोडायला तेच एकमेव कारण वाटत नाही. रूक्मिणीचे काही उद्‌गार, महाराजांचे व सत्यभामेचे काही उद्‌गार पाहिले तर रूक्मिणीच्या खाजगी जीवनावर प्रकाश पडतो. महाराज व रूक्मिणीचं लग्न पाळण्यात ठरलं. महाराजांची मुंज झाल्यावर ते झालं. त्यांच्या दोघांच्या वयात एक वर्षाचंही अंतर नाही. 'पुरुषापेक्षा स्त्री लौकर पक्व आणि जीर्ण होते. मला ती अत्यंत प्रिय आहे आणि आदरणीय आहे. पण पत्नी म्हणून मात्र मी विचार करू शकत नाही आता तिचा' असं महाराज म्हणतात. पती पत्नी असताना त्यांचे संबंध किती समरसपूर्ण होते ? त्यांनी किती वर्षे एकत्र संसार केला ? रूक्मिणीला मूल न होण्याचे खरे कारण काय ? महाराजांच्या संसारात पत्नी म्हणून रूक्मिणी खरंच समाधानी होती काय ? हे प्रश्न एक स्त्री म्हणून रूक्मिणीच्या बाजूने निर्माण होऊ शकतात.

महाराजांचा दुसरा विवाह लावून देण्यामागे काय फक्त मोठेपणा आहे ? प्रचंड मानसिक वेदना नाहीत ? आपल्या हक्काचं माणूस दुसऱ्या स्त्रीच्या हाती सोपवताना होणारा कोंडमारा घुसमट नाही ? महाराजांपासून कायमचं दूर राहीन असं वचन देताना काय रूक्मिणीला आनंदाच्या उकळया फुटल्या असतील ? स्त्री पुरुष काय केवळ मूल होण्यासाठीचं एकत्र येतात काय ? त्या शिवाय ही दांपत्तिक सुखाची ओढ स्त्री पुरुषांच्या शारीर मीलनात नसते काय ? चाळीशीला चार वर्ष कमी असलेले महाराज तिसऱ्या विवाहाला उभे राहतात. बाहेर चैनी करतात आणि त्यांच्या वयाची बाई मात्र अहोरात्र धर्मकृत्यात स्वतःला गाडून घेते सौभाग्यात विधवेचे जीणं स्वीकारते. ती काय स्त्री म्हणून त्यागाचं बाळकडू जन्मापासूनच तोडांत घेऊन येते काय ? वरवर रूक्मिणी हसते, आनंदात दिसते म्हणून ती खरीच समाधानी असेल काय ? सत्यभामेचे तिच्याविषयीचे उद्‌गारही खूपसे सूचक आहेत, "त्यांच्या जीवनात काही जिवंतपणा, काही संसाराचा गोडवा, काही भोवतालच्या जगाची जाणीव आहे का ? त्या मनानं मेलेल्या आहेत.."

रूक्मिणी मनानं का मेली असेल ? केवळ मूल नाही म्हणून ? पाण्यावर तरंगणारी बर्फाची शिळा जशी सात अष्टमांश पाण्याखाली गडप असते, तसं रूक्मिणीचं खरं रूप अदृश्यच आहे, ती समजतच नाही. बंगल्यावरच्या भानगडींबाबत ती म्हणते, " सगळयाचं काही माझ्यासारख्या स्थितप्रज्ञ नसतात. पण पुरुष म्हटला म्हणजे असं चालायचचं" पुरुषांचं बाहेर ख्यालीपण असं इतकं गृहीत धरणं रूक्मिणीला सोपं गेलं असेल का ? "यांनी जरी सोडलं तुला आणि चौथी आणली घरात तरी मी अंतर देणार नाही तुला" असं उर्मिलेला महाराजांसमोर म्हणताना महाराजांचं पाणी तिनं पूर्ण जोखलेलं आहे, पचवलेलं आहे, म्हणूनच ती महाराजांवर अधिकार गाजवू शकते. पण हा अधिकारही वरवरचा आहे, याची जाणीव तिला आहे. 'पाणी आणू नकोस बाई डोळयात अग, बोलून चालून स्त्रीजन्म आहे आपला हा. बापानं कुणाशीही लग्न लावून दिलं तरी तो मंगल योगच समजला पाहिजे कुलवंताच्या मुलीनं' हे रूक्मिणीनं उर्मिलेच्या बाबतीत म्हटलं असलं तरी तिच्या बाबतीतही ते तितकच खरं आहे. रूक्मिणीचं आतलं आयुष्य ही एक स्त्री जन्माची शोकात्मिका आहे आणि कुठेतरी पृष्ठभागावर विखुरलेल्या लहरीतून तिची अंतर्यामीची खोली जाणवते आहे. शहाण्या बायकोनं कधी आपल्या नवऱ्याच्या जीवनात फार मन घालून आणि खोल शिरून बघू नये हे तिचं स्त्रीविषयक तत्त्वज्ञान स्वतःच्या ज्या अनुभवातून जन्माला आलं, त्यामागच्या तिच्या अपार वेदना, भ्रमनिरास, कोंडमारा, होलपट ही कादंबरीत पुढे येत नाही, पण सुजाण (कदाचित मुख्यत्वे स्त्री) वाचकांना विशेषत्वाने जाणवून जाते आणि तशी ती जाणवून देण्यातच कादंबरीकार म्हणून माडखोलकरांचे श्रेष्ठत्व लपलेले आहे.

डॉ. अश्विनी धोंगडे
शरण्य
४७, स्वेदगंगा सोसायटी,
वारजे, पुणे – ४११०२९.

अनुक्रमणिका

साठोत्तरी मराठी कादंबरी

डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर

स्वातंत्र्यपूर्व काळात लेखन करणारे बोकील, कवठेकर, साने गुरूजी, फडके, खांडेकर, माडखोलकर, वरेरकर स्वातंत्र्योत्तर काळातही लिहीत होते, परंतु त्यांच्या लेखन शैलीचा ठराविक साचा प्रथमपासूनच झाला होता. विभावरी शिरूरकरांच्या 'बळी' ने (१९५०) मराठी कादंबरीच्या वास्तववादी रूपाचे प्रखर दर्शन घडवले. मराठी कादंबरीला वास्तवाभिमुख करण्यात "बळी" चा वाटा मोठा आहे. हया काळात गो. नी. दांडेकर, श्री. ना. पेंडसे, पु. भा. भावे, र. वा. दिघे, गंगाधर गाडगीळ, वसंत कानेटकर, इ. कादंबरीकारांनी आपला आगळा ठसा उमटवला.

हया युगाचे वैशिष्ट्य हेच की या काळात मराठी साहित्यावर असणारा रोमांटिसिझमचा प्रभाव हळुहळू कमी होऊ लागला होता. सुधारणावाद, राष्ट्रीयता, तत्वज्ञान, गांधीवाद मार्क्सवाद, मानवतावाद अस्तित्ववाद, इत्यादीनी प्रभावित होऊन कादंबरी लेखनाऐवजी कादंबरीकार आपल्या वैयक्तिक अनुभूतीला आणि जीवनातील अनुभवांना प्राधान्य देऊ लागले. कल्पना–विलासाचे व मनोरंजनवादाचे फडक्यांइतके समर्थन स्पष्टपणे कोणत्याच कादंबरीकाराने केले नाही. मात्र एकूण मराठी कादंबरीवर फडक्यांच्या रंजनवादाचा प्रभाव खूप होता. हे मान्य करायला हवे.

वास्तवाची जाण ! १९६० पूर्वीचे साहित्यिक कर्तृत्व :

स्वातंत्र्योत्तर कालखंडाच्या हया पहिल्या चरणात गो. नी. दांडेकर आणि श्री. ना. पेंडसे सर्वश्रेष्ठ कादंबरीकार गणले जातात.

गो. नी. दाडेकरांनी 'बिंदूची कथा' (१९४७) या पहिल्याच कादंबरीत आपल्या तीव्र संवेदनशीलतेचा प्रत्यय आणून दिला होता. नोआखलीच्या जातीय दंग्यांवर या कादंबरीची पृष्ठभूमी आधारित आहे. याच सुमारास या विषयावर बिवलकरांची 'सुनीता' ही कादंबरी प्रकाशित झाली होती. श्री. ना. पेंडश्यांच्या 'एल्गार' या (१९४७) साली प्रसिध्द झालेल्या पहिल्या महत्वपूर्ण कादंबरीत स्पृश्य–अस्पृश्यतेच्या रूढीविरूध्द प्रतिक्रिया आणि हिंदू मुस्लिम संबंधातील आरंभीचा आपलेपणा, नंतर वैमनस्यातून निर्माण झालेली सूडाची आग अन् मानवी विवशता याचे चित्रण आढळते.

गो. नी. दांडेकरांचे वैशिष्ट्य हे की ते सदैव आपले अनुभवविश्व विस्तारित राहिले. 'तुडवलेले घरकुल' बंगाली समाजाचे दर्शन घडविते. 'शितू' मध्ये कोकणाच्या परिसराला मूर्त रूप देऊन जमीनदाराच्या मुलावरील शितूच्या असफल प्रेमाची करुण कथा हळूवारपणे कथन केली आहे. 'पडघवली' मध्ये पडघवली गावाला केंद्र मानून त्या गावच्या सर्वतोपरी विनाशाची कथा मांडली आहे. 'माचीवरला बुधा' ही कादंबरी निसर्गापासून दुरावलेल्या बुधाची अंतर्व्यथा तर आहेच पण त्याचबरोबर निसर्गाशीच एकरूप होऊ पाहणारी त्याची मानसिक व्याकुळता ही प्रभावीपणे व्यक्त करते. अतिसामान्य पात्रांच्या माध्यमातून ग्रामीण समाजातील मधुर संबंधाना उठाव दिला आहे. ग्रामीण वऱ्हाडी जनजीवनाचे सामूहिक रूप 'पूर्णामायची

अनुक्रमणिका

लेकरे' यात दिसून येते. गो.नी. दांडेकरांनी महाराष्ट्राबाहेरील इतर प्रातांच्या चित्रणात ही रुची घेतलेली आढळते. त्यांच्या भटक्या, प्रवासी मनोवृत्तीचे संवेदनशील अन् मर्मस्पर्शी दर्शन 'कुण्या एकाची भ्रमणगाथा' मध्ये आढळते. भाक्रा– नांगलच्या धरणाच्या निर्मितीमागे दडलेली मानवी सुख दुःखे अन् सर्वांवर मात करू पाहणारी माणसाची जिद्द दिसते ती 'आम्ही भगीरथाचे पुत्र' या कादंबरीत. 'पडघवली', 'माचीवरला बुधा', 'पूर्णामायची लेकरे', 'पवनाकाठचा धोंडी,' या कादंबऱ्या वाचताना असे जाणवते की प्रादेशिक कादंबरीलेखनाचे पहिले सशक्त पाऊल दांडेकरांनी उचललेले आहे. त्यांची लघुकादंबरी "जैत रे जैत" ही समीक्षकांच्या दृष्टीने ही अधिक महत्वाची ठरली आहे. दांडेकरांच्या लेखणीतून जणू अस्सल भारतीय परंपराच पाझरते आहे. 'उडोनी हंस चालला' 'अजून नाही जागे गोकुळ' यासारख्या पौराणिक कादंबऱ्या, "जगन्नाथ पंडित" ही ऐतिहासिक कादंबरी या मताला अधिकच दुजोरा देतात. महाराष्ट्रातीय संतापैकी रामदासांवरील 'दास डोंगरी राहतो' तुकारामावरील 'तुका आकाशाएवढा' आणि ज्ञानेश्वरीवरील 'मोगरा फुलला' या चरित्रात्मक कादंबऱ्या प्रसिध्द आहेत. यापैकी 'मोगरा फुलला' ही मराठीतील एक श्रेष्ठ कादंबरी मानली पाहिजे. शिवकालीन समाजाचे यथार्थ चित्रण करणाऱ्या शिवकालावर आधारित अशा दांडेकरांच्या चार कादंबऱ्या प्रसिध्द आहेत. ऐतिहासिक प्रख्यात व्यक्तीला नायक बनवून विभूत्तीपूजेला महत्त्व देणारा ऐतिहासिक कामगिरीचा बाज दांडेकरांनी सोडून दिला आणि समाज–दर्शनाला केंद्रीय स्थान दिले. ही त्यानी केलेली ऐतिहासिक कादंबरीची रूपक्रांती म्हटली पाहिजे आणि ती महत्वाची आहे. आधुनिक भारतीय मनावर पाश्चिमात्य संस्कृतीचा अन साहित्याचा प्रभाव आहे अन तो सुध्दा इतका की कधी कधी आधुनिक मराठी साहित्य भारतीयतेपासून दुरावलेले आणि पाश्चिमात्यांचे ढोंगी अनुकरण करणारे मानले जाते. अर्थात ही अतिशयोक्ती आहे. पण ती एका महत्वाच्या विचाराची अतिशयोक्ति असावी. दांडेकरांसारख्या लेखकावर पश्चिमी संस्कृतीचा वा विचारांचा जरासुध्दा प्रभाव नाही अन् म्हणूनच भारतीय संस्कारांनी परिपूर्ण अशा त्यांच्या कादंबऱ्या स्वतःचे विशिष्ट स्थान निर्माण करतात. दांडेकरानी महाराष्ट्रातील अस्सल बोली भाषांचा जो समर्थ उपयोग केला आहे. तो त्यांच्या देशीयतेचा फार मोठा पुरावा आहे दांडेकरांचे कादंबरी लेखन काहीसे एकेरी आहे, व्यक्तिरेखांची व्यामिश्रता आणि घटनांतील अनेकार्थता दांडेकरांमध्ये नाही. त्यांच्या कादंबऱ्यात सामाजिक वास्तवाची बहुपेडी संदर्भ समृध्दि नाही. पण भावनांची पारदर्शी उत्कटता ही त्यांची जमेची बाजू आहे. त्याच वेळी मराठीचा मोठा देशी कादंबरीकार कोण या प्रश्नाचे उत्तर शोधताना प्रथम अंगुलिनिर्देश करावा लागतो तो दांडेकरांच्या साहित्यिक कर्तृत्वाकडे ! भारतीय परंपरा व्यक्तित्वात पूर्णपणे पचवून आधुनिक युगाशी समन्वय करणारा हा लेखक आहे.

श्री. ना. पेंडसे सुध्दा महत्वाचे लेखक असून 'एल्गार' नंतर आलेल्या त्यांच्या 'हद्दपार' ने ते प्रसिध्द झाले. पण लोकप्रियतेच्या शिखरावर त्याना बसवणारी त्यांची कादंबरी आहे. 'गारंबीचा बापू' प्रादेशिकतेचा गहिरा स्पर्श असणाऱ्या हया कादंबरीत बापूच्या विकासशील व्यक्तित्वाचे सुरेख दर्शन आहे. समाजाच्या रूढ परंपरांवर आघात करणारी राधा–बापूची धुंद करणारी रासवट व मांसल प्रणयकथा हे या कादंबरीच्या लोकप्रियतेचे खरे कारण आहे. तसे पाहिले तर पेंडश्यांच्या 'हत्या' आणि 'कलंदर' या दोन कादंबऱ्या अधिक महत्वपूर्ण ठराव्यात. माणसाच्या आंतरव्यक्तित्वातला काही निवडक तपशील आणि घटना याना प्रभावी अभिव्यक्ती देण्यात पेंडसे यशस्वी झाले आहेत. पेंडश्यांनी ग्रामीण,जीवनाबरोबरच मुंबईसारख्या महानगरीचे ही अनुभव घेतले आहेत. त्यांच्या 'कलंदर' मध्ये साठ–सत्तर वर्षा पूर्वीच्या मुंबईचे चित्रण आहे तर 'लव्हाळी' मध्ये युध्दकालीन मुंबईच्या मध्यमवर्गीय प्रवृत्तीला प्रकट रूप दिलेले आहे. मध्यम वर्गाच्या गुणदोषांचे व प्रवृत्ती–अपप्रवृत्तींचे हे प्रभावी दर्शन एका सर्वस्वी वेगळया फॉर्ममध्ये (डायरीच्या उपयोगाने) पेंडश्यांनी घडवले आहे. पेंडश्यांना 'रथचक्र' साठी साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला आहे. हया कादंबरीत पेंडश्यांनी गावच्या अशिक्षित अन् दुर्दैवी स्त्रीच्या असफल जीवन–संघर्षाची कहाणी प्रभावीपणे चित्रित केली आहे. "ऑक्टोपस" मध्ये उच्च मध्यमवर्गाच्या कामविषयक गंडांचे रोचक ढंगात प्रस्तुतीकरण आहे. त्यांची आकाराने मोठी कादंबरी 'तुंबाडचे खोत' पेंडशांच्या शैलगत वैशिष्ट्यांची या कादंबरीत प्रभावी प्रचीती देते. माणसांचे

ठळक स्वभाव नेमक्या ठसकेवाज भाषेत मांडणे, परिसराची चित्रमय पार्श्वभूमी देऊन जीवन प्रवाह जिवंतपणे रेखाटणे, राजकीय घटनांची डूब देऊन समाज–वास्तवाचा आभास उत्पन्न करणे, स्त्री–पुरुष संबंधातील लैंगिक सत्य काहीसे धीटपणे व्यक्त करणे, शब्दांचा नेमकेपणाने प्रभावी उपयोग करणे आणि वाचकाल काहीसे झपाटून टाकणे इ.! पण तिच्या आकाराचा विचार करता कादबरीत बराचसा सपाटपणा आल्याचे जाणवते. पेंडश्यांमध्ये एका चांगल्या कलाकाराचे गुण अवश्य आहेत. परंतु अपेक्षित उंची मात्र त्यानाही लाभलेली नाही. एक तर पेंडसे इतके पात्रामध्ये गुरफटतात की पात्रांच्या परिस्थितीकडे त्यांचे फारसे लक्ष जात नाही. शिवाय ही पात्रे तशी एकांगी असतात. मोठा जीवनाशय व्यक्त करण्याची कुवत त्यांच्यात नसते. परिणामत· एका उत्तम लेखकाच्या मर्यादा प्रकट होतात.

पु. भा. भाव्यांचे खरे क्षेत्र कथांचे आहे. परंतु १९५० मध्ये 'अकुलीना'च्या लोकप्रियतेनंतर त्यानी बऱ्याच कादंबऱ्या लिहिल्या. 'अकुलीना' पत्रात्मक कादंबरी आहे. यौवनात स्त्री सहवासात बेबंदपणे आयुष्य घालवलेल्या युवकाला वृध्दापकाळी झालेल्या पश्चातापाची ही कथा आहे. 'आग', 'वर्षाव', 'अडीच अक्षरे', 'अंतराल' इत्यादी कादंबऱ्या लिहून सुध्दा भाव्यांना जे स्थान कथाकाराच्या रूपात सहजतेने प्राप्त झाले ते कादंबरीकार म्हणून प्राप्त झाले नाही. त्यांच्या पात्रांची मनोरचना एकेरी असते आणि सामाजिक भानही अंधुक असते. वाचकांच्या कल्पना विलासाला अधिक बाव न देता अधिकाधिक निवेदन करणारी भाव्यांची भाषा जणू एखादया धबधब्यप्रमाणे कोसळत राहते. त्यांच्या कादंबऱ्यात मानसशास्त्राच्या दृष्टीने प्रभावी करता येण्यासारख्या व्यक्तिरेखा आणि मनोवृत्ती असूनही भावे त्या दिशेने जात नाहीत.

वसंत कानेटकर मराठी साहित्यातील प्रतिष्ठित नाटककार आहेत. १९५१ मध्ये त्यांच्या 'घर' या कादंबरीतून त्यांनी आगळे वास्तववादी अनुभव व्यक्त केले. मुंबईसारख्या महानगरात घराच्या अभावी झालेल्या मध्यमवर्गीय तरूण मनाच्या कुंठित मनस्थितीचे सुदंर चित्रण यात आहे. नंतर 'पंख' (१९५३) आणि 'पोरका' (१९५७) प्रकाशित झाल्यानंतर कानेटकर अधिक यश देणाऱ्या नाटयक्षेत्राकडे वळले.

समाजाच्यां खालच्या स्तरातील ग्रामीण स्त्रियांचे दुर्दशापूर्ण वास्तविक रूप सादर करणारी अण्णाभाऊ साठयांची 'चित्रा' ही पहिली कादंबरी १९५१ मध्ये प्रकाशित झाली. त्यांची 'चंदन' मुंबईच्या फुटपाथवरील जीवनाचे वास्तव वाचकासमोर आणते. 'फकीरा' त्यांची यशस्वी कादंबरी ठरली. ज्या माग जमातीत खूद्द लेखकाचा जन्म झाला त्या मांग जमातीच्या वीरतेचे, साहसाचे, निष्ठेचे चित्रण 'फकीरा' मध्ये उत्कटतेने झालेले दिसते. दलित जीवनावर विपुल लेखन करून अण्णाभाऊ साठयांनी मध्यम वर्गाच्या कुंपणापलीकडच्या भयावह वास्तवाचे रूप वाचकांसमोर तर आणले परंतु मराठी कादंबरीच्या सूडो–रोमांटिक प्रणयप्रधान परपरेपासून मात्र ते दूर राहू शकले नाहीत... त्यामुळे त्यांच्या साहित्यात भडकपणा अन् नाटकीपणा अधिक जाणवतो..

गंगाधर गाडगीळांची कादंबरी 'लिलीचे फूल' १९५५ मध्ये प्रकाशित झाली. ही त्यांची कादंबरी प्रेम अन् वासनेच्या विचित्र संबंधीचे विश्लेषण करणारी रसरसीत आणि मनोवैज्ञानिक कादंबरी आहे. वाचकाला स्वप्नसृष्टीत घेऊन जाण्यात ही कादंबरी सफल होते. दुर्दैवाने तिच्यातल्या प्रतिमासृष्टीच्या प्रभावी आविष्काराकडे लक्ष दिले गेले नाही. एकदा विशिष्ट सामाजिक आशयाचीच अपेक्षा कादंबरीकाराकडून केली. तर अशा मानसशास्त्रीय वास्तवाला चिमटीत धरून उडवलेल्या तुसा सारखे उडवणे शक्य आहे. पण कादंबरीकाराच्या आशया विषयीचा आपला पूर्वग्रह बाजूला ठेवून वेध घ्यापचा व त्याच्या आशयाच्या कलात्मक अभिव्यक्तिचे स्वरूप प्रथम पहायचे ही समीक्षेची प्राथमिक अट स्वीकारली तर गाडगीळांच्या या कादंबरीत प्रतिमा आणि प्रतीकांच्या सहायाने फुललेली मानसशास्त्रीय वास्तवता निश्चित लक्षणीय वाटेल. मला वाटते या अंगाने मराठी कादंबरी फारशी विकसित झाली नाही. गाडगीळांची सर्वात महत्वाची कादंबरी 'दुर्दम्य' १९७१–७२ साली प्रकाशित झाली. लोकमान्य टिळकांचे जीवन अन् त्या वेळची परिस्थिती यातून गाडगीळांनी टिळकांचे विकासमान अंतर्व्यक्तित्व साकारण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. इतिहास आणि कादंबरी यांचे यथोचित भान ठेवून लिहिलेली मराठीतील ही पहिली 'सिग्निफिकेट' चरित्रात्मक कादंबरी ! तिचा अधिक विचार पुढे केला आहे.

अनुक्रमणिका

मराठी साहित्यात ग्रामीण कादंबरीचा आरंभ निश्चित कोणत्या तारखेला झाला असेल तेव्हा तो होवो पण खऱ्या अर्थी ग्रामीण कादंबरीचे रूप पुढे आले ते व्यंकटेश मांडगुळकरांच्या 'बनगरवाडी' मुळे.

जीवनाचे वास्तववादी चित्रण एका प्राथमिक शाळेच्या शिक्षकाच्या नजरेतून करताना माडगूळकरांनी आपल्या चित्रदर्शी शैलीचा उत्तम प्रत्यय हया कादंबरीतून दिला. नैसर्गिक दृश्यांची रमणीयता इथे दिसणार नाही. परंतु धनगर जमातीच्या वैशिष्टयांना चित्रात्मक रूप देण्याची क्षमता, विलक्षण सूक्ष्म निरीक्षणशक्ती आणि कथाकथनाची कला या कारणांमुळे 'बनगरवाडी' ने मराठी साहित्यात एक विशिष्ट स्थान मिळवले. पुढे त्याची 'सत्तांतर' कादंबरी गाजली. काम आणि भूक यांच्या प्रमाणेच सत्ता ही एक माणसाची मूलभूत प्रवृत्ती आहे आणि ती मानवाच्या आदिरूपातून संक्रांत होत आहे याचे चित्रात्मक दर्शन ही कादंबरी घडवते.

१९६० नंतर ज्या वाङ्मयीन प्रवृत्ती बहरल्या त्यांची बीजे स्वातंत्र्योत्तर काळात दिसतात. साहित्याने विशेषतः कादंबरीसारख्या कालविदग्ध वाङ्मयप्रकाराने गतिशील जीवनाशी आंतरिक, भावनात्मक संबंध ठेवून काळाप्रमाणे मिळालेली समस्यांची आव्हाने घेतलीच पाहिजेत. काही लेखक मागे वळून पाहातात. त्याचाही जिवंतपणा चैतन्यशील संवेदनात्मक अंगाशी संबंध्द असतो. ही चैतन्यमयता जीवनाच्या गतीबरोबर दृष्टी ठेऊनच जिवंत राहाते. याचा अर्थ असा की रणजित देसाईची ऐतिहासिक पेशवे गाथा ऐतिहासिक असली तरी स्त्री–पुरुष संबंधातली काहीशी मुक्ततेची प्रेरणा समकालीन जीवनातून मिळाल्याशिवाय तिला प्राप्त झालेले विशिष्ट रूप एरवी येणार नाही. दलितांवर झालेल्या प्रतिष्ठितांच्या अन्यायाच्या बोचक जाणिवेशिवाय 'मृत्युंजय' मधला कर्ण आकार घेऊ शकत नाही. सामाजिक जीवनात निर्माण झालेल्या शोषितांच्या जीवनाविषयीच्या आस्थेशिवाय 'बनगरवाडी' लिहिली जाऊ शकत नाही. प्रेमातील वासनेच्या आदिबंधाविषयी सामाजिक जीवनात काहीशी भावनात्मक सहानुभूती निर्माण झाल्याशिवाय राधा–बापूच्या प्रणयातली बेहोशी निर्माण होऊ शकत नाही. स्वातंत्र्योत्तर काळात माणसाचे व्यक्ती म्हणून अनुभव घेण्याचे स्वातंत्र्य मान्य होऊ लागले. स्त्रीला पुरुषासारख्याच भावना, वासना असतात आणि त्याच्या इतक्याच स्वातंत्र्याची तिलाही गरज आहे. तिला घराबाहेर व्यक्ती म्हणून कर्तृत्व आहे, प्रसंगी पुरुष निरपेक्ष जीवन जगता येण्याचा अधिकार आहे, नैतिक बधने स्त्री–पुरुष दोघांना स्वीकारण्याचा वा काही बाबतीत नाकारण्याचा अधिकार आहे हे जवळ जवळ मान्य झाले. लैंगिक संबंधाविषयी मोकळे पणाने बोलता येण्याची शक्यता उत्पन्न झाली. जाति व्यवस्थेची जोखडे तीव्रतेने रूतू लागली. केवळ आपण भोगलेलेच तेवढे सत्य आणि तेवढेच वास्तव व्यक्त करण्याने साहित्यिक गुणवत्ता निर्माण होण्याची शक्यता असते या समजुती वर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले. भाषेवरची अभिजातीय मुद्रा प्रश्नांकित झाली आणि जनजीवनाशी साहित्यिक भाषेचा अनुबंध वाढू लागला. साहित्य प्रवाह आपल्या जातिगत, धर्मगत, वर्गगत मर्यादांच्या बाहेर जाण्यासाठी खळखळू लागला. या सर्वांचा परिणाम १९६० नंतरच्या साहित्यावर प्रभावीपणे झाला. देशीयतेचा जो अंकूर केतकरांच्या कादंबऱ्यात वाढू लागला त्याची झपाटयाने वाढ स्वातंत्र्योत्तरकाळात १९६० च्या आधीच झाली. भाषेच्या अंगाने या बाबतीत केलेले दांडेकरांचे योगदान आणि काहीसे स्वभावासरशी संवादांचा देशी व कोकणी शैलीवैशिष्टयांचा बाज या बाबतीत पेंडसे, माडगूळकर यांची दाखवलेली तत्परता महत्वाची आहे.

१९६० नंतर

१९६० नंतर मराठी कादंबरीमध्ये आधीच्या काळात बीज रूपात आढळणाऱ्या प्रवृत्ती फुलू–फळू लागल्या. हा काळात जोमदार पणे आकार घेण्याच्या वाङ्मयीन प्रवृत्तीचे चित्र पाहण्यापूर्वी काही साठोत्तर महत्वपूर्ण कादंबरीकारांच्या कर्तृत्वाचा धावता आढावा घेणे जरूरीचे आहे.

मराठीतील एक महत्वपूर्ण कादंबरीकार शरच्चंद्र मुक्तिबोध यांची 'क्षिप्रा' १९५४ मध्ये प्रकाशित झाली. अर्थात त्यांच्या बृहतकादंबरीचा हा पहिला प्रयत्न होता. एकूण ५०३ पानांची ही कादंबरी तीन खंडांमध्ये समाप्त होते – 'क्षिप्रा' (१९५४), 'सरहद्द' (१९६२) 'जन हे वोळतु जेथे'. 'बळी' ने जी वास्तववादी कादंबरीची परंपरा समर्थपणे सुरू केली होती त्याचेच विकसित रूप या



त्रिखंडात्मक कादवरीत पाहावयास मिळते. मराठी कादंवरीच्या क्षेत्रात केतकर आणि पु. य. देशपांडे यांच्या कादंवरीलेखनावर वैचारिकतेचा प्रभाव जाणवतो, परंतु मुक्तिबोधामध्ये मात्र ही वैचारिकता पूर्णतः कादबरीच्या जीवनानुभवात मिसळून गेल्याचे जाणवते. कादंबरीचा नायक विशू भावुक असून ही चिंतनशील आहे. आणि जीवनात येणाऱ्या प्रत्येक अनुभवाचे मूल्यांकन करणे आणि आपल्या 'स्व' चा शोध करणे हा त्याचा स्वभाव आहे. जबरदस्त आवेग (पॅशन) आणि त्या विरुध्द त्याला संयमित करणारा त्याचा विवेक या दोहोंमधील विशूचा मानसिक संघर्ष दर्शनीय आहे. विशू आणि त्याच्या कुटुंबीयांतील नात्यांच्या गुंत्यामधून लेखकाने आपली दृष्टी बरोबर आर्थिक, पारिवारिक अन् सांस्कृतिक वास्तवावर ठेवली आहे. त्यामुळेच पूर्ण कादंबरीला व्यापकतेचे परिमाण लाभले आहे. सगळया भयावह परिस्थितीच्या विरूध्द सफलते–असफलतेच्या संघर्षात आपली मानवीय स्थिती स्पष्ट करणारी चरित्र–सृष्टी सजीवपणे चित्रित झालेली दिसते. जगाच्या विषमत्तेमुळे व्याकुळ होणारा अन् आपल्या अंतर्व्यथेला प्रकट करू पाहणारा विशू शेवटी समाजप्रबोधनाचा मार्ग निवडतो. जरी या मार्गावर त्याला त्याच्या समस्यांचे उत्तर मिळत नसले तरी हाच मार्ग त्याला आत्मिक संतोष मिळवून देतो. जनवादी दृष्टीतून लिहिलेल्या त्रिखंडीय कादंबरीमुळे मुक्तिबोध मराठीतील एक अग्रणी कादंबरीकार गणले जावेत.

उध्दव शेळकेंची 'धग' १९६० मध्ये प्रकाशित झाली अन् कठोर, उग्र, भयावह, वास्तवाला सामावणारे एक वेदनामय ग्रामीण दृश्य वाचकांच्या समोर आले. जीवनसंघर्षात पशुपेक्षा थोडासाच वरचा स्तर असणारे जीवन कौतिक अन् तिच्या कुटुंबाच्या वाटयाला आले आहे. आर्थिक विषमता आणि दारूण नैराश्य यांच्या खोल दरीत ढकलणारे कौटुंबिक जीवन् आणि क्रूर नियतीविरूध्द संघर्ष यातून जाताना आपल्या मुलांवर सर्व लक्ष एकवटणारी कौतिक शेवटी वेडी होते. खरेतर हेच व्हायचे होते. शेळके कुठेही भावुक न होता या स्त्रीची दारूण कथा चित्रित करतात. अतिशय सामान्य प्रसंग, सामान्य जन आणि तितकेच सामान्य जीवन, परंतु या कलाकाराच्या हातात हे द्रव्य आल्यावर त्याच्यातूनच अद्वितीय कलाकृती निर्माण होते. 'धग' मराठी कादंबरीत अव्वल स्थानावर मानली जाते. पेंडसे यांची 'रथचक्र' आणि उध्दव शेळके यांची 'धग' यांचा तुलनात्मक अभ्यास केला तर 'धग' ची वास्तवदर्शी आग अधिक जाळणारी वाटते. 'अगतिका' मध्ये उध्दव शेळके कुष्ठरोगी मध्यमवर्गीय स्त्रीच्या करूण वास्तवाचे दर्शन घडवतात. 'बाईविना बुआ' हया कादंबरीकडे जर मनोवैज्ञानिक दृष्टीने पाहिले नाही तर तिच्यावर अश्लीलतेचा आरोप केला जाऊ शकतो. परंतु पत्नीच्या अनुपस्थितीत एका निष्क्रिय व्यक्तीच्या मानसिक विकृतींचे कुशलतापूर्वक चित्रण या कादंबरीत केले गेले आहे. या तीन कादंबऱ्यानंतर सुध्दा शेळके लेखन करीत होते. परंतु नंतर ते रंजनवाद आणि लोकप्रियता यांच्या आहारी गेले.



हयाच कालखंडातील महत्वाचे लेखक चि. त्र्यं. खानोलकर अत्यंत प्रतिभाशाली लेखक होते. काव्य, नाटक, कथा, कादंबरी, असे सर्व प्रकारचे त्यांचे लेखन प्रतिष्ठित ठरले. 'रात्र काळी घागर काळी' १९६३ मध्ये प्रकाशित झाली आणि एका अनोख्या संवेदनशील आणि प्रतिभाशाली लेखकाचे मराठी वाचकाला दर्शन झाले. त्यानंतर 'अजगर', 'चानी', 'कोंडुरा' (६६), 'पाषाणपालवी' (७६) 'अगोचर' (७५), 'भागधेय' ७० इत्यादि कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. कवीची सूक्ष्म तरल भावुकता आणि प्रतिमाधर्मी भाषा, कादंबरीकाराची मोठया व्यापक पृष्ठभूमीवर धैर्याने (पेशन्स) चित्रण करण्याची वृत्ती, कथाकाराची अनुभवाच्या क्षणांना अचूक आपल्या लेखणीत पकडण्याच क्षमता आणि नाटककाराची दृश्य साकार करण्याची, जीवनातील मार्मिक प्रसंगाना योग्य तऱ्हेने सादर करण्याची कुशलता या साऱ्यांचा खानोलकरांच्या कादंबरीत झालेला समन्वय, त्यांच्या कादंबरोला उच्च स्थान मिळवून देतो. सौंदर्याचा विलक्षण प्रभाव आणि वेदना देत चिरंडू पाहणऱ्या नियतीशी त्याचा शोकांत संघर्ष, सेक्सची मांसल आग आणि आत्मा जाळू पाहणारी दाहकता, कोणत्या ना कोणत्या स्वत्वाशी इमान ठेवण्याच्या नादात सर्वस्वी हरणाऱ्या पात्रांची करुण मानसिकता, आणि मानवी जीवनाचे गूढ शोधण्याची वृत्ती ही खानोलकरांच्या कादंबरी सृष्टीची काही महत्वाची वैशिष्टये आहेत. खानोलकरांच्या कादंबऱ्यांचे नागरी, ग्रामीण, प्रादेशिक इत्यादी प्रकारांत वर्गीकरण करणे म्हणजे त्यांच्या मौलिकतेची उपेक्षा करण्यासारखे आहे. कोकणच्या

लोकजीवनाचा गंध खानोलकरांच्या चरित्रसृष्टीमध्ये एकजीव होऊन लोकजीवनाचे अजब रसायन तयार करतो. खानोलकरांचे साहित्य वाचताना चिरंतन मानवी वेदनेची जाणीव सतत होत राहते. खानोलकरांची बरीचशी स्त्री–पुरूष पात्रे मनावर करुण सुरावटीचा नाद उमटबीत समाप्त होतात. खानोलकर एक स्वयंभू कलाकार होते. त्यांची विविध प्रकारची पात्रे पाहून आश्चर्य वाटते. कारण एकलकोंडी वृत्ती, जीवनातील निरर्थकतेची खोल जाणीव, मनाच्या घालमेलीचे, वास्तव, नैराश्य इत्यादी मनोवृत्तांनी ग्रासलेली ही पात्रे अस्तित्ववादी विचारधारेने प्रभावित झालेल्या लेखकाच्या व्यक्तित्वाची निर्मिती वाटते. पण प्रत्यक्षात खानोलकर पाश्चिमात्य साहित्य किंवा विचारांपासून तसे दूरच होते. कारण त्यांचे पाश्चात्य वाङ्मयाचे वाचन नव्हते. नैतिकतेच्या एकतर्फी आणि तकलादू कल्पनेतून खानोलकरांच्या कादंबऱ्यांचे मूल्यांकन करणे म्हणजे त्यांच्या कलात्मक वर्चस्वाला जाणून बुजून उपेक्षित करण्यासारखे आहे. नैतिकतेच्या स्थूल कसोटीवर मानवी जीवनाचे अनुभव पारखण्याची अरसिक संवय एकदा लागली की खानोलकरांच्यासारख्या माणसाच्या आदिम जीवनाला स्पर्श करणाऱ्या अनुभवातील वासनेचे अपरिहार्य चित्रण आणि त्यांची प्रतिमाधर्मी काव्यात्मक अभिव्यक्ती यातले मर्म आकळणे कठीण जाते.

अनुभव किंवा वाङ्मय प्रकारासंबंधी कादंबरीची रूढ परंपरा सोडून एक नव्या प्रकारची कादंबरी १९६२ मध्ये प्रकाशित झाली ती म्हणजे भालचंद्र नेमाडयांची 'कोसला'. पंचवीस वर्षाच्या पांडुरंग सांगवीकरला जाणीव होते ती आपल्या जीवनाच्या निरर्थकतेची, असंगतीची आयुष्य साकारणाऱ्या घटकांमध्ये आई–वडील, कुटुंबीय समाज, शिक्षणसंस्था, शहर किंवा गावातील मित्रमंडळी, या साऱ्यांचेच तो पारंपारिक दृष्टी बाजूला ठेवून निरीक्षण करतो आणि त्याला जाणवते ती उदास शून्यता. ती शांत करण्यास आध्यात्मिक जिज्ञासासुध्दा अपुरी ठरते. 'कोसला' मराठी साहित्यातील एक अद्‌भुत घटना आहे. कथा, पात्र चित्रण, प्रसंग चित्रण, जीवनातील भव्य उदात्ततेच्या ठराविक पारंपारिक कल्पना हा साचा ही कादंबरी दूर सारते. भाषेपासून अनुभवविश्वापर्यंत सर्वत्र केवळ मोडतोड आहे–तरीही कलाकाराच्या ताकतीचा प्रभाव संमजस वाचकांवर पडल्याशिवाय राहत नाही. कादंबरीसंबंधी चिंतनावर आणि कादंबरीच्या स्वरूपावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी अशी ही कलाकृती आहे. नंतर नेमाडेंनी 'बिढार', 'जरीला', 'झूल' मध्ये पांडुरंग सांगवीकरचे नव्या रूपात चांगदेव पाटीलच्या माध्यमातून आपल्या व्यक्तिमत्वाच्या संगठनेचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या सीमा ही यात स्पष्ट झाल्या आहेत. या कादंबऱ्यांत मोडतोडीकडून संगठनेकडे जाण्याचा प्रयत्न दिसतो.

'बिढार' मध्ये 'कोसलातलाच' कॉलेजमधला युवक चांगदेव पाटील या नावाने मुंबईतल्या नवयुवकांच्या अनियतकालिकाच्या जगातले वैविध्यपूर्ण अनुभव घेताना दिसतो. या धडपडणाऱ्या युवकांच्या विविध तऱ्हा आणि त्यांची रूपे प्रभावीपणे नेमाडे यांनी दाखवली आहेत. 'कोसळा' मधीला पांडुरंग आपल्या आतून. स्वयंकेंद्रित पणातून बाहेरच येऊ शकत नाही, मात्र त्याची जीवन जगण्याची जिजीविषा आणि लोकांबद्दलची खरीखुरी कळकळ, जीवन 'ऑथेंटिकली' पारदर्शी प्रामाणिक पणे जगण्याची धडपड नेमाडे यांनी उत्तम प्रकारे दाखवली आहे. पुढे चांगदेव पाटीलमध्ये ही वैशिष्टये अधिक भारदस्त वैचारिक स्तरावर व्यक्त होतात. मुंबईतली मनोरंजनाची साधने, साहित्य निर्मितीची आणि सामूहिकरित्या ते प्रकाशित करण्याची धडपड चित्रित करताना चांगदेव पाटीलच्या मनातली प्रचंड खळबळ व्याकुलता आणि जीवनाचा अर्थ शोधण्याची धडपड नेमाडे प्रभावी पणे व्यक्त करतात. मुंबईतले जीवन सुसहय होत नाही. म्हणून तो छोटया शहरात प्राध्यापक बनून येतो आणि तिथे रमण्याचा, नवी माणसे जोडण्याचा, त्यांच्या सुखदुःखांशी समरस होण्याचा प्रयत्नही करतो. पण कुठेतरी आत गुप्त रोगांची शंका त्याला कुरतडत असते. व्यक्ती म्हणून जाणवणारी अर्थशून्यता मनात बाळगूनही तो कुटुंब, लोकजीदन, यांच्याशी व्यक्तीच्या असलेल्या चिवट धाग्यांची दखल घेतो. तो 'कोसला' मधल्या पांडुरंग सांगवीकर सारखा कोषात गुरफटलेला नसतो व त्याच्यापेक्षा खूपच सामर्थ्यवान, आस्थाशील व प्रयत्नशील असला तरी समाजाचे सर्व पदर अजूनही विस्तृतपणे खोलपणे पाहू शकत नाही. त्यामनाने ही कादंबरी खूपच आत्मनिष्ठ आहे. त्यांची तिसरी कादंबरी, 'जरीला' जीवनानुभावाशी अधिक सरळपणे.

भिडणारी आहे आपल्या मनातली पोकळी नव्या वातावरणात धडपड करण्यात बुजवून टाकण्याची तृष्णा त्याला नवनव्या कार्यात गुंतवून घेण्यास भाग पाडते. मात्र या भटकेपणात समतोलपणा येऊ शकत नाही. या सर्व धडपडीत शिक्षण, शिक्षणसंस्था, शिक्षकांच्या जीवनातील खुरटलेपणा या सर्व गोष्टी प्रभावीपणे प्रकट होतात. 'जरीला' मध्ये एका बाजूने सर्व अनुभव कॉलेजपुरते मर्यादित केले आहेत पण दुसऱ्या बाजूने भारतीय समाजातील जातीयवादाचे रूप राष्ट्रीय व आतराष्ट्रीय घडामोडी व वैवाहिक संस्थेचे रूप इत्यादी कितीतरी गोष्टींशी चांगदेव पाटील भिडतो. चांगदेव पाटील जरीला मध्ये अधिक प्रौढ दिसतो. जरीला वाचत असताना सारखं वाटत राहातं की चांगदेव कधी अन्तर्मनाला अस्वस्थ करणाऱ्या भिरभिर फिरायला लावणाऱ्या यक्ष प्रश्नाला डोळा देणार आहे काय ? एका बाजुला 'जरीला' म्हणजे सामान्य माणसाच्या जिजीविषेचं, समजुतदार जीवन विषयक तत्वज्ञानाचं, अतिरेकीपणा टाळून जीवन शांतपणे स्वस्थपणे जगू इच्छिणाऱ्याचं मोहमुग्ध करून टाकणार विश्व आहे. जीवनविषयक अतिरेकी कल्पनाचं मूळ किंवा जन्मस्थान शिक्षित मनच आहे ही भूमिका घेऊन स्वतःच्या हरण्यातून, पलायनातून सामान्य माणसाची जीवनदृष्टी कधी अधिक ग्राहय आहे हे नेमाडे सुचवतात. पुढे एका बाजूला प्रचड एकटेपणातून आलेली मांनसिक विकृती आणि दुसऱ्या बाजूला भारतीय जीवनात असलेलं गृहस्थ धर्माचं, कुटुंब संस्थेचं महात्म्य यांच्यातील अंतर कलात्मकतेने दाखवित नेमाडे भारतीयतेकडे येतात. आधुनिक माणसाच्या शोकांतिकेवर काही अमृत सांपडणार आहे काय ? या प्रश्नाच्या उत्तरासाठी वाचकाची जिज्ञासा कमालीची उंचावण्यात 'जरीला' कादंबरीला यश मिळालं आहे. हे या कादंबरीच्या वयस्कतेचं लक्षण आहे. त्यानंतरची 'झूल' 'जरीलाची' उंची गाठू शकली नाही. तरही भालचंद्र नेमाडे यांची संकल्पित कादंबरी 'हिंदू' त्यांच्या जीवनविषयक दृष्टीचा कलात्मक विन्यास समग्रपणे प्रस्तुत करील अशी प्रचंड अपेक्षा मराठी वाचकांमध्ये निर्माण झालेली आहे. 'झुल' मध्ये छोटया शहरातून स्थापन होत जाणाऱ्या विद्यालयातील दारूण स्थितीचे जवळ जवळ समग्र चित्रण आले आहे. प्राध्यापक, विद्यार्थी, प्राचार्य, कार्यकारिणीचे सदस्य आणि सरकारी अनुदानावर चालणाऱ्या या संस्थात आपल्या वैयक्तिक मालकीची संपत्ती समजून आपल्या राजकीय सत्तास्थानासाठी शैक्षणिक बाबींना पूर्णपणे धुडकावून लावून कारभार करणारे अध्यक्ष या सर्व वास्तवाचे भेदक चित्रण विनोदाच्या अंगाने केल्यामुळे ही कादंबरी विलक्षण पकड घेते. भालचंद्र नेमाडेंच्या साहित्यकृतींनी काही समीक्षक इतके प्रभावित आहेत की, त्यांना ते मराठीतील एकमात्र सर्वश्रेष्ठ कादंबरीकार मानतात. मात्र त्याचवेळी जयंत. दळवी, भाऊ पाध्ये, मधु मंगेश कर्णिक यांच्या स्वतःच्या मध्यम वर्गीय वृत्तीतून बाहेर पडण्याचा धडपडीच्या संदर्भात नेमाडयांच्या कृतित्वाचा पुनर्विचार आवश्यक वाटतो. दुसरा काहीसा अस्वस्थ करणारा प्रश्न म्हणजे नेमाडे यांचे सर्व नायक एकाच पध्दतीने अनुभव घेतात आणि अभिव्यक्तीही जवळपास तशीच करतात. ही सीमा नाही काय ?

मध्यमवर्गीय वास्तवाचे सीमोल्लंघन

जयवंत दळवी कथाकार, नाटककार, विनोदी लेखक आणि कादंबरीकार या विविध रूपांत १९६० नंतर साहित्यविश्वात प्रसिध्द होते. १९६३ साली दळवींची 'चक्र' ही कादंबरी प्रकाशित झाली आणि मध्यमवर्गीय वाचकांसमोर मुंबईच्या झोपडपट्टीचे नरकतुल्य जग सामूहिक स्वरूपात उभे ठाकले वाचकांच्या मध्यमवर्गीय मनाच्या वास्तवासंबंधी कल्पनेला तडे देण्याची शक्ती निश्चितच 'चक्र' मध्ये होती. 'चक्र' ने मराठी कादंबरीच्या अनुभव विश्वाच्या क्षेत्राचा विस्तार केला. कारण त्याच सुमारास मधु मंगेश कर्णिकांची 'माहीमची खाडी' (६३) प्रसिध्द झाली. हिच्यात तेच झोपडपट्टीचे भयावह जीवन, घाणेरडया विकृतींनी भरलेल्या, सेक्स आणि पोटाच्या भूकेने तडफडणाऱ्या वास्तवाचे दर्शन घडवणारा एक वास्तवाचा तुकडा आढळतो. भाऊ पाध्यांची 'वासूनका' ही कादंबरी फुटपाथवरील व त्याच्या आजूबाजूच्या गल्लीतील दिशाहीन, अस्थिर जीवनाचे जग समोर घेऊन आली तर जीवनासमोर उभ्या राहणाऱ्या उग्र समस्या त्यानी मांडल्या. भा. ल. पाटीलांच्या 'वस्ती वाढते आहे' कादंबरीत हा होणारा बदल मध्यम वर्गाच्या लेखकांच्या नजरेतून पहाण्यापेक्षा खालच्या थरातील जीवन दृष्टीने वास्तव जीवनाचे चित्रण करणारा होता.

दळवींनी लैगिंक दृष्टीने अतृप्त व्यक्तींच्या विकृतींचे

'स्वागत' आणि 'अथांग' मध्ये चित्रण केले. हे एका निरोगी मनाच्या लेखकाने केलेले विकृती चित्रण असल्यामुळे त्यात मानवी मनाला भिडण्याची ताकद आहे. लैंगिक प्रवृत्तीच्या उत्तेजनाची भावना त्यात नाही. (चंद्रकांत खोतांच्या तथाकथित आधुनिक 'उभयान्वयी अव्यय' या कादंबरीत मात्र ही भावना दिसते. तसेच ह. मो. मराठयांच्या पहिल्या काही कादंबऱ्यांमध्ये सुध्दा याच भावनेचा प्रभाव जाणवतो). जयवंत दळवी माणसाच्या वेडसरपणाच्या रोगाने आणि त्यातील कारुण्याने बिध्द झालेले लेखक आहेत. जयवंत दळवीना माणसाच्या अंतर्मनात डोकावून पाहाण्याचा कलात्मक नाद होता तसाच बाहेरच्या जगात चाललेल्या धडामोडी आणि त्यात उध्वस्त होत जाणाऱ्या व्यक्तित्वांचा वेध घेण्याची क्षमताही त्यांच्याकडे होती. याचा प्रत्यय 'चक्र' मध्ये आलाच. पुढे तो 'चक्रव्यूह' आणि 'सूर्यास्त' या दोन्ही कादंबऱ्यापासून येतो. भ्रष्टाचाराच्या चक्रव्यूहात अडकलेल्या सद्वर्तनी दुर्वर्तनी माणसांची ही जीवनावस्था या चक्रव्यूहात भलेपणा आणि दुष्टपणा असा फारसा प्रश्न नसतो. माणूस भ्रष्टाचराच्या चिखलात विवश झालेला आहे याचे प्रभावी चित्रण जयवंत दळवी करतात. राजकीय व्यवस्थेचं हे एक कटु आणि दारुण सत्य आहे. माणसाच्या वेडसरपणाचा न नांगारलेला प्रदेश जयवंत दळवीनी नांगरला. पुढे 'सारे प्रवासी घडीचे' (१९६४) मध्ये जयवत दळवीनी बालपणीच्या आठवणीतून कोकणी माणसांची खुमासदार व्यक्तिचित्रे विनोदी अंगाने उभी केली आहेत. ही एक मराठीतील आगळया बाजाची कादंबरी आहे. 'महानंदा' (७०) मध्ये खेडयातील भाविणीच्या मुलीच्या जीवनाचे शोकात्म रूप रेखाटले आहे. 'धर्मानंद' (८०) कादंबरी खेडयातील उच्च वर्गीय कुटुंबाच्या शोकान्त गतीची व्यथागाथा आहे.

मराठीत वामन इंगळेंनी 'काळा समुद्र' (१९६५) मध्ये समलिंगी विकृतींवर बोट ठेवले आहे. 'ऑक्टोपस' मध्ये श्री. ना. पेंडश्यांनीही याच विकृतीकडे ढोबळ निर्देश केला होता. लैंगिक विकृर्तीना वेगळया वाटेने हाताळण्याचा प्रयत्न अच्युत बर्वेच्या 'कॅलिडोस्कोप' आणि वि. ज. बोरकरांच्या 'जिराफ' मध्ये दिसतो. पण हे प्रयत्न अपयशी ठरले. लैंगिक, जीवनाचा रंजनासाठी उपयोग करण्याची प्रवृत्ति, समाजात तिचे भुकेच्या पातळीवर असलेले अस्तित्व आणि कलाकाराला अवरोधक वाटणाऱ्या स्थूल नैतिक कल्पना यांच्या मर्यादा ओलांडल्याशिवाय लैंगिक प्रश्न खऱ्या अर्थाने प्रभावी व कलात्मक होत नाहीत. (अपवाद नाटककार विजय तेंडुलकरांचा). पुढे तरुण लेखक सुमेध वडावाला यानी एका दिवाळी अंकात लिहिलेल्या कादंबरीत (तृषा) समलैंगिकभोगाच्या आहारी गेलेल्या तरूणांच्या मानसिकतेचा नेटाने वेध घेण्याचा प्रयत्न केला. प्रत्यक्ष लैंगिक भोगाच्या क्रियेचे कुठेही वर्णन न करता त्यामागची व्यथा आणि अपराधीपणाची जाणीव त्यानी प्रभावीपणे व्यक्त केली आहे. यातील मानसिक शोकात्मतेची जाण कादंबरीस दर्जेदार बनवते.

दळवीनंतर भाऊ पाध्येंचे नाव मराठी कादबरीकारांत महत्वपूर्ण आहे. भाऊ पाध्येंनी महानगरचे भकास वास्तव अनुभवले आहे. त्याचे वास्तविक रूप प्रस्तुत करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. घराच्या शोधात संत्रस्त झालेल्या आणि जीवन निरर्थक वाटणाऱ्या युवकाच्या मानसिकतेचे चित्रण 'वैतागवाडी' मध्ये (१९६४) केलेले आहे. त्या पूर्वीची 'डोंबाऱ्याचा वेळ' ही कादंबरी राजनैतिक विचार आणि ट्रेड युनियनच्या वातावरणाचे चित्रण करते. भाऊ पाध्येंची रोमांटिसिझमला छेद देणारी दृष्टी त्यांना लोकप्रिय बनवू शकली नाही. १९६५ मध्ये प्रकाशित झालेल्या 'वासुनाका' ने त्यांना लोकप्रियता मिळवून दिली. 'बॅ. अनिरूध्द धोपश्वरकर' वर अस्तित्ववादी विचारांचा थोडासा प्रभाव जाणवतो. ॲंटी हीरोला साकार करण्याचा पाध्यांचा प्रयत्न या कादंबरीत बराचसा सफलही झालेला दिसतो. 'होमसिक ब्रिगेड' (७४) 'राडा' (७५) 'वणवा' (७९) या त्यांचा अन्य कादंबऱ्या आहेत. भाऊ पाध्यांच्या लेखनाबाबत समीक्षकात बरेचसे मतभेद आहेत. सामान्य जनजीवनातल्या समस्यांबद्दल त्यांच्या दु:खाबद्दल, त्यांच्या अगतिकतेबद्दल प्रचंड कणव आणि आत्मीयता भाऊ पाध्यांमध्ये आहे. त्यांच्यातली चळवळीची सुप्त शक्तीही ते जाणतात. मुंबईच्या जीवनाचे एक समग्र चित्र भाऊ पाध्यांच्या अनेक कादंबऱ्यांच्या रूपाने साकार झालेले दिसते. त्यामुळे जीवनातील गद्यात्मकतेत निर्माण होणारी भाषिक रूपे आणि शब्दसंपदा यात त्याना भर टाकली आणि ही त्यांची जमेची मोठी बाजू आहे. तरीही मोठा कादंबरीकार होण्यासाठी अनुभवाच्या द्रव्यात जी वैचारिक

झेप आवश्यक असते ती भाऊ पाध्ये यांच्या कादंबरीत तितक्या समर्थपणे दिसत नाही. भाऊ पाध्ये विषय निवडीत प्रयोगधर्मता दाखवतात पण त्यांच्या अनुभवाविकासाच्या मांडणीत भरगच्चपणा येत नाही.

अस्तित्ववादी आभास

अस्तित्ववादी विचारधारेच्या मानसिक वृत्ती–प्रवृत्तींनी प्रभावित झालेल्या काही कादंबऱ्या मराठीत आल्या. जीवनाच्या असंगतीची जाण, आत्मनिर्वासन, एकटेपणा, निरर्थकेतेची जाणीव, क्षणभंगुर जीवन जगण्याची आस, जीवनातील घालमेल, भव्य–दिव्य प्रसंगाविरूध्द कार्टूनीबाजात उभे राहण्याची वृत्ती, स्वतःशीच इमानदार राहण्याच्या प्रयत्नात मनाच्या कप्यांना उघडण्याचे आणि स्वत्व शोधण्याचे प्रयत्न, दुसऱ्यांच्या उपस्थितीची दहशत आणि त्यांचा त्रास, जीवनाचा अर्थ जाणण्याचा ध्यास, मानवी संबंधाची सत्यता पडताळताना होणारी निराशा, कोणत्याही क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींविरूध्द एक विद्रोहांची भावना, आपल्याच वेदना आणि यातनांना विष समजून उत्पन्न झालेली मृत्यूची ओढ, जीवनाची यांत्रिकता, वृत्तीतील उपरोध व उपहास या सर्व द्रव्यावर आधारित मराठी कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. काही उल्लेखनीय कादंबऱ्या वसंत आबाजी डहाकेंची 'अधोलोक', त्र्यं. वि. सरदेशमुखांची 'बखर एका राजाची', किरण नगरकांची 'सात सक्कं त्रेचाळीस', कमल देसाईची 'काळा सूर्य', 'रात्रं दिन आम्हां', दीनानाथ मनोहरांची 'रोबो' (७४) इत्यादी या कादंबऱ्या १९६०–८० च्या कालखंडात प्रकाशित झाल्या. विलास सारंग यांची 'एन्कीच्या राज्यात' ही कादंबरी मराठी वाचकाला विदेशी वातावरणात नेते आणि माणसाच्या स्वतंत्र्याची, मनाची कुचंबणा व अगतिकता प्रभावीपण व्यक्त करते. माणसाला यातना देणाऱ्या एकटेपणाचा वेध सारंग उत्कृष्टपणे घेतात पण त्यांचे वास्तव व्यक्तीच्या मर्यादांनी सीमित झालेलं आहे. ''एन्कीच्या राज्यात'' व्यक्तीच्या कोंडमाऱ्यासाठी मागचे बाहय वास्तव पुरेशा ताकतीने उभारले जात नाही. त्यामुळे यातील व्यथा–वेदनांना वैश्विक राजकीय परिस्थितीची पृष्ठभूमी आणि भान आहे असं वाटत नाही.

इथे ए. वी. जोशींच्या 'काळोखाचे अंग' चा विशेष उल्लेख करावयास हवा. १९६६ मध्ये प्रकाशित ही कादंबरी जोशींच्या खास शैलीचे आणि जीवनुभवाच्या वैशिष्टयांचे दर्शन घडवते. हया पूर्वी हैद्राबादच्या रजाक आणि भारतीय सैन्यातील संघर्षावर त्यांनी – 'रानभूल' ही कादंबरी लिहिली होती. 'काळोखाचे अंग'ची बहुतार्थ सूचित करण्याची शक्ती आणि नवीन अनुभव देण्याची कला यामुळे ही कादंबरी बरीच लोकप्रिय झाली. टीकाकारांमध्ये सुध्दा ही बहुचर्चित ठरली. महाविद्यालयीन तरुण–तरुणींच्या परस्पर संबंधावर आधारित ही कादंबरी प्रणयाच्या विविध रूपांना सादर करीत शोकपूर्ण स्थिती निर्माण करते. जोशींच्या व्यक्तिचित्रणाच्या कलेने पात्रे इतकी सजीव होतात की वाचकाच्या आसपास राहून त्याला ती छळत राहतात. माणसाच्या संबंधातील आरोह–अवरोह, विचार आणि नैतिक मूल्यांना उखडून टाकणाऱ्या रक्तातील ऊर्मी यांचे शक्तिशाली चित्रणात दिसते. रक्तातील ही आदिम प्रवृत्ती प्रभावीपणे मराठीत आणणारे कदाचित जोशी मोठे साहित्यिक ठरावेत. खानोलकरांच्या साहित्यातही यांचे दर्शन घडते परंतु नंतर लिहिलेल्या 'मी मी मी नटराज' (१९७८) आणि 'विश्वास' (१९८०) या कादंबऱ्या मात्र हया ऊंचीपर्यंत जाऊ शकल्या नाहीत.

ग्रामीण कादंबरीचे नवे वळण : खऱ्या अर्थाने समग्र ग्रामीणता

ग्रामीण कादंबरी हा तसा निश्चित अर्थ देणारा शब्द नाही, विवाद्य आहे. ग्रामीण वातावरणाच्या पार्श्वभूमीवर लिहिल्या गेलेल्या चिं. त्र्यं. खानोलकर यांच्याही कादंबरीला ग्रामीण म्हणणे शक्य आहे. आणि ती परंपरा १८८८ मध्ये कृष्णराव भालेकर यांनी लिहिलेल्या 'बळीबा पाटील' आणि १८५७ च्या 'दुष्काळ' या लेखनापर्यंत दाखवणेही शक्य आहे. परंतु ग्रामीण प्रवृत्ती ही एक साहित्यिक चळवळ म्हणून नंतर आकार घेऊ लागली. अण्णाभाऊ साठे हे दलित कादंबरीकारही आहेत आणि ग्रामीण कादंबरीकार ही. त्यांची 'फकीरा' (५९) ही पहिली ग्रामीण कादंबरी ग्रामीण भागातील लोकमानसात घर करून राहिलेल्या वीर पुरुषांच्या पराक्रमाचे चित्रण यात आहे. गावांतील दोन कुटुंबातील वैरावर, 'वैर' (६४) कादंबरी आधारलेली आहे. 'माकडीचा माळ' (६३) गोसावी, फासेपारधी, दरवेशी या भटक्या जमातीवर आधारलेली आहे तर 'वैजयंता' दलित

अनुक्रमणिका

समाजातील तमाशातील कलावंताच्या जीवनावर प्रकाश टाकते. त्यांच्या जीवनातील आर्थिक हालारवी, नैतिक मूल्यांची जपणूक करताना. होणारी कुतरओढ यांचे प्रभावी चित्रण असते. तरी अण्णाभाऊ लोकप्रिय साहित्याच्या वैशिष्टयांनी काहीसे कमजोर होतात, संघर्ष, खून, हिंसा, कामवासना, शत्रुत्व, योगायोग यानी आणलेल्या रंजकतेमुळे त्यांचे लेखन पुष्कळवेळा शक्ति–क्षीण होते.

आनंद यादवांच्या 'गोतावळा' १९७१ च्या प्रकाशानानंतर खऱ्या अर्थाने ग्रामीण कादंबरीमध्ये एक नवीन वळण आले. 'गोतावळा' ग्रामीण किंवा प्रादेशिक तर आहेच तरीही ती सार्वदेशीय आणि सार्वकालिक झाली आहे. कृषीसंस्कृतीवर अर्थाला प्राधान्य देणारी उद्योग संस्कृती अतिक्रमण करू लागते. यंत्रांनी मानवीय भावना अन् सांस्कृतिक मूल्यांवर आक्रमण केले हया अतिक्रमणाचे प्रभावी चित्र गोतावळामध्ये एका सामान्य शेतीमजुराच्या भावनिक माध्यमातून झाले आहे. 'गोतावळा' ची भाषा अनुभवाच्या अपरिहार्य आवश्यकतेमुळे गावरान असली तरी ती विलक्षण प्रतिमाधर्मी आहे. यातील आरंभापासून अंतापर्यंत ओतप्रोत भरलेले दुःख, पशू, मानव आणि प्रकृती यांचा विनाश, मानवी मूल्यांची होळी; एका बाजार संस्कृतीचे आक्रमण या साऱ्याचा अनुभव वाचकाचे संवेदनशील मन घेऊ शकत असेल तरच गोतावळाच्या विषयानुरूप भीषण नाटयाची जाणीव त्याला अतिशय बैचेन करील, सुन्न करील. यादवांची ''नटरंग'' ही तितकीच महत्त्वाची कादंबरी आहे. अस्पृश्य जातीत जन्मलेल्या कलाकाराच्या भीषण दैवाची ही करुण कथा आहे. तमाशात नाचणाऱ्या व्यक्तीच्या कलाकाराच्या रूपात असामान्य भूमिका करणाऱ्या नायकाला कला आणि जीवनातील अंतर न समजणारे सामान्य लोक कशा नरक यातना देतात आणि सगळया कुटुंबाला अपंगाचे जिणे जगावे लागते याचे मोठे धारदार चित्रण यादवांनी यात केले आहे. 'माऊली' आदिम प्राण्याच्या आदिम प्रवृत्ती चित्रित करते. आनंद यादव मराठीच्या अग्रणी साहित्यिकांमध्ये एक आहेत. त्यांनी 'झोंबी', 'नांगरणी', 'घरभिंती' यात आत्मचिरित्र सादर केले आहे. व्यक्ती, कुटुंब आणि समाज यांना, कादंबरीरूपात सादर करण्याचा हा प्रयत्न वाङ्मयीन दृष्टया अन् कलेच्या दृष्टीने सुध्दा अतिशय यशस्वी झाला आहे. त्यांची 'काचवेळ' मात्र प्रवासवर्णनीय झाली आहे.

राजकीय कादंबरी

साठोत्तरी कादंबरीमध्ये अरुण साधूनी आपले अग्रस्थान निश्चित केले आहे. मराठीत राजकीय पार्श्वभूमीवर माडखोलकर, फडके, खांडेकर यांनी लेखन केले परंतु त्यांच्या कादंबऱ्यांना राजकीय कादंबऱ्या म्हणता येत नाही, याचे कारण असे की राजकीय चळवळी व वातावरण हे पार्श्वभूमीसारखे होते. अरुण साधूंच्या कादंबऱ्यात राजकीय डावपेच, धडामोडी, सत्तेसाठी केलेले संघर्ष कादंबरीच्या केंद्रीय अनुभवाचा भाग आहेत. अरुण साधूंच्या 'सिंहासन' (७७) मध्ये मुख्यमंत्र्याला पदच्युत करण्यासाठी केलेले डावपेच, रस्सीखेच आणि सत्तेसाठी बरेवाईट मार्ग हाताळण्याचे प्रयत्न यांचे प्रभावी चित्र दिसते. यांचे महत्त्व अलीकडे अधिकच वाढले आहे. कारण त्यांना जाणवलेले वास्तव आता जनजीवनाच्या अनुभवाचा भाग झाला आहे. यापूर्वी 'मुंबई दिनांक मध्ये एका वृत्तपत्र वार्ताहराला केन्द्रस्थानी ठेवून मुंबईच्या तस्करी जगाचे आणि राजकीय जगाचे संबंध त्यांनी रेखाटले आहेत. डायरी लेखन शैलीत लिहिलेली ही कादंबरी अधिक लोकप्रिय ठरली. अरुण साधूंनी 'स्फोट' मध्ये विज्ञान कथेच्या माध्यमातून मानवाच्या सत्–असत प्रवृत्तींना हाताळण्याचा प्रयत्न केला आहे. तसे पाहिले तर ही केवळ कल्पना आहे. पण वैज्ञानिकांसमोर निर्णायक बनून उभ्या असणाऱ्या प्रश्नाशी याचा संबंध असल्याने या कादंबरीला गंभीर स्वरूपही प्राप्त झाले आहे. 'त्रिशंकू' मध्ये साधूंनी गावातून शहरात आलेल्या दलित तरुणाच्या उखडलेपणाचे धारदार चित्रण केले होते. ही त्यांची चांगली कादंबरी. नंतरच्या 'बहिष्कृत' मध्ये दलित युवकाचा संघर्ष आहे. जातिव्यवस्थेवर आधारित या समाजात त्याला मिळालेल्या कटुअनुभवांचे यात चित्रण आहे. दुष्काळात अशुध्द व घाणेरडे पाणी पिऊन मरायला भाग पडलेल्या दलितांच्या बाजूने एक दलित संघर्षासाठी उभा राहतो. संघर्षात तो प्राण गमावतो. त्याच्या वेदनेला योग्य प्रकारे साकारण्यात साधूना यश आले आहे. 'शापित' ही लघुकादंबरी दुष्काळग्रस्तांच्या विखुरलेल्या अन् उद्ध्वस्त जीवनाला साकार करणारी करुण कथा आहे. अरुण साधू समाजविषयीच्या आत्मीयतेच्या आणि कर्तव्याच्या भावनेने प्रेरित

होऊन निष्ठेने लेखन करणाऱ्यापैकी आहेत आणि कलात्मक मूल्यांची पर्वा न करता जीवनाच्या उग्र वास्तवाचे एक एक अग सामोरे आणण्याचा प्रयत्न, त्यांच्या साहित्यात आढळतो. अरुण साधू यांच्या लेखनातले वैविध्य फार महत्वाचे आहे. अलीकडील प्रकाशित त्यांची कादंबरी 'शोधयात्रा' एका तरुणाने घेतलेल्या जीवनाच्या अर्थाच्या शोधाची आणि त्याच्या आध्यात्मिक अनुभवाची प्रस्तुती आहे. या स्वत्वाचा शोधासाठी जीवनाच्या यथास्थितीविरूध्दचा विद्रोह अधिक वेदनापूर्ण व्हायला हवा होता. तसेच या आत्मशोधात शब्दांच्या मधल्या मूक जागांनी आंतरिक वास्तवाचे उद्‌घाटन केले असते तर ही कादंबरी मराठीतली एक उत्तम कादंबरी ठरली असती. अरुण साधूंची 'तडजोड' ही (१९९२) कादंबरी व स्वातंत्र्योत्तर काळात झालेली राजकीय व राष्ट्रीय मूल्यांची घसरण नजरेसमोर ठेवून लिहिलेली महत्वाची कृती आहे. राजकीय पक्षांच्या राजकारणापेक्षा राजकारणाचा व समाजकारणाचा शेवटी ज्या माणसाच्या मनाशी संबंध आहे. त्या माणसाच्या मनाचे वास्तव त्यांनी प्रामुख्याने चित्रित केले आहे. म्हणजे असे की राजकीय घटना व त्यांचे परिणाम यांच्या चित्रणाला फारसे महत्व न देता त्या घटनांच्या मागे असणाऱ्या व्यक्तीचे व समूहाचे मन अधिक महत्त्व पावते. आणीबाणीपासून राजीव गांधीच्या सत्तेवर येण्याच्या घटनेपर्यंतच्या पार्श्वभूमीवर ही कादंबरी लिहिली आहे. एका छोटया नगरपालिकेची निवडणूक केंद्रस्थानी आली आहे. स्वातंत्र्योत्तर राजकारणापेक्षा ढासळत जाणाऱ्या नैतिकतेचे हे प्रभावी चित्रण या निवडणुकीच्या घटनेच्या माध्यमातून केले आहे. एका परीने ही निवडणूक देशाच्या राजकारणाचे प्रतीकही ठरते. याच निमित्ताने स्वातंत्र्यपूर्वकाळातील पत्रकारितेचे रूप व नंतरचे बदललेले रूप यांचे चित्रण महत्त्वाचे आहे. स्वातंत्र्योत्तर काळात अनैतिक मार्गाने धन प्राप्त करण्याच्या वर्गाचेही चित्रण केले आहे. एका टोकाची मूल्यनिष्ठा व आदर्शवाद (गांधी, विनोबा यांचा) व दुसऱ्या टोकाचा चंगळवाद यात कुठेतरी तडजोड व्यवहारात करावी लागते. मात्र ती तडजोड काही मूल्यनिष्ठा ठेवून विवेकाने करायाला हवी असेही सुचवले जाते. राजकीय कादंबरीचा मोठेपणा या निकषावर ठरवायला हवा की



राजकारणातल्या गुंतागुतीचे किती प्रकार, स्तर, उभे आडवे धागे, असंख्य घटनांचे परस्पर संबंध, माणसांची मने आणि त्याचे अन्तर्संबंध लेखकाने दाखवले आहेत. या दृष्टीने अरुण साधूंची 'तडजोड' चागलीच यशस्वी कादंबरी आहे. अरुण साधू यांच्या कादंबरीत व्यापलेले जीवन पाहता ते साठोत्तरी कादंबरी वाङ्मयातले व बिनीचे कादंबरीकार आहेत. राजकीय कादंबरीचा विचार करताना ग. प्र. प्रधान यांच्या 'साठा उत्तराची कहाणीचा' आवर्जून उल्लेख करायाला हवा. कारण १९३०–३१ चा काळातील राजकीय परिस्थितीचे एक समग्र चित्र त्यात प्रतिबिंबित झाले आहे.

लक्ष्मीकांत देशमुख यानी 'अंधेर नगरी' कादंबरी लिहून राजकीय कादंबरीच्या भयावह वास्तवाचा वेध प्रभावीपणे घेतला आहे. त्यातील मूल्यभ्रष्टता, सत्तेसाठी तडजोडी मूल्यनिष्ठा माणसाची अगतिकता, सत्तेचा माज यांचे भेदक चित्रण केले आहे. त्यानी म्युनिसिपल निवडणुका हे केंद्रीय उद्दिष्ट समोर ठेवले असले तरी एकूण भारतीय राजकारण्याचा खेळखंडोबा यातून व्यक्त होतो. अपेक्षा भरपूर वाढवणारी ही कादंबरी आहे.

कथाकार वसंत नरहर फेणे यांची 'पाहिला अध्याय' कादंबरी १९७० मध्ये प्रकाशित झाली. काहीशी दुर्लक्षित तिची दुसरी आवृत्ती १९९५ मध्ये प्रसिध्द झाली. साठनंतर सामाजिक कादंबरीला एक राजनैतिक परिमाण स्वयंस्फूर्तपणे प्राप्त झाले. कारण राजकारण घराशी अटळपणे जोडले गेले. या कादंबरीला एक प्रत्यक्ष घटना प्रेरक झाली. एका गावी पारध्यांच्या कुटुंबाची एका मातबर कुटुंबाच्या चिथावणीने गावकरी समूहाने सामूहिकरित्या हत्या केली. या हत्येमागे शोषक–शोषित, सवर्ण–दलित, लोकशाहीच्या प्रक्रियेतून अपरिहार्यपणे वर येणारे खालच्या थरातील विद्रोहाचे हुंकार आणि गांधीवादाचे छद्‌मी आवरण घेतलेल्या उच्च वर्णीय, उच्च वर्गीयांचा रक्तात भिनलेला अहंकार यांतील अपरिहार्य द्वन्द्व, तणाव अशी परिमाणे होती. वसंत नरहर फेणे यानी ही सर्व परिमाणे कलात्मकपणे आणि समर्थपणे व्यक्त केली आहेत. ही एक लक्षणीय कादंबरी आहे.

साठ सालानंतर मराठी कादंरीत वास्तववादी प्रवृत्ती प्रबळ झाल्या. परिणामी मध्यमवर्गाच्या मर्यादांनी सीमित झालेल्या परिघाला तोडून नव्या–नव्या प्रातांचा व दिशांचा शोध घेण्यास सुरवात झाली. मधु मंगेश कर्णिकांनी 'माहीमची खाडी' नंतर 'भाकरी आणि फूल' १९७२ मध्ये सडणाऱ्या दलित जीवनाचे

अनुक्रमणिका

यथार्थ रूप प्रकट केले. यात आलेले महारांच्या जीवनाचे वर्णन, त्याच्यातले अनेक गटांची विभाजित शक्ती आणि त्यांच्या विकासाआड येणारी त्यांची मानसिक स्थिती यामुळे ही कादंबरी सकस बनली. प्रा.वि.शं. चौगुले म्हणतात. 'भाकरी आणि फूल' दलितेत्तर साहित्यिकांकडून रचित दलित जीवनानुभव सांगणारी एक लक्षणीय कृती आहे. (ग्रंथ संवाद पृ. ७४) मधु मंगेश कर्णिक कोकणाचे प्रादेशिकत्व मूर्त रूपात आणण्यात विशेष रस घेतात हे त्यांच्या 'कातळ' ने सिध्द केले आहे. 'जुईली' कोकणात जन्मलेल्या अन् कलाकार म्हणून पुढे येऊ पाहणाऱ्या जिद्दी मुलीची प्रभावी कथा आहे. प्रेमाची उत्कट व मानवी संबंधातील भाव संवेदनांचे गहिरेपण यात जाणवते. 'सनद' ने उत्पादन मंडळाच्या कार्यव्यवस्थेवर प्रखर प्रकाश टाकला आहे. नोकरशाहीचा हिंस्त्र, आत्मकेंद्रित स्पर्धाळू स्वभाव ताकदीने यात व्यक्त केला आहे. वेगळया अनुभवविश्वाचे दर्शन ही कादंबरी घडवते. आशयाच्या दृष्टीने नवे नवे प्रयोग करण्याची गो. नी. दांडेकरांची प्रवृत्ती कर्णिकांमध्येही दिसते. मराठीतले अग्रिम पंक्तीतले हे कादंबरीकार! माणसाबद्दलाची प्रचंड कणव आणि वास्तवाचे सूक्ष्म निरीक्षण रसात्मक प्रसंग निर्माण करण्याचे कौशल्य आणि प्रसंग आणि व्यक्ती याना अनुरूप वैविध्यपूर्ण भाषा समर्थपणे वापरण्याचे सामर्थ्य यामुळे मधु मंगेश कर्णिक मान्यवर लेखक झाले आहेत.

श्री. ह. मो. मराठे यांनी आठपेक्षा अधिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. परंतु जी सफलता त्यांना लघुकथाकार म्हणून मिळाली ती कादंबरीकार म्हणून मिळाली नाही. 'प्रास्ताविक', 'कुरूक्षेत्र', 'लग्न', इत्यादी कादंबऱ्या १९८५ मध्ये प्रकाशित झाल्या मध्यम वर्गीय जीवनातील सर्वभक्षी कुचंबणा मराठे तीव्रतेने चित्रित करतात. सामाजिक वास्तव, विशेषतः उद्योगपती व नोकरशही यांचे जग आणि मजुरांच्या जीवनाचे व त्यांच्या परस्पर जटिल संबंधाचे चित्रण हा सुध्दा मराठयांचा खास विषय आहे. आणि त्याच्या हाताळणीला त्याना चांगले यश मिळाले आहे. रंगनाथ पठारे हे एक मराठी कादंबरीतील महत्त्वाचे नाव. त्यांची 'ताम्रपट' (१९८४) कादंबरी राजकीय कादंबरी म्हणून विशेष गाजली. १९४२ ते १९७९ काळातल्या राजकीय धडामोडी आणि वैचारिक प्रवाह यांचे ठळकपणे दिग्दर्शन ही कादंबरी घडवते. नानासाहेब सिरूर यांच्या राजकीय जीवनातील चढ उत्तारांच्या अनुषंगाने हे दर्शन धडवले आहे. सत्तेतील स्पर्धा, सहकारी संस्थातील राजकारण, शिक्षण संस्थांचे स्वरूप, दलिताच्या व समस्या या अंगाना स्पर्श करणारी ही कादंबरी अनेक माणसांची वैविध्यपूर्ण स्वभावचित्रणे समर्थपणे रेखाटते. १९४२ च्या राजकीय वातावरणाचा समर्थ अनुभव ही कादंबरी देते. नानासाहेब सिरूरांची आदर्शनिष्ठा आणि बापुसाहेब देशमुख यांचे धूर्त राजकारण सद्यःस्थितीतील राजकीय वास्तवावर झगझगीत प्रकाश टाकते.

वास्तवाच्या पलीकडे

आत्तापर्यंत वास्तववादी कादंबरीकारांच्या आढाव्यामध्ये दोन महत्वपूर्ण लेखकांचा नामोल्लेख जाणूनबुजून टाळला आहे. पु.शि. रेगे आणि गौरी देशपांडे ह्या दोघांच्या कादंबऱ्या बाहय वास्वापासून दूर आहेत. इतक्या की वाटते त्यांच्या कादंबरीच्या चरित्राची स्वतःची वेगळीच सृष्टी असावी, तिचा बाहय जीवनाच्या धकाधकीशी संबंध नाही आणि असलाच तरी अगदीच नावापुरता. परंतु या लेखकांची स्वतःची अशी जी सृष्टी, भाव, अनुभाव, संचारी भाव यांनी युक्त आहे ती अतिशय तरल, सूक्ष्म, अप्रतिम आणि अद्वितीय आहे. यांची पात्र रचना वाचकांच्या जगानुसार नाही तर स्वतःच्या मानसिक जगाची ती स्वायत्त निर्मिती आहे. तरीही त्या पत्रांचा प्रभाव कुठेही कमी झालेला जाणवत नाही. हया लेखकांच्या दृष्टिकोनातून त्यांचे साहित्य वाचले तर वाचकाला अनोख्या अनुभवाचा परिचय निश्चितच होतो.

पु. शि. रेगे मराठीतील वेगळया ढंगाचे कवी आहेत आणि मर्ढेकरांच्याच काळात वेगळया प्रकारच्या कविता लिहून नव्या टीकाकारांकडूनही सन्माननीय स्वीकृती त्यांनी मिळवली आहे. त्यांची लघु कादंबरी 'सावित्री', १९६२ मध्ये प्रकाशित झाली आणि तिच्या वेगळया ढंगासाठी ही कादंबरी प्रशंसनीय ठरली. 'सावित्री' ची परिस्थिती वेगळी आहे. अनोखी आहे. तिची अनुभव घेण्याची संवेदनक्षमताच केवळ तीव्र नाही तर ती चिंतनामुळे धारदार बनली आहे. 'सावित्री' चा अवकाश आंतराष्ट्रीय आहे. काळ महायुध्दाचा आहे. दुसऱ्या बाजूने सावित्री, काळ अन् स्थान

दोहोंना ओलांडून चिरंजीवीत्वाला स्पर्श करते. सावित्री आणि तिचा प्रियतम दोघांचे संबंध काहीसे अतिभौतिकी पण तरीही तरल काव्यात्मक आहेत. घटना यात फारच कमी घडतात. त्या मानसिक स्तरावर घटना घडतात. व्यक्तिरेखांच्या मानसिकतेमध्ये अतींद्रियता असल्याने मानसिक मीलनाची तीव्रता अधिक आहे. रेग्यांची विलक्षण प्रतीकात्मक कल्पना, प्रतिमाधर्मी भाषा आणि काव्यात्मक शैली कादंबरीला बरेच वरचे स्थान देतात. 'अवलोकिता' किंवा 'रेणू' सुध्दा रेग्यांच्या विशिष्ट व्यक्तित्वाची छाप घेऊन प्रसिद्ध झाल्या आहेत. 'रेणू' वाचताना जाणवते की एक स्तरावर रेगे कामविषयक जटिलतेचे आणि कामुकतेचे तरल काव्यात्मक ढंगात चित्रण करीत आहेत. परंतु कधी असेही वाटते की रेगे एकाच विशिष्ट वा मूलभूत दृष्टीने जीवनाकडे पहात नाहीत, विविध स्तरांवर त्यातील विविधतेला पकडण्याचा प्रयत्न करतात. मानसिक गहनता आणि विविधतेकडे निर्देश करीत राहतात. पु. शि. रेगयांचे लेखन संपूर्ण मराठी साहित्यिसृष्टीत वेगळेच पृथगात्मक लेखन आहे. ते त्यांच्या तरल काव्यात्मक चिंतनाइकेच समृध्द आहे.

स्त्री-मुक्ती काही दिशा व दशा

गौरी देशपांडे पारंपारिक भारतीय स्त्रीच्या 'टॅबूज' पासून मुक्त होऊन प्रेम आणि कामसंबंधीचे चिंतन करणारी लेखिका असून स्वतःच्या विशिष्ट संवेदनशीलतेमुळे महत्वपूर्ण लेखकांमध्ये प्रतिष्ठित झाल्या आहेत. 'तेरुओ आणि काही दूर पर्यंत', 'एकेक पान गळावया' या त्यांच्या महत्वपूर्ण लघुकादंबऱ्या. गौरी देशपांडयांचे महत्त्व हे की त्या स्त्री पुरूष संबंधाचे उत्कट क्षण उत्कटतेने पाहतात आणि जीवनाकडे गंभीरतेने पाहण्याचेही टाळत नाहीत. त्यांच्या संवेदनेत भावुकता नाही पण मानवीयता मात्र ओतप्रोत भरलेली आहे. 'मुक्काम' ही त्यांची उल्लेखनीय कलाकृती आहे. कादंबरीतील घटना भारत आणि परदेशांमध्ये घडत असून मानव आणि मानवामधील भावात्मक संबंधांचा खोलवर शोध त्या घेतात. नायिका मनस्वी स्त्री आहे आणि आपल्या प्रेमाच्या शोधात परंपरा किंवा समाज या दोघांनाही ती स्थान देत नाही. परंतु प्रेमाची उत्कटता वैयक्तिक जीवनाला कदाचित सार्थक करीत ही असेल पण आपल्या मुळांना धरून ठेवण्यात सुध्दा जीवनाची सार्थकता असते. ती अधिक वरच्या दर्जाची असते.परदेशातील श्रीमंती अन् देशातील भयावह दारिद्रय यापैकी कोणत्यातरी एकाची जेव्हा तिला निवड करावी लागते तेव्हा ती आपल्या दरिद्री आणि अभावग्रस्त समाजाची, आपल्या लोकांची निवड करते. ही निवड तिच्या अंतर्मनाचा दमदार आवाज आहे. गौरी देशपांडयांच्या कादंबरीतील अनुभव हा पारंपारिक स्त्रियांपासून वेगळा, मौलिक आणि अद्वितीय असतो. तसेच तो आधुनिकतेचे ववरकरणी वस्त्र त्यालेल्या स्त्रियांच्या आवाजापेक्षा पृथगात्म आणि व्यक्तित्ववान आहे. आतापर्यंत गौरी देशपांडे ज्या समस्यांशी सामना करत होत्या त्यांचेच उत्तर त्यांना 'मुक्काम' कादंरीत मिळाले आहे असे वाटते. स्त्री मुक्तीची ही वेगळी, निराळी दशा आणि दिशा आहे. शेवटी जीवनाची सार्थकता स्वतःच्या ऐंद्रिय सुखात्म, महत्वाकांक्षांच्या पूर्णतेत नाही, ती ग्लॅमर मध्येतर नाहीच नाही. दुःखी, अभावग्रस्त आणि पंगू माणसांच्या सुखासाठी मनःपूर्वक सेवा कार्य करण्याचा निवडीत आहे, याच उत्कट बोध 'मुक्काम' कादंबरी देते. ज्या मनस्वीपणे गौरी देशपांडयांच्या नायिका ऐंद्रिय सुखाचा भोग घेतात त्याच मनस्वीपणे त्याकडे पाठही फिरवू शकतात आणि त्याच हार्दिकतेने समाजाच्या सुखदुःखांशी तन्मयही होतात. ही निवड लादलेली नसते, बौध्दिक नसते. आत्मिक असते. जीवन सार्थक्याची एक दिशा दाखवणारी ही कादंबरी. मात्र ही दिशा कोहीशी बाहेरची असली तरी तिला मनाच्या आंतल्या गाभ्यातून प्रचंड तयारी लागते.

शांता गोखलेंची 'रीटा वेलणकर' ही कादंबरी स्त्रीच्या तणावांचे प्रभावी चित्र उभे करते. काम–संबंध आणि वात्सलय–संबंध दोन्हीच्या संदर्भात नव्या वाटांचा शोध वाटतो. तो एका नव्या दिशेकडे निर्देश करणारा वाटतो. वस्तुतः बऱ्याच वर्षापूर्वी मामा वरेरकरांनी आर्थिक दृष्टया पुरुषी जीवनावर अवलंबित स्त्री जीवनाला आव्हान देत स्त्रियांच्या वेगळया गृहस्थ धर्माचा विचार मांडला होता. पण ते कामसंबंधी प्रश्नांवर मौन राहिले होते. मराठीतील ही एक लक्षणीय कृती वाटते. या संदर्भात सानियां यांच्या 'स्थलांतर' चा उल्लेख आवर्जून करायला हवा. हा एका स्त्री मनाने वस्तुनिष्ठपणे घेतलेला शोध आहे. हा एक जटिल अन्तर्मनाचा आणि खऱ्याखुऱ्या व्यक्तित्वाचा शोध

आहे. बाहय परिस्थितीच्या विकटतेपेक्षा अन्तर्मनाच्या वृत्ती प्रवृत्तींचे, आपल्या सुप्त सामर्थ्यांचे, सीमांचे, सुप्त आशा आकांक्षाचे जाळे विश्लेषित करून यथाशक्ती तळापर्यंत जाण्याचा आणि आपल्या प्रेम आणि श्रेय यांचा विवेक करण्याचा हा प्रयत्न खूपच अडथळयांचा आहे आणि हे अडथळे दूर करण्यात स्त्री एकटी असते, शेवटी नाते सबंधातील गुंतागुंत ही तरल संवेदनशील माणसाला दुर्गम्य वाटते. प्रेम, वासना, अधिकार भावना, वात्सल्य, मैत्री या सर्व बाबी त्या मनाला सरळ वाटत नाहीत आणि ही एक फार मोठी अडचण ऑथेंटिक जीवन जगताना येते, याचे तीव्र भान ही कादंबरी देते. शेवटी आपण ज्या शब्दांचा सर्रास उपयोग मोठया अभिमानानं करतो तो शब्द 'स्वातंत्र्य' या शब्दाचा तरी नेमका अर्थ आपल्यात मिळतो का ? असा एक अस्वस्थ करणारा प्रश्न ही कादंबरी उभी करते. जगदीश नंदिनी आणि तिची आई यांचे संबंध अतिशय गूढ आणि तरल. शेवटी हे गुंते संपत नाहीत, त्यांची सरळ उत्तरे मिळत नाहीत म्हणून करावं लागतं 'स्थलांतर', म्हटलंतर गुंता सोडवण्याचा मार्ग म्हटलं वर पलायन पण अपरिहार्य. 'स्थलांतर' ही मराठीतील एक महत्वाची कादंबरी कारण ती संवेदनेच्या आणि आत्मभानाच्या पातळीवर जगणाऱ्यांपुढे काही जीवनविषयक अनुत्तरित प्रश्न तीव्रतेने मांडते.

स्त्रीमुक्तीचा पुरुषविरोधी सूर आक्रोशाने न लावता आत्मशोध घेणा-या या महत्वाच्या कादंब-या.

ग्रामीण कादंबरी विकासाचे रूप

मराठीमध्ये ग्रामीण प्रादेशिक कादंबरीची काही वैशिष्टये ग. ल. ठोकळ--'गावगुंड', चिंदरकर 'महामूर', वरेरकर 'सात लाखाती एक', 'मी रामजोशी', 'फाटकी बाकळ', वि. ल. बर्वे, 'मुचकुंददरी', र. वा. दिघे 'सराई', 'रानजाई', 'पाणकळा', 'आई आहे शेतात', 'पड रे पाण्या', श्री. ना. पेंडसे हत्या, गारंबीचा बापू, रथचक्र गो. नी. दांडेकर जैत रे जैत, पडघवली, शितू, रानभूल, पूर्णामायेची लेकरे, पवनाकाठचा धोंडी यांच्या कादंबऱ्यांमध्ये दिसून येतात. या लेखनाच्या पाठीमागे ग्रामीण जीवनाबद्दलची आत्मीयता होती. पण या लेखनाला खऱ्या अर्थाने ग्रामीण स्वरूप प्राप्त झाले नव्हते. फारतर प्रादेशिकतेच्या स्पर्शाने लिहिले गेलेले लेखन असे म्हणता येईल. व्यंकटेश माडगूळकरांची "बनगरवाडी" खऱ्या अर्थाने पहिली समर्थ ग्रामीण कादंबरी मानली जाते. साठ सालच्या आसपास किंवा नंतर ही प्रवृत्ती फारच विस्तीरित झाली. अण्णाभाऊ साठयांच्या कादंबऱ्यांमध्ये ग्रामीणता मोठया प्रमाणावर दिसून येते. ग्रामीण जीवनाच्या अनुभवांचा खरा साठा साठयाकडे होता. म्हणूनच भूक, वासनेचे निर्मम खेळ, मनुष्याची असहाय्यता आणि शोषणाची क्रूर चित्रे प्रस्तुत करून सुध्दा साठयांच्या कादंबऱ्या लोकप्रिय ठरल्या. मधु मंगेश कर्णिकांनी सुध्दा कादंबरीला सघन प्रादेशिकतेचे पुट दिले आहे. ग्रामीण जीवनाला भडक रूपात सादर करण्याचेही प्रयत्न अनेक झाले. घटनांच्या जाळयात भडक रूपात सादर करण्याचे ही प्रयत्न अनेक झाले. परंतु घटनांच्या जाळयात मानवी जीवनाचे सत्त्व आणि कलात्मकतेचे भान मात्र धूसर झाले आहे. १९६० नंतर एकूण मराठी साहित्य अधिक जनाभिमुख होऊ लागलेले. दलित साहित्य आणि स्वतःचे असे स्वायत्त रूप प्राप्त झालेले ग्रामीण साहित्य या जनाभिमुखतेचे प्रचंड आविष्कार आहेत. दलित साहित्याची अभिव्यक्ती काव्यातून, लघुकथांतून आणि आत्मकथात्मक साहित्य रूपातून अधिक सशक्तपणे झाली तर ग्रामीण साहित्य लघुकथा आणि कादंबरी या वाङ्मय प्रकारांकडे अधिक जोमाने वळलेले दिसते. दलित साहित्यिकानी एक स्वतंत्र चळवळ उभारली, संगठित केली आणि प्रचंड अस्मिता निर्माण करून स्वतःच्या स्वतंत्र सौंदर्यशास्त्राचीही अपेक्षा व्यक्त केली. दलित साहित्याने मध्यम वर्गीय साहित्यिकांना आणि विचारवंताना सम्माननीय स्वागत करण्यास प्रवृत्त केले. ग्रामीण साहित्यिकांनी दलित साहित्याचा संगठित प्रयत्नांपासून प्रेरणा घेऊन ग्रामीण साहित्याची चळवळ उभारली. परिणामी ग्रामीण साहित्यासाठी संबंधित अनेक समस्यांचा विचार होऊ लागला. डॉ. आनंद यादव यांच्यावर साहित्याचे सौंदर्यशास्त्रीय आणि रूपवादी संस्कार झाले होते. ग्रामीण साहित्य चळवळीला त्यांचे नेतृत्व लाभल्यामुळे दोन गोष्टी घडल्या. एक तर परंपरागत सौंदर्यशास्त्रीय दृष्टीविरूद्ध निषेधाचा किंवा विद्रोहाचा आवाज उठला नाही आणि ग्रामीण साहित्य हा एकूण समग्र मराठी साहित्याचा एक महत्वपूर्ण आगळा आविष्कार आहे. व साहित्यांचे एका मर्यादे पर्यंत स्वायत्त वैशिष्टय आहे हे मान्य झाले. १९७५ नंतर ग्रामीण साहित्याच्या अंगभूत महत्वाच्या

प्रश्नांवर खूपच चर्चा झाली आणि साहित्याची अशी काही विशिष्ट आविष्कार प्रणाली असते हे मान्य झाले. तत्त्वतः महान साहित्य, ग्रामीण, दलित नागर असे काही नसते, ग्रामीणता हा साहित्यांच्या मूल्यमापनाचा निकष नसून अनुभवाच्या वेगळ्या स्वरूपाने विवेचन करण्याची एक सोय आहे हे ही जवळ जवळ मान्य झाले. मात्र ग्रामीण साहित्यातून एक गोष्ट स्पष्ट झाली. गावातील अठरापगड जातीचे वास्तव, दारिद्रय, विषमता, शोषण, राजकारणाचे भ्रष्ट होत चाललेले स्वरूप, सहकारी कारखान्यांतून निर्माण झालेली पण काही थोडया कुटुंबात अडकून राहिलेली संपत्ती त्यातून निर्माण झालेली अपसंस्कृती आणि समस्या यांचे भान ग्रामीण लेखकांना झाले. आपले वास्तव डोळे उघडून पाहिले पाहिजे, आपल्या समाजाशी असलेले संबध तोडता कामा नयेत याची जाणीव झाली. त्यामुळे ग्रामीण साहित्यात माणसाविषयीची कणव अधिक मोठया प्रमाणात दिसते. यातून ग्रामीण साहित्य अधिकाधिक जनजीवना जवळ लागले. आदिवासी समाजातून शिक्षण घेऊन आलेल्या तरुणांनी आदिवासी जीवनाबद्दल लिहिलेच. पण व्यापक मानवतावादी दृष्टीतून आदिवासी नसलेल्या पण ग्रामीण समाजातून आलेल्या लेखकांनीही आदिवासी जीवनाचा आविष्कार कथा कादंबऱ्यातून केला. (पाहा मधुकर वाकोडे 'झेलझपाटा' (१९७८) अनिल सहस्त्रबुध्देकृत 'डांगाणी' (८५) सुरेश द्वादशीवार कृत हाकूमी' (९०) इत्यादी) शहरवासी लेखकांनी ग्रामीण व दलित साहित्य लिहिले. त्यापाठीमागे संकुचित वर्गीय/वर्णीय दृष्टी नसल्यामुळे, उदंड माणुसकीच्या कणवेतून, उच्च वर्गीय लेखकांनी या संदर्भात उच्चवर्णीय अहंकारावर, त्यांच्या अन्यायांवर आणि आमानवी दृष्टीवर प्रहार केले आहेत. (पाहा सदा कऱ्हाड यांची 'गावकुसाबाहेरची वस्ती' (७९) अरुण साधू यांची 'बहिष्कृत' (७८) मधु मंगेश कर्णिक यांची 'भाकरी आणि फूल' इत्यादी.)

ग्रामीण साहित्याची मराठी साहित्याला एक फार मोठी देणगी म्हणजे साहित्यात ग्रामविशिष्ट बोलीभाषांचा उपयोग. ग्रामीण साहित्याची नाळ गावातील समाजजीवनाशी असल्यामुळे ग्रामीण अनुभव व्यक्त करताना अनिवार्यपणे त्याला ग्रामीण बोलींचा उपयोग करावा लागला.

शहराबाहेर पसरलेल्या विशाल देशाची खरी ओलख या ग्रामीण साहित्यातून होते.

उध्दव शेळके यांनी 'धग', 'गाई विना बुवा' यांत ग्रामीण जीवनाची योग्य पृष्ठभूमी देऊन मानवी मनाचे उल्लेखनीय चित्र रेखाटले आहे. द. ता. भोसले यांच्या 'मी आणि माझा बाप' (१९७०) मध्ये ग्रामीणतेला काहीशा हास्यमयरूपात सादर केले आहे. 'इथेफुलाना मरण जन्मता' (८५) कादंबरी वेगळया प्रकारची आहे. यात ग्रामीण युवतीच्या दुर्दैवी जीवनाची कथा काहीशी भडकपणे रंगवली आहे. 'वनगरवाडी' नंतर शंकर पाटीलांची 'टारफुला' (१९६४) कादंबरी खऱ्या अर्थाने ग्रामीण कादंबरी मानली जावी. ग्रामीण जीवनात पाटलाच्या शोषणाच्या विविध पध्दतींची आणि सत्तासंघर्षाची जाणीव कादंबरीत जाणीव होते. गावच्या गुंडगिरीची ही कथा गावच्या भयानक व क्रूर वास्तवावर प्रकाश टाकते. ग्रामीण जनतेच्या असहाय्यतेच चित्रसुध्दा लेखक प्रभावीपणे रेखाटतो. ग्रामीण वास्तवाचे हे रूप पाटलांनी ग्रामीण भाषेच्या माध्यमातून मोठया कलात्मकतेने प्रस्तुत केले आहे.

हया आधी रणजित देसाईच्या 'माझा गाव' (१९६०) मध्ये थोडया कृत्रिमतेच्या स्पर्शाने कलुषित परंतु नाटयमय प्रसंगांची लयलूट करून ग्रामीण वास्तविकतेचे दर्शन घडविले गेले होते. पण ही वास्तविकता वरच्या वर्गाच्या नजरेतून पाहिली गेली असल्याने तिला वस्तुनिष्ठेचे स्वरूप आले नाही. हमीद दलवाईंनी 'इंधन' (१९६५) मध्ये राष्ट्रीय प्रवृत्तीने प्रेरित कोकणच्या मुसलमान युवकाची कथा सांगितली आहे. ती चिपळूणच्या मुसलमानी बोलीच्या प्रयोगामुळे वैशिष्टयपूर्ण बनली आहे. कामजीवनाची मांसल चित्रे यात थोडयाशा उत्तेजित रूपात आली आहेत. परंतु गावात राहणाऱ्या जातींचे मानसिक तणाव व्यक्त करण्यात लेखकाला यश मिळाले आहे. मुसलमान जीवनाशी संबंधित काही चांगल्या कादंबऱ्यांचे राजन खान यांनी लेखन केलेले आहे. (शरीयत, स्क्रीन, टेस्ट, काफ, यतीम इत्यादी) त्यातले वास्तव अधिक भरीव आहे.

आनंद यादवांच्या 'गोतावळा' (१९७१) ची चर्चा केली आहे. जवळजवळ त्याचवेळी रा. रं. बोरोडे यांची 'पाचोळा' प्रकाशित झाली. यात शहर अन् गाव यांच्यातील संबंधांचे

वास्तव प्रकट झालेले आहे. यांत्रिकीकरणामुळे गावातील हस्तोद्योग, कौटुंबिक जीवनाची व्यवस्था आणि अर्थतंत्र असे विस्कटून जाते आणि जीवन कसे पाचोळयासारखे होते याचे यशस्वी चित्र हया कादंबरीत केलेले आहे. प्रमुख पात्र पार्वतीच्या तोंडातून कथा सांगितली गेली असून हया कथेमध्ये उस्मानावादच्या बोलीचा प्रयोग केलेला आहे. त्यामुळे या कादंबरीचा अनुभव अधिक प्रभावी झाला आहे. त्यांच्या 'सावट' कादंबरीत शिक्षणामुळे गावातील मुलांचे आपल्या भूमीपासून, समाजापासून होणारे विभाजन समर्थपणे रेखाटले आहे. ग्रामीण समाजाच्या रूढिग्रस्त मनाचे चित्रण प्रभावी वाटते. निसर्गावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांच्या दुर्दशेचे आणि त्यांच्या शोषणाचे चित्र यात आहे. बोराडे याचं लेखन वास्तवदर्शी पण काहीसे एकेरी असते.

ना. धों. महानोर मराठीचे नामवंत कवी असून ग्रामीण जीवनाशी केवळ परिचित आहेत असे नाही तर ते गावात राहून शेतीही करतात. त्यांच्या 'गांधारी' (१९७३) कादंबरीत गांधारीला नायिका मानले आहे. रझाकरांच्या अत्याचारांनी पिडलेला गाव स्वातंत्र्योत्तर युगात नवीन रूप धारण करतो परंतु स्वातंत्र्य युगातील राजकीय भ्रष्टाचारामुळे दबला जातो. महानोरांच्या ग्रामीण कवितेत सुद्धा 'ते रोमांटिसीझमचे गडद रंग दिसतात आणि वरील कादंबरीत सुद्धा' अधिकाधिक गडद होता जातात. परंतु या कादंबरीत ग्रामीण वास्तवाच्या काही घटकांचे प्रभावशाली चित्र रेखाटले आहे.

महादेव मोरे यांनी विपुल वाङ्मय निर्मिती केली. वास्तवाची उत्तम ओळख आणि पकड असून सुध्दा त्यांचे साहित्य अपेक्षित यश प्राप्त करू शकले नाही. विविध क्षेत्रातील लोक आणि विविध जीवनांगाचा ते उपयोग करतात पण खूपवेळा प्रस्तुतिकरणामध्ये एकसुरीपणा आणि वास्तव भेदक करण्याच्या नादात काहीसा गुळगुळीतपणा येतो. 'बळी' (१९७३,) 'आडगार' १९७८, 'लाईन' १९८० त्यांच्या काही उल्लेखनीय कादंबऱ्या आहेत. शोषित लोकांबद्दलची आत्मीयता मोरेंच्या कादंबऱ्यांना वेगळीच शक्ती प्रदान करते. मध्यम वर्गीय माणसांच्या अनुभवपरिधाच्या बाहेरचे वास्तव मोरे यांनी रेखाटले आहे. विडी कामगार, शेतमजूर, ड्रायव्हर, क्लीनर, वेश्या, दलाल, जोगजोगतिणी, डोंबारी, मांगगारूडी यांचे हे जग आहे. आणखी एक कादंबरीकार चंद्रकुमार नलगे यांनी 'आगीनफूल' (१९७४), 'गस्त' (१९७६), 'देवाची साक्ष' (१९७९) इ. कादंबऱ्या लिहिल्या. ग्रामीण जीवनाची ओळख सुध्दा शहरी रोमँटिक दृष्टीत अधुक होऊन जाते. आणि चिंतनाची कमतरता असल्याने कादवरी फारशी सफल होऊ शकत नाही. बाबा भांड यांची 'जरंगा', 'शंकर खंडू पाटलांच्या', 'सरपंच', 'बेईमान', 'घुंगरू', माधव यादवांची 'बोरगांव', वि. वि. जोशींची 'सरधा', शरद पोतदाराची 'महाद्वार', मनोहरांची 'पैलतीर', श्रीपाद जोशींची 'मी भूमिपूत्र', आ.ना. पेडणेकरांची 'ऐलपैल' या कादंबऱ्यांमध्ये ग्रामीण जीवनातील बदलाची जाणीव ठेवून ग्रामीणतेचे वास्तव रेखाटलेले दिसते. व. वा. बोधे यांनी डझनभर ग्रामीण कादंबऱ्या लिहिल्या पण मनोरंजन करण्यासाठी त्यानी लोकप्रिय कादंबरीचा बाज स्वीकारल्यामुळे त्याना ग्रामीण कादंबरीवर आपली छाप उमटवता आली नाही.

आनंद पाटील यानी 'कागूद' आणि 'सावली' (१९८६) या दोन ग्रामीण कादंबऱ्या लिहिल्या ग्रामीण वास्तवाचा एक छोटासा तुकडा अलग करून त्याचे प्रभावी चित्रण त्यानी केले आहे. शेत खरेदी करताना येण्याच्या अनेक प्रकारच्या समस्यांचे 'कागूद' मध्ये कलात्मक चित्रण आहे. 'सावली' मध्ये कोकणात मातीच्या ओढीने शहरातून काही पैसा गाठीशी बांधून झालेल्या संपकरी मजूराची घर बांधण्याची महत्वाकांक्षा शेवटी त्याचा कसा सर्वनाश करते याचे वास्तव चित्रण केले आहे. गावच्या लोकांच्या मनाचे चित्रण प्रभावी आहे.

बाबाराव मुसळे यांच्या "हाल्या हाल्या दुधू दे" मध्ये शेतकऱ्याच्या सर्वनाशाची करूण कथा आहे पण योगायोगांनी काहीसा भडकपणा यात आला आहे. पुरूषोत्तम बोरकरांची 'मेड इन इंडिया' (८७) मध्ये गरसोई खुर्दचा सरपंच गावच्या मूल्यभ्रष्टतेची आणि शहरी आक्रमणाची कथा वऱ्हाडी बोलीत सांगतो. राजन गवस यांच्या 'चौंडक' (८५) मध्ये जोगतिणींच्या जीवनाचे दुःख व्यक्त झाले आहे तर 'भंडारभोग' (८८) मध्ये जोगत्याच्या जीवनाची उध्वस्तता व्यक्त झाली आहे. जोगव्या तायाप्पाची समाजाने निर्माण केलेली व्यथा प्रभावीपणाने व्यक्त होते. राजन गवस यांची

'कळप' कादंबरी एक समर्थ कृती आहे. छोटया शहरातील विद्यालयातील सर्वभक्षी भ्रष्टाचार ताकदीने व्यक्त केला आहे. नागनाथ कोतापल्ले याच्या दोन कादंबऱ्या 'उलट चालिला प्रवाहो' (८५, आणि 'गांधारीचे डोळे' मध्ये गावातील संधिसाधू राजकारणाचे भेदक-चित्र आहे. वासुदेव मुलाटे यांच्या "विषवृक्षाच्या मुळया" (८९) मध्ये सहकार क्षेत्रातील भ्रष्टाचाराचे चित्रण केले आहे. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी उघडलेल्या बँकातून चाललेल्या दुर्व्यवहारांविरूध्द उभा ठाकणारा विश्वनाथ यामुळे दुभंगतो. एक चांगला विषय नीटसपणे मांडला गेला आहे.

विश्वास पाटील यांच्या 'आबी' (१९८०) मध्ये त्यांच्या ग्रामीण जीवनाच्या वास्तवावरच्या अधिकाराची कल्पना होते पण त्यांची खरी ताकद 'पांगिरा' (१९९०) मध्ये प्रकट झाली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात सर्व प्रकारे कायापालट झालेल्या गावाची ही कथा विलक्षण प्रभावी आहे. पाटील यांची निरीक्षण शक्ती जबर, वास्तवातील फेरबदलांचे, गतीचे भान उत्तम, वास्तवाचा थोडासा तुकडा अलग काढून चित्रण करण्यापेक्षा ते वास्तव समग्र वास्तवाचा भाग म्हणून अनेकांगी चित्रण करण्याची क्षमता मोठी, व्यक्तींच्या चित्रणाची कला भारदास्त आणि रसात्मक प्रसंगनिर्मितीचे कौशल्य वाखाणण्यासारखे एकाच वेळी व्यक्ती आणि सामूहिक मन यांचे चित्रण करण्याचे कसब चांगले. यामुळे 'पांगिरा' ही कादंबरी एक प्रौढ ग्रामीण कादंबरी वाटते. राजकारण्याने आणि सत्ता लोलुपतेने गांवजीवन कसे सर्वस्वी उध्वस्त झाले आहे याचे हे प्रभावी चित्रण विश्वास पाटील याना मराठी कादंबरीकारांच्या अग्रस्थानी नेते. गावातील उत्सव, वाढलेली श्रीमंती, त्या श्रीमंतीचे चार दोन व्यक्तींच्या हाती झालेलं केंद्रीकरण, पैशातून आलेली ताकद, त्या आधारावर राजकारण्यांचा स्थान बळकट करण्याचा प्रयत्न आणि या सर्वात गावचा श्रम करणारा शेतकरी मात्र भरडून निघतो आहे. या बरोबर समृध्द व सकस ग्रामीण बोलीने लेखकाची ताकद प्रचंड वाढवली आहे. विश्वास पाटील यांची नंतरची ग्रामीण कादंबरी 'झाडाझडती' मराठीतील ही एक लक्षणीय अशी महाकाव्यीय कादंबरी आहे. जांभळी गावच्या धरणग्रस्तांच्या सर्वकष उध्वस्ततेची करूण कहाणी. एकाच कादंबरीने विश्वास पाटील मराठी कादंबरीच्या अग्रिम पंक्तीत विराजमान व्हावेत. विश्वास पाटील यांच्या व्यक्तित्वात काही महत्वाचे गुण आहेत. त्याना आपल्या समाजाबद्दल प्रचंड आत्मीयता आहे. त्यांच्या जीवनातील नानाविध प्रश्नांनी त्याना अस्वस्थ केले की लेखनाची प्रेरणा मिळते. ते प्रतिभाशाली असले तरी परिश्रमांचे महत्त्व जाणतात आणि प्रचंड परिश्रमाची जोड देऊन लेखन सकस बनवतात. त्यामुळे धरणग्रस्तांच्या व्यथा वेदना त्याना केवळ भावनात्मक आवाहन करत नाहीत. ते त्यांची मुळं शोधताना सामाजिक राजकीय परिस्थीतीचा, सांस्कृतिक परंपराचा अभ्यास करतात. त्याचं सामान्य माणसांच्या जीवनव्यापाराचं निरीक्षण सूक्ष्म आणि समग्र असत. त्यांच्या बोलीभाषेतील घाट आणि ठसका त्याना सहज आत्मसात होतो. यानां शेतकऱ्याचं शोषण करणाऱ्या सर्व शक्तींची जाण आहे. सरकार, नोकरशाही, सरंजामदारी व्यवस्था व जमीनदार लोकांच्या मतावर निवडून येणारं धूर्त, दुष्ट, आणि आत्मकेंद्रित नेतृत्व या सर्वांच्या जीवन व्यापाराची त्याना अंतर्भेदी ओळख आहे. जीवनाच्या नानाविध रीती, गती आणि रूपे त्यांना ज्ञात आहेत म्हणून 'झाडाझडती' मध्ये समग्रलक्षी वास्तव प्रचंड प्रभावाने व्यक्त होऊ शकते. मराठीतल्या आठ दहा श्रेष्ठ कृतीपैकी झाडाझडती ही एक संस्कृती आहे.

दलित जीवन आणि कादंबरी

दलित साहित्य ही मराठी साहित्याची एक प्रभावशाली प्रवृत्ती आहे. परंतु ही प्रवृत्ती काव्य, कथा आणि आत्मचरित्र यांच्या माध्यमातून जेवढया समर्थपणे प्रकट झाली आहे. तेवढी कादंबरीच्या माध्यमातून झालेली नाही. दलितांच्या आत्मचरित्रात्मक लेखनाला कादंबरीपासून किती दूर ठेवायचे हा मोठाच प्रश्न आहे. कारण त्यांच्या आत्मचरित्रांवर कादंबरीच्या वैशिष्टयांचा प्रभाव दिसतो. इथे केवळ कादंबरी म्हणूनच लिहिल्या गेलेल्या दलित साहित्याचा उल्लेख केला जाईल. यात सुध्दा वादाचा प्रश्न उद्‌भवतोच. केवळ दलितांद्वारा लिहिलेले कादंबरी साहित्य इथे चर्चिले जावे की दलितेतर लेखकांनी दलित जीवनासंबंधी लिहिलेले सुध्दा? या वादाच्या भोवऱ्यात न अडकता दलित जीवनाचे चित्रण दलितांच्या दृष्टीने आणि ज्या समर्थपणे साहित्यात आढळते असेच साहित्य इथे

अनुक्रमणिका

उल्लेखनीय ठरावे. म्हणून कर्णिक यांची "भाकरी आणि फूल" कादंबरी ही दलित कादंबरी म्हणता येईल. दलित लेखक ना. रा. शेंडे यांचे काहीसे आध्यात्मिकतेचा रंग असणारे साहित्य काजळीरात्र (५६) तांबडा दगड (५८) विलासिनी (७४) इना दलित कादंबरी म्हंटले जाऊ शकत नाही.

'बळी' मालतीबाई बेडेकर (१९५०) मध्ये दलित जीवनाचे प्रभावी चित्रण झाले होते. मधु मंगेश कर्णिक, जयवंत दळवी, अरूण साधू, बाळकृष्ण प्रभु देसाई यांनीही दलित जीवनाकडे लक्ष पुरविले. त्यांच्या लेखनात दलित साहित्य कम–अस्सल चित्रित झाले आहे असे म्हणता येणे कठीण आहे. अण्णाभाऊ साठे यांच्या कृतित्वाचा उल्लेख झाला आहेच. शंकर खरातांनी झोपड़पट्टीमधील हातभट्टीच्या धंद्यात जगणाऱ्या दलित जीवनाचे रूप सादर केले आहे. (हातभट्टी, झोपडपट्टी, मी मुक्त, मी मुक्त, फूटपाथ इत्यादी) शंकरराव खरात आशया बरोबर रूपरचनेकडे व प्रयोगात्मकतेकडेही लक्ष्य देतात. हरिभाऊ पगारे यानी आंबेडकरांच्या चवदार तळयाच्या सत्याग्रहाला केंद्रस्थानी ठेवून 'कांलिंदी' या लघुकादंबरीची रचना केली. हिं. गो. बनसोडे यांनी दलित मुक्ती आंदोलनावर 'मुक्तीसंग्राम' ही कादंबरी लिहिली. ज. वि. पवारांनी 'बलिदान' मध्ये आंबेडकरांच्या महानिर्वाणानंतर दलित नेतृत्वाची असमर्थता आणि सामान्य जनतेची असमर्थता यांचे प्रभावी चित्र रेखाटले. दलित साहित्यात ज्या कादंबऱ्या जीवनदृष्टी, प्रसंगचित्रण आणि व्यक्तित्वचित्रणाच्या दृष्टीने सफल झाल्या आहेत. त्यांत ज.वि. पवारांच्या कृत्तींची गणना केली जाते. अशोक लोखंडे यांच्या "निष्ठा" कादंबरीत दलित स्त्रीच्या अब्रूवर आक्रमण करणाऱ्या घटनेला केंद्रस्थानी ठेवले आहे. घटनेत रोचकता आणण्यासाठी अतिरेकी नाटयात्मकतेचा वापर केला गेला आहे. नामदेव ढसाळांच्या 'हाडकी हाडवळा' मध्ये साहसी दलित स्त्रीचे रेखाटन आहे. बाबूराव बागुलांची 'सूड' (७०) ची नायिका देवदासी असून पुरूषाच्या साधुत्वाने प्रभावित होऊन समर्पण करते. नायिकेची मानसिक उलघाल दाखविण्यात लेखक यशस्वी झाला आहे. सुधाकर गायकवाड यांनी समाजाला लागलेल्या शुद्रत्वाचा कलंक नष्ट करणाऱ्या आणि त्याकरिता संघर्ष करणाऱ्या नागनाथाची प्रभावी व्यक्तिरेखा सादर केली आहे. (शूद्र)

प्रा. केशव मेश्राम यांनी 'हकीकत' मध्ये जीवनातील दाहक अनुभव आत्मकथनात्मक शैलीत व्यक्त केले आहेत. त्यांची 'जटायु' ही खूप प्रभावी कादंबरी आहे. मांग समाजातील अभिमन्यु नवाचा तरुण अनेक स्तरांवर संघर्ष करतो. आपल्या जातीबरोबर, उच्च वर्गाबरोबर, परिस्थिती बरोबर शिक्षित परंतु आपल्या समाजाशी निष्ठेने बांधलेल्या तरुणाचे प्रभावी चित्रण 'जटायू' मध्ये झाले आहे. मेश्रामांची 'पोखरण' ही सुध्दा वेगळी कादंबरी आहे. आर्य–अनार्य यांचे संबंध, संपर्क, यांचे प्रभावी चित्रण यात केलेले आहे. आकाराने ही कादंबरी लहान आहे.

भीमसेन देठेंच्या 'इस्कोट' मध्ये बौध्द धर्म स्वीकारल्यानंतर निर्माण झालेल्या बौध्द आणि बौध्दतरांमधील संघर्षाचे प्रभावी चित्र आहे. भीमसेन देठे यांनी या नंतर 'घुसमट', 'झाकळ' या कादंबऱ्या लिहिल्या.

त्यांची अलीकडे प्रकाशित झालेली चक्री (९४) त्यांच्या मनात 'दगडी' नावाच्या करारी स्त्रीचं व्यक्तित्व खोलवर रूतलेलं होतं. तिचं चित्रण त्यानी 'चक्री' मध्ये केलं आहे. दगडी महार जातीतली आहे. पण या कादंबरीत देठे यानी तिच्या वाटयाला आलेल्या यातनांची कारणमीमांसा करताना ती दलित आहे. एवढीच दृष्टी न बाळगता भारतीय पुरूष प्रधान संस्कृतीत शोषित म्हणून जगत असलेल्या स्त्री–वर्गाची प्रतिनिधी या व्यापक अर्थाने चित्रण केलं आहे. स्त्रीवर अत्याचार करणारा उच्च वर्गातील, उच्च वर्णातील पुरूष असतो तसा दलित वर्गातीलही असू शकतो हे भान देठे यानी ठेवले आहे. यातील पवार गुरूजी आणि दगडी यांच्यातील निर्विषय प्रेमसंबंध परस्परांच्या त्यागावर आधारीत आहेत. बुध्दाची करूणा हा त्याचा आधार आहे हे दाखवते आहे. दगडीचा विवाह गुलाबशी झाल्यावर तिनं तो भारतीय स्त्रीच्या मनाप्रमाणे मान्य केला होता. गुलाबच्या अपघाती निधनानंतर तिच्याच जातभाईकडून तिची फसवणूक होऊन तिला वेश्याव्यवसायात जावं लागलं. पुढे दगडी आपल्या करारी व्यक्तिमत्त्वाप्रमाणे स्वतः या चिखलातून बाहेर येते. बरोबरच्या स्त्रियांनाही श्रमावर आधारलेल्या स्वावलंबी जीवनाचा मार्ग दाखवते. देठे यांची जाणीव विस्तारलेली आहे. दगडीचा महार मास्तरांनी पाळलेला मुलगा माधव प्रोफेसर

होतो. पण मध्यमवर्गीय संस्कृतीच्या मोहात गुरफटलेला त्याचा मुलगा राहुल मात्र आंबेडकरांच्या कार्याला वाहून घेतो. जातीच्या संकुचितं वर्तुळातून आंबेडकरी मूल्यांच्या आधारे व्यापक मानवीय मूल्यव्यवस्थेकडे ही कादबरी निर्देश करते. यात लोकप्रिय साहित्याची काही वैशिष्टये आढळतात. पण देठे यांचा मूळ दृष्टीचा विस्तार महत्वाचा आहे. तो दलित साहित्याच्या, भावी दिशेकडे निर्देश करतो. माधव कसबेंच्या 'नकुल' मध्ये दलित जीवनाच्या वास्तवाबरोबर प्रणयाचे रंग ही आहेत. भाई तांबे ची 'नियती' एका बौध्द तरुणाच्या सूडाची भावना व्यक्त करते. जे. जी. मानेंच्या 'मुक्त' मध्ये दलित स्त्रीच्या जिद्दीचे आणि साहसाचे समर्थ चित्रण केलेले आहे. 'मेलेलं पाणी' मध्ये अशोक व्हटकरांनी ढोर जातीच्या विकासाची आकांक्षा व्यक्त केली आहे ' त्यांच्या अनेक कादंबऱ्यात '७२ मैल' कादंबरी विशेष उल्लेखनीय आहे. उग्र वास्तवाचे प्रभावी चित्र यात आले आहेत. भि. शि. शिंदे यांची 'अमृतनाथ' नामक ऐतिहासिक असून आपल्या समाजासाठी बलिदान करणाऱ्या अमृतनाथ नामक तरुणाची करुण कथा यात आहे. कल्पनाविलासाची ओढ या कादंबरीत अधिक जाणवते. प्रेमानंद गज्वींच्या 'जागर' मध्ये वैदर्भीय जीवन दिसते. गज्वी खूप अपेक्षा उत्पन्न करणारे आणि कलेची उत्तम जाण असणारे लेखक आहेत. राजा जाधव यांनी दलित कादंबरीची चर्चा करुन असा निष्कर्ष काढला आहे की 'प्रा. मेश्राम, बाबुराव बागुल, नामदेव ढसाळ यांच्या कादंबरीतील व्यापक जीवन आणि त्याचे काव्यमय प्रकटीकरण सोडले तर बाकीच्या लेखकांच्या कादंबरी लेखनात अजून कच्चेपणा दिसून येतो.' माधव कोंडविलकरांच्या 'छेद' 'वेध', 'अनाथ' मध्येही हेच दोष दिसतात. नामदेव व्हटकर आणि अशोक व्हटकरांनी काही चांगल्या कृती मराठी साहित्याला दिल्या आहेत. अशोक व्हटकर यांच्या 'मेमेलं पाणी' या कादंबरीचा उल्लेख करायला हवा यात चांभारांच्या जीवनाचा व्हटकरानी घेतलेला वेध महत्वाचा आहे. हे जीवन चितारताना चांभारांच्या व्यवसायाचे व त्यांतील अडचणींचे प्रभावी चित्रण त्यानी केले आहे. यातून दलित व दलितेवर संबंध प्रकट होतात, एक गाव साकार होते. उत्तम बंडू तुपे एक प्रभावी दलित साहित्यकार आहेत. त्यांच्या साहित्यकृतीमध्ये अनुभवलेल्या जीवनाचे नागडे वास्तव दिसून येते. मात्र वैविध्याच्या मागे लागताना कादंबरीच्या अनुभवावर चिंतन करण्याची प्रवृत्ती क्षीण दिसते. शरणकुमार लिंबाळे एक चांगले कादंबरीकार आहेत. दलित लेखकांनी मराठी वाचकाला एका वेगळया विद्रुप भयानक आणि नरकासमान जीवनाचा अनुभव करून दिला आहे. असा अनुभव जो मध्यमवर्गीय लेखकाच्या कल्पनेतही येणे कठीण होते. अलीकडे प्रसिध्द झालेल्या नामदेव कांबळे यांच्या 'राघववेळ' (१३) कादंबरीचा विशेष आवर्जून उल्लेख करावा इतकी ती महत्वाची कृती आहे. शोषित मांग जीवनाचे प्रभावी समग्रतेकडे वळणारे वास्तवभान यात व्यक्त झाले आहे.

दलित लेखकांजवळ जीवनाचा विलक्षण प्रभावी अनुभव आहे. हा अनुभव स्वतःच इतका दाहक, भयानक आणि प्रभावशाली आहे की त्याचे सरळ–साधे निवेदन सुध्दा वाचकाला हलवून टाकते. परंतु बरेचदा प्रणयाचा नको तितका स्पर्श या वस्तुला झालेला आढळतो. भा. दि. फडके म्हणतात, 'संघर्षाला केन्द्र करू इच्छिणाऱ्या मराठी कादंबरीकरांना अजून मोह आवरत नाही तो त्याना प्रेमकथेचा एक धागा गुंफून टाकण्याचा'. (दलित साहित्य वेदना व विद्रोह) अनुभवाला अधिक प्रभावी करण्यासाठी भडक नाटयमयतेचा आधार घेतला गेल्यामुळे पुष्कळ वेळा कृत्रिमपणा ही येतो. दलित लेखक जर अनुभवाबरोबर निष्ठेने लेखन करतील तर महत्वपूर्ण साहित्य निर्माण होऊ शकेल. अनुभवाचे संचित यांच्याजवळ कमी नाही. पण आत्मपूजन आणि आत्मरती या भावना बाधक ठरतात असे वाटते. या संदर्भातही नामदेव कांबळे यांचे लेखन महत्त्वाचे वाटते.

दलित साहित्यिकांना ज्या भयानक परिस्थितीशी टक्कर देत वर यावे लागते त्यात त्यांच्या भावनात्मक अंगाचे जितके सकस पोषण व्हायला हवे तितके ते होत नाही. व्यक्तित्वात एकारलेपणा राहतो. त्यामुळे अनुभवाला बहुकेंद्री, बहुरूपी, आणि बहुपेडी करणे फार कठीण जाते. कादंबरीच्या प्रकाराला या गोष्टीची विशेष आवश्यकता असते. अर्थात ही गोष्ट सामान्यपणे प्रवृत्तीचा विचारकरताना महत्वाची वाटते. एखादा महान प्रतिभाशाली साहित्यिक सर्वच अडवणींवर व अवरोधांवर मात करतो.

दलित साहित्याच्या मर्यादांना एक महत्वाचे कारण हे ही आहे की त्यानी विरोध, निषेध, क्रोध, आक्रोश या भावनात्मक अंगाचा जेवढा उपयोग केला तेवढा सहानुभूती, कारुण्य, वर्णजात निरपेक्ष माणुसकीचा गहिंवर यांचा केला नाही. निषेधातून वाङ्मयीन परंपरानाही बाद केले की लेखकीय व्यक्तित्वावर संकुचित बंधने येतात. क्रोध आणि आक्रोशातून व्यापक व समग्र चिंतनाचा परीघ वाढत नाही. त्यामुळे लेखकाला आपल्या स्वतःच्या विचाराना विरोधी आणि वृत्ति विरोधी वास्तवाची खोल जाण येत नाही आणि वेगवेगळया मनोभूमीकेत आणि स्वभाव वैशिष्टयांनी युक्त माणसांच्या, मनात उतरण्याची तयारी राहात नाही. कादंबरी सारख्या व्यापक अवकाश असलेल्या वाङ्मय प्रकाराला हे फार आवश्यक असते. लेखनात एक प्रकाराचा एकेरीपणा, सांचेबंदपणा येतो. सुदैवाने दलित साहित्याला याची जाण झाल्याच्या खुणा दिसतात, यामुळे सध्या थोडा निर्मितीत मंदपणा आला असला तरी अधिक ऊर्जा प्राप्त करून वेगाने अधिक ताकदीने दलित साहित्यात भर पडेल असे वाटते. दलित साहित्यात चित्रित होणारी तरूण पिढी अन्तर्मुखी होऊन पुनः समाजाशी एकरूप होताना दिसते. ही आशेची खूण आहे.

इतिहासाचा शोध

ह. ना आपटयांनी ऐतिहासिक कादंबऱ्यांचा पाया रचिला पुढे नाथ माधव, हडप, गो. नी. दांडेकर आदी लेखकांनी महाराष्ट्राच्या उज्ज्वल ऐतिहासिक कालावर लेखन केले. सर्वानांच राष्ट्रीयतेच्या प्रेरणेने प्रेरित केले होते. १९६० नंतर या दृष्टीत थोडासा बदल जाणवू लागला. मराठी सामाजिक कादंबऱ्यांची जी व्यक्तिवादी प्रेरणा होती ती कमी झाली मात्र ऐतिहासिक वातावरणातील काही विशिष्ट चरित्रांवरतीच लेखकांची नजर जाऊ लागली. रणजित देसाईच्या ''स्वामी'' ने ऐतिहासिक व्यक्ती अन् ऐतिहासिक वातावरणाचे सहाय्य अवश्य घेतले परंतु माधवराव पेशव्यांचे व्यक्तित्व नव्या मनोवैज्ञानिक दृष्टिकोनातून उभे केले. माधवरावांची पत्नी रमा आणि माधवराव यांमधील प्रेमसंबंध अनोख्या नजाकतीने चित्रित केले. अधिकार, सत्ता, वैभव या सर्वांपासून माधवरावाला वेगळे करून एका व्यक्तीच्या सुख दुःखांच्या रूपात त्याचे मूल्यमापन केले. शिवाजीच्या जीवनावर ''श्रीमानयोगी'' सुध्दा रणजित देसाईची महत्वपूर्ण कादंबरी आहे पण ''स्वामी'' ची अंतर्भेदी दृष्टी त्यात नाही. नंतर मराठी कादंबरी क्षेत्रात नवीन लाट आली. सगळया बाहय वास्तवात संघर्षरत व्यक्तीच्या आतील मानसिक वास्तवाचे अंकन करीत त्या व्यक्तिबद्दलच्या समाजात स्वीकृत व मान्य मतांना आणि रूपांना आव्हान देत एखाद्या नवीन अस्पर्श्य, उपेक्षित तरीही महत्वपूर्ण चारित्रिक पक्षाचे रेखाटन करण्याची लाट समाजाकडून अनेक वर्षे अपमानित व्यक्तींच्या उज्ज्वल पक्षाला सामोरे आणून तिला न्याय देण्याचा परिपाठ सुरू झाला. मराठी लेखकांच्या मनावर व्यक्तिवादाचा जो प्रभाव आहे तो सामाजिक कादंबऱ्यावरच नव्हे तर ऐतिहासिक कादंबऱ्यावरही परिणाम करतो. परिणामी ऐतिहासिकत्व उणावते. इतिहासाच्या भरभक्कम आधारावर व्यक्तींची रेखाटणे करण्यापेक्षा आपल्या विशिष्ट दृष्टिकोणासाठी आवश्यक ऐतिहासिक प्रमाणांची पाहाणी केली गेली. ही काहीशी उलटी दिशा आहे. ना. स. इनामदारांच्या 'झेप' (१९६३) 'झुंज', 'मंत्राबेगळा' 'शहेनशहा' आदी कादंबऱ्यांनी लोकप्रचलित विश्वासांना बदलण्याचा जणू विडा उचलला. भीमराव कुलकर्णीच्या 'ओंकार' ने आनंदीबाई (राघोबा पेशव्यांची कुटिल पत्नी) चे कुटिल चरित्र बदलवून टाकीत तिला उज्ज्वल स्वरूपात प्रस्तुत केले. हयाचा क्वचित एखादा चांगला परिणाम सुध्दा असा झाला की व्यक्तीच्या चांगले वाईटपणाच्या पलिकडे जाऊन अधिक व्यापक सांस्कृतिक दृष्टिकोनातून भूतकालाकडे पाहण्याचे प्रयत्न केले गेले. प्रो. रंगनाथ तिवारींची कलाकृति 'देवगिरी बिलावल' ने अल्लाउद्दीन खिलजीच्या संगीत प्रेमाकडे याच नजरेने पाहिले. ही कादंबरी एक यशस्वी ऐतिहासिक कादंबरी आहे. कारण तिच्या भावानुभवाला ऐतिहासिक वातावरणाची उत्तम जोड आहे. इंदुमती केळकर, प्रतिभा रानडे, नलिनी सहस्त्रबुध्दे यांनी क्रमशः 'सुलताना रझिया', 'बदनसीब' (बहादुरशाह जफरच्या जीवनावर आधारित) 'मस्तानी' या कादंबऱ्या लिहून व्यक्तींना न्याय देण्याचा प्रयत्न केला. पुढे द. ग. गोडसे यांनी मस्तानीच्या जीवनावर कादंबरीवजा पुस्तक लिहिले.

भूतकालाचा नवीन दृष्टीने शोध घेण्याची दृष्टी पौराणिक काळापर्यंत गेली.

वि.स. खांडेकरांच्या 'ययाती' ने समकालीन व्यक्तिवादी भोगवाद आणि श्रेयमूलक समाज दृष्टी यांच्यातील द्वन्द्व साकार केले. आणि पौराणिक कालातही शोध सुरू झाले. खांडेकरांच्या ययातीला ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झाला आणि तिचा मराठी कादंबरीवर प्रभाव ही पडला. म्हणून तिचा किंचित विस्ताराने उल्लेख आवश्यक वाटतो. ययातीचा कथा व पात्रे पौराणिक एतिहासिक आहेत. पण त्याच्या अनुभवाला आधुनिक मानवाच्या समस्यांची, मानसिकतेची आणि संवेदनेची भक्कम जोड आहे. वेगवेगळया पात्रांच्या मनोभूमिकेतून कादंबरीच्या अनुभवाची उभारणी केल्यामुळे ऐतिहासिक वातावरण ठोसपणे चित्रित करण्याचे टाळता आले आणि सर्व घटना विशिष्ट पात्रांच्या दृष्टीतून पाहिल्यामुळे त्यांच्या ऐतिहासिकतेचा प्रश्नही फारसा महत्वाचा राहिला नाही. विसाव्या शतकातले जग आत्मकेंद्रित चंगळवादामुळे अतृप्तीच्या आणि विनाशाच्या रस्त्यावर घोडदौड करीत आहे आणि त्याचा समतोल नष्ट झाला आहे. पुनः समतोल निर्माण झाल्याशिवाय या जगाला असलेला विनाशाचा शाप नष्ट होणार नाही, या समतोलाचा रस्ता सेवा, त्याग, करुणा, प्रेम, निष्कामता या मूल्यांच्या आधारेच प्राप्त होणे शक्य आहे. हा या कादंबरीचा मुख्य आशय आहे. खांडेकरांच्या लेखनातले फार मोठे दोष या कादंबरीतही जाणवतात पण भारतीय वाचकाला असलेल्या पौराणिकतेची ओढ आणि खांडेकरांच्या लेखनात त्यांच्या पारदर्शी प्रामाणिकणामुळे, आत्मिक औदात्याच्या, स्पर्शामुळे आणि जीवन दृष्टीतल्या भव्योदात्तपणामुळे ही कादंबरी लोक प्रियतेच्या शिखरावर गेली. यातील पात्रे विशिष्ट प्रवृत्तींची/जीवन विषयक तत्वज्ञानाची प्रतीके असल्यामुळे कादंबरीला गांभीर्य आणि महत्व आले आहे. खांडेकरांच्या कांदबरीत महानतेचे गुण कमी आहेत. त्यांची पात्रे सामान्य वाटतात. तांत्रिक, चुकाही खूप आहेत. पण या सर्व लेखनात खांडेकरांच्या चिंतनशील मनाचा प्रत्यय येतो. त्यांचे चिंतनही फारसे मौलिक नाही. पण त्या चिंतनाच्या पाठीमागे प्रतीत होणारे व्यक्तित्व अतिशय प्रामाणिक, विलक्षण भावनाप्रधान समाजाबद्दल अपार कळवळा असणारे आहे. माणसाच्या भोगवादातून संभवणाऱ्या विनाशामुळे ते अतिशय अस्वस्थ झालेले आहेत. मानवाने सांस्कृतिक मूल्यांची जपणूक करावी म्हणून ते तिळतिळ तुटताना दिसतात.

चक्रव्यूहात केन्द्रभागी राहून मोडक्या रथाच्या चक्राने शेवटपर्यंत लढत राहणाऱ्या अभिमन्यूचे श्रेयोन्मुख व्यक्तित्व ज्या अर्थाने भारावून टाकते त्या अर्थानेच खांडेकरांचे लेखकी व्यक्तित्व ज्या अर्थाने भारावून टाकते त्या अर्थानेच भारावून टाकते. नंतरच्या पौराणिक कादंबऱ्यांच्या निर्मितीला 'ययाती' पुष्कळअंशी कारण झाली आहे हे तिचे मोठेपणा सिध्दच आहे. आलोचना, (ऑगस्ट १९७६ चंद्रकांत बांदिवडेकर) उपेक्षितांच्या विषयी सहानुभूती, त्यांच्यावरील कलंक दूर करून न्याय देण्याची उदार मानवी दृष्टी आणि काही उच्च वर्गाकडून खालच्या वर्गावर झालेल्या अत्याचारांमुळे उत्पन्न झालेली आत्मग्लानीची भावना हया सर्वांचा असा प्रभाव पडला की पौराणिक घटनांची नव्या दृष्टींनी समीक्षा केली जाऊ लागली. शिवाजी सावंतांच्या 'मृत्युंजय'. ने कर्णाचे नवीन रूप प्रस्तुत करताच कादंबरी 'ययाती' प्रमाणेच लोकप्रियतेच्या शिखरावर जाऊन पोहोचली. या कादंबरीची अन्य भारतीय भाषांतील भाषांतरे वाचकांनी मोठया आवडीने वाचली. त्यांच्याच 'छावा' मधील संभाजीला सुध्दा वाचकांनी डोक्यावर घेतले. कवी बा. भ. बोरकरांनी दशरथ पत्नी कैकयीचे उज्ज्वल रूप 'प्रियकामा' मध्ये दाखवले. हयाच प्रकारच्या अनेक कादंबऱ्या पुढे येऊ लागल्या. आनंद साधलेंनी अनेक पौराणिक आख्यानांकडे नवीन दृष्टिकोनांतून पाहण्याचा प्रयत्न केला. या प्रकारच्या अधिकांश कादंबऱ्यांचा विचार करता असे जाणवते की कादंबरीत मिथकांचे (दैवतकथांचे) स्वरूप संभाळून त्यांचा कलात्मक वापर न करता वैयक्तिक दृष्टिकोणातून भूतकाळ शोधण्याचा हा प्रयत्न केवळ एक 'स्मार्ट' प्रयत्न आहे. अन्य अनेक कादंबऱ्या तर दैवत कथांचे स्वरूपच बदलून वकिली थाटाने दिलेल्या कैफियती सारख्या वाटतात. हा दोष मराठी कादंबरीच्या मुळाशी असलेल्या व्यक्तिवादी दृष्टीचा परिणाम आहे. या संदर्भात विवेच्य काळांत विश्वास पाटील यांच्या 'पानीपत' कादंबरीचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. त्यांनी इतिहासात लांछित झालेल्या भाऊसाहेब पेशव्यांचे एक आगळे दर्शन नव्याने घडवले. पण या पाठीमागे इतिहासाचा अभ्यास, पानिपत ज्या ठिकाणी धडले त्या भूमीचे साक्षात दर्शन, काहीशी काल्पनिक आणि वास्तवाभासी जोरदार संघर्षाची उभारणी यामुळे कादंबरी ऐतिहासिक कादंबऱ्यांत महत्वाची ठरली आहे.

अनुक्रमणिका

चरित्रात्मक कादंबरी

मराठी साहित्यात आत्मचरित्रांची परपरा प्रभावी आहे आणि साठ नंतर स्त्रियांनीसुध्दा आपले अनुभव निःसंकोचपणे सांगण्याचा बिडा उचलला आहे. अनेक दलित लेखकांची आत्मचरित्राच्या माध्यमातून साहित्यात प्रवेश केला. परंतु इथे ज्या साहित्यप्रकारचे वर्णन करायचे आहे तो आत्मचरित्र आणि चरित्र यांचाशी संबधित असून ही वेगळयाच रूपाचे दर्शन घडवतो. चरित्रात्मक कादंबरी सुध्दा ऐतिहासिक कादंबरीप्रमाणेच जीवनातील घटनांचा साचा आणि व्यक्तीचे स्थूल बाहय–चरित्र स्वीकारते नव्हे ते अनिवार्य ही आहे. परंतु त्यानंतर त्या संबंधातील आंतरिकतेला कल्पनेच्याद्वारे साकारण्याचे स्वातंत्र्य घेतले जाते. लोकमान्य अशा परिचिताच्या अपरिचित पैलूंना सामोरे आणणे आणि त्याला वैशिष्ट्पूर्ण आणि अधिक जिवन्त बनविण्यासाठी लेखकाच्याठायी कल्पनाशक्तीची, मानवजीवनाच्या निरीक्षणाची आणि मानमशास्त्रीय जाणकारीची आवश्यकता असावी लागते. भीमराव कुलकर्णीच्या 'हरिनारायण' (हरी नारायण आपटे) कादंबरीने या प्रवृत्तीचा सूत्रपात केला असावा. पण श्री. ज. जोशींच्या 'आनंदी गोपाळ' ने एवढे यश संपादन केले की मराठीत अशा कादंबऱ्यांची एक लाट निर्माण झाली. भा. द. खेर यांची 'यज्ञ' (सावरकरांचे जीवन चरित्र) मृणालिनी देसाई 'पुत्र मानवाचा' (गांधीजींचे जीवन) ज्योत्स्ना देवधर यांची 'उत्तरयोगी' (योगी अरविंदांचे जीवन), सुमति क्षेत्रमाडे यांची 'जीवन स्वप्न' (शरतचंद्र चॅटर्जी) हया कादंबऱ्याना अपेक्षित यश मिळाले नाही. 'दुर्दम्य' मध्ये गंगाधर गाडगीळांनी टिळकांच्या चरित्राला कादंबरीचे रूप देण्याचा प्रयत्न केला. आणि त्यावर झालेल्या प्रतिकूल टीकेचे भान ठेवून ही गाडगीळांनी यात चांगले यश संपादन केले असे माझे स्पष्ट मत आहे.

ही लोकमान्यांच्या जीवनावरची कादंबरी आहे. अर्थातच लोकमान्यांच्या जीवनातील प्रमुख अप्रमुख पण ऐतिहासिक पुरावा असलेल्या घटना व व्यक्ती यात येणारच. प्रश्न या साम्ग्रमीच्या कलात्मक रूपात व्यक्त होण्याचा. शैलीचे कलात्मक उपयोजन, प्रसंगांची आणि घटनांची दृक्प्रत्ययी, रंगत आणणारी रचना, पात्रांच्या लकबींनी आणि स्वभावैशिष्टयांनी आणलेला जिवंतपणा (हे सर्व गाडगीळ एखाद्या शब्दाने वा वाक्यानेही घडवून आणंतात), संवादांचे पात्रनिहाय वेगळेपण, युक्तिवादांतही, विलक्षण वक्रता आणि हजरबाबीपणा, व्यक्ती–व्यक्तीमधल्या संबंधांचे काहीसे ज्ञात व बरचसे अज्ञान परंतु ज्ञाताशी संगत आणि विश्वसनीय रूपाकंन, मानवीय चैतन्याचा सर्वव्यापी सुगंध या बाबी चरित्र निरूपणाला कलेच्या पातळीवर नेतात, सर्वात महत्वाचे म्हणजे लोकमान्यांच्या व्यक्तित्वातील मूलभूत मनोधर्म आणि बाहयपरिस्थिती (राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, कौटुंबिक इत्यादी) यांचा अनुबंध दाखवीत व्यक्तित्व विकासाची प्रक्रिया गतिमान करून व्यक्तित्वाबद्दल एक समग्र भान उत्पन्न करण्याचे कार्य कादंबरीकाराला करायचे असते. ते सर्व मर्मज्ञपणे गाडगीळांनी केले आहे. बाळू, बळवंत, बळवंतराव, लोकमान्य आणि निष्काम कर्मयोगी महात्मा या चढत्या श्रेणीच्या विकासमान व्यक्तिमत्वाचा आलेख विश्वसनीय स्वरूपात गाडगीळांनी काढला आहे. या व्यक्तिमत्वाचा विकासाचा अनुभव ही कृती देते. टिळकांच्या बहिर्मुखी स्वभावात पुढे चिंतनाच्या स्पर्शाने अंतर्मुखता येते, आरंभीची गृहस्थधर्माची प्रतिकूल वैशिष्टये पुढे त्यांना जखडून न ठेवता त्यांतील आंतरिक भावार्थाशी तन्मय करतात. लोकप्रेम, मित्रप्रेम आणि कुटुंबप्रेम यात एकरूपता येते. त्यांच्या मूल प्रवृत्ती, त्यांच्या अर्जित वृत्ती आणि त्यांची जीवन ध्येये यात एकात्मता निर्माण होते. एक सोवळे नेसणारा सनातनी ब्राहमण अस्पृश्यता नष्ट करू पाहातो, हिंदु–मुसलमानांचे ऐक्य व्हावे अशी प्रामाणिक धडपड करतो. हा व्यक्तित्व विकास गाडगीळांनी कलावंताच्या मर्म–दृष्टीतून पाहिला म्हणून ही कादंबरी मराठीतल्या काही श्रेष्ठ कादंबऱ्यापैकी एक वाटते. (गंगाधर गाडगील व्यक्ति आणि सृष्टी पृ. ४१०–४११) 'आनंदी गोपाळ' च्या यशा नंतर श्री. ज. जोशींनी पुन्हा एका महत्वपूर्ण व्यक्तित्वाला स्पर्श केला होता – १९२०–२५ च्या काळात लैंगिक विषयावर खुली चर्चा करणारे आणि कुटुंब नियोजनाचा प्रचार करणारे र. धों. कर्वे यांना नायकाच्या रूपात रंगवून "रघुनाथची बखर" त्यांनी लिहिली पण ही कलाकृती अयशस्वी ठरली.

हया संदर्भात गो.नी. दांडेकरांनी ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास यांच्या जीवनावर लिहिलेल्या कादंबऱ्यात ज्ञानेश्वरांवरील 'मोगरा फुलला'

ही मराठीत भूषणभूत ठरावी अशी श्रेष्ठ कादंबरी मानायला हवी हा उल्लेख वर आलेलाच आहे. विद्या गौरी सप्रे यांनी मराठीतील अग्रणी कथाकार जी. ए. कुलकर्णी यांच्या जीवनावर 'गूढयात्री' नावाची कादबरी लिहिली आहे. एकटे जीवन जगणाऱ्या प्रतिभाशाली लेखकांची मानसिकता त्याच्या जीवनात घडलेल्या घटनांच्या आधारे आणि त्याच्या कथांच्या अनुभवांच्या आधारे कादंबरीत चित्रित करण्यात लेखिकेला यश प्राप्त झाले आहे. विद्या गौरीनी मीरेच्या जीवनावर 'कृष्णामयी', इंदिरा गांधीवर 'अर्ध्यदान' (९१) आणि 'वज्रलेख' या कादंबऱ्या लिहिल्या वज्रलेखचे कथानक कोणार्क येथील सूर्यमंदिरा भोवती फिरते. १३ व्या शतकातील उत्कल प्रांतातील राजा नरसिंहदेवापासून ते विसाव्या शतकातील कॅलीफोर्निया राज्यातील मिनी क्राईस्टपर्यंतच्या ७०० वर्षाचा काळ कवेत घेण्याचा प्रयत्न केला आहे. चद्रकांत खोतानी विवेकानंदाची जीवन कथा त्यांच्या आत्मानिवेदनातून साकार केली आहे. 'बिंब प्रतिबिंब' (१९९३) चरित्र नायकावर उपलब्ध सामुग्रीचे वाचन करून ही कांदबरी सिध्द केल्यामुळे तिला प्रामाणिक पणाचे वजन प्राप्त झाले आहेच पण त्यांच्या वैचारिक प्रवाहांचा, स्थित्यंतरांचाही प्रभावी वेध घेतला आहे. बुध्दिवादी विज्ञाननिष्ठा विवेकानंद, नास्तिक्याकडून आस्तित्त्वाकडे कसे जातात त्याचा रसात्मक आविष्कार लेखकाने केला आहे. विवेकानंदाच्या जीवनातील महत्वाचे प्रसंग, मानसिक ताण–तणाव सामर्थ्यानं व्यक्त केले आहेत. 'दोन डोळे शेजारी' ही रामकृष्ण परमहंस, शारदामाता, विवेकानंद आणि त्यांचे मित्र याच्या संबंधावर आधारलेली एक यशस्वी कादंबरी खोतानी लिहिली आहे. भगिनी निवेदिताची कहाणी 'सन्याशाची सावली' मध्ये आली आहे.

भा. द. खेर यानी चरित्रात्मक कादंबरीत भरपूरच भर घातली असली तरी त्यांच्या फक्त चार्ली चॅपालीनचा जीवनावर लिहिलेल्या 'हसरे दुःख' कादंबरीचा उल्लेख करायला हवाः चार्ली चॅपलीनच्या जीवनातील दुःखद करुण घटना कौशल्याने निवडून इतकं दुःख पचवून लोकांना सतत हंसत ठेवणाऱ्या चॅपलीनचं हे चित्र प्रभावी आहे. विद्याधर भागवत यांच्या 'ऐल तटावर पैल तटावर' या बालकवी ठोंबरे यांच्या जीवनावर लिहिलेल्या चरित्रात्मक कादंबरीचा ही विशेष उल्लेख करायला हवा. विभावरी शिरूरकर यांची 'खरे मास्तर' ९३ आणि अनुनाई भागवतांची 'बिल्वदल' या दोन्ही कादंबऱ्या आपल्या वडिलांच्या जीवन चरित्रावर लिहिलेल्या यशस्वी कादंबऱ्या आहेत. पित्याच्या चरित्र्याचा वेध घेताना त्यानी अपेक्षित तटस्थता आणि वस्तुनिष्ठता बाळगली आहे, अल्पशिक्षित परंतु सामाजिक मान असलेल्या आणि प्रगतिशील विचारांना आचरणात आणणाऱ्या आपल्या वडिलांच्या प्रमादांचे चित्रण करताना ही विभावरी शिरूरकर हातचे राखून लिहीत नाहीत. खरे मास्तरांच्या एकटेपणाही प्रभावीपणे व्यक्त झाली आहे. मराठीत आत्मचरित्रात्मक कादंबऱ्या लिहिण्याची मोठा प्रयत्न अलीकडे दिसतो. या प्रयत्नाची सुरवात पडक्यांच्यापासून झाली असावी. पुष्कळ वेळा आपल्या जीवनातल्या चुका, प्रमाद, नैतिक स्खलन यांचे वकिली थाटाने समर्थन करणे, आपल्या महात्म्याचे वर्णन करणे, खऱ्या बरोबर पुष्कळ से काल्पनिक घुसडणे यातून आत्मसमर्थनाचा उद्देश लपत नाही. अशा वेळी धड आत्मचरित्रही नाही आणि धड कादंबरीही नाही अशी फसगत होते. आनंद यादव यांच्या तीन कादंबऱ्या 'झोंबी', 'नांगरणी' 'घरभिंती' यशस्वी आत्मचरित्रात्मक कादंबऱ्या म्हणता येतील. कारण आपला काळ परिसर, आपले घर, कौटुंबिक अवस्था यांचा प्रामाणिक चित्रपट प्रस्तुत करताना आपल्याकडे तटस्थपणे पाहून आपल्या व्यक्तित्वाचा वेध घेण्यात लेखक यशस्वी झाला आहे. नामदेव कांबळे यांच्या दोन आत्मचरित्रात्मक कादंबऱ्या 'राघववेळ' आणि 'ऊनसावली' महत्वाच्या आहेत. दलित जीवनाची अपरिहार्य दुःखे भोगूनही वस्तुनिष्ठ दृष्टीने त्यानी व्यथा व्यक्त केली आहे.

काही तथ्ये

आतापर्यंत केवळ मनोरंजनार्थ लिहिणाऱ्या लेखकांचा उल्लेख हया निबंधात झालेला नाही. अद्‌भूत आणि रहस्यमय वातावरण निर्माण करून भयकथा लिहिणाऱ्या लेखकांचा उल्लेखही केला गेला नाही. हेर कथा ही विचारात घेतलेल्या नाहीत. वैज्ञानिक समस्यांना फँटसी म्हणून चित्रित करणाऱ्या कादंबऱ्या सुध्दा धडाधड प्रकाशित होत आहेत. हयाला अपवाद जयंत नारळीकरांसारखे काही वैज्ञानिक जे उत्कृष्ट विज्ञानकथा लिहीत आहेत. स्त्रियांबाबत वेगळा विचार करण्याची या

समानतेच्या युगात गरज नाही पण गिरिजा कीर यांच्या काही कादंबऱ्या त्यांच्या रोचक शैली अन् प्रसंग चित्रणामुळे वाचकांवर प्रभाव टाकत आहेत. संदर्भात कुसुम अभ्यंकर यांचा ही नामोल्लेख करता येईल. वाचक वर्गाची वाढ करण्याचे श्रेय या लेखकांना दिले पाहिजे. या दृष्टीने या कादंबऱ्यांचा वेगळा अभ्यास गंभीरपणाने होणे आवश्यक आहे. भारतीय भाषातील वाचक वर्ग अनेक स्तरावर जगत आहे. त्यामुळे सामान्य वाचकाला व्यवहारिक जीवना पलीकडचा कल्पनेचा आनंद देणारा आणि त्याच्या मनावर संस्कार करणारा लोकप्रिय लेखक मोठे सांस्कृतिक कार्य करीत असतो याबद्दल कृतज्ञ असणे आवश्यक आहे.

काही उल्लेखनीय लेखक व कादंबऱ्या

सुभाष भेंडेच्या 'आगचां गोवा आम कां जाय' 'जोगीण', 'उद्ध्वस्त', 'अंधारवाटा', अच्युत बर्वे यांची 'सुखदा', एस.ची 'आदिमाया' मनोहर तल्हारांची 'माणूस', मनोहर शहाणेंची, 'देवाचा शब्द' प्रभाकर पेंढारकरांची, 'रारंग ढांग', अनिल बर्वेच्या, 'थँक्यु मिस्टर ग्लॅड' आणि 'अकरा कोटी गॅलन पाणी', डॉ. सदा कऱ्हाडेंची 'एका स्पृश्याची डायरी', राजेन्द्र बनहट्टींची 'अखेरचे आत्मचरित्र' (ही लहान पण दर्जेदार कादंबरी आहे). इ. कादंबऱ्या उल्लेखनीय आहेत. रंगनाथ पठारेंच्या 'चक्रव्यूह' मध्ये विद्यापीठातील विज्ञान शाखेतील शैक्षणिक स्थिती– गतीच्या आधारे तथाकथित यशस्वी वैज्ञानिकांचे ढोंग उघडकीस आणले आहे. वास्तवाचे हे घाडसी वेधक चित्र आहे. विद्यापीठातील अग्रणी पदाधिकाऱ्यांच्या राजकारणावर आधारित सुभाष भेंडेची 'बोनसाय' सुध्दा उल्लेखनीय रचना आहे यात पदाधिकाऱ्यांचे आपसांतील तणाव चित्रित झाले आहेत. रवींद्र शोभणेंच्या 'कोंडी' मध्ये राजकारणामुळे झालेला सामान्य माणसाच्या कोंडमारा अन् हार याचे प्रभावी दर्शन घडते. डॉ. अरुण गद्रेंची 'घातचक्र' वैद्यकीय अभ्यासक्रमातील कटू वास्तव समोर आणते. रत्नाकर मतकरी यांची 'ॲडम' कादंबरीही उल्लेखनीय वाटते. काम जीवनाविषयी मुक्तपणे काही वास्तवाचे पैलू त्यानी चितारले आहेत. अनंत सामंत यांच्या दोन कादंबऱ्या 'एम. टी. आयवा मारू' आणि 'अविरत' मराठी जगाला काहीसा नवखा असा अनुभव देणाऱ्या कादंबऱ्या आहेत. पहिल्या कादंबरीतील दर्यावर्दी जीवन अतिशय प्रभावी आहे. दोन्ही कादंबऱ्यात सामंतांची शक्तिशाली अनुभव व्यक्त करण्याची ताकद जाणवते. मात्र कामोत्तेजनाची काही वर्णने अतिशयोक्त वाटतात. तसेच अनेक ठिकाणी भडकपणाही येतो. दुसऱ्या कादंबरीची रचना ही दुसऱ्या भागात काहीशी विखुरल्यासारखी झाली आहे. पण सध्या लिहित असणाऱ्या मराठी कादंबरीकारांमध्ये अनंत सामंताची ऊर्जा प्रखर वाटते. त्यांच्या 'त्रिमाकासी मादाम' मध्ये बोटीवरील खलाशांच्या जीवनाचे प्रभावी चित्रण आहे. त्यांची भाषा दणकट, रांगडी आणि शक्तिशाली आहे. याच्या संदर्भात सुमेध वडावाला यांची एक अप्रतिम कादंबरी 'ब्रह्मकमळ' उल्लेखनीय आहे. यातील तुलसीचे विलक्षण व्यक्तित्व मुरळ घालणारे असून वडावाला यांच्या उज्ज्वल भविष्याची खात्री पटवणारी ही कादंबरी आहे. मानसिक व्यमिश्रतेची जाण, चिंतनशीलता आणि चित्रदर्शी शैली या त्यांच्या फार मोठया शक्ती आहेत. निर्मला देशपांडे यांची 'संलत सूर सनईचा' मध्यप्रदेशातील सरंजामशाही वातावरणाचा आणि उध्वस्ततेचा चांगला वेध घेते, ज्योत्स्ना देवधर यांनीही काही चांगल्या कादंबऱ्या दिल्या आहेत. 'घर गंगेच्या काठी', 'कल्पाणी' बाबा भांड यांच्या 'दशक्रिया' कादंबरीचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. एक अगदी वेगळा विषय जो कधी रोमांटिक होणे शक्य नाही तो घेऊन त्यांनी लिहिलेली कादंबरी मराठी कादंबरीकाराच मन विशेषतः तरुण पीढीचं जुन्या रोमांटिक परंपरा टाकून वास्तवातील कटुतेशी आणि विद्रूपाशी जोमदारपणे भिडते आहे याचा कादंबरीच्या विकासाला हया प्रवृत्तीची जरुरी आहे. श्याम मनोहर यांच्या लेखनाविषयीही अपेक्षा उंचावतात. त्याचे विषय आणि संरचना यात मौलिकता आहे.

काही निष्कर्ष

मराठी साहित्य वाचताना असे जाणवते की बऱ्यावश्या साहित्यावर सुखवाद अन् व्यक्तिवादाचा प्रभाव आहे. हा ना. सी. फडके यांचा प्रभाव आहे. आत्मकेंद्रित अनुभवच केवळ खरा अनुभव होऊ शकतो. अशी समजूत रूढ झाली आहे. (जिचे मूळ कलावाद आणि सौन्दर्यवादांच्या प्रभावात आहे). व्यामिश्र व विराट वास्तव दर्शन घेण्यास आणि अनुभवांचा सामना करण्यात रोखणारी

विचारधारा आहे. दलित साहित्याने निश्चितच या सौंदर्यवादावर आणि रूपवादावर आघात केले आहेत. परंतु अधिकाधिक दलित लेखक आत्मचरित्रात्मक लेखन करीत आहेत किंवा प्रतिक्रियात्मक आणि क्रोधजनित आक्रोशाने प्रेरित होऊन लिहीत आहेत. म्हणूनच पहिल्या कृतीनंतर चिंतन करून दुसरी प्रभावी कृती देण्या ऐवजीपहिल्या कृतीच्या यशावर अवलंबून राहण्याची वृत्ती वाढीस लागलेली दिसते. ग्रामीण साहित्याची स्थिती सुध्दा काहीशी अशीच आहे गावातील भयानक वास्तवाची सर्वांगीण विराट प्रतीती करून देणारी समर्थ कादंबरी कोणती ? झाडाझडती नंतर एकदम दुसरे नाव घेणे कठीण आहे. मन आणि बुद्धी दोघांनाही एकच वेळी हेलावून टाकणारी शक्ती कितीशा कृतीत आहे ? मात्र ग्रामीण साहित्यिक आपल्या ग्रामीण वास्तवाच्या वेध घेतांना नोस्टॅल्जिक वृत्तीने न घेता बदलत चाललेल्या, वास्तवाचे अनुगमन करताना दिसतो. राजकरण आणि समाजकारण यांचा एकमेकात झालेला गुंतवडा आणि एकूण मूल्यभ्रष्टतेमुळे सर्वत्र येत चाललेली उध्वस्तता अवकळा यांचे मर्यादित परिघात राहून का होईना पण वास्तवदर्शी चित्रण करण्याकडे साहित्यिकांची प्रवृत्ती ही साठोत्तर कादंबरीची जमेची बाब आहे.

आत्मचरित्रात्मक कादंबरी किंवा चरित्रात्मक कादंबरी काही सन्मान्य अपवाद वगळता एक प्रकारचा बदलत्या वास्तवाचा आणि काळाने दिलेली आव्हाने टाळण्याचा एक पलायनवादी मार्ग तर नाही ? काही अस्सल कादंबरीकारांना या प्रवृत्तीने चकवा दिला आहे. हेच मिथकावर आधारलेल्या साहित्याबद्दल म्हणता येईल. दुर्देवाने अनुवादित साहित्यांचे व्हावेतसे स्वागतच केले जात नाही. ही फारशी सुखाची गोष्ट नाही. मराठी कादंबरीच्या समृध्दीसाठी भारतीय श्रेष्ठ साहित्याच्या अनुवादांचा व्यासंग आवश्यक वाटतो. प्रत्येक वर्षी सुमारे साडेतीनशे कादंबऱ्या प्रकाशित होतात. पण त्यातल्या एखाददोनच चांगल्या कादंबऱ्या मानल्या जातात श्रेष्ठ कादंबरी नव्हे.

एकूण मराठी साहित्यात चांगली कादंबरी या वर्गात पंधरा बीस कादंबऱ्या येऊ शकतात पण श्रेष्ठ कादंबरी शोधताना पुन्हा एकदा विचार करावा लागेल. मराठीत कळत–नकळत प्रभावी ठरलेली व्यक्तिवादाची, आत्मविष्कारवादाची, विशुध्द सौंदर्यवादाची विचारधारा कादंबरीच्या जटिल वास्तवाची जाण करून देऊ शकत नाही. म्हणून कादंबरीची शक्ती ज्यामुळे क्षीण होते अशा गोष्टींचा पुनः विचार व्हायला हवा. दलित समाजातील साहित्यकांच्या भावनात्मक अंगाचे सर्व दिशांनी पोषण होईल अशी परिस्थितीच त्यांच्या कुटुंबव्यवस्थेत व समाजव्यवस्थेत लाभू शकत नाही. ग्रामीण साहित्यकार शहराची ओढ आणि गावातून हद्दपारी, औद्योगिक विकास, कृषी संस्कृती व शिक्षण यांच्यातील तफावत आणि यांच्यातील द्वन्द्वाने काहीसे निःशक्त झाल्या सारखे वाटतात. पांढरपेशी शिक्षणव्यवस्थाही लेखकांच्या व्यक्तित्व विकासाला पोषक राहिलेली नाही ती समाजा पासून लेखकाला अलग करते. अर्थातच प्रवृत्तीचा विचार करताना असा वास्तवाधिष्ठित विचार करावा लागतो. मात्र एखादा महान प्रतिभाशाली लेखक या बंधनांच्या पलीकडे जाऊ शकतो. तो तसा जावा आणि मराठीला मलयाल्लम लेखक शिवशंकर पिळ्ळू यांच्या "कयर" सारखी कादंबरी लाभावी ही इच्छा.

डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर
७ शाकुंतला,
साहित्य सहवास,
बांद्रा (पूर्व), मुंबई–५१

अनुक्रमणिका

माडखोलकरांची त्रिदल कादंबरी सामाजिक संदर्भात

प्रा. रवीन्द्र ठाकरे

'त्रिदल कादंबरीची' एकसंधता, तिचे अखंडत्व 'त्रिदल' हया संज्ञेतच गृहीत आहे. 'त्रिदल' म्हणजे एकाच ठिकाणावरून उगवलेली तीन 'दले' (पाने) पळसाच्या झाडाच्या एकेका फांदीला जशी तीन–तीन पाने उगवलेली असतात; ती वेगवेगळी दिसत असली तरी त्यांचा उगम एकाच ठिकाणावरून झालेला असतो; तशाच प्रकारचे 'त्रिदल' कादंबरीचे असते. ती तीन वेगवेगळया स्वरूपात आणि वेगवेगळया नावांनी अस्तित्वात असली तरी तिचा उगम हा एकाच कथाबीजापासून झालेला असतो. थोडक्यात असे म्हणता येईल की, 'त्रिदल कादंबरी'तील तीन 'दला' पैकी प्रत्येक 'दल' हे विषयाच्या, कथानकाच्या व निवेदन पध्दतीच्या दृष्टीने एकसंध असावे लागते. हया अटी जी तीन कादंबऱ्यांची मालिका पूर्ण करीत असेल तिलाच 'त्रिदल' कादंबरी म्हणता येईल.

भाऊसाहेबांनी लिहिलेल्या 'रूक्मिणी', 'सत्यभामा' व 'ऊर्मिला' हया तीन कादंबऱ्या वरील अटी पूर्ण करतात. या तीनही कादंबऱ्यांचा विषय एकच आहे. तो म्हणजे "सरंजामशाहीच्या उतरत्या काळातील नागपूर प्रांतातील जुन्या प्रतिष्ठित वर्गाच्या झपाट्याने होत असलेल्या ऱ्हासाचे व त्यांच्या जीवनाचे चित्रण करणे." हा विषय या तीनही कादंबऱ्यांमधून गुंफलेला असून सरंजामशाहीतील प्रतिष्ठित घराण्यांचा हळूहळू ऱ्हास कसा होत गेला, हे लेखकाने उत्कृष्ट रीतीने सरजामशाहीतील एक मालगुजाराचे घराणे घेऊन, त्याला त्या वर्गाचे पूर्ण प्रतिनिधित्व देऊन प्रदर्शित केला आहे. या तीनही कादंबऱ्यांचे लेखनतंत्र एकच असून; लेखकाने वापरलेली निवेदन पध्दतीही एकच आहे. पात्रेसुध्दा तीच दिसून येतात. उदा. महाराज, ऊर्मिला, रूक्मिणी, सत्यभामा, श्रीवल्लभ आणि कृष्णा ही मुख्य पात्रे आहेत. 'रूक्मिणी' व 'महाराज' ही पात्रे 'रूक्मिणी' व 'ऊर्मिला' या कादंबऱ्यांमध्ये मृत्यु पावतात. त्यामुळे 'रूक्मिणी' दुसऱ्या व तिसऱ्या कादंबरीत आणि महाराज तिसऱ्या कादंबरीत आढळत नाहीत. परंतु त्यांच्यासंबंधी आलेले रेखाटन हया कादंबऱ्यांमधील इतर पात्रांच्या मुखांतून अधून–मधून केलेले दिसते. त्यांचे आदर्श पाळणारी व त्यांनी आखून दिलेल्या मार्गाने जाणारी त्यांची निकटवर्ती मंडळी ही हया पात्रांची प्रतिकृतीच वाटतात. म्हणूनच 'महाराज' व 'रूक्मिणी' ही पात्रे मरण पावली असली तरी नंतरच्या कादंबऱ्यांमधून जिवंत असल्यासारखीच वावरताना भासतात. गौण पात्रांमध्ये ज्यांचा समावेश होईल अशी 'राही', 'मादाम', 'मरीयन', 'रोजालींड', 'चीफ सेक्रेटरी', 'गव्हर्नर', 'मध्यप्रांत वऱ्हाडचे गृहमंत्री' इत्यादी पात्रेसुध्दा तीनही कादंबऱ्यांत आहेतच। याव्यतिरिक्त जी नवीन पात्रे अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या कादंबऱ्यांमध्ये उतरतात, त्यांचेही हितसंबंध प्रधान पात्रांशी गुंतलेले असतात. सर्व गौण पात्रांचे चित्रण, प्रधान पात्रांना आणि कथानकाला वाव मिळेल असेच केले आहे. 'रूक्मिणी', 'सत्यभामा' व 'ऊर्मिला' हया कादंबऱ्यांच्या उपरोक्त सर्व बाबतीत

असलेल्या एकसंधतेमुळेच त्यांना 'त्रिदल कादंबरी' असे नामाभिधान दिले आहे. कलेसाठी कला या सौंदर्यवादी विचारांपेक्षा भाऊसाहेब माडखोलकरांचा समावेश जीवनवादी लेखकांच्या गटात करावा लागेल. कारण त्यांनी निर्माण केलेल्या सर्व साहित्याचा बारकाईने अभ्यास केल्यास ते समाजभिमुख असल्याचे दिसते. हयाची सत्यता पडताळून पाहण्यासाठी खुद्द भाऊसाहेबानीच स्वतःच्या लिखाणाबद्दल काढलेले उद्‌गार पुरावा म्हणून सांगता येतील. ते म्हणतात, "जे जे मला दिसते त्याच्या आधारानेच लिहितो. जसे दिसते तसे मी माझ्या लेखनात दाखवतो" प्रस्तुत कादंबरीत्रयीतसुध्दा त्यांनी हयाच दृष्टिकोणातून लिहिलेली आहे. उदा. त्यांनी वर्णन केलेला संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न (सत्यभामा), महाराज शिक्षणमंत्री झाल्यानंतर शिक्षण क्षेत्रात जी सुधारणा करू पाहतात त्याचे चित्रण आणि त्या अनुषंगाने आलेल्या त्यावेळच्या परिस्थितीचे चित्रण (ऊर्मिला); तसेच तिन्ही कादंबऱ्यातून प्रकटणारे मध्यमवर्गीयांचे जीवन, नागपूरच्या प्रदेशाचे वास्तव चित्रण इत्यादी.

"नागपूर प्रांतातील सरंजामशाही घराण्यांतील प्रतिष्ठित वर्गाचा हळूहळू होत असलेला ऱ्हास आणि त्यांचे परिस्थितीनुरूप बदलते जीवन" ही त्रिदल कादंबरीची मध्यवर्ती कल्पनाच सूचित करते की ती कादंबरी काही प्रमाणात सामाजिक बांधिलकी स्वीकारते आहे. जसजसा सरंजामशाही घराण्यांचा ऱ्हास होत गेला, तसतसे त्या वर्गातील मंडळींनी परिस्थिती ओळखून नवीन परिस्थितीशी मिळते जुळते घेतले. आणि हळूहळू आपल्या वंशपरंपरागत चालत आलेल्या रूढी किंवा प्रथा सोडून दिल्या. उदा. महाराजांच्या अगोदर मोठया महाराजांच्या काळात घराण्यातील परंपरागत रिवाजांप्रमाणे सर्व व्यवहार चालत असत. जसे–पूजापाठ, जपजाप्य वगैरे धार्मिक विधी; उपवास, व्रंते, दानधर्म, गोपाळकृष्णाच्या संस्थानामुळे त्यानिमित्ताने होणारे निरनिराळे उत्सव, भोजनांचे चालणारे सत्र, दिवाळीच्या वेळेस होणारे धार्मिक उत्सव इत्यादी. हे सर्व व्यवहार महाराजांच्याही कारकीर्दीत होत राहिले. नंतर त्यांची आर्थिक परिस्थिती खालावल्यामुळे हळूहळू या सर्व उत्सवांना व प्रथांना उतरती कळा लागली. धार्मिक बाबतीत तर महाराजांना अजिबात रूची नव्हती. घराण्याची प्रतिष्ठा सांभाळणे भाग आहे म्हणून तेवढयापूरते ते घरात धार्मिक विधी करीत असत. येरव्ही त्यांना अशा गोष्टींचा फारच कंटाळा होता. महाराजांच्या नंतर श्रीवल्लभच्या कारकीर्दीत आर्थिक परिस्थिती आणखीच खालावल्यामुळे, उत्पन्नाचे प्रमाण कमी झाल्यामुळे आणि महाराजांचे छत्र नाहीसे झाल्यामुळे वाडयातील सर्व उत्सव हळूहळू कमी कमी करीत आणून शेवटी बंद करण्यात आले. श्रीवल्लभने तर कधीही धार्मिक विधींचे पालन केलेले आढळत नाही. इतकेच नव्हे तर तो शेवटी 'रत्ना लेले' हया ख्रिश्चन मुलीला हिंदू करून तिच्याशी विवाह करून आपल्या घराण्यातील चालत आलेल्या सर्व रूढींची बंधने तोडून नवीन विचारप्रणालीशी समरस होतो. याचवेळी धर्म न बदलता असे विवाह सुखरूप होऊ शकतील या विचारावर लेखकाने जोर दिला आहे. हया सर्व घराण्यातील मंडळी जशी हळूहळू आपल्या कर्मठ, रूढीप्रिय विचारांपासून मुक्त झाली; आणि नवीन बदलत्या परिस्थितीत मिसळून गेली, त्याप्रमाणेच त्यांचा आदर्श समोर ठेवून अशा रूढीप्रिय व कर्मठ विचारांच्या मंडळीनी ते विचार सोडून देऊन बदलत्या परिस्थितीबरोबर चालावे असा संदेशच या 'त्रिदला'च्या द्वारा भाऊसाहेबांना द्यावयाचा आहे; असे प्रकर्षाने जाणवते.

सरंजामशाहीतील प्रतिष्ठित घराण्यांचा ऱ्हास कसा होत गेला हे स्पष्ट करण्यासाठी भाऊसाहेबांनी 'महाराजांचे' घराणे केंद्रस्थानी कल्पून त्या घराण्याला राजे महाराजे, जहागिरदार, इनामदार, मालगुजार या घराण्यांचे प्रतिनिधित्त्व देऊन, त्यांच्याकडे पूर्वी असलेल्या सत्तेचा, अधिकाराचा, प्रतिष्ठेचा आणि श्रीमंतीचासुध्दा हळूहळू कसा ऱ्हास होत गेला, याचे वर्णन केले आहे. तसेच इंग्रजांच्या काळात त्यांना देण्यात आलेल्या पदव्या व अधिकार स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जेव्हा काढून घेण्यात आले त्यावेळेस त्यांना कशाप्रकारचे जीवन कंठावे लागले हेच हया घराण्याच्या चित्रणाच्या आधारे लेखकाला स्पष्ट करायचे होते. अशाप्रकारचे एका घराण्याचे वास्तव चित्रण

अनुक्रमणिका

करून त्या काळातील उच्चभ्रू वर्गाचे प्रत्यक्ष जीवनच माडखोलकर आपल्या डोळयांसमोर उभे करतात.

येथे एक गोष्ट स्पष्ट करणे आवश्यक वाटते ती अशी की, माडखोलकरांनी आपल्या 'त्रिदल' कादंबरी प्रमाणेच इतर कादंबऱ्यांमधूनही समाज जीवनाचे वास्तव दर्शन घडवून त्यांच्यापुढे असणाऱ्या असंख्य समस्या अत्यंत कळकळीने मांडल्या आहेत. परंतु आजची काही टीकाकार मंडळी, "भाऊसाहेबांनी खालच्या वर्गाकडे दुर्लक्ष केले. त्यांची लेखणी उच्चभ्रू समाजाचे व मध्यमवर्गीय समाजाचे चित्रण करण्यामध्येच जास्त रमत होती." अशा प्रकारचे आरोप त्यांच्यावर करताना दिसतात, हे काही योग्य नाही, त्यांनी समाजातील तळाच्या लोकांचे चित्रण केले नाही. हा काही त्यांचा दोष नाही. कारण प्रत्येक लेखकाला सर्वच प्रकारचे लेखन करणे शक्य नसते. त्याच्या प्रतिभेला काही मर्यादा असतात. म्हणूनच "दलित, पिडित लोकांचे चित्रण त्यांच्या कादंबऱ्यांमधून आढळत नाही म्हणून ते खऱ्या अर्थाने जीवनवादी नाहीत." असे म्हणणे बरोबर नाही. त्यांनी सामाजिक बांधिलकी स्वीकारलीच होती, परंतु त्यांना मध्यम वर्गाचे कडे फोडून खाली झेप घेता आली नाही. एवढे मात्र खरे।

'रूक्मिणी', 'ऊर्मिला', आणि 'सत्यभामा' हया 'त्रिदला'त आलेल्या राजकारणाचाही उपयोग भाऊसाहेब काही समस्या सोडविण्यासाठी, काही सुधारणा अमलात आणण्यासाठी आणि त्यावेळी मध्यप्रांत वऱ्हाड व विदर्भातील परिस्थिती कशा प्रकारची होती; यावर प्रकाश टाकण्यासाठी करून घेतात. इतकेच नव्हे तर त्या समस्या सोडविण्यासाठी किंवा त्या काळातील परिस्थितीवर प्रकाश टाकण्यासाठीच ते आपल्या कादंबऱ्यातून राजकारणविषयक चर्चा घडवून आणीत असावेत. "वाङ्मय हे साधन आहे, साध्य नव्हे जीविताकडे पाहण्याची माझी दृष्टि सर्वथैव राजकीय असल्यामुळे, वाङ्मय हे जीवित संगरातील केवळ एक शस्त्र आहे, हत्यार आहे" २ हे भाऊसाहेबांनी स्वतःच काढलेले उद्गार या गोष्टीची ग्वाही देतात. या विधानाची प्रतीती पुढील त्रिदळातील उदाहरणांवरून येईलच.

कल्याणकारी शिक्षणाची योजना

'ऊर्मिला' या कादंबरीत महाराज हे शिक्षण मंत्री बनल्यानंतर ते विदर्भ, नर्मदा विभाग आणि छत्तिसगड या मध्यप्रांत वऱ्हाडच्या तिन्ही विभागांची भिन्न शैक्षणिक पध्दती ध्यानात घेऊन या विभागांना निदान साक्षरतेपुरते तरी एका पातळीवर आणण्यासाठी 'शारदामंदिराच्या स्थापने'ची योजना तयार करतात. ती विधेयकाच्या साचात बसवून ते मंत्रीमंडळापुढे विचारार्थ ठेवतात. ही योजना महाराजांनी मुलेबाळे आणि प्रौढ स्त्री–पुरूष यांच्यात साक्षरतेचा प्रसार करून त्यांना वाचनाची गोडी लागावी या उद्देशाने तयार केली होती. त्यासाठी सगळया प्रांतभर खेडयापाडयांतून शाळा स्थापन करायच्या, त्यासाठी देवळे, मठ, धर्मशाळा वगैरेंचा उपयोग करायचा व जीपन वेतन देऊन गावोगाव शिक्षक पाठवायचे; असा त्यांचा दूरगामी दृष्टिकोण असतो. यावर स्पष्टीकरण देताना स्वतः महाराज चीफ सेक्रेटरींना म्हणतात, "ही योजना राबविण्यास बराच खर्च येईल ही गोष्ट खरी. पण हा खर्च जर आपण प्रांतिक स्वराज्य चालविणारांनी आज केला नाही, तर मतदार साक्षर आणि सुजाण होऊन पूर्ण स्वराज्याला लायक तरी कसा होईल ? माझ्यापुढे जुनी आणि नवी पिढी, आजचा आणि उद्याचा मतदारसंघ, साक्षर आणि सुबुध्द करायचा प्रश्न आहे. त्या दृष्टीने तयार केली आहे मी ही योजना" (ऊर्मिला पृष्ठ ९१)

लष्करी शिक्षण आवश्यक

'ऊर्मिला' कादंबरीमध्येच महाराज हे मंत्री असताना आणखी एक योजना तयार करतात. ती अशी की, "प्रत्येक शाळेतून लष्करी शिक्षण सक्तीने देण्यात यावे." या संबंधातील संवादांतून, "आपल्या प्रांतातील मुलांना शिस्त नाही म्हणून ती लावण्याची गरज आहे व त्यादृष्टीने लष्करी शिक्षण योग्य ठरेल" हा विचार मांडला आहे.

संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न

'सत्यभामा' कादंबरीत राजकारणाचा उपयोग सुरूवातीच्या भागात स्वातंत्र्य–

अनुक्रमणिका

चळवळीचे स्वरूप स्पष्ट करण्याकरिता केला आहे; तर उत्तरार्धात तो संयुक्त महाराष्ट्राच्या एकीकरणाचा प्रश्न सोडविण्यासाठी केलेला केलेला आहे.

स्थार्थसाधू व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींचे चित्रण :

'ऊर्मिला', कादंबरीमध्ये 'कृष्णा', महंतजींचा मुलगा व शेठजींचा भाऊ यांच्या चालणाऱ्या काळया धंदयावरही राजकीय चर्चेतून आणि बैठकीतून प्रकाश पडतो. या व्यक्ती समाजाला हानीकारक आहेत तेव्हा त्यांना वेळीच वठणीवर आणले पाहिजे असा गुप्त संदेशच जणू काही या राजकीय चर्चेतून माडखोलकरांना दयावयाचा आहे.

सामाजिक समस्या सोडविण्यासाठी व काही सुधारणा घडवून आणण्यासाठी राजकारणाचा तर भाऊसाहेबांनी उपयोग करून घेतलाच परंतु त्याबरोबरच समाजातील विविध अनिष्ठ चालीरीती, अनाठायी प्रथा त्याचप्रमाणे समाजातील इतर समस्यांचा वेध घेणारी वर्णनेही या 'त्रिदलातून' रेखाटली आहेत. काही उदाहरणांनी हे स्पष्ट होईल.

जरठ कुमारी विवाहाचे चित्रण

'रूक्मिणी' कादंबरीच्या पहिल्या चाळीस पानांत 'महाराज' व 'ऊर्मिला' यांच्या विवाहसोहळयाचे चित्रण केलेले आहे. विवाह समयी महाराजांची चाळाशी उलटून गेलेली असते तर ऊर्मिलेने नुकतेच तारूण्यात पदार्पन केलेले असते. असा विजोड 'जरठकुमारी' विवाहाचा सोहळा भाऊसाहेबांनी रंगविला आहे. या लग्नाला ऊर्मिलेला वडिलांच्या स्वार्थसाधू वृत्तीपुढे हार खाऊन नाईलाजाने संमती दयावी लागते. ती विचार करते, "आपल्या महाराजांशी होणाऱ्या विवाहामुळे जर आपल्या आईवडिलांचा व भावंडांचा उद्धार होत असेल, त्यांचे दारिद्रय दूर होतं असेल तर स्वतःला विकून या ऋणाची फेड करून त्यातून का बरे मुक्त होऊ नये ?" या प्रसंगाच्या माध्यमातून भाऊसाहेबांनी आपल्या आजूबाजूच्या समाजात नेहमीच होणाऱ्या जरठ–कुमारी विवाहाचेच चित्र रेखाटले आहे. आपल्या आजूबाजूच्या समाजाकडे डोळसपणे लक्ष दिल्यास असे प्रसंग अद्यापही घडत असल्याचे दिसते. तरूण मुलींचे आईवडील आपल्या मुलींना महाराजांसारख्या बिजवराला किंवा तिजवराला देऊन, तिच्या सौंदर्याच्या भांडवलावर स्वतःचा स्वार्थ साधून घेतात. स्वतःचे दारिद्रय दूर व्हावे म्हणून मुलीला विकतात. तिच्या भावना चिरडल्या जातात. तिला स्वतःचे म्हणून मनच राहत नाही. लग्नाच्या अगोदर तिला सर्वस्वी वडिलांच्या कृपेवर अवलंबून राहावे लागते. त्यांची जी इच्छा असेल तीच तिची इच्छा ! ते म्हणतील ती पूर्व दिशा ! अशा तऱ्हेने वागावे लागते. तिचे अस्तित्व असून नसल्यासारखेच असते. आपल्या वडिलांच्या किंवा पतीच्या व्यक्तित्वात तिला स्वतःचे व्यक्तित्व मन मारून समर्पित करावे लागते. भारतीय स्त्रीवर आजतागायत होत आलेल्या व अद्यापही होत असलेल्या अन्यायाच्या वेदनाच भाऊसाहेबांनी ऊर्मिला व महाराजांच्या विवाह सोहळयाच्या रूपाने वाचकांसमोर मांडल्या आहेत.

दंभाचारी ब्राहमण्यावर टीका

'रूक्मिणी' मध्ये पृष्ठ १९२ ते १९७ वर महामहोपाध्यायांच्या भूमिकेच्या आधारे माडखोलकरांनी एकीकडे जपजाप्य करणाऱ्या, धर्मकीर्तने आणि नीतिपर व्याख्याने देणाऱ्या, कानात रूद्राक्षाची कुंडले घालून, कपाळाला भस्माचे आडवे पट्टे ओढून, त्यावर केशरी गंध लावून, धर्मप्रवचन करीत हिंडत असताना, सोज्वळतेचा, चांगुलपणाचा व शुध्दचारित्र्याचा आव आणणाऱ्या, पण दुसरीकडे मद्य व मदिराक्षी यांची चटक लागलेल्या दुटप्पी, ढोंगी, यज्ञसंस्थेच्या पुनरूज्जीवनाला पाठिंबा असलेल्या आणि यज्ञातील पशुहिंसेचे समर्थन करणाऱ्या, मांसाहारास लालचावलेल्या दंभाचारी ब्राहमण्यावर म्हणजेच पुरोहितशाहीवर सडकून टीका केली आहे.

स्त्रीच्या स्त्रीत्वाची व्यथा

नवरा जिवंत असताना स्त्री दुसऱ्या पुरुषाकडे का

अनुक्रमणिका

वळते ? याचे सर्वांना पटेल असे कारण महाराजांच्या पात्राच्या मुखाने माडखोलकर देतात. घटना अशी घडते की, कृष्णरावाची पत्नी महाराजांकडे गोपाळकृष्णाच्या उत्सवानिमित्त झालेल्या पूजेला उपस्थित राहते. तेथे महंतजींच्या व्यक्तिमत्वाचा तिच्यावर परिणाम होऊन ती त्यांच्याकडे आकर्षिली जाते. तिचे हे वर्तन ऊर्मिलेला मानवत नाही. याबाबतीत ती महाराजांना ज्यावेळी विचारते, त्यावेळेस महाराज म्हणतात, "जेव्हा पुरूष स्त्रीचे संरक्षण करण्यास नालायक ठरतो, किंवा तिच्यावर अत्याचार करतो तेव्हा ती दुसऱ्या पुरूषाकडे वळते" हे तत्त्व महाराजांनी द्रौपदीचे व पांडवांचे उदाहरण देऊन स्पष्ट केले आहे. पांडवांना कौरवांनी दयुतात जिंकल्यावर पांडव द्रौपदीचे संरक्षण करायला असमर्थ ठरतात. तेव्हा स्वतःची अब्रू वाचविण्यासाठी ती श्रीकृष्णाकडे वळते. तिला त्याशिवाय दुसरा मार्गच नसतो. (ऊर्मिला पृ. ८२) हया ऊर्मिला व महाराज यांच्या संवादातून भाऊसाहेबांनी स्त्रीहृदयाची व्यथाच शब्दरूपाने प्रकट केलेली दिसते.

पोकळ धार्मिक विधी व प्रथा

'सत्यभामा' या कादंबरीच्या पृ. क्र. २० वर श्रीच्या, मुंजीच्या वेळेस घडलेला एक प्रसंग चित्रित केला आहे. श्रीच्या दोघी माता 'सत्यभामा' व 'ऊर्मिला' हया विधवा असल्यामुळे त्या स्वतः श्रीच्या मुंजेच्या सोहळयात भाग घेऊ शकत नाहीत. त्याला स्वतःच्या पानात मातृभोजन देऊ शकत नाहीत. हे केवळ धर्माच्या बंधनामुळे। याला पर्याय म्हणून त्या आपल्या घराण्यातील एका बाईच्या पानात त्याला मातृभोजनाप बसवितात. पण त्यावेळी तो हट्टालाच पेटतो आणि आपल्या मातेला 'ऊर्मिलेला' प्रश्न विचारतो, "धर्म व्यवहारापेक्षा वेगळा असतो का ग? मग करायचं काय त्या धर्माशी ? उपयोग काय त्या धर्माचा ?" असे म्हणून त्यावेळेसच्या धार्मिक प्रथांवर व विधींवर प्रहार करतो आणि जोडीला महाभारतातील उदाहरणही देतो. तो म्हणतो. "पांडव लहान असतानाच पांडुराजा मरला. तेव्हा कुंतिमातेनंच केलं नाही का सगळं त्याचं ? त्याचं मातृभोजन काय गांधारीच्या पानात झालं की काय ? अर्जुनानं पण जिंकून आणलेल्या द्रौपदीला तर सगळया भावांशी लग्न करायची आज्ञा कुंतीनं केली आणि त्यानं लग्नही तिनंच लावून दिलं. त्या वेळचा धर्म काही वेगळा होता काय ?" (सत्यभामा पृ. २०) हया श्रीच्या संवादा वरून हे स्पष्ट होते की ही कादंबरी लिहिली त्या वेळचा धर्म हा पोकळ दंभाचाराने फुगलेला होता. त्यात पुरोहितवर्गाने अवास्तव कर्मकांडाचे थोतांड माजविले होते. धर्माला अधिक कठिण व गुंतागुंतीचे बनविले होते.

जातिभेदावर व पंक्तिप्रपंचावर विजय

सनातनी व धार्मिक विधींचे पालन करीत असणाऱ्या महाराजांकडील गोपालकाल्याच्या प्रसंगी हरिजन, मुसलमान, ख्रिश्चन, आदिवासी, संत महंत यांची एकच पंगत महाराज बसवितात व त्यांना भोजन घालतात. (ऊर्मिला पृ. ६५) हा प्रसंग चित्रित करून भाऊसाहेबांनी त्या वेळच्या जातिभेद व पंक्तिप्रपंचाविरूध्द एक क्रांतिकारक दृष्टिकोण प्रगट केला. येथे महाराज जातिभेद व पंक्तिप्रपंचाविरोधातील आपला क्रांतिकारक विचार प्रत्यक्ष आचरणात आणून दाखवितात. त्याचप्रमाणे 'सत्यभामा' कादंबरीत ख्रिश्चन धर्मीयांविषयी सहानुभूती व समभाव प्रदर्शित करणारे विचार गजाननरावांनी 'रोजच्या आईच्या' पात्राचा उपयोग करून स्पष्ट केले आहेत. ते विचार असे "ख्रिश्चन व्यक्ती चांगल्या, सत्प्रवृत्त, धार्मिक व मानवतावादी असतात. त्यांच्यावर हिंदू संस्कारांचा पगडा मोठया पमाणावर असतो म्हणून त्या व्यक्ती आदरणीय होत."

आदिवासी, अस्पृश्य आणि अनौरस संततीची समस्या :

आदिवासी हे हिंदू की अहिंदू ? बहुजन समाजात शिक्षण प्रसार कशाप्रकारे करावा ? याबाबत महाराजांच्या पात्राच्या रूपाने भाऊसाहेबांनी स्वतःचीच मते उद्घृत केली आहेत व या प्रश्नाला वाचा फोडली आहे. तसेच मठांचा कारभार पंचांच्या हाती असावा व देवस्थानाची पुर्नरचना व्हावी ही विचारधारासुध्दा

महाराजांच्या पात्राचा उपयोग करून समाजापुढे मांडली. (ऊर्मिला पृ. १०२) महंतजींच्या मुलाच्या निमित्ताने अनौरस संततीची समस्या पुढे आणली. (उर्मिला- पृ. १२५)

अशाप्रकारे समाजातल्या वेगवेगळया थरांतील समस्यांच्या विश्लेषणासाठी माडखोलकरांनी 'त्रिदल कादंबरीचा' चांगला उपयोग करून घेतला. परंतु काही समीक्षकांनी निराळाच सूर लावला आहे. प्रा. नरहर कुरुंदकर माडखोलकरांच्या कादंबऱ्यांवर असा आक्षेप घेतात, "कृत्रिम आणि नाटकी कथानकाचा, भडक आणि अतिरेकी प्रसंगांचा खुलासा व समर्थन करण्याचे हे साधन मान्य करता येणे कठीण आहे. कारण कादंबरीतील वास्तवता ही प्रत्यक्ष जीवनातील वास्तविक घटनेवर किंवा स्वाभाविक अपरिहार्यतेवर अवलंबून असते." कुरुंदकरांचे हे विधान 'त्रिदल कादबरीचे आतापर्यंत केलेले विवेचन लक्षात घेतल्यास आणि दिलेली उदाहरणे पडताळून पाहिल्यास सयुक्तिक वाटत नाही; कारण या कादंबरीत जीवनातील वास्तविक घटनांबरोबर स्वाभाविक अपरिहार्यताही साधली गेलेली आहे.

सारांश, जीवनातील वेगवेगळया थरातील समस्यांचे दर्शन घडविणारी, त्यांचे निरसन करण्याकरिता उपाय सुचविणारी, तसेच समाजातील अनिष्ट प्रथांचे चित्रण करून, त्याविरूध्द क्रांतिकारक विचार प्रकट करणारी, जातिभेद व स्पृश्यास्पृश्य भेद नाकारणारी ही त्रिदल कादबरी म्हणजे समाजाला नवीन क्रांतिकारक विचार प्रदान करणारी जीवनाचे वास्तव दर्शन घडविणारी बोधवादी कादंबरीच होय. आणि म्हणूनच हया कादंबरीत्रयीचा 'सामाजिक बांधिलकी स्वीकारणारे त्रिदल' किंवा 'समाजनिष्ठा जोपासणारे त्रिदल' या शब्दांत मला गौरवपूर्वक निर्देश करावासा वाटतो.

'प्रकरण टीपा'

१. ग. त्र्यं. माडखोलकर; 'चंदनवाडी', आवृत्ती चवथी, नाग–विदर्भ प्रकाशन, अमरावती, १९६०, पृ. ४.

२. ग. त्र्यं. माडखोलकर; 'वाङ्मयाकडे मी कोणत्या दृष्टीने पाहतो', मनोहर, संपा. शं. वा. किर्लोस्कर, किर्लोस्कर वाडी, जुलै १९३९, पृ. ६२.

३. नरहर कुरुंदकर; 'धार आणि काठ', देशमुख आणि कंपणी, पुणे, १९७१, पृ. १५८

स्वैर संदर्भ

४. ग. त्र्यं. माडखोलकर; 'रूक्मिणी' तिसरी आवृत्ती, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, १९५९

५. ग. त्र्यं. माडखोलकर; 'सत्यभामा', नागविदर्भ प्रकाशन अमरावती, १९६८

६. ग. त्र्यं. माडखोलकर; 'ऊर्मिला', नागविदर्भ प्रकाशन, अमरावती, १९६३.

प्रा. रवीन्द्र ठाकरे
'इंद्रप्रस्थ'
निखाडे ले–आऊट,
हिंगणघाट.

मराठी समीक्षेचे सामाजिकतेचे आकलन

डॉ. अरुणा देशमुख

स्वातंत्र्योत्तर मराठी समीक्षेचे जे स्वरूप आपल्या पुढे आहे त्यावरून ती काही जबाबदार समीक्षा आहे असे म्हणणे फारसे बरोबर ठरणार नाही. मराठी समीक्षेतले वादही फारसे गंभीर होते असे म्हणता येत नाही. सध्याचे तिचे स्वरूप पाहिले तर ती आहे याहून अधिक जबाबदार होईल अशी चिन्हेही दिसत नाहीत. मराठीत महत्त्वाचा मानला जाणारा मर्ढेकरांचा सौंदर्य आणि साहित्यविचार किती पोकळ होता हे सांगताना डॉ. रा. भा. पाटणकर म्हणतात, की मर्ढेकर म्हणजे विश्वचैतन्यवाद्यांच्या वृक्षाची एक अगदी लहानशी आणि कमकुवत डहाळी आहे. वाद घालायचा असेलच तर थेट कांटला वादात ओढले पाहिजे. याचा अर्थ असा की आपला अगदी मौलिक समजला जाणारा साहित्य आणि सौंदर्य विचाराचा व्यूह जन्मतःच अगदी दुबळा होता. मग त्याचे खंडन करणारा अथवा मंडन करणारा पुढचा साहित्यविचार कोणत्या स्तरावरचा असेल हयाची आपण कल्पना करू शकतो.

मराठीतील सैद्धांतिक समीक्षा एकतर मर्ढेकरांना प्रस्थापित करण्यासाठी किंवा त्यांना विरोध करण्याच्या निमित्ताने निर्माण झालेली आहे. त्यातली लौकिकतावादी समीक्षा जराशी महत्त्वाची आहे. कारण त्या निमित्ताने लौकिकतावादी समीक्षक प्रामाणिकपणे व जबाबदारीने साहित्यविषयक प्रश्नांकडे बघू लागले आहेत. आणि नव्या साहित्या सिद्धांताची मांडणी करू लागले आहेत. साहित्यातील सामाजिकतेचे आकलन करून घेण्याचा त्यातला एक महत्त्वाचा प्रश्न आहे. त्याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न लौकिकतावादी समीक्षकांनी केलेलाही आहे. अलौकिकतावाद्यांनी मात्र या प्रश्नाला बगल दिली त्यामुळे त्यांच्या पुढे या प्रश्नाचे आव्हान उभेच झाले नाही. अर्थातच त्यामुळे या विवेचनात अलौकिकतावाद्यांचा संदर्भ उपस्थित होणार नाही हे उघड आहे.

सर्वप्रथम आपण सामाजिकतेच्या आकलनाच्या मुद्याकडे वळू. सामाजिकतेचे आकलन ज्या वेगवेगळया पातळयांवर संभवते त्या अशा –

१. वाङ्मयनिरपेक्ष सामाजिकतेचे आकलन.

२. वाङ्मयात आविष्कृत झालेल्या सामाजिकतेचे आकलन.

३. दोहोंची सांगड घालून निर्माण झालेले आकलन. आणि

४. सैद्धांतिक समीक्षेने स्वीकारलेल्या सामाजिक मूल्यनाचे आकलन.

वाङ्मयनिरपेक्ष सामाजिकतेचे पूर्णत्वाने आकलन झाल्याशिवाय वाङ्मयात आविष्कृत झालेल्या सामाजिकतेचे मर्मस्पर्शी आकलन होणार नाही हे या विभाजनात आपण लक्षात घ्यायला हवे. सामाजिक साहित्य सिद्धांतांची मूळेही वाङ्मयनिरपेक्ष सामाजिकतेतच असतात म्हणून वाङ्मय निरपेक्ष सामाजिकतेच्या चिकित्सेकडे आपल्याला वळावे लागेल.

वाङ्मयनिरपेक्ष सामाजिकता म्हणजे आपल्या अवती भवती असलेले सामाजिक वास्तव. आपण या वास्तवाचेच घटक असतो. या समाजातच आपण घडत असतो. आपल्याला मर्मदृष्टी प्राप्त होत असते.

अनुक्रमणिका

येथेच आपली जीवनमूल्यांशी सांगड घातली जाते. आपल्याला त्यामुळे वैचारिक भूमिका घेता येतात. आपण या काठावरचे की त्या काठावरचे अस्तित्व स्वीकारतो याचे निदान या समाजाच्या चौकटीतच अर्थपूर्ण ठरणार असते. आपल्या मूल्यधारणांची कसोटीही याच समाजात लागते. आपण समाजामुळे जसे घडणार असतो तसेच आपल्या कर्तृत्त्वावर समाजही घडणार असतो. समाजाकडून जे आपण स्वीकारतो त्यातून समाजाच्या घडणीलाही आपला हातभार लागणार असतो. ही द्विमार्गी वाटचाल आहे. हे परस्परावलंबन आहे. आपण समाजामुळे आणि समाज आपल्यामुळे असे हे संबंध असतात. आपल्या वैचारिक कसावर, आपल्या मूल्यधारणांवर आणि आपल्या कर्तृत्त्वावर समाजाचा दर्जा ठरविता येणार असतो.

कलावंत, समीक्षक आणि विचारवंत हे समाजाचेच घटक असतात. ते तिथेच वाढतात, घडतात. जे विविध अनुभव ते आपल्या मानसगर्भात धारण करतात ते सामाजिकच असतात. तेच अनुभव कलावंत त्याच्या कलाकृतीतून, सिद्धांतनातून संस्कारित रूपात मांडत असतात. प्रश्न असा निर्माण होतो की या तिघांना आपल्या भोवतीच्या सामाजिकतेचे आकलन पुरेसे झालेले असते का हा ! या तिघांनाही सामाजिकतेचे परिपूर्ण आकलन होणे अगत्याचे असते. आपल्या आसपासचे सामाजिक जीवन असते कसे ? त्याची खोली – रूंदी – व्याप्ती असते केवढी ? समाजातल्या विविध स्तरांवरचे विविध व्यामिश्र संघर्ष कोणते ? अशा अनेक प्रश्नांचे खोलवर आकलन करून घ्यावे लागते. समाजाच्या प्रगतीचे व परिवर्तनाचे मर्म कशात आहे; कोणकोणत्या आक्रमणांमुळे हया मर्मावर आघात होतात आणि त्याचे परिणाम समाजाला कसे भोगावे लागतात हया साऱ्या बाबी निदान त्यांनी समजून घेतल्या पाहिजेत. सामाजिकतेचे आकलन कलावंताचे समीक्षकाचे आणि विचारवंताचे चढत्या भाजणीने सिद्ध होते. कलावंताच्यापेक्षा समीक्षकाचे आणि समीक्षकापेक्षा विचारवंताचे सामाजिकतेचे मूल्यभान अधिकाधिक तीव्र असते. या तिघांचेही सामाजिकतेच्या आकलनाचे बौद्धिक संकलन अधिक बळकट आणि मूल्ययुक्त असावे लागते. समाजाच्या स्थितीगतीची आणि परिवर्तनाची मांडणी त्यांच्याजवळ असावी लागते. समाजाच्या सौंदर्याचे तात्त्विक मूल्यमान त्यांना बाळगावे लागते. हया सर्व बाबी साध्य कशा होतील ? असा प्रश्न येथे निर्माण होईल.

या संदर्भात मग प्रश्न असाही उपस्थित होईल की कलावंत आणि समीक्षकांनी विचारवंत आणि समाजशास्त्रज्ञ व्हावे की काय? आणि असे झाले तर त्यांच्यातल्या बौद्धिक आणि सर्जक शक्तीचे अंश सामाजिकतेच्या वर्णनविश्लेषणातच जास्त खर्च होतील. समाजाच्या अंतर्बाहय चिकित्सेकरिता समाजशास्त्रज्ञांची किंवा विचारवंतांचीच गरज आहे हे निर्विवाद. ज्ञानाच्या प्रचंड निर्मितीच्या आजच्या काळात अशा प्रकारच्या सर्वगामी प्रज्ञा आणि प्रतिभा दुर्मिळ राहणार हेही निर्विवाद आहे. कलावंत किंवा समीक्षक यांच्या काही मर्यादा राहतीलच सामाजिकतेच्या त्यांच्या आकलनात काही त्रुटीही राहतीलच परंतु यातून त्याला मार्ग काढता आला पाहिजे आणि तो काढताही येतो. या ठिकाणी त्याने विचारवंताकडे जाणे अगत्याचे आहे. विचारवंताशी त्याने आपले संवादी नाते प्रस्थापित केले तर सामाजिकतेचे आकलन करता येणारच नाही असे नाही. कलावंत समीक्षक आणि विचारवंत यांच्यात जर परस्परसंवादी नाते असेल तर त्याचा कलाकृती आणि समीक्षा यांच्यावर अनुकूल परिणाम होईल. यांच्या अशा प्रकारच्या नात्यामधूनच महान कलाकृती, महान समीक्षा आणि महान वैचारिक आंदोलन निर्माण होऊ शकते. हे तीन घटक जर पुरेसे प्रामाणिक व जबाबदार असतील. तर ते ज्या समाजात असतात त्या समाजाची तात्त्विक, दार्शनिक, वाङ्मयीन आणि समीक्षात्मक उंची वाढणे अटळ असते.

येथे आपण विचारवंताची भूमिका समजून घेतली पाहिजे. विचारवंताची व्याख्या करताना मे. पु. रेगे म्हणतात– "गोष्टी घडवून आणण्यापेक्षा गोष्टी समजून घेण्याची विचारवंताची प्रवृत्ती असते. कल्पना, संकल्पना, रूपपत्ती हयांच्याविषयी इतरांच्या मानाने त्यांना असाधारण आस्था असते. विवक्षित प्रसंगामध्ये त्यांच्या दृष्टीने सामान्य संकल्पना मूर्त झालेल्या असतात आणि त्या हुडकून काढण्याकडे त्यांचा कल असतो. सारांश कर्ता म्हणून जगण्याऐवजी द्रष्टा, भाष्यकार म्हणून विचारवंत जगतो. व्यवहारात मग्न होण्याऐवजी एक पाऊल

अनुक्रमणिका

मागे सरून त्या व्यवहारात स्वरूप संकल्पनांच्या साहाय्याने आकलन करण्याचा त्याचा प्रयत्न असतो... हया सकल्पना तो अधिक विकसित करील, त्यांचे एक नवीन संघटन घडवून आणील. एका क्षेत्रात घर करून राहिलेल्या संकल्पनांना तेथून उचलून· त्यांचा दुसऱ्या क्षेत्रात वापर करील... संकल्पनांच्या हया हालचाली ज्याच्या मनात सुरू होतात आणि चालू राहतात ते विचारवंत... विचारवंतांनी या संकल्पनांचा उपयोग प्रत्यक्ष जीवनाच्या चिकित्सेसाठी करायचा असतो... ही चिकित्सा म्हणजे मूल्यमापन असते आणि म्हणून स्थिरावलेल्या व्यवहाराला आणि त्याच्या गृहितकृत्यांना, जडलेल्या सामाजिक सवयींना तिच्यामध्ये एक आव्हान असते. विचारवंतांनी रंगविलेल्या स्वप्नाळू युटोपिया भावी सामाजिक क्रांतीच्या आणि पुनर्रचनेच्या रूपरेखा ठरतात, अशा रूपरेखा म्हणून मांडण्यातही येतात." रेग्यांचे हे मत लक्षात घेतले तर विचारवताची सामाजिकतेतील भूमिका आपल्या लक्षात येते. समाजरचनेचे संपूर्ण दायित्व विचारवंतांवर सोपविलेले असते.

विचारवंत आपल्या समाजाचीच चिकित्सा करीत असतो. त्याच्याजवळ सामाजिक सौंदर्याचे एक मॉडेल असते. संकल्पन असते. तो स्वतः समाजसौंदर्यावरच जगणारा असतो. हे सौंदर्य त्याच्या प्रज्ञेने निश्चित केलेले असते. समाजातील प्रस्थापित आंतरव्यवस्था तो मोडतो. पण त्या मोडण्यामागे सामाजिक सौंदर्याची सकल्पना असते. तो जीवनाची चिकित्सा करतो तेव्हा प्रचलित सामाजिक संस्था आणि व्यवहार, नीतिमूल्ये, राजकीय कार्यक्रम, कला आणि साहित्यातील प्रवृत्ती, विज्ञानांची अवस्था इत्यादी गोष्टींची चिकित्सा करीत असतो. त्याची चिकित्साही जीवनाच्या कोणत्याही भौतिक सांस्कृतिक अंगाची चिकित्सा असते. जीवनाची गुणवत्ता वाढली पाहिजे, ती अधिक मौलिक झाली पाहिजे हा विचारवंतांचा आग्रह असला पाहिजे. संकल्पनांच्या साहयाने जीवनात बदल घडवून आणण्याची निष्ठा त्याच्या अंतरंगात असली पाहिजे. विचारवंतांशी जर कलावंत आणि समीक्षक यांचे संवादी संबंध असतील तर त्यांचे सामाजिकतेचे आकलन अधिक खोलवर आणि सूक्ष्म होऊ शकते. समाजाचा बौद्धिक दर्जा विचारवंतांवरच ठरवला जात असतो. म्हणून समाजाच्या बौद्धिक दर्जाची उंची विचारवंतांशी वाढवली पाहिजे. हे करताना कलावंत आणि रामीक्षक यांचीही मदत त्याला घेता येऊ शकते.

"सत्यान्वेषणात गढून गेलेले संशोधक व तत्त्वचिंतक हे कोणत्याही समाजाचे डोळे होत. जगातील नानाविध घडामोडींचे व प्रवृत्तींचे विश्लेषण करून त्यामधील अंतःसूत्र शोधून काढण्याचे आणि त्याच्या आधारे भविष्याची दिशा सूचित करण्याचे काम ते करीत असतात. सर्वसामान्य लोकांची दृष्टी बहुधा तात्कालिक प्रश्नांवर खिळलेली असते. कोणत्याही गोष्टीचे दूरगामी परिणाम सहसा त्यांच्या लक्षात येत नाहीत. भोवतालची परिस्थिती अधिकाधिक बिकट व गुंतागुंतीची होऊ लागली, की ते गोंधळून जातात. अशावेळी योग्य मार्गदर्शन न लाभल्यास लोक प्रवाहपतित किंवा प्रतिगामी बनण्याचा संभव असतो. म्हणून या बाबतीत विचारवंतांची जबाबदारी मोठी आहे." असे गं. बा. सरदार यांनी म्हटले आहे. विचारवंत हा समाजाचा मार्गदर्शक असतो. समाजाला त्याने योग्य दिशेने नेण्याची जबाबदारी स्वीकारलीच पाहिजे. ही बाब आपण लक्षात घेतली तर समाजाच्या जडणघडणीतला विचारवंताचः वाटा किती महत्त्वाचा असतो हे लक्षात येईल.

कलावंत समीक्षक आणि विचारवंत या तिघांचीही समाजातली भूमिका महत्त्वाची मानायला हवी. समाजघडणीच्या आणि परिवर्तनाच्या महानाटयाचे हे तीन महानायक असतात. हे महानाटय यशस्वी होते की कोसळते, हे या तिघांच्या टिमवर्कवर अवलंबून असते. समाजाची अवरूद्ध गती पुन्हा जोमाने प्रवाहित करता येते. पिढयान् पिढयांच्या संस्कारांमधून, श्रद्धामधून समाजात निर्माण झालेल्या गतानुगतिकत्वाची चिकित्सा केल्यामुळे त्यांना समाजाच्या हितविरोधी गोष्टी आणि हितकारक गोष्टी यांचे मूल्यात्मक भान येते. मग समाजात असणाऱ्या विविध समस्यांचे आकलन या मूल्यात्मक चौकटीत झाल्यामुळे त्याच्या गुंतागुतीची सोडवणूक या तिघांच्या परस्पर सहकार्याने करता येऊ शकते. या तिघांपैकी एखाद्यानेही आपली भूमिका बजावताना बेजबादारपणा केला की सामाजिक स्वास्थ्य बिघडते. आपल्या आजच्या समाजात विचारवंतांची उणीव आपल्यांला प्रखरपणे जाणवते आहे. आजच्या ताण–तणावाच्या वातावरणात परिवर्तनाच्या

दिशा दाखविणारे आणि त्या वाटेवर घेऊन जाणारे विचारवंत आपल्याला हवे आहेत. आपल्या सांस्कृतिक परिस्थितीतील मृत घटक कोणते आणि जिवंत घटक कोणते याची समाजाची अंतर्बाह्य रचना बदलविण्याची आकांक्षा बाळगणारे विचारवंत ही आजच्या समाजाची गरज आहे. समाजाची वर्तमान व्यवस्था स्वतंत्रपणे वर्तमानात जन्माला आलेली नसते. ती भूतकाळाची निर्मिती असते. म्हणून भूतकाळाची चिकित्सा करणारा विचारवंत समाजात असावा लागतो. भूतकाळाच्या चिकित्सेतून विचारवंत वर्तमान समाजाला उन्नत आणि उज्ज्वल रूप देऊ शकतो.

सामान्य समाज प्रवाहपतित असतो. त्याची अप्रियता पत्करून त्याच्याचसाठी विचारवंताने बोलायचे असते. समाजाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी स्वप्न पाहणारा डोळा त्याच्याजवळ असतो संपूर्ण जीवनाच्या उन्नयनाचे स्वप्न त्याच्याजवळ असते. लोकाचे मन खरवडून काढून हे स्वप्न त्याला लोकांमध्ये रूजवायचे असते. खुद्द विचारवंताची मानसिकता क्रांतिप्रवण असली तर तीच मानसिकता त्याला लोकांमध्ये रूजवता येते. विचारवंताने समाजाला संजीवक विचार, विवेकदृष्टी आणि उज्ज्वल भविष्यासाठी आशावाद या तीन गोष्टी दिल्या पाहिजेत असे डॉ. जनार्दन वाघमारे म्हणतात. आपल्या समाजाला अशा विचारवंतांची गरज अधिक आहे. परंतु अशा विचारवंतांची संख्या कमी असणार हे लक्षात घेतले तरी त्यांची अनुपस्थिती जाणवण्यासारखी परिस्थिती आज आपल्याभोवती आहे.

विचारवत असणे म्हणजे एखादे व्रत स्वीकारण्यासारखे असते. उतायचे नाही, मातायचे नाही, घेतला वसा टाकायचा नाही अशा प्रकारचे हे व्रत असते. विचारांची विशिष्ट भूमिका घेतली की ती कुठल्याही प्रलोभनाने टाकायची नसते. प्रसंगी कुचेष्टा सोसून, अन्याय सोसून, विरोधाला धैर्याने तोंड देत आपले विचारवंतपण निभवावे लागते. आपल्या वैयक्तिक हितसंबंधाचा बळी देऊन परंतु सार्वजनिक हिताला पूरक असे वर्तन विचारवंताला करावे लागते. त्यासाठी प्रसंगी कठोरात कठोर भूमिका घ्यावी लागते. लोकांना सुखविण्यासाठी अशा प्रकारची कठोर भूमिका घेण्याचे बरेच वेळा टाळले जाते. पण विचारवंताचे हे वर्तन नैतिक वर्तन असत नाही. त्याची नैतिकता समाजाच्या हितात असली पाहिजे. असे विचारवंत आज आपल्याला दुर्मिळ झालेले दिसतात. विचारवंत अनेक आहेत, भाष्यकार अनेक आहेत, चिकित्सक अनेक आहेत, पण कुठल्या ना कुठल्या कारणाने त्यांचे नैतिक वर्तन डागाळलेले आहे. सांप्रदायिकतेने, सांस्कृतिक आवेशाने, पत्करलेल्या विचारप्रणालीने, स्वीकारलेल्या व्यासपीठाने लोकमान्यतेच्या कृतक कल्पनेने, सरकारदरबारी मिळणाऱ्या मानसन्मानाने त्यांची वैचारिकता लांछित झालेली असेल तर अशा विचारवंतांचा समाजाला फारसा मूल्यात्मक उपयोग होत नाही.

आपल्या सामाजिक इतिहासात विचारवंतांची परंपरा खूप समृद्ध नसली, तरी ती आहे याचे समाधान आपण मानले पाहिजे. याठिकाणी विचारवंतांच्या एका वैशिष्टयपूर्ण परंपरेविषयी बोलावयाचे आहे. ही परंपरा प्रबोधनवाद्यांची आहे लोकहितवादी, फुले, आगरकर, र. धो. कर्वे, आंबेडकर इत्यादींचा वारसा सांगणारी वैचारिक परंपरा आज दिशाहीन झालेली दिसते. आंबेडकरांच्या पुढे जाणारा विचारवंत आपल्या समाजाला अजून गवसलेला नाही. आपले प्रबोधन आंबेडकरांपाशी थांबून गेलेले आहे. आपल्या समाजात प्रबोधन विचाराचा सतत पराभव केला जातो आहे. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात पारतंत्र्यामुळे प्रबोधनविचार गौण मानला गेला. स्वातंत्र्य मिळताच आपल्या समाजाची प्रकृती पूर्ववत ठणठणीत होईल अशा पोकळ भ्रमामुळे प्रबोधनविचार निर्मितीकाळीच पांगळा झाला. स्वातंत्र्यानंतर आज पन्नास वर्षे उलटली तरी आपल्या समाजाची प्रकृती ठणठणीत होण्याचे तर दूरच पण त्याच्या आजाराचे नीटसे निदानही अजून आपल्याला करता आलेले नाही. आमचे जेवढे काही बरेवाईट प्रबोधन आहे ते अगदी वरवरचे आणि आपाततः झालेले आहे. प्रबोधनविचाराला आलेली ती गोमटी फळे आहेत असे म्हणणे भ्रमाचे ठरेल. विज्ञाननिष्ठेचा अभाव, बुद्धीनिष्ठेचा अभाव यामुळे आमचे प्रबोधन पराभूत झालेले आहे.

प्रबोधनाच्या पराभवाला आणखी एक गोष्ट कारणीभूत ठरलेली आहे ती म्हणजे महाराष्ट्राच्या संवेदनस्वभावाची. महाराष्ट्र तडजोडवादी, समन्वयवादी, पुनरूज्जीवनवादी आहे. प्रसंगी अटीतटीचे रण माजवण्याची त्याची प्रवृत्तीच नाही. तो कचखाऊ आहे. ज्या काळात सुधारणावादाचा प्रकर्षाने प्रयत्न केला जात

अनुक्रमणिका

होता त्याच काळात त्याच्या या वृत्ती दृष्टीस पडल्या होत्या. आगरकरांचा पराभव या वृत्तीमुळेच झालेला होता. "चिपळूणकर टिळकांनी आपल्या इतिहासाधिष्ठित अहंगंडाला इंग्रजविरोधी राष्ट्रवादाचे रूप दिले ही राजकीयदृष्ट्या योग्य गोष्ट झाली. पण या भावनात्मक राष्ट्रवादाने इंग्रजविरोध म्हणजे पाश्चात्य कल्पनांना विरोध असे समीकरण बांधून आपल्या जन्मापासूनच आधुनिकतेशी वैर आरंभिले. दुबळयांचा अहंभाव उपकारक ठरण्याऐवजी उपद्रवकारक ठरतो तो असा. हे वैर तिथेच संपले असे नाही. टिळक युगातच नव्हे, तर गांधीयुगातही या राष्ट्रवादाने नवे विचार, नव्या कल्पना यांना विरोध करण्याचा आपला वारसा चालविला. इतकेच नव्हे तर स्वातंत्र्योत्तर काळातही दिवसेंदिवस आक्रमक बनत चालेलला हा जातीयवादी राष्ट्रवाद आधुनिक प्रगतीशी राष्ट्रप्रेमाच्या नावाखाली सतत वैर धरून वागत आहे. व्यक्तिवाद, बुद्धीवाद, ऐहिक मानवतावाद या मूलतत्त्वांची शास्त्रशुद्ध रूपे महाराष्ट्रीय समाजाला त्या काळी (व आजही) मानवली नाहीत... म्हणूनच आज या देशाला हवी असलेली 'आधुनिकता' पूर्णांशाने म्हणा व विशुद्ध स्वरूपाने म्हणा आमच्या ठिकाणी बिंबलेली नाही; हीच खरी या सुधारणावादाची शोकांतिका होय" असे यासंदर्भात ह. श्री. शेणोलीकर म्हणतात. त्यांच्या मते आमचा मूल्यविचार मुळातच भ्रष्ट आहे. पारंपरिक विचार व नवे विचार यांच्यात पातळीवर समन्वय होत गेला आहे, असे कधी घडलेच नाही. आम्ही फक्त नव्या–जुन्याची उसनवारी करून वेळ निभावून नेण्याचा प्रयत्न करतो. शिक्षण, साहित्य, राजकारण अर्थकारण या सर्व ठिकाणी भ्रष्ट परंपरा नि·अर्धीकच्ची नवीनता यांच्यात तत्त्वशून्य तडजोड करीतच आपण व्यवहार करतो आहोत. उच्चनीचतेच्या, जातीयतेच्या, भेदाच्या कल्पना जणू आमच्या रक्ताच्या थेंबाथेंबाशी आणि रोमरोमाशी इतक्या एकजीव होऊन राहिल्या आहेत, की उच्चनीच भावाच्या कल्पनांतून जातीयतेच्या परिधातून मुक्त होऊन आम्ही कसलाही विचार करू शकत नाही, की कोणताही आचार स्वतंत्रपणे आचर शकत नाही ही आम्हा भारतीयांची शोकांतिका आहे" शेणोलीकरांची ही मीमांसा लक्षात घेतली म्हणजे आपल्या प्रबोधनविचारांचा आपणच केलेला पराभव आपल्याला अधोरेखित करता येतो. महाराष्ट्राचा स्वभाव असा स्वतःच्याच पायावर धोंडा पाडून स्वतःला पांगळे करणारा स्वभाव आहे. मराठी माणसाचा आजचा संवेदनस्वभाव काहीसा भांबावलेला आहे. त्याला टोकाचे त्याच्याकडे आणून सोडलेले विविध घटक त्याच्यावर आजही आक्रमण करीत आहेत. या आक्रमणांचे विळखे पूर्णपणे त्याला तोडून टाकता येत नाही. जग त्याच्यापुढे झपाटयाने बदलत चाललेले आहे. त्यासोबत आपणही बदलले पाहिजे हे त्याला जाणवते आहे. पण या बदलाच्या प्रक्रियेत भूतकाळातून संक्रमित झालेले कोणते ओझे आपण टाकून दिले पाहिजे आणि कोणती पुंजी आपल्याबरोबर आपण नेली पाहिजे या द्वंद्वात तो सापडलेला आहे. यातून सुटण्याचे उपाय त्याला सापडत नाहीत. अशा संभ्रमित संवेदनस्वभावाला प्रबोधनाची पाठराखण करण्याचे स्वप्न मात्र पडत नाही त्या प्रबोधनाचे पाईक होण्याची पात्रता आपण धारण केली पाहिजे असे त्याला वाटत नाही. परिवर्तनाच्या मूल्यांची स्वीकृती आपल्याला संभ्रमातून बाहेर काढू शकेल यावर त्याचा विश्वास उरलेला नाही. त्यामुळे मराठीतला प्रबोधनकार आणि प्रबोधन आज दुबळे झालेले दिसते आहे.

अशा प्रकारच्या सामाजिक व्यवस्थेमध्ये कलावंत, समीक्षक आणि विचारवंत यांच्यातले परस्परसंवादित्व तडकून जाते. जोपर्यंत हे परस्पर संवादित्व समाजात असते तोपर्यंत वाङ्मयातून सामाजिकतेचे आकलन व्यक्त केले जाते. समीक्षेत या सामाजिकतेचे मूल्यमापन केले जाते. पण जेव्हा हे परस्पर संवादित्व आणि परस्परावलंबन शबलित होते, तिन्ही घटक स्वतंत्र आणि स्वायत्त बनू लागतात तेव्हा सामाजिकतेचे आविष्करण शबलित होऊ लागते. कलावंत आत्ममग्न, स्वकेंद्री, व्यक्तीवादी होतो. आकृतीवादाचा पुरस्कार तो करू लागतो. समीक्षेतही कलावादाचा पुरस्कार केला जातो. सामाजिकतेचे भान विसर्जित केले जाते. कलेला स्वायत्तता दिली जाते. रंजनाची मूल्येच वाङमयाची प्रेरणामूल्ये ठरू लागतात. यातून वाङ्मयात तोचतोचपणा सांचलेपण वा आवर्त निर्माण होऊ शकते. ही कोंडी फोडण्यासाठी कलाव्यवहार विचारवंताशी जोडावा लागतो. म्हणूनच विचारवंताच्या भूमिकेचा येथे येवढया विस्ताराने विचार केलेला आहे.

कलाव्यवहारातील ही त्रिपात्री भूमिका समजून घेतल्यानंतर आपल्याला मराठी

समीक्षेचे, समाजिकतेचे आकलन तपासता येणार आहे. मराठी समीक्षेने सामाजिकतेचे आकलन हवे तितके तीव्र आणि खोलवर केले नाही कारण आपल्या समाजात विचारवंत दुबळे आहेत. आपली या महानाटयातली भूमिका त्यांना जबाबदारीने पार पडता आलेली नाही. आणि जेव्हा अशी भूमिका त्यांनी जबाबदारीने पार पाडली तेव्हा तेव्हा समीक्षेतही सामाजिकतेच्या तत्त्वाचा आविष्कार झाला. आपल्या प्रबोधनाच्या पराभवातून, समाजाच्या विविध प्रकृती–प्रवाहांच्या प्रबोधनाच्या पराभवातून, समाजाच्या विविध प्रकृती–प्रवाहांच्या खोलवर न केलेल्या चिकित्सेतून वाङ्मयनिरपेक्ष सामाजिकतेचे आणि वाङ्मयातील सामाजिकतेचे भान अपुरे आहे. हे आपल्या लक्षात येते. समीक्षकाला त्याच्या भोवतीच्या समाजाच्या समस्या, त्याच्यापुढे उभा असलेली आव्हाने यांच्या स्थितीगतीचा परिपूर्ण परिचय असावा लागतो. भूत–वर्तमान–भविष्य याचा वेध त्याला घेता आला पाहिजे. असे झाले तर त्याचे सामाजिकतेचे आकलन पूर्ण होईल. ते जर त्याला स्वतःच्या बौद्धिक आणि वैचारिक क्षमतेवर झाले तर उत्तमच अन्यथा त्याने विचारवंताचे दरवाजे ठोठावले पाहिजेत आणि स्वतःला त्यादृष्टीने परिपूर्ण केले पाहिजे.

स्वातंत्र्योतर मराठी समीक्षेने प्रत्यक्ष सामाजिकतेकडे पाठ फिरवली, त्याकडे तिचे संपूर्णच दुर्लक्ष झालेले आहे. असे नाही पण हे आकलन परिपूर्ण न करण्याचा प्रमाद तिने केलेला आहेच. याचा परिणाम म्हणून मराठी साहित्याला थिटेपण आलेले आहे. आपली वाङ्मयीन संस्कृतीच मुळात शबलित आहे. या दुबळया वाङ्मयीन संस्कृतीला जोपर्यंत सामाजिकतेचे खोलवर आकलन होणार नाही. तोपर्यंत या वाङ्मयीन संस्कृतीचा दुबळेपणा संपणार नाही, थिटेपणा संपणार नाही. आपल्या वैचारिक–सामाजिक जबाबदाऱ्या टाळणे हा प्रमाद आहे. मराठी समीक्षेने हा प्रमाद केलेला आहे. त्यामुळेच आपल्या वाङ्मयाला महत्त्वा प्राप्त होऊ शकलेली नाही.

मराठी समीक्षेने सामाजिकतेच्या संदर्भाचे भलेबुरे आकलन करून घेणाऱ्या कलावंत–समीक्षकांची योग्य बूज राखली नाही. हाही आणखी एक प्रमाद आहे. मराठी समीक्षेने फार वरवरच्या, पोकळ आणि कृतक तत्त्वसंकल्पनांची साथ धरलेली आहे. या संकल्पना समीक्षेला आकृतीवादाशी, रंजनवादाशी जोडणाऱ्या आहेत. या संकल्पनांच्या विरोधी बोलणारे, लिहिणारे कलावंत–समीक्षक मराठीत कधीच महत्तेच्या पदाला जाऊ दिले गेले नाहीत. मराठीत जेव्हा जेव्हा नवे सामाजिक प्रवाह येत गेले तेव्हा तेव्हा त्या या प्रवाहांची किती खोलवर समीक्षा आपण केली ? काही अपवाद वजा केले तर कौतुक आणि स्वागताचे पहिले पर्व संपल्यावर त्यांच्या मीमांसेचे पर्व सुरू झालेच नाही. त्या प्रवाहांजवळचे नवे सामाजिक भान आणि त्याचे मूल्यन वैचारिक पातळीवरून करण्याचे समीक्षेने टाळलेच या प्रवाहातून आलेल्या जीवनाच्या खदखदत्या रसायनाची तपासणी करणेही टाळलेलेच आहे. समाजात घडणाऱ्या मूलभूत उलथा पालथीकडे मराठी समीक्षेने दुर्लक्ष केले आहे. म्हणूनच मराठी वाङ्मयाची समीक्षा करणारा समीक्षक वाङ्मयाच्या एकूणच खुजेपणाला जबाबदार आहे. त्याच्यासोबतच मराठीतील वैचारिक परंपराही आपल्याला आरोपीच्या पिंजऱ्यात उभी करावी लागते. आपले जीवन खुजे, वैचारिक परंपरा खुज्या आहेत आणि म्हणून त्यावर वाढलेल्या, विकसलेल्या वाङ्मयीन परंपरा किरटया आणि खुरटया आहे.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात मात्र सामाजिकतेचे मूल्य घेऊन वाङ्मयाची समीक्षा झालेली आहे. ती पुरेशी नाही पण महत्त्वाची आहे. कुसुमावती देशपांडे, दि. के. बेडेकर, नरहर कुरूंदकर, शरच्चंद्र मुक्तिबोध, डॉ. रा. भा. पाटणकर, गं. बा. सरदार, डॉ. भालचंद्र नेमाडे, रा. ग. जाधव, शरद पाटील इत्यादी सारखी समीक्षक मंडळी सामाजिकतेच्या अंगाने मूल्यमापन आणि सिद्धांतन करताना दिसतात.

कुसुमावतींनी मध्यमवर्गाची चिकित्सा करून असे सांगितले की सामान्य व्यक्तिला कलात्मक, तरल अशा अनुभूतीतले काही कळणारच नाही अशा भ्रमिष्ट कल्पनेमुळे आत्मकेंद्रित वाङ्मयाची निर्मिती झाली. त्यामुळे जीवनाचे आकुंचन व पर्यायाने कलेचे अर्थशून्यत्व निर्माण झाले. मध्यवर्गीयांच्या कलानिष्ट जीवनाची साथ करता करताच कलेला क्रांतिकारक वळण मिळण्याच्या शक्यता होत्या; पण तसेही घडले नाही. कलेने जीवनाची साथ करण्याचा देखावा केला. परंतु खरोखरी मात्र एका कल्पनाविश्वात पळ काढला. हे कुसुमावतींचे निदान

सामाजिकतेच्या आकलनातून आलेले आहे. कलेत वस्तुस्थितीचे सत्यस्वरूप दिसते की नाही हे पाहण्याचा आपला अधिकार आहे. आपल्या भावभावनांच्या, आकांक्षांचा, दुःखयातनांच्या त्यात उपमर्द तर होत नाही ना हे जागरूकपणे पाहणे आपले कर्तव्य आहे. एवढेच नव्हे तर कलेचे जीवनाशी जे नाते आहे ते ती पाळते का नाही हे पाहणेदेखील महत्त्वाचे आहे. जीवनमूल्यांची राखण करणे, मानवी मनाला आकुंचित, क्षुद्रवृत्ती बनू न देणे, अश्मप्राय होऊ न देणे हे कलेचे मुख्य कार्य आहे. हे कार्य ती करते का नाही हे पाहण्याचे आपले–कलेचे जीवन व तिचा व्यवहार ज्यावर मुख्यतः अवलंबून आहे त्या वर्गाचे कर्तव्य आहे अशी स्पष्ट भूमिका कुसुमावतींनी घेतलेली आहे''

दि. के. बेडेकरांसारख्या समीक्षकाने असे मानले आहे की सामाजिक संस्कारांचा व जन्मसिद्ध गुणांनी विशिष्ट कलाने ते ग्रहण करणाऱ्या कविमनाचा जो संबंध आहे तो इतका उघड आहे की, तो नाकारणे म्हणजे कवीला अलौकिकाचा अव्हेर करण्याच्या भरात त्याला अमानुष ठरविण्यासारखे आहे. समाजविन्मुख व्यक्ती म्हणजे विकृती आहे व व्यक्तित्वाला उपकारक न ठरणारा समाज म्हणजे पशुंचा कळप अथवा राक्षसी तुरुंग आहे. जीवनात मानवजातीला क्रमशः ज्ञात होत गेलेला निसर्ग आणि मानवाला स्वतःच्या व इतरांच्या मनांचे होत गेलेले ज्ञान या व्यापक प्रक्रियेचा निर्देश त्यांनी केलेला आहे. कलात्मक सर्जनात व्यक्तिमात्राचे, राष्ट्राचे व संस्कृतीचे संस्कार फार स्पष्टपणे व उत्कट पणे प्रतिबिंबित झालेले आढळतात असे त्यांनी मानलेले आहे. राष्ट्रवाद, मानवतावाद, साम्यवाद, विविध धर्ममते, दर्शने, सुरत, हिंसा व पशुत्व या साऱ्या गोष्टींना जीवनात सामावून जीवनाचा अर्थ साकल्याने कलावंताने सांगायला हवा. जीवनाच्या सत्याकडे निर्भयपणे पाहणारा कलावंत माणसाच्या मनात वसणाऱ्या दुर्दम्य स्वातंत्र्य इप्सेच्या साक्षात स्पर्शाने बंडखोर बनतो अशी त्यांची धारणा आहे.

शरच्चंद्र मुक्तिबोधांनी मांडलेली सकलात्म मानुषतेची संकल्पना ही पूर्णतः सामाजिक संकल्पना आहे. सामाजिकतेची आपली धारणा व्यक्त करताना ले लिहितात – ''व्यवहार म्हणजे माणसामाणसांचा. म्हणजेच व्यक्ती व्यक्तींचा व्यवहार परस्परांशी अनुकूलतेचा वा प्रतिकूलतेचा वा तटस्थपणाचा प्रत्यक्ष संबंध परस्पर संबंधामधून व्यक्तिगत रागद्वेष प्रकट होत असूनही त्यामधून जुन्या–नव्या पिढीचा संघर्ष, किंवा कदाचित श्रेष्ठ–कनिष्ठ जातीचा वा वर्गाचा संघर्ष वा संस्कृती संस्कृतींचा सुद्धा संघर्ष प्रकट होऊ शकेल'' येथे मुक्तिबोधांनी मानवी व्यवहाराची व्यापकता सांगून त्याच्या द्वंद्वात्मक गतीशीलतेवर भर दिलेला आहे. कलावंताला आपला अनुभव, अनुभवाचा आकार आणि अनुभवाचे वैशिष्टय व मौलिकता या व्यवहारातूनच निवडावी लागते. मुक्तिबबोधाचे सामाजिकतेचे आकलन या व्यवहाराशी सापेक्ष अशा वेगळया संकल्पनेत त्यांनी मांडलं आहे. कलावंताचा स्वतःचा तीव्र संवेदनशील 'मी', 'तू'शी समव्यास होतो ही कलावंताच्या विकासाची खरी मानसिक क्रिया आहे. 'मी'ची 'तू'होत जाण्याची (becoming) ही प्रक्रिया म्हणजे सामाजिकतेचे भान कलावंताच्या व्यक्तित्वात प्रवेशिण्याची प्रक्रिया आहे. सर्व पातळयांवर कलावंताचा या विश्वाशी संघर्ष होऊन त्याच्यात गुणात्मक परिवर्तन घडून येते. समाजाच्या आवडीनिवडीतून कलावंताच्या वृत्तीत अंतर्भूत झालेले अनुभव स्थिर होतात. समाजाला सोयीच्या ठरणाऱ्या सौंदर्यकल्पनांनी या वृत्तीचे नियंत्रण केलेले असते. प्रत्येक मानवी समाजाची सौंदर्यासंबधीची एक विशेष अशी अभिरूची अराते व एक विशिष्ट प्रकारची सौंदर्यनिर्मिती असते. त्यामुळे सौंदर्यातून मिळणारा आनंद सामाजिक जीवनापासून उद्‌भूत होतो व तो सामाजिक आशयानेच समृद्ध होतो असेही मुक्तिबोधांचे सामाजिकतेचे आकलन आहे. मानुषतेची संकल्पना मांडताना हे आकलन अधिक मौलिक झाले आहे. मानुषता ही सर्व देशात सर्व काळात आणि सर्व परिस्थितीत आज–काल आणि उद्याच्या मानवी व्यक्तींचा व्यापून असणारे माणूसपणाचे (being) चे तत्त्व आहे. मनुष्यपणाच्या प्रत्यक्ष व्यावहारिक जीवनातून घडत जाण्याच्या–संघर्ष करीत जाण्याच्या विकास करीत जाण्याच्या यातनाप्रद अद्‌भूत प्रवासात (becoming च्या प्रक्रियेत) सतत असलेले मानुषपणाचे (being) चे तत्त्व आहे. त्यांनी मांडलेली व्यावहारिक विश्वाची कल्पना म्हणजेच सामाजिकतेची कल्पना आहे. मानुषतेच्या संकल्पनेतून त्यांनी जी कसोटी दिली ती निखालसपणे जीवनाशी भिडणारी, जीवनमूल्यांना सामावून घेणारी, कलेतील

सामाजिकतेचा प्रश्न सोडवणारी कसोटी आहे. अधिकाधिक व्यापक आनंदाशी व जीवनहेतूशी तादात्म्य पावणे हेच सृजनाचे सार्थक परममूल्य त्यानी मानलेले आहे.

द. ग. गोडसे यानी स्वतंत्र परिभाषा वापरून स्वतंत्र सौंदर्यसिद्धांत मांडला. कलात्मक अंगभूत संबंधाचे दर्शन घडविणारा 'पोत' हा त्यांचा सिद्धांत महत्त्वाचा आहे. पोत या सिद्धांताचे जीवनविषयक तत्त्व, तत्त्व विशद करणारी जाणीव, या जाणिवाची उभी आडवी वीण आणि जाणिवांचा आविष्कार घडवून आणणारे माध्यम हे चार घटक आहेत. ते सामाजिकतेशी सबध आहेत. समाजातील जीवनविषयक धारणा, त्या विशद करणाऱ्या जाणिवा यांच्यात घडणारी अवस्थांतरे आणि आविष्कारयत्रणेतील अवस्थांतरे समांतरपणे घडत असतात. कलानिर्मितीमागील कालावस्थाचे त्यांनी केलेले विश्लेषणही सामाजिकतेच्याच अंगाने जाणारे विश्लेषण आहे. प्राथमिक अवस्था निसर्गचित्रणावस्था, आदर्शचित्रणावस्था आणि संकेतावस्था या सगळया अवस्थांमध्ये तत्कालीन सामाजिक जीवनजाणिवांचे प्रतिबिंब पडलेले असते अशी त्यांची धारणा आहे. गोडशांच्या विचारांवर बरीच उलटसुलट चर्चा झाली पण मराठी समीक्षेने या सिद्धांताची फारशी दखल घेतली नाही. त्यांच्या सिद्धांताला अनुसरून मराठी वाङ्मयाची जर चिकित्सा केली तर कदाचित आमच्या वाङ्मयाची दुबळी संस्कृती पार निकालात निघण्याची शक्यता आहे म्हणूनही या सिद्धांताचे मोल नाकारण्यात आले असावे.

जगता जगता समाजाच्या सहकार्याने नैसर्गिक वस्तुंवर केलेल्या संस्काराचे एक रूप म्हणजे सौंदर्य असे निःसंदिग्धपणे मांडणाऱ्या कुरुंदकरांची सामाजिकतेची धारणा खरोखरच सूक्ष्म आणि खोलवरची आहे. कलावंतांनी अमूक वादाचा किंवा तमूक समस्येचा पुरस्कार करावा असा आग्रह नसून समाज ज्या अवस्थेतून जातो आहे, ज्या व्यथा, जी दुःखे भोगतो आहे, त्या व्यापक वास्तवाचे प्रतिबिंब वाङ्मयात पडावे या अपेक्षेतून ते तसे पडते का नाही असा प्रश्न आहे. असे प्रतिबिंब जर वाङ्मयात अभिव्यक्त होऊ शकले, तर वाङ्मयातून प्रकटणाऱ्या जाणिवांची समृद्धी वाढेल, कलेच्या पातळीवरून वास्तवाच्या आकलनाचा आणखी एक टप्पा गाठला जाईल व साहित्याच्या कक्षांचा विस्तार विविध परिमाणांनी होईल असा विश्वास कुरुंदकरांना वाटतो. जीवनातील घटना कलाकृतीत येतात तेव्हा त्या केवळ घटनांसाठी घटना असू शकत नाहीत. त्या कोणत्यातरी दृष्टीकोनातूनच बघता येतात. घटनांमागे उभी असणारी मूल्ये आणि संदर्भ विसरून घटनेचे आकलन करता येत नाही. इष्ट काय, अनिष्ट काय, जे इष्ट त्याच्या समर्थनार्थ कसे वागायला हवे याचा विचार करणे हे खरे सामाजिकतेचे मूल्य असावे असे त्यांचे मत आहे. सामाजिकतेच्या नुसत्या आविष्कृतीपेक्षा त्यातील मूल्यस्वीकाराचे भान कुरुंदकरांना महत्त्वाचे वाटते. त्यांचा साहित्यविचार सामाजिक मूल्ये, सांस्कृतिक परंपरा व मानवी जीवनातील अनुभूती यांच्या रसायनातून निष्पन्न झालेला आहे.

डॉ. रा. भा. पाटणकर यांनीही सामाजिक जीवनाचा व कलेचा अपरिहार्य संबंध मानलेला आहे. "कलावंताने व्यक्ति जीवनावर जरूर लिहावे पण असे करताना त्याला समाजजीवनाचा विसर पडून उपयोगी नाही. असा विसर पडला तर व्यक्तिजीवनाचे चित्रणही बेगडी व तकलादू होते. कारण त्या व्यक्तिजीवनाला कोणत्याच समाजात मुळे नसतात. आणि समाजजीवनात ज्याला मुळे नाहीत असे व्यक्तिजीवन खोटे व तकलादू असेच असते.. समाजाच्या मध्यवर्ती जीवनस्त्रोताशी त्याचा काही ही संबंध नसतो." आपली मूल्यव्यवस्था आपल्या समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी निर्माण व्हायला हवी. आपण आपल्या सामाजिक – सांस्कृतिक जीवनाचा मध्यवर्ती स्त्रोत शोधून काढला पाहिजे व तेथे जीवन जगताना, घडवताना आपले सत्त्व शोधले पाहिजे अशी पाटणकरांची धारणा आहे. कोणत्यातरी जीवनप्रकारातून जो उमललेला नाही असा सौंदर्यसिद्धांत असूच शकत नाही असा निःसंदिग्ध निर्वाळा पाटणकरांनी दिलेला आहे. वाङ्मयकला समाजजीवनाच्या ओघात निर्माण झालेल्या जीवनार्थाला अभिमुख राहूनच जगू शकते. वाढू शकते. त्यामुळे वाङ्मयातील जीवनदर्शन व जीवनमूल्ये यांची चिकित्सा व मूल्यमापन करणे हे समीक्षकांचे प्रमुख कर्तव्य आहे. असे त्यांना वाटते. आपल्या जीवनातील सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक संदर्भ केवळ अनुस्यूत नसतात

अनुक्रमणिका

तर या सर्वांना व्यापून उरणारी देशीयता टाळून चालणार नाही असेही पाटणकरांना वाटते. देशीय भानाचे त्यांचे विवेचन म्हणजे सामाजिकतेचेच विवेचन आहे. आपले स्वत्व कशात आहे हे शोधून ते टिकवायचे की नाही अशा मूल्यात्मक निर्णयाला तोंड द्यावे लागेल अशी वेळ आलेली आहे. जोपर्यंत आपण भारतीय, महाराष्ट्रीय होत नाही तोपर्यंत आपण कोणत्याही आंतरराष्ट्रीय–सांस्कृतिक क्षेत्रात कसलीही भर टाकू शकणार नाही हे ही यापुढच्या समीक्षेसाठी त्यांनी सांगून टाकलेले आहे.

गं. वा. सरदारांनीही सामाजिकते विषयीचे विवेचन केलेले आहे. धर्मवत्ते, शास्त्रज्ञ, यांच्या प्रमाणेच साहित्यिकही क्रांतदर्शी असतो. ज्ञाताच्या पलीकडे झेपावण्याचे सामर्थ्य त्यांच्यापाशी असते असे सरदार मानतात. एका स्वयंपूर्ण साहित्यकृतीजवळ परिवर्तनवादी शक्तींनी युक्त असे क्रांतदर्शित्व असते असेच त्याना अभिप्रेत आहे. विज्ञान आणि साहित्य यांचा शोधविषय एकच असतो म्हणन सामाजिकशास्त्रांचा व्यासंग साहित्यसेवकांना उपकारक ठरेल. त्यांची जीवनाची समज अधिक खोल व पक्की होण्यास त्यामुळे मदत होईल असे त्यांना वाटते. सरदारांनी साहित्यिकाच्या सामाजिक बांधिलकीला महत्त्वाचे मानलेले आहे.

अलिकडच्या काळात रा. ग. जाधव, भालचंद्र नेमाडे, सुधीर बेडेकर, शरद पाटील, यशवंत मनोहर या समीक्षकांनी सामाजिकतेचे तत्त्व वेगवेगळया संदर्भात स्पष्ट करून सांगितलेले आहे. त्यातून सामाजिकतेच्या अंगाने मौलिक साहित्यसमीक्षा होण्यास प्रारंभ झाला आहे. बदलत्या सामाजिक परिस्थितीत वाङ्मयाने आणि समीक्षकाने अधिक डोळसपणे समाजाची चिकित्सा करण्याची गरज या समीक्षकांनी वेळोवेळी प्रतिपादिलेली आहे. स्वतःच्या उदाहरणाने त्यांनी समीक्षकाचे सामाजिकतेचे आकलन कसे असले पाहिजे याचा वस्तुपाठ घालून दिलेला आहे. अत्यंत जबाबदारीने आणि गंभीरपणे सामाजिक भान जीवंत ठेऊन त्यांनी जेव्हा समीक्षा केली तेव्हा त्यांच्या हातात काही निराळेच निष्कर्ष लागलेले आहे यावरून आपण हे लक्षात घेतले पाहिजे की समीक्षेचे सामाजिकतेचे आकलन सूक्ष्म आणि परिपूर्ण असले की मौलिक समीक्षालेखन होते.

आजच्या सामाजिक परिस्थितीत एका सम्यक् परिवर्तनाची गरज भासू लागलेली आहे. या परिवर्तनाला पोटात सामावून घेणारी नवी सामाजिक सौंदर्यप्रणाली निर्माण व्हायला हवी आहे. अशी प्रणाली निर्माण होण्यासाठी आपल्या आजच्या सामाजिक जीवनाची समीक्षा व्हायला हवी आहे. आमच्या समाजापुढे कोणती आव्हाने उभी आहेत, त्यांना आपण कसे सामोरे जाणार आहोत, कोणत्या प्रश्नांचे निराकरण कशा प्रकारे झाले पाहिजे यांचाही विचार आम्ही करायला हवा आहे. त्यातूनच आपल्याला काही नवे निर्माण करता येईल.

आपल्या भोवतीचे समाजवास्तव कशा प्रकारचे आहे त्याची थोडीशी चर्चा आपण करायला हवी. आपल्या समाजाजवळ भौतिक समृद्धीचे समाधान आहे. पण या समाधानात समाज किती काळ निर्भेळ पणे राहू शकेल याविषयी साशंकता आहे कारण औद्योगिक रणाचे फायदे गृहित धरूनही त्यामुळे मानवी नात्यांमधले सौंदर्य नष्ट झालेले दिसते आहे. भौतिक गरजा आणि मानवी विकासाची नैतिक मूल्ये यांत विसंगती आणि विसंवाद उत्पन्न होऊ लागला आहे. समाजव्यवस्थेत असलेल्या नैतिक मूल्यधारणा निरर्थक ठरू लागल्या आहेत. माणसाच्या कौटुंबिक जीवनाला तडे गेलेले आहेत. एकमेकांमधील संवादित्वाला आपण पारखे झालेले आहोत. बेकारीमुळे एका बाजूने वैफल्य आहे आणि तेच वैफल्य दुसऱ्या बाजूने दहशतवाद, हिंसाचार यात परिवर्तीत होते आहे. एका बाजूने अस्तित्वशून्यता आणि सत्त्वशून्यता आहे तर दुसऱ्या बाजूने भयव्याकुळता आहे.

विज्ञानाची प्रचंड वाढ झाली आहे पण वैज्ञानिक दृष्टिकोणाचा अभाव कायम आहे. जुन्या नैतिक आणि पाखंडी अभिनिवेषातून स्वतःची सुटका करून घेण्याचे धाडस आमच्या समाजाला अजूनही झालेले नाही. नव्या युगाच्या नव्या विचारधारा घडविण्याविषयी आपण उदासिन आहोत. जुन्या विचारांची ओझी घेऊन नव्या युगाचा आणि त्यातल्या समस्यांचा आपण सामना करीत आहोत. त्यामुळे सतत अपयश

अनुक्रमणिका

आपल्या वाटयाला येते आहे. आपल्या सामाजिकतेत कोणत्याही सांस्कृतिक मनोभूमिकेचे कलम बांधता येते. त्यामुळे आपण वेगवेगळी जीवनदर्शने आयात करीत जातो. त्याचे आपल्या सामाजिकतेतले अन्वयार्थ तपासताना पुन्हा आमच्या जुन्या पारपारिक मार्गाकडे वळत जातो. आपलेसत्व राखून नव्या युगाच्या नव्या जाणिवा आपण जन्माला घालत नाही. आपल्या समाजाला नव्या क्रातिकारक, बंडखोर आणि विरोधी जाणिवा पचवून टाकता येतात. त्यामुळे नव्या विचाराचा धक्का समाजरचनेच्या मूळावर घाव घालू शकत नाही. फक्त वरवरचे बदल होत जातात. व प्रबोधनाला पाठ दाखविली जाते.

राजकीय संदर्भात तर प्रचंडच काळोख दाटलेला आहे. भारतीय संविधानाने समाजाचे एक आदर्श स्वप्न दिले. पण पन्नास वर्षात या स्वप्नाची राखरांगोळी झाली आहे. संपूर्ण शासनयंत्रणा भ्रष्टाचाराच्या विळख्यात गुरफटलेली आहे. तो भ्रष्टाचार झिरपत झिरपत सामान्यांच्या जीवनात पोचलेला आहे. त्याचे भयावह परिणाम समाजाला भोगावे लागत आहेत. अस्थिर राजकारणामुळे मुख्य प्रश्नांना बगल देऊन भलतेच बिनमहत्त्वाचे प्रश्न महत्त्वाचे होत आहेत. त्यात बेजबाबदार आणि भ्रष्ट लोकप्रतिनिधिंच्या वर्तनाने भरच पडत चालली आहे. वैचारिकदृष्टया संपन्न, नैतिकदृष्टया श्रेष्ठ अशा लोकनेत्याच्या अभावी समाज भरकटतो आहे.

आपल्याला सगळयांना आपल्या भोवतीच्या या भयाण वास्तवाची पूर्ण कल्पना आहे. आपले विचारवंत आपले कलावंत आणि आपले समीक्षक या तिघांनी मिळून सामाजिकते विषयीच्या परस्परांच्या आकलनातून समाजाला आणि वाङ्मयाला मानाचे पान मिळवून दिले पाहिजे. समाजरचनेच्या आणि साहित्यरचनेच्या महानाटयातल्या या तीन महानायकांनी आपले जीवन आपले साहित्य आणि आपला समाज यांचा दर्जा उन्नत केला पाहिजे. आपल्या यापुढच्या काळाची हीच प्रधान गरज आहे ओळखून आपापल्या भूमिका त्यांनी अत्यंत गांभिर्याने आणि जबाबदारीने निभावल्या तर महत्तेच्या निकषावर हे महानाटय यशस्वी होणार आहे व त्याबरोरच समाजपरिवर्तनाचे दरवाजे आपल्यासाठी आपोआप उघडणार आहेत.

संदर्भ ग्रंथ

१. मे. पुं. रेगे; विचारवंतांचे जग; व्याख्या आणि व्याप्ती, मौज; दिवाळी, १९६८, पृ. १४–१५

गं. बा. सरदार, ज्ञाननिष्ठा व समाजपरिवर्तन, परंपरा आणि परिवर्तन, संपा. गोसावी, चौघुले, नाशिक. १९८८ पृ. १–२.

३. ह. श्री. शेणोलीकर, महाराष्ट्रातील सुधारणावादाची शोकांतिका, साहित्याविचार आणि समाजचिंतन संपा. भा. शं. भणगे, मुंबई, १९६८, पृ. १८८–१९८

४. तत्रैव, पृ. १८६–१८७

५. कुसुमावती देशपांडे, पासंग, मुंबई, १९६१ पृ. ४ ५–६

६. दि. के. बेडेकर, विचारयात्रा, मुंबई, १९७५ पृ. १६१

७. शरच्चंद्र मुक्तिबोध, सृष्टी, सौंदर्य आणि साहित्यमूल्य मुंबई, पृ. १२–१३

८. नरहर कुरूंदकर, पायवाट, मुंबई, १९८१. पृ. ९०

रा. भा. पाटणकर, सौंदर्यमीमांसा, मुंबई, १९७४ पृ. २८९.

डॉ. अरूणा देशमुख
श्रीनाथ रोड, शांतीनगर,
नागपूर-४४० ००२

स्मृतीची चाळता पाने !

उषा मा. देशमुख

गजानन त्र्यंबक माडखोलकर यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने आठवणी किंवा समीक्षात्मक लेखन करावे असे युगवाणी संपादक, माझ्या स्नेही आणि नव्यादमाच्या कवयित्री सौ. सुलभा हेर्लेकर यांचे पत्र आले आणि मी विचार करू लागले. माडखोलकरांच्या समग्र साहित्याचा तलस्पर्शी अभ्यास करून साहित्य अकंदमीसाठी मी नुकतेच एक छोटेस पुस्तक लिहिले आणि ते प्रसिध्दही झाले. त्या ग्रंथात सिंधूला बिंदूत पकडणाचा प्रयत्न झाला. पण त्या अभ्यासातून पुनः तीनचार लेख माझ्याकडून लिहून झाले. म्हणून आज ठरविले की काही आठवणी मांडाव्या की ज्यातून माडखोलकरांचा स्वभाव आणि व्यक्तित्व यावर प्रकाश पडू शकेल।

माझे बंधू मो. द. ब्रह्म हे अमळनेर नगरपरिषदेचे अध्यक्ष होते. गणेश मेळयात, नवरात्रात महाराष्ट्रातील ख्यातकीर्त वक्ते, साहित्त्यिक आणि विचारवंत व्याख्यानांसाठी येत असत. असेच माडखोलकर एकदा आले होते. मला आठवते तो काळ आक्टोवर १९४६ मधला असावा. आदल्याच दिवशी मामा वरेरकरांचे 'रामायणातील लक्ष्मण' या विषयावर व्याख्यान झाले होते. रात्री वा. टाऊन हॉलच्या मैदानात मांडव टाकून जवळ जवळ दहा हजाराच्या घरातील श्रोतृवर्ग व्याख्यानांना हजर असे. दुसरे दिवशी सकाळच्या रेल्वेने व्हाया भुसावळ पॅसेंजरने माडखोलकर अमळनेर रेल्वे स्टेशन वर उतरले. त्याकाळी अमलनेरहून कोणतीच सुपरफास्ट एक्सप्रेस जात येत नसे. पॅसेंजर नेहमीच एकदीडतास उशिराने येत असे त्यामुळे स्टेशनवर स्वागतासाठी एकही कार्यकर्ता हजर नव्हता. भाऊराव विचारत विचारत ब्रह्मेगल्लीत बंगल्यासमोर उतरले. गावामध्ये टांगाही एकच होता. टांगेवाला गंगाराम पैशासाठी कटकट करू लागला. घरात ब्रह्मेवकिलांकडे आशिले येऊन बसलेली होती. तावातावाने काहीतरी बोलाचाली चालू होती. आमच्या दादांनी (बंधू) मला कोण आले आहे. ते बघ म्हणून सांगितले मी दाराशी आले त्यावेळी भाऊराव सामान उतरवण्यात गुंग होते. मी पळत जाऊन कुणीतरी पाहुणे आले आहेत असे दादांना सांगितले ते हंडयाच्या माडीतून (ऑफिस) झरझर खाली आले त्यांनी मला सांगितले 'अग', हे माडखोलकर थोर कादबरीकार. नमस्कार कर ही माझी आणि माडखोलकरांची पहिली भेट। ते भयंकर संतापलेले होते. त्यामुळे ललबुंद झाले होते. डोळ्यात राग मावत नव्हता. वरेरकर मामाही आमच्या घरीच मुक्कामाला होते त्यांच्या स्वाधीन माडखोलकरांना दादांनी केले आणि आपल्या आशिलांना घरी पाठवून दिले. आम्हाला चहा फराळाची व्यवस्था पहाण्यास पिटाळले. हळूहळू माडखोलकर शांत झाले. दुपारी चांदीच्या ताटावाटीतून बासुंदीपुरीचे जेवण झाले. त्यांचा थकवा कमी झाला असावा म्हणून ते निवळले आणि दुपारी झोपण्यासाठी आपल्या हॉलमध्ये गेले. आमचे घर पाच मजली. 'यशोदाधाम' अमलनेरच्या मध्यभागी वरच्या मजल्यावर

अनुक्रमणिका

गच्चीत गेले की सारे अमलनेर दिसते. मी, माझा भाऊ अरविंद त्याचा मित्र पम्या यांना काही माडखोलकरांचे वागणे आवडले नाही. त्यांनी घरात सर्वत्र सामसूम झाल्यावर दुपारची वामकुक्षी मोठी माणसं घेत असतांना खिडकीजवळच्या खुर्चीचा एक दाडू काढून ठेवला. म्हणजे जो कुणी खुर्चीवर बसेल तो दणकन खाली आपटेलच घरात कुणालाच हे माहिती नव्हते. संध्याकाळी माडखोलकराचे मराठी रंगभूमी या विषयावर भाषण होते. झोप झाल्यावर भाऊराव हंडयाच्या माडीत आले आणि खुर्चीवर बसले दणकण खाली डोक्यावर आपटले. दुसरे कुणीही तिथे नव्हते पण मी, पम्या अरविंद खिडकीच्या फटीतून बघत होतो. भाऊराव उठले डोके चोळू लागले. नंतर त्यांनी खुर्चीची तपासणी केली त्यावेळी त्यांच्या लक्षात आले की हे व्रात्य मुलांचे काम असावे. आम्ही त्यांच्या डोक्याकडे पाठीमागच्या बाजूला बघत होतो. सुपारी एवढे टेंगूळ त्यांना आले होते. रात्री त्यांचे भाषण उत्तम झाले. माझी आत्या मथूआत्या ना. सी. फडके आणि माडखोलकर यांच्या कादंबऱ्या रात्री कुणी जागे नाही असे बघून वाचीत असे. आम्हा मुलांना ती का वाचते ? आणि काय वाचते ? या विषयी कुतूहल असे. पण तेच माडखोलकर आमच्या घरी आले व भावाने त्यांची खोडी काढली होती. स्टेशनवर कुणी आले नाही म्हणून भाऊरावांचा अहंकार दुखावला गेला असावा. आणि आपल्याच घरी येऊन हे पाहुणे संताप करतात म्हणून माझ्या भावाला आणि त्याच्या मित्राला राग आला असावा। पुढे लग्नानंतर नागपूरला मी आल्यावर टेंगळाची आठवण भाऊराव नेहमी करून देत. पण त्यांनी कधी राग धरला नाही. भेट झाली की नेहमी माहेरची खुशाली विचारत असत. इतकेच नव्हे तर माझ्या वहिनी आणि बंधूच्या मृत्यूनंतर भाऊरावांनी आठवणीने सांत्वनपर पत्र पाठविले होते. भाऊराव रागीट आहेत, कडक शिस्तीचे असावे असे त्यांच्या व्यक्तित्वावरून नवख्या माणसाला जाणवे. पण मोठयात मोठे आणि मुलात मूल होण्याची त्यांची निरीक्षण शक्ती होती.



मामा वरेरकरांना भुईमुगाच्या शेंगा फार अवडत असत म्हणून मुद्दाम शेतातल्या शेंगा आणून काही भाजून आणि काही उकडून आमच्या वहिनीने ठेवल्या होत्या. मामा पोटभर शेंगा खात होते. त्यांच्या सर्वांच्या गप्पा चालू होत्या. 'मामा वयोमानावर लक्ष ठेवा उद्या प्रवासाला निघायचे आहे ना 'शेंगा उत्तम आहेत पण तुम्हाला सोसणार नाही' असे म्हणून भाऊरावांनी शेंगांचे तबक परत न्यायला लावले. स्पष्टवक्ते पणा आणि दुसऱ्या विषयीची आत्मीयता खटयाळपणाने व्यक्त करण्यात माडखोलकर मुरब्बी होते.

१९५२ साली कै. माधवराव देशमुखांशी विवाह झाल्यावर मी नागपूर येथे आले. आम्ही टिकेकर मार्गावरील सरनाईकांच्या बंगल्यात त्यावेळी रहात होतो. माडखोलकर धंतोलीतच 'प्रसाद' मध्ये राहण्यास आले होते. त्यावेळी ते नेहमी घरी येत असत देशमुखांचे ते ज्येष्ठ मित्र होते. पण त्यांचा विशेष जीव होता तो माझे भाऊजी त्र्यं. गो. देशमुख यांच्यावर दोघेही पत्रकार, प्रवाहाच्या विरोधी जाणारे, स्वभावाने प्रथमदर्शनी फटकळ वाटावे असे आणि हजर जबाबी. त्यामुळे भाऊराव माडखोलकर कधी त्र्यंगोकडे तर कधी माधवरावांकडे कधी कामानिमित्त कधी विदर्भ साहित्यसंघाच्या स्थलांतराच्या प्रश्नासंबंधी विचारविमर्शासाठी तर कधी गप्पा मारण्यास येत असत. एकदा भाऊराव घरी आले की तीनचार तास त्यांचे निघून जात असत. १९५२/५३ सालच्या नागपूर मध्ये आजच्या सारखी धावपळ नव्हती. जीवनाला निवांतपणा होता. कुणाकडे फोन असे नसे त्याची गरज पडत नसे. म्हणजे फोन करून घरी जाण्याची गरज वाटत नसे. स्नेहाचे धागे अधिक गहिरे होते. भाऊसाहेब कोलते, शं. दा. पेंडसे, श्री. ना. बनहट्टी पु. य. देशपांडे, काकासाहेब जोशी, रा. पु. सगदेव अशी सारी वाङ्मयीन चर्चात दंग होणारी मंडळी संध्याकाळी एकत्र जमत असत. त्यांच्या चर्चा चालत काही वेळा खलबते होत. मी स्वयंपाकघरात त्यांच्या चहा फराळाच्या गडबडीत असे. भाऊराव गंमरिपणाने काहीतरी गुप्त बातमी पुरविल्यासारखे नेहमी बोलत. हळू आवाजात कानामध्ये कुजबुजल्यासारखे ते बोलत असत. जणू आपणच एखादी गुप्त माहिती सर्वप्रथम पुरवित आहोत असा त्यांचा अविभाव असे. त्यामुळे बैठकीत त्यांचा दबदबा असे.

राजकारणी मंडळीमध्ये उठवस असल्यामुळे हा दबदबा अधिकच जाणवत असे. भाऊरावांजवळ कुणाकुणाचे खाजगीतले खूप किस्से असत. त्यांचे वाचन चागले होते. म्हणण्यापेक्षा आकलनशक्ती आणि स्मरणशक्ती अतिशय सूक्ष्म होती. हकिकती, कुलंगडी, काही प्रसग ते अतिशय गंमभिरपणाने सांगत असत आणि त्या व्यक्तीची पुरती फजिती करीत असत. त्यामुळे ते बोलतांना अंदाज घेऊनच खऱ्याखोटयाची शहानिशा करावी लागे. हा त्यांचा स्वभाव होता. साहित्यिक, राजकारणी त्यांना वचकून असत. त्यांचा लोकसंग्रह, विविधपूर्ण होता. जीवन शिस्तशीर असावे. ज्योतिष्याबद्दल, योगविद्देबद्दल ते अतिशय भरभरून बोलत असत. नियमितपणाबद्दल ते आग्रही असत. त्यांच्या सूनबाईवर त्यांचा फार जीव असे. बोलण्यातून सतत हे जाणवे. सुधा माझी काळजी घेते, सुधा माझे सर्व बघते याचे त्यांना फार समाधान वाटत असे. मी शांताबाईना बघितलेले नाही. माडखोलकरांनी त्यांच्याविषयी जे जे लिहिले आहे ते मी वाचलेले आहे. माडखोलकरांच्या कादंबऱ्यातून येणारा स्त्रीभाव, स्त्रीपुरूषसबंधातील ताणतणाव स्त्री चित्रणातील बारिकसारीक तपशील या संदर्भात माडखोलकर शांताबाईशी चर्चा करीत असत असे त्यांच्या कादंबऱ्यातील प्रास्ताविकातून दिसून येते. विदर्भ साहित्य संघाचे कार्यालय अमरावतीहून नागपूर येथे आणण्यात माडखोलकरांचा सिंहाचा वाटा होता. विदर्भ साहित्यसंघाला मोक्याची जागा मिळवून देण्यात माडखोलकरांनी खूप खटपट केली होती. अन्यथा एका पत्र्याच्या खोलीमध्ये नाना जोग, देहाडराय, कुसुमावतीबाई, मा.गो. देशमुख, वि.भि. कोलते असे संध्याकाळी जमत असत आणि सर्व कार्यालयीन कामे करीत असत. व्याख्याने ठरविणे त्याच्या पत्रिका घरोघरी देणे इत्यादी कामे एकजुटीने सर्वजण करीत असत. 'महाराष्ट्र' आणि 'तरूण भारत' या दोन्ही दैनिकांतून विदर्भ साहित्यसंघाच्या जडणघडणीच्या वार्ता अग्रक्रमाने देण्यासाठी भाऊराव खूप कष्ट घेत असत. द्वारकाप्रसाद मिश्र यांना भेटणे, रविशंकर शुक्ला यांना संघाचे मोल पटवून देणे या साऱ्या गोष्टी माडखोलकरांनी विशेष पुढाकाराने केल्या होत्या; याची जाणीवही सर्व कार्यकर्त्यांना होती. अमरावतीच्या संघाच्या कार्यकर्त्यांची समजूत घालण्याचे कामही भाऊरावांनी चोखपणाने केले होते. एखादी गोष्ट सिध्द करण्यासाठी भाऊराव जिवाचा आटापिटा करीत असत. सार्वजनिक जीवनात आणि सामाजिक जीवनात एक विचारवंत, वृत्तपत्रकार, ज्येष्ठ, लेखक म्हणून त्यांचा जसा लौकिक होता तसाच कादंबरीकार, शिक्षणात रस असलेला आणि चालू पर्यावरणाचा भान असलेला लेखक म्हणून विदर्भात त्यांना विशेष मानसन्मान होता. समाजमनात त्यांच्याविषयी आदर होता. त्यांच्या शब्दाला त्यामुळे सरकार दरबारी आणि सामाजिक चळवळीत फार मोल होते. विदर्भातील वैचारिक चळवळीचे आणि विदर्भ साहित्य संघाच्या प्रस्थापनेचे अग्रदूत म्हणून भाऊरावांनी काम केले. आयुर्वेदावर, भविष्यावर, ग्रहताऱ्यांवर, भाजीपाल्यावर, नोकरचाकरांवर ते तासंतास बोलू शकत असत. त्यांच्या लेखणीला जशी तपशीलवार टीका टिप्पणीची हौस होती तशीच ती संवादात, बैठकीतही उतरत असे. माडखोलकर किस्से सांगत त्यावेळी स्वतः अतिशय गंभीर असत आणि सारे श्रोते हास्यविनोदात दंग होत असत. एकदा एका महाविद्यालयाच्या (मॉरिसकॉलेज) समारंभासाठी माडखोलकर अध्यक्ष म्हणून आले होते. डॉ. देशमुख प्रास्ताविक करीत होते आणि मी व्यासपीठावर माडखोलकरांच्या जवळच्या खुर्चीत माधवरावांचे भाषण ऐकत होते. इतक्यात भाऊरावांना काय झाले कुणास ठाऊक त्यांनी कानाजवळ हळूच सांगितले 'उषाताई सुनीलचे वय आता वाढते आहे (सुभेदार) त्यासाठी एक चांगली मुलगी सुचवा' मला आश्चर्य वाटले की पुढचे भाषण त्यांना करायचे होते. त्यांच्याविषयी डॉ. देशमुख आपल्या खास शैलीत (विनोद – उपरोध) बोलत होते आणि भाऊरावांच्या मनात वडिलधाऱ्या पित्याची काळजी भरून आली होती. की सुनील सुभेदार यांचे लग्न लौकर झाले पाहिजे. माडखोलकरांच्या मनाचा थांग कुणाला लागत नसे असे म्हणतात पण ते अनेक पातळीवर सतत मनात विचार करीत असावेत असे मला वाटते. डॉ. देशमुखांच्या 'भावगंध' या ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीसाठी माडखोलकरांची

अनुक्रमणिका

प्रस्तावना घ्यावी असे त्यांनी ठरविले. तशी ती त्यांनी घेतली आणि छापलीही गेली. ती प्रस्तावना डॉ. देशमुखांच्या प्रमेयसिध्दांताला विरोधी जाणारी होती म्हणून मी जरा अस्वस्थ होते पण एका शब्दाचाही बदल न करता देशमुखांनी ती छापली त्यामुळे भाऊसाहेब माडखोलकर आणि डॉ. देशमुख याच्या भेटीगाठीत किंवा स्नेहात कुठेही अंतराय आला नव्हता. मला मात्र ही गोष्ट विसरायला बराच वेळ लागला होता. डॉ. देशमुखांनी मुंबई विद्यापीठातील मराठी विभाग प्रमुखपदाची धुरा सांभाळण्याचा निर्णय घेतला त्यावेळी माडखोलकरांनी आम्हाला भावपूर्ण निरोप दिला होता. आणि 'तरुण भारतात' अग्रलेख लिहिला होता. त्यांच्या ठिकाणी गुणग्राहकता होती. माणसांची पारख होती आणि विद्यार्थ्यांविषयी विलक्षण सहानुभूती होती. खेडयापाडयातून आलेल्या विद्यार्थ्यांना मॉरिस कॉलेजमध्ये प्रवेश मिळावा म्हणून भाऊराव स्वतः जातीने प्राचार्यांच्या बंगल्यावर येत असत. आणि त्या विद्यार्थ्याला प्रवेश मिळत असे. शिक्षणासाठी नोकरीसाठी कितीतरी तरुण भाऊसाहेब माडखोलकर यांचेकडे राहून गेले आहेत. आणि कर्तृत्वाने पुढे आले आहेत. माडखोलकरांची शेवटची कादंबरी याच स्नेहबंधाचे उद्‌घाटन करणारी आहे.

कृ. प्र. खाडीलकर आणि श्रीपादकृष्ण कोल्हटकर यांच्या जन्मशताब्दी सोहळयासाठी भाऊराव माडखोलकरांना मुंबई विद्यापीठाने खास निमंत्रित केले होते कारण भाऊराव श्रीपादकृष्णांचे पट्टशिष्य होते माडखोलकरांचे भाषण नेहमी प्रमाणे अतिशय दुर्मिळ माहितीने आणि तपशिलाने परिपूर्ण होते. सरदारगृहात ते उतरले होते आणि बरोबर माझ्या आठवणी प्रमाणे प्रा. भास्कर नंदनवार होते. कुलगुरू कुलसचिव यांनी आपली गाडी पाहुण्यांना आणण्यासाठी पाठविली पण त्यांची गाडी पोहोचण्यापूर्वीच माडखोलकर आणि प्रा. नंदनवार मराठी विभागात हजर झाले. त्यांनी बारकाईने सर्व चौकशा केल्या. घरची खुशाली विचारली आणि मला म्हणाले 'उषाताइ तुम्ही विदर्भातून महाराष्ट्राच्या राजधानीत आला आहात. मराठी भाषा आणि साहित्याविषयी भरीव काम झाले पाहिजे' मी फक्त मान हलविली. एक अधिव्याख्याता विद्यापीठाच्या पातळीवर काय करूं शकणार ? पण मला नेहमी आज मागे वळून बघतांना वाटते की डॉ. मा. गो. देशमुख यांची पुण्याई, विदर्भातील जनतेचे प्रेम आणि माडखोलकरांसारख्या ज्येष्ठांचे सौहार्द यामुळेच 'मराठी भाषा आणि साहित्य भवना'चे स्वप्न साकार होणार असल्याचे आपणासर्वांना दिसणार आहे. मराठी भाषा आणि साहित्याला 'कुणी घर देता का घर' असे यापुढे म्हणावे लागणार नाही ही ज्येष्ठांची अपेक्षा थोडीफार मला पूर्ण करता आली. कै. माधवराव देशमुखांचे ज्येष्ठ स्नेही आणि आस्थेवाईक भाऊराव माडखोलकरांना त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने ही शब्दांजली !

डॉ. उषा माधव देशमुख
'फुलराणी'
साहित्य सहवास,
बांद्रा (पूर्व), मुंबई

अनुक्रमणिका

आठवणीतले भाऊसाहेब

विजय देशमुख

१९५५ साली मी तेल्हाऱ्याहून खामगावी शिक्षणासाठी आलो तेव्हापासून तरुणभारताच्या माध्यमातून भाऊसाहेबांची ओळख व्हायला लागली. विशेषतः त्याकाळातील रविवार सोमवारचे भाऊसाहेबांचे अग्रलेख परिणाकारक वाटत. ज्ञान पिपासू वृत्ती, रसिकता, मांगल्याची आस्था लिप्त असून अलिप्त राहण्याची वृत्ती, मार्दवी शैली असे अनेक गुणविशेष त्यांच्या लेखणीत असत.

तो काळ द्विभाषिकाच्या विरोधात एकीकडे संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा तर दुसरीकडे महाविदर्भ चळवळीचा होता. पण मराठी माणसाला झपाटून टाकले होते अत्रे माडखोलकरांनीच त्यांच्या लेखणीतून एका प्रक्षोभ–पर्वाचा अनुभव अवघे घेत होते. तसे अत्रे माडखोलकर दोघेही संयुक्त महाराष्ट्राचे पुरस्कर्ते, पण दोघाचे विरोधक जसे वेगळे होते. तसे त्यांच्याशी झुंजण्याची दोघाची शैलीही वेगळी होती. आचार्य अत्रेंचा मराठा अतिरंजित, मर्मभेदी, काहीशा आक्रस्ताळेपणाने प्रतिपक्षाची भंबेरी उडविण्यात अग्रेसर होता. तरूण भारताच्या माध्यमातून भाऊसाहेबही संयुक्त महाराष्ट्राचा आग्रही पुरस्कार करीत होते. पण विदर्भवादी ब्रिजलालजी बियाणी, कन्नमवारजी वा बापुजी अणेंवर लिहिताना कुठेच भडकपणा जाणवत नसे. भाऊसाहेब थंडपणे वार काढून अलिप्त होत !

अशा संघर्षमयी वातावरणातच १९५७ साल उजाडले. त्या वर्षी शिवाजी महाराजांच्या प्रतापगड बांधण्याच्या घटनेला ३०० वर्षे पूर्ण होत होती. मराठी मनात शिवछत्रपती बद्दल असलेला भक्तिभावाचा अशावेळी राजकारणी मंडळीनी फायदा उचलण्याचा प्रयत्न केला नसता तरच नवल होते ! काँग्रेसी मंडळींनी या निमित्त्याने प्रतापगडावर शिवछत्रपतींचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्याचा व त्याचे अनावरणासाठी पंतप्रधान पंडित नेहरूंना बोलवण्याचा घाट घातला. शनिवार दि. ३० नोव्हें. १९५७ रोजी हा कार्यक्रम व्हायचे निश्चित झाले. पंडितजींचे प्रतापगडावर येण्याचे निश्चित झाले आणि त्याचवेळी त्यांना महाराष्ट्रात पाय टाकू द्यांयचा नाही असा संयुक्त महाराष्ट्र समितीने चंग बांधला. नेहरू–गांधीचा शिवछत्रपतींबद्दलचा अनादर प्रसिद्ध होताच. त्याचा फायदा उचलून पुन्हा शब्दतोफांचा घडघडाट सुरू झाला. वातावरणात एक प्रकारची सुत्र प्रक्षुब्धता जाणवू लागली.

पंडितजींच्या येण्याला विरोध करू नये, उलट शिवछत्रपतींचा प्रतापगड त्यांनी एकदा पहावाच, त्या ठिकाणी घडलेले अद्भूत प्रतापपर्व समजून घ्यावे म्हणजे आपोआपच त्यांचे पूर्वग्रह गळून पडतील आणि मग शिवछत्रपतींची त्यांनी बांधलेली पूजा हा मराठी मनाचा विजयच ठरेल असे मला राहून राहून वाटत होते. पण अत्रेंच्या तुतारीपुढे कुठेच हा भाव प्रकट होण्याची आशा वाटेना.

अशा कोंडलेल्या मनोवस्थेतच दि. ३० नोव्हेंबरचा शनिवार उजाडला. आज

अनुक्रमणिका

प्रतापगडावर काय घडेल या चिंताचक्रात फिरत असतानाच घरी तरूण भारतचा अक आला. तो चाळत असताना अग्रलेखाच्या शीर्षकाकडे लक्ष गेले. शीर्षक होते 'प्रतापगड' अधाश्यासारखा तो अग्रलेख वाचून काढला. एक अप्रतिम अग्रलेख, प्रतापगडचे महत्त्व यथार्थ शब्दात विशद करणारा, सहजसुंदर शैलीतून उतरलेला, शिवगंगे सारखा शांतगंभीर, समकालीन प्रक्षुब्धतेला वळसा घालून नकळत इतिहासात घेऊन जाणारा आणि तरीही वर्तमानाची जाण ठेवून अफझल वधाचे राष्ट्रव्यापी महत्त्व सांगून टाकणारा तो अग्रलेख आपल्याच मनाचे हितगुज सांगतो आहे असे वाटत होते. एका कट्टर संयुक्त महाराष्ट्रवादी विचारवंत पत्रपंडिताचा हा अग्रलेख त्याच्याविषयी आदराची भावना निर्माण करून गेला. आठवणीतला भाऊसाहेबांचा हा पहिला परिचय !

लौकरच भाऊसाहेबांना प्रत्यक्ष पाहण्याचा अन् ऐकण्याचा योग आला. बहुधा कोल्हटकर स्मारकाचे निमित्ताने भाऊसाहेबांचे खामगावला येणे घडले. मी उत्सुकतेने व्याख्यान ऐकण्यासाठी गेलो काही दिवसांपूर्वी आचार्य अत्रेंचेही एक व्याख्यान ऐकण्याचा योग आला होता. अत्रेंचा तो धिप्पाड देह, सुटलेले पोट, सुटा बुटातील अत्रे कोट मागे सारून हात कमरेवर ठेवून वाक्यागणिक हसवत होते. श्लील अश्लीलतेची चिंता न करणाऱ्या त्यांच्या शाब्दिक कोटयांमुळे क्षणभर मनोरंजन होत असले तरी भरीव वैचारिक खाद्य काही त्यातून मिळत नव्हते.

त्या पार्श्वभूमीवर भाऊसाहेबांचे व्याख्यान उजवे वाटते. उंच, गोरी शरीरयष्टी, मोठे डोळे, धोतर–कोट परिधान केलेले भाऊसाहेब दिसण्यात जसे भारदस्त वाटले तशीच त्यांची विचार चिंतनाची बैठक लाभलेली ठाशीव उच्चार करणारी वाणीही भारदस्त वाटली. विद्यार्थी दशेत ऐकलेला तो व्याख्यान विषय आज विस्मरणाच्या पडद्याआड गेला असला तरी तो प्रसंग आजही आठवतो. भाऊसाहेबांना भेटून व्याख्यान आवडल्याचे त्यांना सांगावे असे वाटले. पण एवढया मोठया व्यक्तिसमोर बोलण्याचा संकोच वाटत होता. हिंमत होईना. मग तसाच परतलो यानंतर कधी त्यांची प्रत्यक्ष भेट होईल असे स्वप्नातही वाटले नाही. पण नियतीच्या मनातले कळत नाही हेच खरे.

१९६१ साली नोकरी निमित्त नागपूरला आलो. पहिली ५–६ वर्षे स्थिर होण्यात गेली. त्यानंतर लेखन, शिवचरित्र कथन सुरू झाले. वृत्तपत्रातून तुरळक नाव येऊ लागले. १९७१ साली, कै. अप्पासाहेब चितळेंनी स्थापन केलेल्या हिंदु–धर्म संस्कृति मंदिरात मानद व्यवस्थापक म्हणून कार्य सुरू झाले. तिथे आम्ही त्याचवर्षी एम.ए. मराठी विषयाचे मार्गदर्शन केंद्र सुरू केले. त्या केंद्रात भाऊसाहेबांच्या सुकन्या सौ. मीनाक्षी फडणीस येत असत. बहुधा त्यांच्याकडूनच आमच्या मार्गदर्शन केंद्राच्या कार्याची इत्यंभूत हकिकत भाऊसाहेबांच्या कानावर गेली असावी. भाऊसाहेबांचे निवास स्थान मंदिराच्या मागील गल्लीत जेमतेम दिड–दोनशे पावलांवर असेल, रोज सकाळी ते फिरायला मंदिरा कडूनच जात असत.

एक दिवस सकाळी अचानक भाऊसाहेब घरी आले. सुखद आश्चर्याने मी त्यांचे स्वागत केले. खुर्चीवर बसत आपल्याच तंद्रीत असलेले भाऊसाहेब चष्म्यातून माझ्याकडे पाहात विचारते झाले, 'तुम्हीच विजय देशमुख का ?' 'हो' मी उत्तरलो.

'तुम्ही एम्.ए.ला शिकवता ?' 'हो, मधून मधून माझे उत्तर.

'कुठल्या कॉलेजमध्ये प्रोफेसर आहात ?'

'मी प्रोफेसर नाही भाऊसाहेब, रिझर्व बँकेत नोकरी करतो.'

'अरे वा ! तिथल्या कामगार चळवळीशी काही संबंध आहे की नाही ?'

'ती मंडळी सुपरिचित आहे एवढेच'

'मी तुमच्या कामगार संघटनेचा एका वर्षी अध्यक्ष होतो पण तुम्ही त्यावेळी नोकरीत नसाल'

मी नकारदर्शक मान हलविली.

अनुक्रमणिका

'मीनाने तुमच्याबद्दल बरेच सांगितले म्हणून मुद्दाम भेटायला आलो'. भाऊसाहेबांनी पुन्हा संभाषण मूळपदावर आणले चहापान सुरू असताना भाऊसाहेबांनी पृच्छा केली, 'सध्या कुठले लेखन अध्ययन सुरू आहे ?'

'सध्या महाभारतातल्या कर्णाचे चिंतन सुरू आहे' मी उत्तरलो चटकन् भाऊसाहेबांचा पुढचा प्रश्न, एम. ए. संस्कृतात केलेकी मराठी साहित्यात ? 'मराठी साहित्यात' मी उत्तरलो.

'मग तुम्ही महाभारतावर काय चिंतन करणार ! आजकालच्या लेखकांना संस्कृतचे अजिबात ज्ञान नाही. मराठी भाषांतरे वाचून लिहितात अन् औषधापुरते संस्कृत श्लोक मधून मधून दडपून तज्ज्ञ असल्याचा आव आणतात ! अशा साहित्यकृतींना काय मूल्य राहणार आहे ?' भाऊसाहेबांमधील संपादक आता रंगात आला होता मी निमूटपणे ऐकून घेत होतो. माझे मौन भंग करीत भाऊसाहेबांनी पुढचा प्रश्न फेकला, 'तुम्ही मूळ महाभारत वाचले आहे काय ?' 'होय भाऊसाहेब, दोनदा वाचून झाले. आता कर्णचरित्राच्या संदर्भात तिसरे वाचन सुरू आहे'

'अशा दोन चार वाचनात कुठे महाभारत समजेल म्हणता ?'

'मला महाभारत पूर्ण समजले आहे अस कुठे म्हणालो मी ? हां, कर्णचरित्र रेखाटनातील नेमकी सुसंगती थोडीफार जाणवू लागली आहे हे मात्र खरे आहे. सूर्यपुत्र म्हणून जन्माला आलेला कर्ण सूर्यपुत्र–सूतपुत्र–सूर्यपुत्र असे पूर्ण वर्तुळ साधणारा रेखाटलेला वाटतो भाऊसाहेबांनी डिवचल्यामुळे, काहीसा चिडुन का होईना, मी बोलका होत गेलो ! पण भाऊसाहेबांना मी किती खोल पाण्यात आहे हे बहुधा अजून जोखायचे होते. म्हणून कदाचित ते म्हणाले.

'विजय, मी महाभारत तीनशे वेळा वाचून काढले आहे !' 'तुम्ही अष्टपैलू संपादक आहात भाऊसाहेब ! संपादकाला चौफेर असावेच लागते. पण चौफेर दृष्टीत विशिष्ट विषयाबाबत संशोधकाची सखोलता असतेच असे थोडेच आहे' माझ्यातील तारुण्यसुलभ अतिउत्साह उत्तरला.

'म्हणजे माझे महाभारताचे वाचन चौफेर आहे आणि तुमचे सखोल आहे असे म्हणायचे आहे तुम्हाला !'

'तूर्त कर्णासंदर्भात असे म्हणण्याचे धाडस करावेसे वाटते' मी थोडया तुटक शब्दात उत्तरलो. हे संभाषण जेवढया लौकर आटोपेल तेवढे बरे असे आता वाटू लागले. भाऊसाहेबांच्या हे लक्षात आले. म्हणून उठत ते म्हणाले, 'ठीक आहे. आपण परिक्षाच घेऊ. उद्या तुम्हाला दुपारी वेळ आहे का ?'

'हो, उद्या दुपारी चारच्या सुमारास मी आपल्या भेटीस येऊ शकेन' 'नको, मीच तुमच्याकडे येतो. निरोप पाठवून तुम्ही महाभारताचे अठराही पर्व काढून ठेवा. मात्र मराठी भाषांतराचे नकोत! मी भाऊसाहेबांना वाकून नमस्कार करीत होकार भरला.

दुसऱ्या दिवशी दुपारी एका छोटया मुलाबरोबर भाऊसाहेबांची दोन बोटांची चिट्ठी आली 'मी येतो आहे. पुस्तके काढून ठेवावीत. थोड्याच वेळात भाऊसाहेब हजर झाले. तोपर्यंत महाभारताच्या अठराही पर्वांचा ढीग मी एका स्टुलावर रचून ठेवलाच होता. तिकडे अंगुलीनिर्देश करीत म्हणालो, भाऊसाहेब नीलकंठी टीका असलेली ही चित्रशाळा प्रेसची आवृत्ती आहे' भाऊसाहेबांनी वरचे पुस्तक काढून चाळले. मराठी भाषांतर नसलेले हे ग्रंथ आहेत याची खात्री करून घेतली आणि माझी परिक्षा घेणे सुरू केले. अमुक संदर्भ कुठे आहे म्हणून त्यांनी विचारायचे. मी तो काढून दाखवायचा अशी तब्बल एक तास परिक्षा घेतली. कुणीच हार जाईना ! मग चहापान झाले. त्यानंतर भाऊसाहेब उद्गारले, 'तुम्ही खरंच मन लावून अभ्यास केलेला दिसतो. आता शेवटचा प्रश्न विचारतो, 'दैवायत्तं कुले जन्म महायत्तं तु पौरुषम्' 'हे कर्णाचे उद्गार काढून दाखवा !'

मी मोठयाने हसत म्हणालो, 'भाऊसाहेब अखेर आपण लढाई हरलात ! 'दैवायत्तं कुले जन्म..' हे कर्णाचे उद्गार महाभारतात नाहीतच मुळी ते वेणीसंहार नाटकातले आहेत ! 'शक्य नाही. माझ्या

डायरीत सविस्तर नोंद आहे. आता तुम्ही नाही म्हणता तर उद्या डायरी पाहून सांगतो कोण बरोबर आहे ते !'

माझ्या विधानाबद्दल माझी खात्री असल्याने आता उद्या भाऊसाहेब कसले येतात असा विचार करून मी अन्य कामाला लागलो. पण केवढे आश्चर्य ! ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी भाऊसाहेब घरी आले. दारातूनच म्हणाले, 'तुमचे म्हणणे बरोबर आहे. काय गफलत झाली समजत नाही. माझ्या डोळयांच्या कडा पाणावळया. भाऊसाहेबांना ओळखण्यात मी चूक केल्याचे शल्य मनाला डाचू लागले. पण भाऊसाहेब वेगळयाच तंद्रीत होते. खुर्चीवर बसत असतानाच त्यांनी विचारले, 'तुम्ही नागपूरला केव्हा आलात ?' '१९६१ च्या मे महिन्यात' मी उत्तरलो. मग गेल्या दहा वर्षात आपली भेट कशी झाली नाही ?' 'तरूण भारताच्या माध्यमातून आपली भेट तर मी रोजच घेत होतो प्रत्यक्षात भेटलो नाही हे मात्र खरे. ग्रामीण भागातून आल्याने पूर्वीचा बुजरा, संकोची स्वभाव जात नाही. शिवाय भेटून तरी काय झाले असते ?'

'तेव्हा भेटला असतात तर आतापर्यंत नागपूरच्या बाहेर काढले असते !' मला काहीच समजले नाही तरी बोलायचे म्हणून बोललो, 'मग आता काढा !', 'आता शक्य नाही, सध्या माझी अवस्था सोनेरी पिंजऱ्यातल्या राघूसारखी झाली आहे !' आणि एकदम भाऊसाहेबांच्या चेहऱ्यावर भावुकता पसरली भाऊसाहेबांच्या याही वाक्याचा अर्थ मला अनाकलनीय वाटला. हे संभाषण एवढयावरच थांबले.

माझे सूर्यपुत्राचे लेखन सुरू होते. एका सकाळी भाऊसाहेबांची दोन बोटाची चिट्ठी पुन्हा आला, वेळ असल्यास पाच मिनिटे भेटून जा ! लगेच भाऊसाहेबांकडे गेलो. मला पाहताच भाऊसाहेबांनी एक पुडके माझ्या हातात दिले व म्हणाले, 'कालच मुंबईहून परतलो. तिथे दाजीशास्त्री पणशीकरांची भेट झाली तेही कर्णावर पुस्तक लिहित आहेत. मी त्यांचे हस्तलिखितच तुमच्यासाठी घेऊन आलो. वाचा, पहा काही उपयोग झाला तर वाचून झाले की माझ्याकडे पोहोचते करा! माझ्यासारख्या एका पोरसवदा लेखकासाठी हा भीष्मपितामह केवढे कष्ट घेत होता या विचाराने भाऊसाहेबांबद्दलच्या आदराची उंची अधिक वाढली.

मधूनमधून भाऊसाहेबांची चौकशी सुरूच असे. लेखकाची जास्तीत जास्त खाजगी माहिती काढण्याचा त्यांचा बहुधा छंदच असावा. एक दिवस त्यांनी विचारले, 'तुम्ही शिवचरित्राचे व्याख्याते म्हणून परिचित आहात मग मध्येच कर्णाकडे कसे काय वळलात ?

'माझे सद्‌गुरू पूजनीय विष्णुदास महाराज यांच्या इच्छेवरून' भाऊसाहेबांनी मग त्यांची चौकशी केली. ते सावंतवाडीचे म्हणजे गोव्याजवळचेच हे कळल्यावर म्हणाले, 'तुमचे गुरू कधी नागपूरला आले तर नक्की कळवा', मी आनंदलो व म्हणालो, सूर्यपुत्रचे प्रकाशन त्यांच्याच हस्ते व्हावे अशी इच्छा आहे. योग जुळून आला तर त्यावेळी आपली भेट नक्की होईल.

त्यानुसार सूर्यपुत्रच्या प्रकाशनासाठी विष्णुदासमहाराज नागपूरला आले. घरीच मुक्काम होता. मी भाऊसाहेबांना कळवले. त्याप्रमाणे सकाळी भाऊसाहेब महाराजाच्या भेटीसाठी आले मी त्यांची ओळख करून देण्याआधीच हात जोडून म्हणाले, 'मी माडखोलकर' महाराजांनी भाऊसाहेबांना जवळ बसविले. जुन्या व्यक्तींच्या आठवणी निघाल्या. मग भाऊसाहेबांनी, दत्तसंप्रदाय कसा कर्मठ आहे. आज तशी कर्मठ उपासना कशी अशक्य आहे, श्रीगुरूचरित्रातील आचारधर्म आज कसा कालबाहय आहे वगैरे विषयांवर मतप्रतिपादन केले. महाराजांनी उत्तर देताना ग्रंथातील कालसापेक्ष भागापेक्षा कालनिरपेक्ष आदर्श मूल्यांकडे लक्ष ठेवावे व चित्रशुध्दी शिवाय अध्यात्मात प्रगती कशी शक्य नाही हे सांगितले. महाराजांच्या खुलाशाने भाऊसाहेबांचे समाधान झाले व येताना हात जोडून नमस्कार करणारे भाऊसाहेब जाताना, महाराज नको नको म्हणत असत.ही, 'सत्पुरूषांचा निरोप असाच घ्यावयाचा असतो' असे म्हणत अक्षरशः साष्टांग दंडवत घालून परतले. माझ्या (गैर) समजुतीला भाऊसाहेबांनी पुन्हा एक धक्का दिला !

१६ डिसें. १९७३ रोजी सूर्यपुत्रचे प्रकाशन झाले. भाऊसाहेबांसह महाराष्ट्रातील काही नामवंतांकडे सूर्यपुत्र भेटीदाखल पाठविला आणि माझ्यापुरता सूर्यपुत्र संपुष्टात आला. शिवचरित्र व्याख्यानमालामध्ये मी पूर्ववत गुंतून गेलो. १९७४ हे वर्ष श्री शिवराज्याभिषेक त्रिशताब्दीचे वर्ष म्हणून महाराष्ट्रात मोठया प्रमाणावर साजरे व्हायचे होते. त्यानिमित्त विविध ठिकाणच्या व्याख्यानमाला, शिवदुर्गदर्शन यात्रेची तयारी या व्यापात 'सूर्यपुत्र'चा पूर्ण विसर पडला. रविवार दि. १० फेब्रु. ७४ ची सकाळ. परगावची व्याख्यानमाला आटोपून काल रात्रीच घरी परतलो होतो. सकाळी उठून नित्याप्रमाणे 'तरूणभारत' उघडून चाळू लागलो. एकदम नजर स्थिरावली अग्रलेखावर ! अग्रलेखाचे शीर्षक होते 'सूर्यपुत्र' भाऊसाहेबांनी पुन्हा अनपेक्षित धक्का दिला होता.

अग्रलेखाच्या पहिल्याच परिच्छेदात भाऊसाहेबांनी लिहिले होते 'केवळ व्यासंगच नव्हे, केवळ परिश्रमशीलताच नव्हे किंवा केवळ लेखनकुशलताच नव्हे, तर आपल्या प्रतिपादनाला घेतलेल्या विषयाचा सांगोपांग अभ्यास आणि चिंतन करून नंतरच लेखणी उचलणाऱ्या महत्त्वाकांक्षी लेखकाच्या ठिकाणी जी मौलिकता आपोआप निर्माण होते तिचा प्रत्यय या प्रबंधात पुरेसा येतो'.

हे वाचत असताना माझ्या डोळयासमोरून तो परिक्षेचा प्रसंग चमकून गेला. त्यावेळी मला भाऊसाहेबांचे वागणे काहीसे, अहंकारी, दांभिकपणाचे वाटले होते. आज फणसातल्या गऱ्याचे दर्शन घडून माझ्या मूर्खपणाची मला लाज वाटत होती. भाऊसाहेबांचे अंतरंग जाणणे कठीण आहे हे पुरेपुर पटले. भाऊसाहेबांच्या या अग्रलेखाने केवळ नागपूर विदर्भाचेच नव्हे तर महाराष्ट्रातील नामवंताचेही लक्ष 'सूर्यपुत्र'कडे वेधले गेले. अनुकूल–प्रतिकूल चर्चा, परिसंवाद सुरू झाले. हे घडत असतानाचे दि. २४ फेब्रु ७४ रोजी भाऊसाहेबांनी 'कर्णाचे आत्मसमर्पण' या शीर्षकाचा दुसरा अग्रलेख लिहिला. एखाद्या साहित्यकृतीवर ओळीने दोन अग्रलेख भाऊसाहेबांनी लिहिण्याची बहुधा ही पहिलीच वेळ असावी. तो बहुमान मला मिळाला हे माझे केवढे परमभाग्य ! भाऊसाहेबांच्या अनसूयु, नव्या लेखकाला प्रोत्साहन देणाऱ्या वृत्तीचा त्याच्या लेखनाला दिशा देण्याच्या वृत्तीचा आयुष्यभर विसर पडणे शक्य नाही. भाऊसाहेबांच्या लेखणीची मातब्बरी केवढी शक्तिशाली आहे हे लौकरच लक्षात आले. भाऊसाहेबांच्या सूर्यपुत्रवरील दोन समीक्षणपर अग्रलेखांनी संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष या ग्रंथाकडे वेधले यात अतिशयोक्ती मुळीही नाही. कारण त्यानंतर प्रख्यात समीक्षक कै. नरहर कुरूंदकरांनी जवळजवळ २०–२२ पृष्ठांचा प्रदीर्घ लेख ('सूर्यपुत्रच्या निमित्ताने) लिहिला तो त्यावेळी युगवाणीच्या दिवाळी अंकात प्रसिध्द झाला (पुढे तो ग्रंथनिविष्टही केला गेला.) श्री कुरूंदकरांप्रमाणेच दुर्गा भागवत, आनंद साधले, शिवाजीराव सावंत, इंदूरचे श्री कविश्वर, प्रा. सावळापूरकर इत्यादि विचारवंतानीही सूर्यपुत्रवर लिहिले. महाराष्ट्रातील बव्हंशी सर्वच मोठया वृत्तपत्रांनी सूर्यपुत्रची परीक्षणे प्रसिध्द केली. या सर्व मान्यवर लेखकांनी वा वृत्तपत्रांनी 'सूर्यपुत्र' वर भरभरून लिहिले त्याचे सारे श्रेय भाऊसाहेबांकडेच जाते त्यांनी 'सूर्यपुत्र'ला समीक्षेच्या कोंदणात बसविले नसते. तेही अग्रलेखाच्या माध्यमातून, तर कदाचित या मंडळींनी 'सूर्यपुत्र'कडे ढुंकूनही पाहिले असते की नाही याची शंका आहे ! भाऊसाहेबांनी अखेर मला नागपूर बाहेर काढलेच !

मौज अशी की, दोन अग्रलेख लिहूनच भाऊसाहेब थांबले नाहीत. दुसरा अग्रलेख प्रसिध्द झाल्यावर त्यांनी घरी बोलावले व पृच्छा केली, माझ्या दोन अग्रलेखांवर तुम्ही काहीच कशी प्रतिक्रिया' व्यक्त केली नाही ?' भाऊसाहेब, आपण एवढे भरभरून द्याल असे वाटलेच नाही. नेहमीप्रमाणे केव्हांतरी तरूणभारतात एखाद्याचा थोडासा अभिप्राय येईल असे वाटले होते. पण तुम्ही एवढे उदंड दिले की अजून त्या भावाकुल मनोवस्थेतून मी सावरलेलो नाही. प्रतिक्रिया व्यक्त करण्यासाठी जी मनाची तटस्थता लागते ती अजून लाभलेली नाही.' आज मात्र मी भारावून बोलत होतो. 'मी तुमच्या प्रबंधावर अनुकूल लिहिले असते तर आज ते लक्ष या ग्रंथाकडे वेधले गेले ते वेधले गेले नसते. पण शक्यता

अशी आहे की टीकेची सवय नसली की विशेषत: नवा लेखक कोमेजून जाण्याची भीती असते. बहिरंगात कितीही आविर्भाव धारण केला तरी मनाच्या अंतरंगात एखाद्याकडून तरी कौतुकाची अपेक्षा असते. तुम्हाला आज मुद्याम बोलावण्याचे कारण म्हणजे तुमच्या पाठीवरून कौतुकाचा हात फिरवू शकेल असे एक व्यक्तिमत्व सुदैवाने आहे. तुम्ही वेळ मागून घेऊन पवनारला जा. वाटल्यास विनोबांना माझे नाव सांगा. म्हणजे ते नक्कीच भेटतील'

मी होकार भरला. भाऊसाहेबांच्या आज्ञेनुसार पवनारला जाण्याचा निश्चय केला. भाऊसाहेबांच्याच तालमीत तयार झालेले मामासाहेब घुमरे त्यावेळी 'तरूणभारत'चे कार्यकारी संपादक होते. अजातशत्रु स्वभावामुळे मामासाहेब सर्वच सार्वजनिक क्षेत्रात लोकप्रिय होते पवनार आश्रमाशी त्यांचा असलेला संबंध मला ज्ञात होता. म्हणून विनोबांच्या भेटीची इच्छा मी त्यांचेजवळ व्यक्त केली. त्यांना त्यामागील पार्श्वभूमी काहीच माहित नव्हती. मामासाहेबांनी सर्व नीट जुळवून आणले आणि त्यांच्यासह मी पवनार आश्रमात विनोबांच्या भेटीला गेलो.

भाऊसाहेबांच्या, मनुष्य नेमका ओळखण्याच्या, ज्ञानाची, पुन्हा एकदा खात्री पटली. कर्णाच्या आत्मसमर्पणाचे प्रमेय विनोबांना आवडले. बाबा दिलखुलास बोलले. सूर्यपुत्रत्त्व हाच कर्णाचा स्थायीभाव आहे हे सांगितले (ती प्रदीर्घ मुलाखत त्याच काळात तरूणभारतात प्रसिध्द झालेली आहे.) निरोप घेताना खडीसाखरेचा प्रसाद देऊन बाबांनी कौतुकाने पाठीवरून हात फिरविला त्यावेळी त्यामागे भाऊसाहेबांचीच प्रबल इच्छा शक्ती कार्यरत असल्याचे जाणवत होते.

'सूर्यपुत्र'च्या निमित्ताने भाऊसाहेबांची जी जवळून ओळख घडली तिचा वृत्तांत युगवाणीच्या माध्यमातून प्रथमच वाचकांसमोर ठेवीत आहे. तो ठेवण्यामागे आत्मश्लाघा वा अन्यकुठलाच हेतू नसून भाऊसाहेबांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने एकप्रकारे त्यांच्याबद्दलची कृतज्ञता जाहिरपणे व्यक्त करणे हाच भाव आहे.

आज भाऊसाहेब आणि त्यांचा काळ दृष्टी आड झाला असून वातावरणातील तत्कालीन प्रक्षुब्धता पूर्णतया निमाली आहे त्या काळातील पूर्वग्रह वा वादविवाद यांच्यापासून अलिप्त असलेल्या नव्या पिढीतील अभ्यासकांना त्यांच्या साहित्य, पत्रकारिता, समाजकारण अशा विविध क्षेत्रातील अजस्त्र कामगिरीचे समतोल वृत्तीने चिंतन करण्याची संधी प्राप्त झाली आहे. जन्मशताब्दीच्या निमित्ताने भाऊसाहेबांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे व रंगीबेरंगी मनोधर्माचे यथार्थ मूल्यमापन होऊन वाङ्मय व इतिहासाच्या अभ्यासकांना त्यांचे त्याक्षेत्रातील स्थान व महत्व निश्चित करण्यासाठी मदत व्हावी हाचे हेतू हा विशेषांक काढण्यामागे संपादकांचा असावा असे वाटते. त्या हेतूला अल्पप्रमाणात का होईना हातभार लावण्याचे कार्य या लेखनाने साधले तरी या लेखनाचे सार्थक झाले असे वाटेल.

शिवकथाकार विजय देशमुख
'श्री व्यंकटेश' ८०,
जयप्रकाशनगर, खामला,
नागपूर – ४४००२५.

बाई - भाऊरावांचे सहजीवन

सौ. मीनाक्षी फडणीस

एखादी वास्तू आपली वाट पहात असते, सतत आपल्याला बोलावीत असते. पण त्या वास्तूच्या भेटीचाही योग यावा लागतो, असे मी कधीतरी वाचले होते. मात्र त्याच्या सत्यासत्यतेविषयीच्या उलट-सुलट विचारानी मनाचा गोंधळ उडवून दिला होता. आपल्यालाही कधीकाळी त्याची प्रचिती येईल, असे तरी कुठे वाटले होते ?

खरे तर 'शांतानिवास' मधून बाहेर पडून अर्धशतकाचा काळ लोटला होता. पण मनातून ते 'घर' काही केल्या हलायला तयार नव्हते. त्या घराची ओढ ही वाढतच होती. हा किती वेडेपणा आहे हे कळत होते, पण मनाची समजूत काही केल्या पटत नव्हती. गेल्या दहा-बारा वर्षांपासून तर जणू मनाने 'शांतानिवास' मध्ये जाण्याचा ध्यासच घेतला होता. मनाची तळमळ तगमग सुरू होती. त्या घराचे आता मालक कोण आहेत आणि तिथे कसे जाता येईल, यासाठी निरनिराळ्या मार्गांनी शोध सुरू केले. पण प्रयत्नांना यश येत नव्हते. मनाची अस्वस्थता, अशांतता मात्र काही केल्या कमी होत नव्हती. माझी ही मनस्थिती घरातल्या सगळ्यांच्या लक्षात आलेली होती. १९९५ च्या प्रारंभीच अनपेक्षितपणे मला अरूंधतीचा, माझ्या मुलीचा फोन आला की दहा मिनिटात बाहेर पडायचे आहे, 'शांतानिवास' मधे जाण्यासाठी तयार रहा. वेळ होती दुपारची ऐन बारा वाजण्याची. मला हा आश्चर्याचा धक्काच होता. मनाची अवस्था कशी झाली होती म्हणून. सांगू ! नाहीच सांगता येत ! एक दिवस आधी जाऊन अरूंधती आणि माझा धाकटा मुलगा श्रीवल्लभ हे दोघेही सध्याचे घरमालक पलांदूरकर यांना भेटून, त्यांना विनंती करून आले होते. सुदैवाने पलांदूरकर पती-पत्नीला माडखोलकरांचा पूर्वेतिहास माहीत होता. त्यांनी ताबडतोब मुलांची विनंती मान्य केली.

आम्ही दोघांनी अरूंधतीसह 'शांतानिवास' मध्ये प्रवेश केला. १९४८ मध्ये निर्वासित, निराश्रित होऊन घराच्या बाहेर पडलेली मी प्रदीर्घ कालावधी नंतर पुन्हा त्या वास्तुत जात होते. कसला योगायोग होता हा ! घरात पाय ठेवताच मी मधला कालखंड जणू विसरूनच गेले होते. आपल्याच घरात असल्यासारखी अतिशय अधीर झालेली मी, अरूंधतीला घेऊन भिरभिरत्या नजरेने घरभर फिरत होते. मनात अनेक वर्ष साचलेल्या, साठलेल्या आठवणींचा बांध फुटला होता. सौजन्यशील असलेल्या गृहस्वामिनी मला म्हणत होत्या, "तुमचे घर तसेच ठेवले आहे, बरं का आम्ही ! काहीही बदल केलेला नाही." खरेच तर ! माझेच तर आहे हे घर ! काहीही बदल न झालेले; पण आता माझे 'बाई-भाऊराव' नसलेले !

का बरे मला या घराविषयी एवढी अनावर ओढ वाटते ? अतिशय सुखाचा, समाधानाचा आणि समृद्धीचा काळ आम्ही या घरात घालवला बाई-भाऊरावांच्या सफल सहजीवनाची साक्ष देणारे 'शांतानिवास' ! कसे विसरू शकते

अनुक्रमणिका

मी ते सुखाचे दिवस ? माझे आजोबा–आजी, (वि. म. आणि गिरिजाबाई नवाथे) बाईची माघारी आलेली आत्या, बाई–भाऊराव, बाबा आणि मी, असे आम्ही, किती आनंदात रहात होतो. लहान दिसणारे आमचे कुटुंब, पण घर माणसांनी कायम गजबजलेले असायचे सर्व तऱ्हेच्या, नाना निमित्ताने आलेल्या, निरनिराळ्या जाती–जमातीच्या, सामान्य आणि असामान्य माणसांची वर्दळ आमच्या घरी अखंड सुरू असे.

वस्तुतः आमच्या घरात भिन्न विचार प्रणालीची वडीलमंडळी एकाच छताखाली रहात होती. बाई–भाऊरावांच्या आवडीनिवडी तरी किती वेगवेगळ्या होत्या पोहणे, बॅडमिंटन खेळणे, नाटकात कामे करणे, बंदूक चालविणे असे तिचे छंद होते, तर भाऊरावानी कधी साधी सायकलही चालवली नव्हती, त्यांना येतच नव्हती. बाईने लग्नानंतर कर्वे विद्यापीठाची 'गृहितागमा' (जी. ए.) ही पदवी घेतली होती. ती अलाहाबादच्या 'राष्ट्रभाषा हिंदी'ची साहित्य विशारद होती. बंगाली भाषा तिला उत्तम अवगत होती. भाऊराव महाविद्यालयाची पायरीही चढने नव्हते. इंग्रजी, मराठी, संस्कृतचे भाषापंडित असलेल्या भाऊरावांचे हिंदी अगाध होते. पं. हृषिकेश शर्मा आणि त्यांच्या समानधर्मी पत्नी शारदादेवी नेहमी म्हणत असत, "भाऊसाहेब, तुमच्यासारखा वृद्ध विद्यार्थी आम्ही कधी बघितला नाही."

भाऊरावांनी बाईला सर्व प्रकारचे स्वातंत्र्य बहाल केलेले होते. नागपुरातल्या कितीतरी संस्थांमधून कुठे अध्यक्ष तर कुठे सचिव म्हणून ती कार्यरत असायची. बाई आणि भाऊराव ही दोघेही सौंदर्यसक्त होती. भाऊरावांना स्वतःला कोणतीही कला येत नव्हती पण ते रसज्ञ होते. आमच्या घरात बारमहा सणा–समारंभाचे उत्सवी वातावरण असे चातुर्मासात सणांची नुसती रेलचेल असायची. बाई, माझ्या आजी–आजोबांच्या आवडीनुसार त्यात मोठ्या हौसेने भाग घेत असे. सोबळ्याच्या स्वयंपाकात मदत करण्यापासून ते पैठणी नेसून, दागदागिने घालून पंक्तीला वाढप करण्यापर्यंत, सगळ्याच बाबतीत तिचा उत्साह दांडगा असे. भाऊराव हे सगळे सोहळे मोठ्या कौतुकाने अवलोकन करीत असत.

बाई रूढार्थाने साहित्यिक नव्हती. पण तिचा 'विखुरलेले मोती' हा कथासंग्रह प्रसिद्ध झालेला होता. शिवाय स्त्री किर्लोस्कर या मासिकांतून ती प्रसंगोपात्त लिखाण करीत असे भाऊरावांच्या जीवनाची ती प्रेरणाशक्ती होती. त्यांच्या लिखाणाची पहिली वाचक, टीकाकार तीच होती. तिला असलेल्या हिंदी–बंगाली भाषेच्या ज्ञानाचा उपयोग, त्यांनी आपल्या कथाकादंबऱ्या तसेच अन्य साहित्यातून करून घेतलेला होता. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर महाराष्ट्राबाहेर असंख्य ठिकाणी भाऊराव अध्यक्ष म्हणून गेले, त्या प्रत्येक वेळी बाई त्यांच्याबरोबरीने सगळीकडे असे. भाऊरावांनी एकट्याने कधी प्रवास केल्याचे मला स्मरत नाही. भाऊरावांच्या आयुष्यात असे एकही क्षेत्र नव्हते की ज्या ठिकाणी बाई नव्हती यशाची एकेकपायरी चढत असताना बाईची मोलाची सोबत त्यांना लाभलेली होती. भाऊरावांच्या सहवासात बाईचे जीवन सर्वार्थाने विकसित होत गेले. मितभाषी, शांत, संयमी, सहनशील पण विलक्षण धाडसी, कणखर आणि स्वाभिमानी असे तिचे व्यक्तिमत्त्व होते. विपुल केशसंभार, अभावानेच आढळणारे डोळ्यांचे देखणेपण ही तिच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये होती. तिच्या व्यक्तिमत्त्वाने भाऊरावांचे अवघे जीवन व्यापलेले होते. बाई–भाऊरावांचे जीवनप्रवाह एवढे एकरूप झालेले होते की त्या दोघांचा स्वतंत्र रीतीने मी विचारच करू शकत नाही.

आमचे 'शांतानिवास' हे अनेकांना दिलासा देणारे आपले घर वाटत असे. आयुष्याला सामोरे जात असताना येणारे पेचप्रसंग, समस्या, सुखदुःख बाई–भाऊरावांना मोठ्या विश्वासाने ही मंडळी सांगत आणि आपल्या अडचणींचे समाधानकारक निवारण झाल्याचा आनंद मिळवीत असत. नागपुरात त्या काळात गाजलेल्या एका विवाहाचा योजनाबद्ध आराखडा आमच्या घरीच आखला गेला होता. एक परिस्थितीने सामान्य असलेला पण अतिशय बुद्धिमान तरूण आणि खानदानी, श्रीमंत घराण्यातली तरूणी असा हा प्रेमविवाह होता. अर्थात हा विवाह त्या तरूणीच्या घरच्या लोकांनी सफल होऊ दिला नाही, ही गोष्ट निराळी. पुढे ह्याच तरूणाने न्यायाधीश पदावर आरूढ होऊन आपलया

बुद्धिमत्तेने, कर्तबगारीने यशाचे शिखर गाठले. तर ती तरूणीही साहित्यक्षेत्रात नामवंत गणली गेली. आज दोघेही काळाच्या पडद्याआड गेलेली आहेत. अशा प्रकारचे आणखी दोन विवाह आमच्या घरी ठरले, पार पडले आणि सफलही झाले.

भाऊराव हे पत्रकार, टीकाकार आणि साहित्यिक क्षेत्रात मान्यता पावलेले, तर बाई ही स्वातंत्र्य चळवळीत आघाडीवर असलेली गांधीजींवर नितांत श्रद्धा असलेली सामाजिक कार्यकर्ती होती. सकृतदर्शनी दोघांचीही राजकीय मते अगदी भिन्न आणि कार्यशैली वेगळी दिसत असली तरी, त्याचा, त्यांच्या सहजीवनावर कोणताही परिणाम कधी झालेला दिसला नाही. बाईची कितीतरी जिवावरची दुखणी याही काळात झाली. घरगुती हर्षामर्षाचे प्रसंगही काही कमी झाले असेही नाही. परंतु कोणत्याही वेळी त्यांची एकमेकांची साथ सुटली आहे असे कधी झाले नाही.

नागपुरात त्या काळात येणाऱ्या सर्वच बड्या मंडळींनी आमच्या घरचे आदरातिथ्य स्वीकारणे हा जणु परिपाठच झालेला होता. राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातले पुढारी, साहित्यातले दिग्गज, नाट्य आणि संगीत प्रांतातले थोर कलावंत, चित्रकार – किती म्हणून सांगू आणि कोणाकोणाची नावे घेऊ ? आमच्या घरी येणाऱ्या या सर्व नामांकित मंडळींना, बाई ती काम करीत असलेल्या दादीबाई देशमुख हिंदू मुलींची शाळा, लोकांची शाळा सरस्वती मंदिर इत्यादि संस्थांतून कार्यक्रमांसाठी निमंत्रित करीत असे आणि या संस्थांनाही विनासायास त्याचा लाभ घेता येत असे. अशा या वातावरणात बाबाचे आणि माझे बालपण विकसीत होत गेले.

३० जानेवारी १९४८ रोजी महात्मा गांधींची दुर्दैवी हत्या झाली त्यावेळी उसळलेल्या आगडोंबात 'शांतानिवास'चा ग्रास गिळला गेला. सुखा–समाधानात सुरू असलेल्या संसाराचा डोळ्यादेखत विध्वंस होत असलेला पाहून जेवढ्या वेदना मनाला झाल्या नसतील तेवढ्या वेदना भाऊरावांचा दुर्मिळ–अमूल्य ग्रंथसंग्रह जनसमुदायाकडून अक्षरशः पायदळी तुडवला गेला, टिळकपुतळ्यापर्यंत विखुरला गेला याच्यामुळे बाईच्या जिवाला यातना झाल्या. कधीच भरून न निघणारे असे ते नुकसान होते. कणखर मनाच्या बाईला हा मानसिक धक्का असह्य झाला. कोणच्याही मनाची उभारी वयाच्या पंचविसाव्या वर्षापासून सुरू होते आणि सामान्यतः पन्नाशीनंतर ती उभारी कमी होऊ लागते. पण भाऊराव मात्र याला अपवाद होते. त्या अत्यंत विपरीत आणि प्रतिकूल परिस्थितीतही –

'आकाशीच्या कुऱ्हाडी, घाली खुशाल माथा,

सामर्थ्य मात्र द्यावे, आघात सोसण्याचे'

असे म्हणून ते जिद्दीने उभे ठाकले बाई सावरावी, तिच्या चित्तवृत्ती पूर्वीप्रमाणे प्रसन्न व्हाव्यात म्हणून भाऊरावांनी कर्ज काढून धंतोलीतील अभ्यंकर मार्गावर प्रशस्त बंगला घेतला तो चांगला सजविला. परंतु भाऊरावांची धडपड वाया गेली. बाई दोन वर्ष या 'प्रसाद' बंगल्यात राहू शकली. कॅन्सरने तिचा अकालमृत्यु १८ ऑगस्ट १९५० रोजी झाला. तिला वाचविण्याचे भाऊरावांनी शर्थीचे प्रयत्न केले. परंतु ते सर्व व्यर्थ गेले.

काव्य–शास्त्र–विनोदात हसतखेळत असलेले आमचे विश्व बाईच्या मृत्युने काही काळ खडित झाले. काळ कोणासाठी थांबत नाही. उपजत तल्लख बुद्धी आणि तीव्र ग्रहणशक्ती असलेला बाबा लहानपणी विलक्षण वांड होता. बाई आणि भाऊरावांच्या जिवाला त्यामुळे मोठा घोर असे. अशा या बाबाचा बहरलेला वैभवाला चढलेला संसार बघण्याचे भाग्य भाऊरावांना लाभले, पण त्याने केलेली भरभराट न बघता बाई तशीच गेली. याची खंत आजही मला फार वाटते.

बाईच्या मृत्यूनंतर भाऊरावांना दोन तपाहून अधिक आयुष्य जगायला मिळाले. या अवधीत त्यांनी स्वतःला क्षणभरही मोकळे ठेवले नाही. त्यांनी युरोप, अमेरिकेचा दौरा केला. त्यांच्या कर्तृत्त्वाचा सोपान चढताच राहिला. बाह्यात्कारी रमलेले दिसले तरी भाऊराव अंतर्यामी एकाकीच होते. बाईला ते अजिबात विसरू शकले नाहीत. ती त्यांच्याबरोबर होतीच. बाईच्या हयातीत आणि

नंतरही त्यांनी लिहिलेल्या कादंबरीतील नायिकांवर बाईच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा पूर्णपणे उमटलेला दिसतो बाईच्या आजारपणात ती मुंबईला टाटा आणि डॉ. चुगांच्या हॉस्पिटलमध्ये औपचारार्थ असताना, तिने आणि भाऊरावांनी मला वेळोवेळी लिहिलेल्या पत्रांतून त्यांचा जीवनविषयक दृष्टीकोन, मला केलेल्या सूचना आणि मार्गदर्शन यात कमालीचा सारखेपणा प्रतिबिंबित झालेला आढळतो.

'तरूण–भारत' मधून घरी जाण्याच्या मार्गावर मधेच धतोलीत माझे घर होते भाऊराव ऑफिसातून परतीच्या वाटेवर माझ्याकडे थांबत, मुलांना बघत, चहा घेत–घेत माझ्याशी गप्पा मारत. हा त्यांचा नित्यक्रम होता. आमच्या गप्पांना विषयाचे बंधन नसायचे बोलता बोलता जुन्या आठवणी निघत. भाऊरावांच्या तोंडून 'तुझी आई' हा शब्द निघे. असा शब्द निघाला की आम्ही दोघेही स्तब्ध होत असू. कधी कधी भाऊराव आपल्याच तंद्रीत उठून चालायला लागत. कधी कधी विषयांतर करीत. पण अशावेळी गप्पांमधली खुमारी निघून गेलेली असे. अगदी बालवयापासून भाऊरावांवर संकट परंपरा कोसळत गेली. पण बाईच्या मृत्यूने त्यांचा जीवनरसच जसा शोषून घेतल्यासारखा झाला. आयुष्यात मिळालेले दुःखाचे आणि संकटाचे आघात ही ईश्वरेच्छा समजून त्यांचा स्वीकार त्यांनी केला. त्यांच्या आध्यात्मिक मनाला त्यांनी तसे वळणच मुळी लावून घेतलेले होते. म्हणूनच बाईचा चिरवियोग सहन करून ते मनाने एकाकी झालेले असले तरी बाबाच्या संपन्न आणि समृद्ध संसारात रमलेले दिसले.

१९८० साली अरूंधतीच्या लग्नाचे निमंत्रण मी 'महाराष्ट्र–टाईम्स'चे माजी संपादक आणि बाई–भाऊरावांचे निकटचे कौटुंबिक स्नेही श्री. द्वा. म. कर्णिक यांना पाठविले होते. त्या वेळी त्यांचे मला पत्र आले, त्यात त्यांनी लिहिले होते की, "शांताबाई तर कधीच गेल्या आता भाऊरावही गेले. भाऊराव नसलेल्या नागपुरात येण्याची मला इच्छाच राहिलेली नाही."

कै. जयवंत दळवींनीही अशाच आशयाचे पत्र मला पाठविले होते. मॅजेस्टिक गप्पांसाठी ते नागपुरला आले तो एकमेव अपवाद म्हणावा लागेल.

बाई–भाऊराव आणि आमचा 'शांतानिवास' जाऊन कितीतरी मोठा काळ लोटला आहे. काळ, दिवसगत हे माणसाला सर्व विसरायला लावते म्हणतात. कोणास ठाऊक असेलही कदाचित ! माझा मात्र तसा अनुभव नाही. आज आयुष्याच्या उतरणीवर उभी असलेली मी, बाई–भाऊरावांना जरासुद्धा विसरू शकलेली नाही. त्यांच्या आशीर्वादाचे अदृश्य हात माझ्या आणि माझ्या कुटुंबाच्या मस्तकावर विसावलेले आहेत, अशी आमची दृढ श्रद्धा आहे. माझ्या हृदयात त्यांच्या स्मृती सतत जागृत आहेत. त्या माझ्या भावनिक आणि मानसिक आधार झालेल्या आहेत. दुःखाच्या आणि सुखाच्या काळात सुद्धा !

सौ. मीनाक्षी फडणीस
बी–२०४,
उज्जवल हाऊसिंग सोसा.,
रहाटे कॉलनी, वर्धा रोड, नागपूर.

ऋजू मनाचे भाऊसाहेब !

कमलाकर धारप

भाऊसाहेब माडखोलकर ! एक प्रभावी लेखक, कुशल संपादक आणि माणूसकी जपणारा असामान्य प्रतिभेचा धनी !! माझ्या वयाच्या विसाव्या वर्षी त्यांचा व माझा हृदय संवाद जुळून आला, तो त्यांच्या अखेरपर्यंत टिकला. भिवापूरकरांच्या दवाखान्यात ते असतांना त्यांची भेट घेतली. तीच शेवटची ठरली. नोव्हेंबर १९७६ रोजी भाऊसाहेब गेले आणि एक चालता बोलता ज्ञानकोश अनंतात विलिन झाला. तेव्हा त्यांचे वय ७८ वर्षाचे होते.

भाऊसाहेबांनी पत्रकारिता हे व्रत म्हणून जोपासलं, ते करीत असतांना त्यांचा राजकारणाशी जो संबंध आला. त्यातूनच त्यांच्या राजकीय कादंबऱ्या जन्मास आल्या. त्यांचा व्यासंग, त्यांची बहुश्रुतता त्यांच्या सान्निध्यात असणाऱ्यांना जाणवत असे. १९५२ साली माझी पहिली कथा तरुण भारतात प्रसिद्ध झाली त्यावेळी मी वीस वर्षांचा होतो. भाऊसाहेबांनी त्या कथेचा मोबदला म्हणून सात रूपये म. ऑ. ने पाठविल्याचे आजही आठवत. त्यावरच ते थांबले नाही, तर पत्र पाठवून मला त्यांनी भेटीला बोलावले आणि नियमित लेखन करण्यास सांगितले. "तू काहीही लिहिलेस की ते निःसंकोचपणे तरुण भारत कडे आणून दे. मी ते प्रसिद्ध करीन" असं त्यांनी मला सागून टाकलं होतं.

याच काळात ॲड. ना. रा. कान्हे यांच्यामुळे मला "राष्ट्रशक्ति" साप्ताहिकात काम करण्याची संधी मिळाली. हे साप्ताहिक मात्र नाग मुद्रणालयात छापले जायचे. पण पुढे ते तरुण भारतांच्या छापखान्यात छापले जाऊ लागले, त्यामुळे तरुण भारत कार्यलयात येणे जाणे वाढले. कधी कधी भाऊसाहेबांच्या अग्रलेखाचे डिक्टेशनही करावे. त्यावेळी हे काम बहुधा सुनील सुभेदार करायचे पण ते जेव्हा नसत तेव्हा मग ते मला डिक्टेशन देत, अग्रलेखाची प्रुफे तपासण्याचे काम तेच करीत. हे तपासत असतांना त्यात नवीन मजकूर घातला जाई. दोन–तीनदा प्रुफं तपासल्याशिवाय त्यांचा अग्रलेख तयार होत नसे. त्यांच्याजवळ सांगण्यासारखं इतकं असायचं की त्यातून अग्रलेखात किती द्यावं नि किती नाही असं त्यांना होत असे.

'तरुण भारत' कार्यालयात त्यांची खोली दर्शनी भागातच होती. त्याला जोडून संपादक विभाग होता. त्यावेळी संपादक विभागात तात्यासाहेब करकरे, ए. श्री. पटवर्धन, गो. गो. गोखले, चं. प. भिशीकर, केशवराव पोतदार अशी भिन्न प्रकृतीची माणसं होती. त्यांच्यात जे वैचारिक आदान–प्रदान होत असे ते माझ्यासाठी पर्वणीसारखे असायचे.

भाऊसाहेब माडखोलकर हे वृत्तीने मोकळे होते. डोक्यावर टक्कल असल्याने कपाळ खूप भव्य दिसायचं. डोळे भेदक होते आणि चष्म्यातून ते जेव्हा एखाद्या व्यक्तीकडे बघत तेव्हा समोरच्या व्यक्तीच्या अंतरंगाचा ते जणू भेद घेत आहेत असंच वाटे. त्यांच्या खोलीत सतत माणसं बसलेली असत आणि त्यांच्याशी गप्पा करीत त्यांचं काम सुरू असे. सायंकाळी साडेसहा सातच्या सुमारास ते घरी जायला निघत. तरुण भारत कार्यालय ते धंतोली हा त्यांचा प्रवास पायीच व्हायचा आणि यावेळी त्यांच्या सोबत माणसांचा घोळका असायचा. त्यांच्याशी गप्पा गोष्टी, हास्यविनोद करीत ते घरापर्यंत जात.

भाऊसाहेबांचे वाचन दांडगे होते. संस्कृत वाङमयाचा त्यांचा अभ्यास होता. स्मरणशक्ती जबरदस्त होती. म्हणूनच त्यांना चालताबोलता ज्ञानकोश म्हटले जायचे. कुणाशी केव्हा भेट झाली. त्यावेळी काय काय बोलणे झाले हे सर्व ते तारीख वार वर्षासह उद्धृत करायचे तेव्हा आम्हाला मोठे आश्चर्य वाटायचे. राजकीय व्यक्तीसोबत उठबस असणारा त्यांच्यासारखा संपादक विरळाच. पं. रविशंकर शुक्ला किंवा पं. द्वारकाप्रसाद मिश्र हे सतत सल्लामसलतीसाठी त्यांना बोलावून घेत यावरून त्यांच्या सरकारदरबारी असलेल्या वजनाची कल्पना येऊ शकते.

१९५४ साली मी पत्रकारिता सोडून सरकारी नोकरीत प्रवेश केला, कारण उपजीविकेचे साधन म्हणून पत्रकारिता ही त्या काळी तितकीशी आकर्षक नव्हती. मी सरकारी नोकरी पत्करल्याचे भाऊसाहेबांना समजले तेव्हा त्यांनी मला जे पत्र पाठवले ते मी अजूनही जपून ठेवलं आहे. त्यात त्यांनी लिहिले होते. "तू मला प्रिय आहेस म्हणून मी तुला हे पत्र लिहित आहे. सरकारी नोकरीत प्रवेश करून तू फार मोठी चूक करीत आहेस असे मला वाटते"

मी वृत्तपत्रातच काम करावे, तेच माझे खरे क्षेत्र आहे असे त्यांना वाटत होते व ते त्यांनी स्पष्टपणे बोलून दाखविले. त्यानंतर माझे तरुण भारतात जाणे येणे कमी झाले पण तरीही माझ्या कथा तरुणभारतातून प्रसिद्ध होतच होत्या. माझ्या पहिल्या कथासंग्रहाचे प्रकाशन भाऊसाहेबांच्या उपस्थितीत वामनराव चोरघडे यांच्या हस्ते झाले होते तेव्हाही भाऊसाहेबांनी मला उज्वल भविष्यासाठी आशीर्वाद दिले होते.

१९७१ साली 'लोकमत' दैनिकात मी काम करू लागल्यावर त्यांचा आशीर्वाद घेण्यासाठी मी गेलो तेव्हा त्यांनी त्या जुन्या पत्राची आठवण करून देत उशिरा का होईना तू योग्य मार्ग स्वीकारलास म्हणून मला शुभेच्छा दिल्या.

वृत्तपत्र क्षेत्रात वाटचाल करीत असतांना भाऊसाहेबांनी दिलेल्या प्रोत्साहनाची त्यांच्या आदर्शाची आठवण होते.

कमलाकर धारप
रामदासपेठ,
नागपूर - १०.

।। कै. माडखोलकरांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटना ।।

जन्म – २८ डिसेंबर १८९९, मुबई येथे स्वतःच्या घरात.

२८.१.१९१६	"देशसेवक संघ" स्थापना.
मे १९१८	मॅट्रीक परीक्षेत अनुतीर्ण व पुन्हा त्या परीक्षेला न बसण्याचा निर्धार.
मे १९२०	श्री. कृ. कोल्हटकर व माडखोलकर यांची "विविधज्ञान विस्तार" चे संपादक श्री. राव साहेब मोरमकर यांचे घरी पहिली भेट झाली. इथूनच माडखोलकरांच्या गुरूपूजेला प्रारंभ झाला.
१२.२.१९२१	न. चिं. उर्फ तात्यासाहेब केळकर यांच्याशी माडखोलकरांची ओळख झाली. या भेटीला कारण झाले ते असे की तात्यासाहेबांनी "केसरी" मध्ये प्रसिद्ध झालेले माडखोलकरांचे "सिनकेन" या आयर्लंडातील चळवळीवरील लेख वाचले. हे लेख त्यांना अतिशय आवडले व त्यांनी माडखोलकरांना पत्राद्वारे भेटीचे निमंत्रण दिले.
२९.११.१९२२	माडखोलकर पुण्यात राहावयाला आले.
मार्च १९२३ ते जुलै १९२४	"काव्यशास्त्र विनोद" व "परराष्ट्रीय राज कारण" या "ज्ञानप्रकाश"च्या दोन विभागाचे संपादकत्व तसेच "रविकिरण मंडळ" ची स्थापना व सभासदत्व माडखोलकरांनी स्वीकारले.
२४.७.१९२४	१९२२ ते १९२४ या काळातील माडखोलकरांना असलेला "सर्व्हट्स ऑफ इंडिया" या सोसायटीचा आधार संपुष्टात आला.
२४.७.१९२४	पुणे सोडून माडखोलकर नागपूरला आले व "महाराष्ट्र" या मराठी वृत्तपत्राचे अर्ध–साप्ताहिकासह संपादक झाले.
२९.५.१९२५	शांताबाईच्या सोबत विवाह झाला.
६.८.१९३०	तळेगांव येथे झालेल्या जंगल सत्याग्रहात माडखोलकरांनी सक्रिय भाग घेतला. परिणामी त्यांना ४ महिन्यांची सश्रम कारावासाची शिक्षा झाली.
७.६.१९३७	महेश्वर येथे झालेल्या "मध्य भारतीय संमेलना"चे अध्यक्षपद भूषविले.
६.१.१९४०	उज्जैन येथील "महाराष्ट्र वाङ्मय मंडळ" चे अध्यक्षपद भूषविले.

अनुक्रमणिका

२८.१.१९४०	"संयुक्त महाराष्ट्र सभा" स्थापन केली.
२८.५.१९४०	पुणे येथील "शारदोपासक संमेलना"चे अध्यक्षपद भूषविले.
२६.११.१९४०	कल्याण येथे "मुंबई उपनगर साहित्य संमेलना"चे अध्यक्षपद भूषविले.
१.२.१९४१	बडोदे येथे "वाङ्मय मंडळा"चे अध्यक्षपद भूषविले.
२६.७.१९४१	मुंबई येथे "मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालया"चे अध्यक्षपद भूषविले.
३०.११.१९४४	नागपूर येथून प्रकाशित होत असलेल्या "महाराष्ट्र" या अर्धसाप्ताहिकातील सहसंपादकाच्या जागेचा माडखोलकरांनी राजीनामा दिला.
२.१.१९४४	नागपूर येथील "तरुण भारत"चे संपादक. "नरकेसरी प्रकाशना"ची व "तरुण भारता"ची स्थापना केली.
२८.५.१९४५	औरंगाबाद येथे "मराठवाडा साहित्य संमेलना"चे अध्यक्षपद भूषविले.
१२.५.१९४६	बेळगांव येथे "महाराष्ट्र साहित्य संमेलना" अंतर्गत "साहित्य सभा" झाली तिचे अध्यक्षपद भूषविले.
२८.७.१९४६	"संयुक्त महाराष्ट्र परिषदेची" स्थापना केली.
२.२.१९४८	"शांता निवास" व "नरकेसरी प्रकाशन" यांची नागपूरातील समाजकंटकांनी गांधीवधाच्या दंगलीत जाळपोळ केली.
.१९५०	प्रिय पत्नी शांताबाईचा मृत्यु झाला.
.१९५७	अमेरिकेच्या दौऱ्यावर माडखोलकर गेले. हा दौरा अमेरिकेतील वृत्तपत्र व्यवसायाची ओळख करुन घेण्यासाठी होता.
.१९६३	या वर्षी माडखोलकरांनी पश्चिम जर्मनीचा दौरा केला. या दौऱ्यातही वृत्तपत्रीय लेखक व व्यवसायिक यांच्या भेटी अभिप्रेत होत्या.
२७.११.१९७६	वृद्धापकाळातील दीर्घ मुदतीच्या आजारपणानंतर, त्यांच्या नागपूर येथील निवासस्थानी माडखोलकर कालवश झाले.

(डॉ. श्रीनिवास सिरास यांच्या अप्रकाशित प्रबंधातून)

अनुक्रमणिका

कै. माडखोलकरांचे साहित्य

कादंबऱ्या	मुक्तात्मा, भंगलेले देऊळ, शाप, कांता, मुखवटे, दुहेरी जीवन, डाक-बंगला, नागकन्या, चंदनवाडी, प्रमद्वरा नवे संसार, अनघा, स्वप्नांतरिता, अरुंधती, रूक्मिणी, उर्मिला, सत्यभामा, रेणुका, जन्मदुर्दैवी.
कथासंग्रह	रातराणीची फुले, शुक्राचे चांदणे.
नाटके	देवयानी, उर्वशी.
प्रबंध	विष्णु कृष्ण चिपळूणकर, आधुनिक कविपंचक, विलापिका, माझे आवडते लेखक, वाङ्मय-विलास, स्वैर विचार, अवशेष, आव्हान, जीवनसाहित्य, माझी नभोवाणी, परामर्श, हाक, सुभाषवाद, दोन तपे, चिपळूणकर काल आणि कर्तृत्व, माझे आवडते कवी, माझे लेखन गुरू, व्यक्तिरेखा, एका निर्वासिताची कहाणी, मी पाहीलेली अमेरिका, निर्माल्य, पखरण, मी आणि माझे साहित्य, कोल्हटकर व्यक्तिदर्शन, व्यक्ति तितक्या प्रकृति, साहित्य शलाका, आधुनिक महाराष्ट्राचा वारसा, साहित्य समस्या, मी आणि माझे वाचक, महाराष्ट्राचे संचित.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ
विक्रीस तयार असलेली प्रकाशने

१.	संशोधन लेखसंग्रह, भाग – २ कै. हरिभाऊ नेने	रु. ६/–
२.	प्रयोगक्षम मराठी नाटके डॉ. मु. श्री. कानडे	रु. ३०/–
३.	मराठी वर्णोच्चार विकास डॉ. द. ह. अग्निहोत्री	रु. ३२/–
४.	अध्यक्षीय भाषणे सा. भू. तु. ना. काटकर (विदर्भ साहित्य संघाच्या संमेलनाध्यक्षांच्या भाषणांचे संकलन)	७५/–
५.	आणखी भाषणे डॉ. मधुकर आष्टीकर	१०/
६.	तीन भाषणे गणेश व्याख्यानमाला १९७७ डॉ. र श. केळकर	४/-
७.	"प्रातिभ" लघुकथा संग्रह (१९८०)	२०/-
८.	समग्र बजाबा	२०/-
९.	हिंदी मराठी भाषा प्रवेशिका श्रीमती मालतीबाई श्रीखंडे	४/–
१०.	ज. के. उपाध्ये यांची १८८३–१९१३ कविता संपा. आशा सावदेकर	३०/-
११.	दक्षिणेतील दोन आचार्य तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी	रु ५/–
१२.	मराठी गद्य प्रा. श्री. गो. काशीकर	रु. ३/–
१३.	संपूर्ण गडकरी भाग – १ व २ (म. रा. सं. मं.)	रु. ७५/–
१४.	युगवाणी साहित्य सूची (संपादन केशव जोशी)	रु. ७०/–
१५.	कविता विदर्भाची डॉ. सौ. आशा सावदेकर	रु. ५०/–
१६.	छंदशास्त्र एक अध्ययन कुंदन दिवाण	रु. १०/–
१७.	वसंत वैभव डॉ. सौ. कुंदा केळापुरे / डॉ. मदन कुळकर्णी	रु. ८०/–
१८.	धन्यतेची थाप डॉ. वि. भि. कोलते	रु.१००/–
१९.	वक्ता दशसहस्रेषु (प्रा. राम शेवाळकर) संपादक डॉ. वि. स. जोग	रु.१२५/–

- १. संमेलन स्थळी एकूण १००/– रु. किंमतीच्या पुस्तकांवर १० टक्के सूट.
- २. शाळा / महाविद्यालय / ग्रंथालये / विक्रेत्यांकरिता २५ टक्के सूट.

युगवाणी जाहिरात दर

आवरण पृष्ठ – ४	रु. ५०००/–	पूर्ण पान	रु. २०००/–
आवरण पृष्ठ – ३	रु. ३०००/–	अर्ध पान	रु. १०००/–
आवरण पृष्ठ – २	रु. ३०००/–	पाव पान	रु. ५५०/–


संपर्क सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, सीतावर्डी, नागपूर – १२. ■ भाप

Printed at : SHARP GRAPHICS, NAGPUR. Phone 540352

युगवाणी

वार्षिक / ९७

मूल्य रु. ३०



अनुक्रमणिका